# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.२०/ २०१५** **दिनांक १०.११.२०१५**

**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- सकाळी १०.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक १०.११.२०१५ रोजी सकाळी १०.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ४४७५/ २०१५, दिनांक ०९ नोव्हेंबर, २०१५ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. तयानुसार सदरहू सभा मंगळवार दिनांक १०.११.२०१५ रोजी सकाळी १०.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.श्रीकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.श्रीकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य

मा.श्री.अप्पासाहेब शिंदे,
उपकार्यकारी अधिकारी,

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्री.बाजीराव शिंदे, कार्यकारी अधिकारी तथा सदस्य यांनी दूरध्वनीवरुन कळविलेले होते, त्यांच्या दूरध्वनी संदेशाची नोंद घेऊन, समितीने त्यांना अनुपस्थित रहाणेची अनुमती दिली.

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत येऊन, मा.अध्यक्ष श्री.श्रीकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **माहे एप्रिल- २०१४ ते मार्च- २०१५ अखेर लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत पुरविण्यात आलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कामगारांचा प्रतिदीन व श्रमदिन संख्येचे विभागनिहाय तपशिलवार तक्ते प्रत्येक महिन्यास मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेसाठी सादर करणेत यावेत व आर्थिक वर्षाचे शेवटी उपरोक्त विषयांचा एकत्रित अहवाल मा.व्यवस्थापन समिती समोर नोंद घेण्यासाठी सादर करणेत यावा बाबत मा.विश्वस्तांचे सूचने नुसार उपरोक्त संदर्भीय ठरावान्वये मान्यता मिळालेली आहे. उपरोक्त मा.विश्वस्तांचे सूचनेनुसार माहे एप्रिल-२०१४ ते माहे मार्च-२०१५ अखेर या आर्थिक वर्षात दरमहा संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत पुरविण्यात आलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कामगारांचा प्रतिदीन व श्रमदिन संख्येचा तपशिल खालीलप्रमाणे देत आहोत.

| अ.नं | कालावधी | अकुशल | | कुशल | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रतिदिन संख्या | श्रमदिन संख्या | प्रतिदिन संख्या | श्रमदिन संख्या | प्रतिदिन संख्या | श्रमदिन संख्या |
| ०१ | एप्रिल-२०१४ लेबर | ८६७ | २५६२४ | ३८१ | १०७७४ | १२४८ | ३६३९८ |
| | सिक्युरीटी | ५५९ | १६७६८ | ३८ | १०९६ | ५९७ | १७८६४ |
| | **एकूण** | **१४२६** | **४२३९२** | **४१९** | **११८७०** | **१८४५** | **५४२६२** |
| ०२ | मे-२०१४ लेबर | ८३२ | २५३८५ | ३६८ | १०५६३ | १२०० | ३५९४८ |
| | सिक्युरीटी | ५३४ | १६५४८ | ३६ | १०८१ | ५७० | १७६२९ |
| | **एकूण** | **१३६६** | **४१९३३** | **४०४** | **११६४४** | **१७७०** | **५३५७७** |
| ०३ | जून- २०१४ लेबर | ८५१ | २५१४३ | ३७२ | १०४०६ | १२२३ | ३५५४९ |
| | सिक्युरीटी | ५७० | १७०८६ | ३८ | १११८ | ६०८ | १८२०४ |
| | **एकूण** | **१४२१** | **४२२२९** | **४१०** | **११५२४** | **१८३१** | **५३७५३** |
| ०४ | जूलै- २०१४ लेबर | ८८५ | २६९९९ | ३८३ | १११२८ | १२६८ | ३८१२७ |
| | सिक्युरीटी | ५८१ | १७९९५ | ३८ | ११६२ | ६१९ | १९१५७ |
| | **एकूण** | **१४६६** | **४४९९४** | **४२१** | **१२२९०** | **१८८७** | **५७२८४** |
| ०५ | ऑगष्ट- २०१४ लेबर | ८६४ | २६४१२ | ३८६ | १११६९ | १२५० | ३७५८१ |
| | सिक्युरीटी | ५८० | १७३५० | ३९ | ११३७ | ६१९ | १८४८७ |
| | **एकूण** | **१४४४** | **४३७६२** | **४२५** | **१२३०६** | **१८६९** | **५६०६८** |
| ०६ | सप्टेंबर- २०१४ लेबर | ८७६ | २५८३८ | ३९३ | ११२१८ | १२६९ | ३७०५६ |
| | सिक्युरीटी | ५९१ | १७६४१ | ४१ | ११३१ | ६३२ | १८७७२ |
| | **एकूण** | **१४६७** | **४३४७९** | **४३४** | **१२३४९** | **१९०१** | **५५८२८** |
| ०७ | ऑक्टों-२०१४ लेबर | ८४२ | २५६७१ | ३८० | १०९६० | १२२२ | ३६६३१ |
| | सिक्युरीटी | ५५८ | १७१७३ | ४० | ११४६ | ५९८ | १८३१९ |
| | **एकूण** | **१४००** | **४२८४४** | **४२०** | **१२१०६** | **१८२०** | **५४९५०** |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०८ | नोव्हें- २०१४ लेबर | ८४५ | २५०३६ | ३९२ | १०९७१ | १२३७ | ३६००७ |
| | सिक्युरीटी | ५५५ | १६४३५ | ३९ | ११११ | ५९४ | १७५४६ |
| | **एकूण** | **१४००** | **४१४७१** | **४३१** | **१२०८२** | **१८३१** | **५३५५३** |
| ०९ | डिसें-२०१४ लेबर | ८६७ | २६४८४ | ३९३ | ११५६९ | १२६० | ३८०५३ |
| | सिक्युरीटी | ५७० | १७५५७ | ४२ | १२४० | ६१२ | १८७९७ |
| | **एकूण** | **१४३७** | **४४०४१** | **४३५** | **१२८०९** | **१८७२** | **५६८५०** |
| १० | जाने-२०१५ लेबर | ८५६ | २६०८७ | ३९६ | ११५९१ | १२५२ | ३७६३८ |
| | सिक्युरीटी | ५६४ | १७३७५ | ४३ | १२०८ | ६०७ | १८५८३ |
| | **एकूण** | **१४२०** | **४३४६२** | **४३९** | **१२७५९** | **१८५९** | **५६२२१** |
| ११ | फेब्रू-२०१५ लेबर | ८३० | २२८४१ | ३९६ | १०४२१ | १२२६ | ३३२६२ |
| | सिक्युरीटी | ५६४ | १५७५२ | ४१ | ११०२ | ६०५ | १६८५४ |
| | **एकूण** | **१३९४** | **३८५९३** | **४३७** | **११५२३** | **१८३१** | **५०११६** |
| १२ | मार्च-२०१५ लेबर | १००४ | २५५५८ | ५१४ | १२५३४ | १५१८ | ३८०९२ |
| | सिक्युरीटी | ६७३ | १७४०३ | ७० | १२१४ | ७४३ | १८६१७ |
| | **एकूण** | **१६७७** | **४२९६१** | **५८४** | **१३४७८** | **२२६१** | **५६४३९** |

उपरोक्त नमूद केले प्रमाणे **माहे एप्रिल-२०१४ ते माहे मार्च-२०१५** अखेर या आर्थिक वर्षात दरमहा संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत कुशल, अकुशल व सुरक्षा कामगार आवश्यकतेप्रमाणे लावणेत आलेले आहे. तरी त्याची नोंद घेणेत येवून, त्यास मान्यता असावी.

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे माहे एप्रिल-२०१४ ते माहे मार्च-२०१५ अखेर या आर्थिक वर्षात दरमहा संस्थानला लेबर/ सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत आवश्यकतेनुसार लावण्यात आलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कर्मचा-यांच्या/ कामगारांच्या मुनष्य दिनाच्या संख्येची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.०२** **माहे एप्रिल-२०१४ ते मार्च-२०१५ अखेर या कालावधीत दर्शनरांगेतील साईभक्तांना मोफत प्रसाद लाडू/ बुंदी वाटपाकामी झालेल्या खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले विनियम मधील 17 (1) मध्ये भक्तगणाना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात अशी तरतूद केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.26/07/2013 रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रं.537मध्ये दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत प्रसाद लाडू/बुंदी वाटप करणेबाबत निर्णय झालेला आहे.

उपरोक् सभेतील निर्णयानूसार दि.15 ऑग ट 2013 पासून दर्शनरांगेतील साईभक्तांना प्रत्येकी 100 ग्रॅमचे एक पाकीट या प्रमाणे प्रसाद लाडू /बूंदि पाकीटांचे वाटप करण्यात येत आहे. मा.मुख्य लेखाधिकारी सो.यांनी संदर्भीय क्रं.1 चे पत्रान्वये मोफत लाडू वाटपाचे स्वतंत्र रजिस्टर ठेवावे .प्रत्येक दिवशी उत्पादित केलेली प्रसादलाडू /बुंदि पाकीटे वाटप केलेली पाकिटे व शिल्ल्क राहीलेली पाकीटे यांचे विवरण् दररोज स्वतंत्र ठेवावे. प्रत्येक महिन्यात वाटप केलेले प्रसाद लाडू/ बुंदि पाकीटे व त्यासाठी झालेल्या खर्चाची रक्कम जमा नावे करणेसाठी प्रत्येक महिन्यात तक्तातयार करुन लेखाशाखेकडे पाठविण्यात यावा. प्रत्येक महिन्यात प्रसादरुपी वाटप झालेली प्रसाद लाडू /बुंदी पाकीटे व त्यासाठी एकूण निर्धारीत किंमत याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये नोंद घेणेसाठी विषय ठेवण्यात यावा .प्रत्येक महिन्याचे मोफत प्रसाद लाडू/ बुदि पाकीटांचे रेकॉर्ड अंतर्गत लेखापरीक्षका मार्फत तपासून घेण्यात यावे असे निर्देश दिलेले आहेत.

मा.मुख्य लेखाधिकारी यांचे उपरोक् निर्देशाप्रमाणे कॅन्टीन विभागामार्फत् प्रत्येक महिन्यात प्रसाद लाडू /बुंदि पाकीटांचे वाटप, शिल्ल्क पाकीटे, मासिक खर्च, जमा नावे करणे इत्यादी कार्यवाही करण्यात येत आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.26/06/2014 रोजीचे सभेतील विषय नं.8 निर्णय क्रं. 564 अन्वये दर्शन रांगेतील भक्तांना वाटप केलेला प्रसाद लाडू/ बुंदि खर्चाचा मासिक अहवाल मा.कार्यकारी अधिकारी सो.यांचे मान्यतेसाठी सादर करणेत यावा व आथिक वर्षाचे शेवटी एकत्रित अहवाल.मा.व्यवस्थापन समीतीसमोर नोंद घेणेसाठी सादर करणेत यावा असा निर्णय झालेला आहे.

कॅन्टिन विभागामार्फत् प्रसाद लाडू /बुंदि वाटपासाठी झालेल्या खर्चाचा मासिक अहवाल मा.का/अ. यांचे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे. संदर्भीय क्रं.2 चे मा.व्य्.समितीचे निर्णया नुसार माहे/एप्रिल- 2014 ते मार्च-2015 आथिक वर्षामध्ये मोफत प्रसाद बुंदि /लाडू वाटपासाठी झालेल्या खर्च खालीलप्रमाणे-

| अ.नं | महिना | प्रसाद लाडू/बुंदि पाकीटे संख्या | झालेला खर्च |
|---|---|---|---|
| 01 | एप्रिल -2014 | 1459500 | 19674408 |
| 02 | मे-2014 | 1716000 | 23131680 |
| 03 | जून-2014 | 1818000 | 23881041 |
| 04 | जूलै-2014 | 1696650 | 20325867 |

| | | | |
|---|---|---|---|
| 05 | ऑगस्ट-2014 | 1503900 | 18546300 |
| 06 | सप्टेंबर-2014 | 1183500 | 14983110 |
| 07 | आक्टोंबर-2014 | 1433800 | 16295880 |
| 08 | नोव्हेंबर-2014 | 1559700 | 19371474 |
| 09 | डिसेंबर- 2014 | 1624350 | 19638391 |
| 10 | जाने-2015 | 1627650 | 19564353 |
| 11 | फेंब्रुवारी-2015 | 1170450 | 12816427 |
| 12 | मार्च-2015 | 1321500 | 14496855 |
| | एकूण- | 18115000 | 222725786 |

माहे/ एप्रिल- 2014 ते मार्च- 2015 इतके प्रसाद लाडू /बुंदि पाकीटांचे दर्शन रांगेत वाटप केलेले असून सदरचे आथिक वर्षात याकामी एकूण रु.222725786/- (बावीस कोटी सत्तावीस लाख् पचंवीस हजार सातशे शेहांशी मात्र) इतकी झालेली आहे.तरी उपरोक्ताप्रमाणे दर्शन रांगेत साईभक्तांना वाटप करणेत आलेले मोफत लाडू/बुंदी पाकीटे व त्याची निर्धारीत किमतीबाबतची माहीती मा.व्यवस्थापन समितीचे सभेत नोंद घेणे कामी सवीनय सादर.

**निर्णय क्र.४३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे दर्शन रांगेतील साईभक्तांना प्रसाद स्वरुपात मोफत वाटप करण्यात आलेल्या १,८१,१५,००० नग लाडू/ बूंदी पाकिटांची व त्यासाठी आलेल्या रु.२२,२७,२५,७८६/- मात्र खर्चाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.०३** **जमा खर्च तक्ता माहे फेब्रुवारी- २०१५.**

माहे, फेब्रुवारी- २०१५ मधील जमा व खर्चाच्या तक्त्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.४३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जमा-खर्च तक्ता माहे फेब्रुवारी- २०१५ चे अवलोकन करत असताना त्यामध्ये दर्शविलेली टक्केवारी प्रथमदर्शी चुकीची असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. याबाबत लेखाधिकारी यांनी पुढील सभेसमोर बिनचुक माहिती फेरसादर करावी तसेच ऑक्टोबर- २०१५ महिना अखेरचे जमाखर्च पत्रकेही तातडीने सभेसमोर सादर करण्यात यावीत, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.०४** **बांधकाम प्रगतीअहवाल ब तक्ता – (अंतिम बीले)**

बांधकाम प्रगती अहवाल ब तक्ता- (अंतीम बीले) च्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविणेत आल्या होत्या.

**निर्णय क्र.४३९** **बांधकाम प्रगती अहवालाच्या ब (अंतीम बीले) तक्त्याचे अवलोकन करणेत येऊन, सर्व कामांचे स्वरुप समितीने समजावून घेतले व त्यावर साधक-बाधक चर्चा होऊन, कामे पूर्ण झालेली असल्यामुळे संबंधीत ठेकेदारांची अंतीम बीले अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०५** **श्री साईनाथ रुग्णालयामध्ये माहे एपिल-२०१४ ते मार्च-२०१५ अखेर या कालावधीत वैद्यकिय बिलात देण्यात आलेल्या सवलतीची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीमधील निर्णय क्र.५१९/२०११ दि.२४/०७/२०११ अन्वये श्री साईनाथ रुग्णालयामध्ये माहे एप्रिल २०१४ ते मार्च २०१५ या अर्थिक वर्षामध्ये रुग्णांना एकुण रु.४२,१५,२८९/- रुपये इतकी वैद्यकीय बिलात सवलत देण्यात आली आहे. रुग्णांच्या गटवारीनुसार विवरण खालीलप्रमाणे:-

**<u>माहे एप्रिल २०१४</u>**

| अ.नं | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | अतिदारिद्र्य रेषेखालील रुग्णांना दिलेल्या सवलतीची रक्कम (INDIGENT) | ४२ | २०,८१० | - | २०,८१० |
| २ | गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम (WEAKER) | १४७ | १,३३,७२२ | ६४,५४८ | ६९,१७४ |
| ३ | श्री साईनाथ रक्तपेढी अंतर्गत गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १२० | ३२,१५० | - | ३२,१५० |
| ४ | श्री साईनाथ रक्तपेढी राजीवगांधी आरोग्य योजना अंतर्गत दिलेली सवलत | ६१ | १,०८,५०० | - | १,०८,५०० |
| | एकुण | ३७० | २,९५,१८२ | ६४,५४८ | २,३०,६३४ |

**<u>माहे मे- २०१४</u>**

| अ.नं | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | अतिदारिद्र्य रेषेखालील रुग्णांना दिलेल्या सवलतीची रक्कम (INDIGENT) | ४१ | ५४,२२८ | - | ५४,२२८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम (WEAKER) | २२२ | १,८५,४६९ | ९१,९७५ | ९३,४९४ |
| ३ | श्री साईनाथ रक्तपेढी अंतर्गत गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १४२ | ३८,०५० | - | ३८,०५० |
| ४ | श्री साईनाथ रक्तपेढी राजीवगांधी आरोग्य योजना अंतर्गत दिलेली सवलत | ४६ | ७६,९५० | - | ७६,९५० |
| | एकुण | ४५१ | २,७७,७४७ | ९१,९७५ | २,६२,७२२ |

**माहे जुन २०१४**

| अ.नं | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | अतिदारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेल्या सवलतीची रक्कम (INDIGENT) | ४२ | २२,१७४ | - | २२,१७४ |
| २ | गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम (WEAKER) | २३८ | २,२५,५५२ | १,१०,००९ | १,१५,५४३ |
| ३ | श्री साईनाथ रक्तपेढी अंतर्गत गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १४२ | ४१,९०० | - | ४१,९०० |
| ४ | श्री साईनाथ रक्तपेढी राजीवगांधी आरोग्य योजना अंतर्गत दिलेली सवलत | ७२ | १,२७,०५० | - | १,२७,०५० |
| | एकुण | ४९४ | ४,१६,६७६ | १,१०,००९ | ३,०६,६६७ |

**माहे जुलै २०१४**

| अ.नं | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | अतिदारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेल्या सवलतीची रक्कम (INDIGENT) | ३४ | ३०,५६३ | - | ३०,५६३ |
| २ | गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम (WEAKER) | २२४ | २,६२,५३२ | १,४३,६४१ | १,१८,८९१ |
| ३ | श्री साईनाथ रक्तपेढी अंतर्गत गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १८१ | ५८,५५० | - | ५८,५५० |
| ४ | श्री साईनाथ रक्तपेढी राजीवगांधी आरोग्य योजना अंतर्गत दिलेली सवलत | ९६ | १,९६,१५० | - | १,९६,१५० |
| | एकुण | ५३५ | ५,४७,७९५ | १,४३,६४१ | ४,०४,१५४ |

**माहे ऑगस्ट २०१४**

| अ.नं | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | अतिदारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेल्या सवलतीची रक्कम (INDIGENT) | ३७ | ३२,५१७ | - | ३२,५१७ |
| २ | गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम (WEAKER) | २३३ | २,५३,४८६ | १,३७,१४८ | १,१६,३३८ |
| ३ | श्री साईनाथ रक्तपेढी अंतर्गत गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १६७ | ५३,४५० | - | ५३,४५० |
| ४ | श्री साईनाथ रक्तपेढी राजीवगांधी आरोग्य योजना अंतर्गत दिलेली सवलत | १२२ | २,४६,८५० | - | २,४६,८५० |
| | एकुण | ५५९ | ५,८६,३०३ | १,३७,१४८ | ४,४९,१५५ |

**माहे सप्टेंबर २०१४**

| अ.नं | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | अतिदारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेल्या सवलतीची रक्कम (INDIGENT) | ३७ | १९,६८४ | - | १९,६८४ |
| २ | गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम (WEAKER) | १८० | २,५९,४७४ | १,३९,५२६ | १,१९,९४८ |
| ३ | श्री साईनाथ रक्तपेढी अंतर्गत गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १४२ | ४७,६०० | - | ४७,६०० |
| ४ | श्री साईनाथ रक्तपेढी राजीवगांधी आरोग्य योजना अंतर्गत दिलेली सवलत | १०९ | १,९३,०५० | - | १,९३,०५० |
| | एकुण | ४६८ | ५,१९,८०८ | १,३९,५२६ | ३,८०,२८२ |

**माहे ऑक्टोबर २०१४**

| अ.नं | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | अतिदारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेल्या सवलतीची रक्कम (INDIGENT) | ३२ | ५०,९१८ | - | ५०,९१८ |
| २ | गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम (WEAKER) | १९२ | २,५५,१७० | १,४०,६०१ | १,१४,५६९ |
| ३ | श्री साईनाथ रक्तपेढी अंतर्गत गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १३३ | ४३,००० | - | ४३,००० |
| ४ | श्री साईनाथ रक्तपेढी राजीवगांधी आरोग्य योजना अंतर्गत दिलेली सवलत | ११० | १,९२,५०० | - | १,९२,५०० |
| | एकुण | ४६७ | ५,४१,५८८ | १,४०,६०१ | ४,००,९८७ |

**माहे नोंव्हेबर २०१४**

| अ.नं | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | अतिदारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेल्या सवलतीची रक्कम (INDIGENT) | ३२ | १६,४९४ | - | १६,४९४ |
| २ | गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम (WEAKER) | १९३ | १,९७,५५६ | ९६,२७४ | १,०१,२८२ |
| ३ | श्री साईनाथ रक्तपेढी अंतर्गत गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १४२ | ३१,००० | - | ३१,००० |
| ४ | श्री साईनाथ रक्तपेढी राजीवगांधी आरोग्य योजना अंतर्गत दिलेली सवलत | ११४ | १,८८,६५० | - | १,८८,६५० |
| | एकुण | ४८१ | ४,३३,७०० | ९६,२७४ | ३,३७,४२६ |

**माहे डिसेंबर २०१४**

| अ.नं | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | अतिदारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेल्या सवलतीची रक्कम (INDIGENT) | ४० | १८,७०९ | - | १८,७०९ |
| २ | गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम (WEAKER) | २३४ | २,६४,१९४ | १,४७,११३ | १,१७,०८१ |
| ३ | श्री साईनाथ रक्तपेढी अंतर्गत गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १९२ | ६०,००० | - | ६०,००० |
| ४ | श्री साईनाथ रक्तपेढी राजीवगांधी आरोग्य योजना अंतर्गत दिलेली सवलत | १०२ | १,५९,८५० | - | १,५९,८५० |
| | एकुण | ५६८ | ५,०२,७५३ | १,४७,११३ | ३,५५,६४० |

**माहे जानेवारी २०१५**

| अ.नं | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | अतिदारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेल्या सवलतीची रक्कम (INDIGENT) | ३२ | २८,६०३ | - | २८,६०३ |
| २ | गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम (WEAKER) | २४९ | २,५३,५३४ | १,३४,२८० | १,१९,२५४ |
| ३ | श्री साईनाथ रक्तपेढी अंतर्गत गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १२० | ४८,९५० | - | ४८,९५० |
| ४ | श्री साईनाथ रक्तपेढी राजीवगांधी आरोग्य योजना अंतर्गत दिलेली सवलत | १३८ | २,२३,६०० | - | २,२३,६०० |
| | एकुण | ५३९ | ५,५४,६८७ | १,३४,२८० | ४,२०,४०७ |

**माहे फेब्रुवारी २०१५**

| अ.नं | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | अतिदारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेल्या सवलतीची रक्कम (INDIGENT) | ३१ | १४,२७६ | - | १४,२७६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम (WEAKER) | १४५ | १,७३,२९३ | ९६,८२० | ७६,३४६ |
| ३ | श्री साईनाथ रक्तपेढी अंतर्गत गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ११५ | ४८,२०० | - | ४८,२०० |
| ४ | श्री साईनाथ रक्तपेढी राजीवगांधी आरोग्य योजना अंतर्गत दिलेली सवलत | ११४ | १,९२,२५० | - | १,९२,२५० |
| | एकुण | ४०५ | ४,२८,०१९ | ९६,८२० | ३,३१,०७२ |

**<u>माहे मार्च २०१५</u>**

| अ.नं | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | अतिदारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेल्या सवलतीची रक्कम (INDIGENT) | २९ | १०,९५६ | - | १०,९५६ |
| २ | गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम (WEAKER) | १७१ | १,३६,७८४ | ५८,५९७ | ७८,१८७ |
| ३ | श्री साईनाथ रक्तपेढी अंतर्गत गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १२० | ४६,४०० | - | ४६,४०० |
| ४ | श्री साईनाथ रक्तपेढी राजीवगांधी आरोग्य योजना अंतर्गत दिलेली सवलत | १२४ | २,००,६०० | - | २,००,६०० |
| | एकुण | ४४४ | ३,९४,७४० | ५८,५९७ | ३,३६,१४३ |

तरी मा.त्रिसदस्यीय समितीचे निर्णय क्र.२५६/ दि.२६.०६.२०१४ रोजीचे सभेतील निर्णयानुसार माहे एप्रिल २०१४ ते मार्च २०१५ या आर्थिक वर्षात वैद्यकिय बिलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणेसाठी सदरचा विषय मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.४४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये माहे एप्रिल- २०१४ ते मार्च-२०१५ अखेर या कालावधीत प्रस्तावात नमुद केलेल्याप्रमाणे वैद्यकिय बिलात देण्यात आलेल्या सवलतीची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच श्री साईनाथ रुग्णालयामध्ये सन- २०१० पासून किती रुग्णांना व किती रकमेची सवलत देण्यात आलेली आहे याचा अहवाल सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षक)

---

**विषय नं.०६** **श्री साईनाथ रुग्णालयामध्ये माहे एप्रिल- २०१४ ते मार्च- २०१५ अखेर या कालावधीत वैद्यकिय आर्थिक अनुदान व रुग्ण संख्यायांची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांचेकडील सासंवि-२००५/३७६/७६-का.सोळा दि.०५ मे २००६ रोजीचे पत्रान्वये अनुदान नियमावलीस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी यांचे मार्फत गरीब व गरजु रुग्णांना त्यांचे वैदयकिय, उपचाराकरीता रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नावे आर्थिक अनुदान देण्यात येते.त्यासाठी संस्थान व्यवस्थापनाने स्वतंत्र नियमावली तयार केलेली आहे.त्यास अनुसरुन सन १ एप्रिल-२०१४ ते ३१ मार्च २०१५ अखेर कालावधीत दिलेले वैदयकिय आर्थिक अनुदान व लाभार्थी रुग्ण संख्यापुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | माहिना | लाभार्थी रुग्ण संख्या | मंजुर अनुदान रक्कम | मंजुर बजेट |
|---|---|---|---|---|
| १) | १ एप्रिल २०१४ | १३७ | ३१,६७,९७५/- | १५,००,००,०००/- |
| २) | मे २०१४ | १०४ | २४,४४,७५०/- | |
| ३) | जुन २०१४ | ९१ | २१,४६,०७८/- | |
| ४) | जुलै २०१४ | १९७ | ४७,२७,७५०/- | |
| ५) | ऑगस्ट २०१४ | १२९ | ३०,३५,९५०/- | |
| ६) | सप्टेबंर २०१४ | १३७ | ३२,३५,०००/- | |
| ७) | ऑक्टोबर २०१४ | ११५ | २७,१५,६२५/- | |
| ८) | नोव्हेबंर२०१४ | १११ | २६,२८,०००/- | |
| ९) | डिसेंबर २०१४ | १५६ | ३६,९७,७७३/- | |
| १०) | जानेवारी २०१५ | १२१ | २८,९०,५००/- | |
| ११) | फेब्रुवारी २०१५ | १५६ | ३६,८२,९६५/- | |
| १२) | ३१ मार्च २०१५ | ११४ | २६,७६,९६५/- | |
| **एकुण** | | १५६८ | ३,७०,४९,३३१/- | |

उपरोक्तप्रमाणे दिलेले वैदयकिय आर्थिक अनुदान बाबतची माहितीची नोंद घेणेसाठी सदरचा विषय मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.४४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये माहे एप्रिल- २०१४ ते मार्च- २०१५ अखेर या कालावधीत १,५६८ रुग्णांना रु.३,७०,४९,३३१/- मात्र देण्यात आलेल्या वैद्यकिय आर्थिक अनुदान तक्त्याचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच श्री साईनाथ रुग्णालयामध्ये सन- २०१० पासून किती रुग्णांना, किती वैद्यकिय आर्थिक अनुदान देण्यात आले आहे याचा अहवाल सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षक)

---

**विषय नं.०७** **श्री साईबाबा रुग्णालयामध्ये माहे एपिल-२०१४ ते मार्च-२०१५ अखेर या कालावधीत वैद्यकिय बिलात देण्यात आलेल्या सवलतीची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ अन्वये श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये माहे एप्रिल २०१४ ते मार्च २०१५ या आर्थिक वर्षामध्ये एकुण ओपीडी रुग्ण १,४६,५२६ पैकी ४०,९१९ व एकुण आयपीडी रुग्ण १२,२५१ पैकी ६,७३६ रुग्णांना एकुण रु.७,३१,४०,७५७/- इतकी वैद्यकिय बिलात सवलत दिली आहे. रुग्णांच्या गटवारीनुसार विवरण खालीलप्रमाणेः-

**<u>एप्रिल- २०१४</u>**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३७१ | ३५,८९,१५२ | २१,४५,८६३ | १४,४३,२८९ |
| २ | जीवनदायी अंतर्गत रुग्णांस दिलेली सवलत | १ | ४६,००० | ४१,००० | ५,००० |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ६० | ७,५५,८६६ | ५,८०,६८० | १,७५,१८६ |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ८० | ९,२४,३०९ | ५,५०,१२४ | ३,७४,१८५ |
| ४ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ४३१ | ३,३२,२१,२९२ | २,९४,०४,७४२ | ३८,१६,५५० |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २,३३७ | ८,९१,२४५ | ------ | ८,९१,२४५ |
| | एकुण | ३,२८० | ३,९४,२७,८६४ | ३,२७,२२,४०९ | ६७,०५,४५५ |

**<u>मे- २०१४</u>**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३७२ | ३५,६७,१३७ | २०,६९,५३२ | १४,९७,६०५ |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ६४ | ६,५०,७०६ | ४,९५,९९५ | १,५४,७११ |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ८६ | ५,१९,८१५ | २,०५,१२४ | ३,१४,६९१ |
| ४ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ४०१ | २,८८,५२,७५९ | २,६३,४१,३५५ | २५,११,४०४ |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २,४९० | ११,४४,८७५ | ------- | ११,४४,८७५ |
| | एकुण | ३,४१३ | ३,४७,३५,२९२ | २,९१,१२,००६ | ५६,२३,२८६ |

**<u>जुन २०१४</u>**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३७५ | ३३,४५,६९४ | २१,५३,०१५ | ११,९२,६७९ |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ८४ | १०,२६,७५२ | ७,६९,२९६ | २,५७,४५६ |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ५९ | ३,५८,९२० | २,५९,५७९ | ९९,३४१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ४०४ | २,९१,९१,२३९ | २,६३,६७,५०६ | २८,२३,७३३ |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २,५६७ | १२,११,११५ | ------ | १२,११,११५ |
| | एकुण | ३,४८९ | ३,५१,३३,७२० | २,९५,४९,३९६ | ५५,८४,३२४ |

**जुलै २०१४**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३८२ | ४०,७७,७३२ | २७,०४,७४६ | १३,७२,९८६ |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ५१ | ५,६३,९०९ | ३,७६,०९० | १,८७,८१९ |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ७३ | ५,४१,५११ | १,७०,७९३ | ३,७०,७१८ |
| ४ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ४०४ | २,९४,५८,४१६ | २,६७,८८,९३८ | २६,६९,४७८ |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३८०३ | १६,९२,९५० | ----------- | १६,९२,९५० |
| | एकुण | ४,७१३ | ३,६३,३४,५१८ | ३,००,४०,५६७ | ६२,९२,९५० |

**ऑगस्ट २०१४**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ५८२ | १,९०,१२,८०१ | १,५९,४८,३८२ | ३०,६४,४१९ |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३० | १,७०,८१६ | ८२,५४६ | ८८,२७० |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ४४ | १,५७,५१२ | ४८,६७१ | १,०८,८४१ |
| ४ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | १४७ | १,००,७५,०६१ | ८९,७५,००० | ११,००,०६१ |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३११८ | १५,१२,४४० | ------- | १५,१२,४४० |
| | एकुण | ३९२१ | ३,०९,२८,६३० | २,५०,५४,५९९ | ५८,७४,०३१ |

**सप्टेंबर २०१४**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३८६ | ३६,५४,२२७ | १८,१६,६५८ | १८,३७,५६९ |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २४ | ७६,२१८ | ४४,८५४ | ३१,३६४ |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १२० | ७,७६,७०२ | ४,३६,६७२ | ३,४०,०३० |
| ४ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३७५ | २,५७,४७,९२७ | २,३१,०२,८८२ | २६,४५,०४५ |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३४२७ | १४,७१,४७५ | - | १४,७१,४७५ |
| | एकुण | ४३३२ | ३,१७,२६,५४९ | २,५४,०१,०६६ | ६३,२५,४८३ |

**ऑक्टोबर- २०१४**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ७४० | २,६५,४१,८५७ | २,२५,१४,५९२ | ४०,२७,२६५ |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १५ | ५४,४३६ | २५,७३६ | २८,७०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २२ | ४६,६४६ | ७,३१० | ३९,३३६ |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना | २० | ५४,४६५ | - | ५४,४६५ |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ५१ | ३३,१७,८१८ | २९,७५,५०० | ३,४२,३१८ |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २,५८० | ११,०३,८९५ | - | ११,०३,८९५ |
| | एकुण | ३,४२८ | ३,११,१९,११७ | २,५५,२३,१३८ | ५५,९५,९७९ |

**<u>नोव्हेंबर २०१४</u>**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २७५ | ४७,३२,९९९ | २८,७८,२९३ | १८,५४,७०६ |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ९ | १,१३,३६८ | ७४,३९३ | ३८,९७५ |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २० | २,९५,०९२ | १,५९,७३४ | १,३५,३५८ |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना | १९३ | २,२३,५८९ | - | २,२३,५८९ |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३५० | २,०५,७२,०७३ | १,८३,१२,००० | २२,६०,०७३ |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३५१३ | १५,५५,१७५ | - | १५,५५,१७५ |
| | एकुण | ४,३६० | २,७४,९२,२९६ | २,१४,२४,४२० | ६०,६७,८७६ |

**<u>डिसेंबर २०१२</u>**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २१८ | २६,९०,५५८ | १५,४८,९९० | ११,४१,५६८ |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १० | १,०५,०५५ | ३३,८७२ | ७१,१८३ |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १२ | २,७५,६२८ | १,८४,४१५ | ९१,२१३ |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना | २०९ | ३,३९,९७१ | - | ३,३९,९७१ |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ४३२ | २,६३,८१,७१६ | २,३४,०६,५२० | २९,७५,१९६ |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३३९५ | १८,२०,४४५ | - | १८,२०,४४५ |
| | एकुण | ४,२७६ | ३,१६,१३,३७३ | २,५१,७३,७९७ | ६४,३९,५७६ |

**<u>जानेवारी २०१५</u>**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २४० | ३४,९१,६६१ | १९,६०,६०१ | १५,३१,०६० |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ११ | १,७२,८९१ | ५१,१०८ | १,२१,७८३ |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २० | २,९९,५६६ | १,९७,०४७ | १,०२,५१९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना | २५३ | ४,८७,५६९ | १४,३४० | ४,७३,२२९ |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३९९ | २,४४,४६,२३९ | २,१८,२६,६२० | २६,१९,६१९ |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३५०७ | १८,६२,२२५ | - | १८,६२,२२५ |
| | एकुण | ४,४३० | ३,०७,६०,१५१ | २,४०,४९,७१६ | ६७,१०,४३५ |

**फेब्रुवारी २०१५**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २१० | ३०,२९,८०४ | १४,८४,५४० | १५,४५,२६४ |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०५ | ५०,०९७ | १९,२४० | ३०,८५७ |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०८ | २२,५४० | ८,९७८ | १३,५६२ |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | १७६ | ४,६३,८९१ | १,५०० | ४,६२,३९१ |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३७८ | २,२२,७९,५४८ | १,९७,८१,७७६ | २४,९७,७७२ |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३१६१ | १६,९६,१९० | - | १६,९६,१९० |
| | एकुण | ३,९३८ | २,७५,४२,०७० | २,१२,९६,०३४ | ६२,४६,०३६ |

**मार्च- २०१५**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २१९ | ३०,४७,१५३ | १९,३६,३९५ | ११,१०,७५८ |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०७ | ५३,०३० | ३५,२८३ | १७,७४७ |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०१ | ३,६४४ | - | ३,६४४ |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | १८६ | ३,६८,५३३ | १२,१८५ | ३,५६,३४८ |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३६० | २,१६,०९,३०२ | १,९२,४२,४९४ | २३,६६,८०८ |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३३०२ | १८,१९,०२० | - | १८,१९,०२० |
| | एकुण | ४,०७५ | २,६९,००,६८२ | २,१२,२६,३५७ | ५६,७४,३२५ |

तरी मा.त्रिसदस्यीय समितीचे निर्णय क्रं.५६४/ दि.२६.०६.२०१४ रोजीचे सभेतील निर्णयानुसार माहे एप्रिल २०१४ ते मार्च २०१५ या आर्थिक वर्षात वैद्यकिय बिलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणेसाठी सदरचा विषय मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.४४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये माहे एप्रिल- २०१४ ते मार्च- २०१५ अखेर या कालावधीत प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वैद्यकिय बिलात देण्यात आलेल्या सवलतीचे अवलोकन करणेत येऊन, त्यांची नोंद घेण्यात आली.**

**तसेच श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सन- २०१० पासून किती रुग्णांना किती वैद्यकिय बिलात सवलत देण्यात आलेली आहे याचा तुलनात्मक तक्त्यासह अहवाल सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.०८** **श्री साईनाथ रुग्णालयामध्ये अपोलो मेडीकल्स यांना चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअरच्या व्यवहारात माहे एपिल २०१४ ते मार्च २०१५ मध्ये झालेल्या उत्पन्नाची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयामध्ये अपोलो फार्मसी एन्टरप्राईजेस लि. चेन्नई या कंपनीस ना नफा ना तोटा तत्वावर मेडीकल स्टोअर चालविणेसाठी देण्यात आले आहे. मेडीकल स्टोअर्सच्या व्यवहारांमध्ये झालेल्या उत्पन्नातुन प्रत्यक्ष खर्च वजा जाता मिळालेले उत्पन्न मे.अपोलो फार्मसी एन्टरप्राईजेस लि.चेन्नई हे संस्थानला देणगी स्वरुपात देत आहे. माहे एप्रिल २०१४ ते मार्च २०१५ या आर्थिक वर्षात आलेल्या देणगीचा अहवाल खालीलप्रमाणे :-

| Month | Sales of Medicine | Gross Profit after VAT | Operating Charges | Net Profit as Donation | % of Donation |
|---|---|---|---|---|---|
| Apr-14 | 9,90,793 | 2,45,609 | 1,25,883 | 1,19,726 | 12% |
| May-14 | 8,87,368 | 1,55,285 | 1,28,073 | 27,212 | 3% |
| Jun-14 | 9,01,859 | 1,87,166 | 1,16,559 | 70,607 | 8% |
| Jul-14 | 11,15,367 | 2,42,079 | 1,32,914 | 1,09,165 | 10% |
| Aug-14 | 9,52,332 | 2,06,473 | 1,48,986 | 57,487 | 6% |
| Sep-14 | 9,11,920 | 1,96,082 | 1,19,059 | 77,023 | 8% |
| Oct-14 | 8,35,685 | 1,92,426 | 1,26,453 | 65,973 | 8% |
| Nov-14 | 8,69,714 | 1,97,503 | 1,23,333 | 74,170 | 9% |
| Dec-14 | 8,63,050 | 1,88,585 | 1,15,416 | 73,169 | 8% |
| Jan-15 | 715988 | 144782 | 116296 | 28486 | 4% |
| Feb-15 | 5,28,111 | 1,11,303 | 84,752 | 26,551 | 5% |
| Mar-15 | 3,95,228 | 79,383 | 95,553 | -16,170 | -4% |
| Total | **99,67,415** | **21,46,676** | **14,33,277** | **7,13,399** | **7%** |

उपरोक्त प्रमाणे माहे एप्रिल २०१४ ते मार्च २०१५ या आर्थिक वर्षात मिळालेल्या देणगी रकमेमध्ये माहे मार्च २०१५ चे देणगी रकमेची वसुली सदर संस्थेने त्यांचे श्री साईबाबा हॉस्पिटलचे दुकानातील देणगी रकमेतुन वजावट करुन उर्वरीत देणगी रक्कम देणगी म्हणुन दिलेली आहे. सदर बाब ही वैधानिक लेखापरीक्षणाचे दृष्टीने महत्वाची असल्याने सदर संस्थेचे लेखापरीक्षण २ औषधांवर दिलेल्या सवलतीची नोंद घेणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.४४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयामध्ये अपोलो मेडीकल्स यांना चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअरच्या व्यवहारात माहे एपिल २०१४ ते मार्च २०१५ मध्ये झालेल्या उत्पन्नाचे व त्यांनी औषधांवर दिलेल्या सवलतीचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.०९** **श्री साईबाबा रुग्णालयामध्ये अपोलो मेडीकल्स यांना चालविण्यास दिलेलया मेडिकल स्टोअरच्या व्यवहारात माहे एपिल २०१४ ते मार्च २०१५ मध्ये झालेल्या उत्पन्नाची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये अपोलो फार्मसी एन्टरप्राईजेस लि. चेन्नई या कंपनीस ना नफा ना तोटा तत्वावर मेडीकल स्टोअर चालविणेसाठी देण्यात आले आहे. मेडीकल स्टोअर्सच्या व्यवहारांमध्ये झालेल्या उत्पन्नातुन प्रत्यक्ष खर्च व मा.व्य.स. चे निर्णयास अनुसरुन काही निवडक औषधांवर मंजुर करणेत आलेली सवलत वजा जाता मिळालेले उत्पन्न मे.अपोलो फार्मसी एन्टरप्राईजेस लि.चेन्नई हे संस्थानला देणगी स्वरुपात देत आहे. माहे एप्रिल २०१४ ते मार्च २०१५ या आर्थिक वर्षात आलेल्या देणगीचा अहवाल खालीलप्रमाणे :-

| Month | Sales of Medicine | Gross Profit after VAT | Operating Charges | Discount on Medicine | Net Profit as Donation | % of Profit |
|---|---|---|---|---|---|---|
| Apr-14 | 33,62,297 | 11,90,603 | 4,68,127 | 1,50,625 | 7,22,476 | 21% |
| May-14 | 40,74,745 | 9,92,810 | 4,14,138 | 1,67,749 | 5,78,672 | 14% |
| Jun-14 | 42,48,932 | 11,43,046 | 4,04,287 | 1,61,387 | 7,38,759 | 17% |
| Jul-14 | 45,45,182 | 12,20,883 | 4,38,685 | 1,61,387 | 7,82,198 | 17% |
| Aug-14 | 43,66,988 | 10,87,810 | 4,25,650 | 1,94,482 | 6,62,160 | 15% |
| Sep-14 | 42,83,573 | 10,98,479 | 4,52,847 | 1,61,324 | 6,45,632 | 15% |
| Oct-14 | 41,24,017 | 10,69,580 | 4,65,482 | 1,03,281 | 6,04,098 | 15% |
| Nov-14 | 39,03,487 | 10,30,454 | 4,47,927 | 1,17,021 | 5,82,527 | 15% |
| Dec-14 | 35,54,515 | 9,03,300 | 4,50,779 | 1,03,281 | 4,52,521 | 15% |
| Jan-15 | 35,23,975 | 11,76,247 | 4,72,108 | 1,15,160 | 7,04,139 | 20% |
| Feb-15 | 32,48,151 | 6,88,049 | 3,83,641 | 1,16,769 | 3,04,408 | 9% |
| Mar-15 | 33,76,304 | 8,94,722 | 3,70,615 | 1,21,871 | 5,24,107 | 16% |
| Total | **4,66,12,166** | **1,24,95,983** | **51,94,286** | **16,74,337** | **73,01,697** | **16%** |

तरी मा.त्रिसदस्यीय समितीचे निर्णय क्र.५६४/ दि.२६.०६.२०१५ रोजीचे सभेतील निर्णयानुसार माहे एप्रिल २०१४ ते मार्च २०१५ या आर्थिक वर्षात मिळालेल्या देणगी रकमेची व औषधांवर दिलेल्या सवलतीची नोंद घेणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.४४४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये अपोलो मेडीकल्स यांना चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअरच्या व्यवहारात माहे एपिल २०१४ ते मार्च २०१५ मध्ये झालेल्या उत्पन्नाचे व त्यांनी औषधांवर दिलेल्या सवलतीचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.१० **श्री.किशोर मार्कस बनसोडे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

प्रस्ताव- श्री.किशोर मार्कस बनसोडे, सफाई कामगार,आरोग्य विभाग हे दि.०५-१२-२००६ पासून संस्थान सेवेत वर्ग ४ चे कर्मचारी म्हणून काम करीत आहेत. श्री.बनसोडे हे आरोग्य विभागात सफाई कामगार म्हणून कार्यरत असतांना त्यांचेकडून दि.२०-१२-२०१३,दि.२३-१२-२०१३ ते दि.२९-०८-२०१४ अखेर २५१ दिवस या कालावधीत खलीलप्रमाणे गैरशिस्त वर्तन घडलेले आहे.

श्री.किशोर मार्कस बनसोडे,सफाई कामगार, आरोग्य विभाग हे दि.२०-११-२०१३,दि.२३-१२-२०१३ ते दि.२९-०८-२०१४ अखेर २५१ दिवस या कालावधीत पुर्व परवानगीशिवाय व रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहीले आहे.त्यामुळे कामाची गैरसोय झाली.श्री.बनसोडे यांना विनापरवानगी,रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहण्याची सवयच झालेली आहे.असे प्र.अधिक्षक,आरोग्य विभाग यांची निवदेन प्राप्त झालेली आहे.श्री.बनसोडे यांचे सदरचे कृत्य हे बेकायदेशीर असून,गंभीर गैरशिस्त् वर्तनात मोडते. म्हणून उपरोक्त गैरशिस्त् वर्तनाबाबत श्री.बनसोडे यांना अनुक्रमे जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३१६८/२०१४

दि.२७-१२-२०१३, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३३७२/२०१४ दि.०८-०१-२०१४, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/ ५२४९/ २०१४ दि.१५-०२-२०१४,जा.नं.दि.१५-०२-२०१४,जा.नं.एसएसएस/वशी-७ए/५७३२/२०१४ दि.१२-०३-२०१४, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१५८/२०१४ दि.१०-०४-२०१४,जा.नं.एसएसएस/वशी-७ए/६९२/२०१४ दि.१०-०५-२०१४,जा.नं.एसएसएस/वशी-७/१३०८/२०१४ दि.१७-०६-२०१४,जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१६४४/ २०१४ दि.०८-०७-२०१४ अन्वये कारणे दाखवा नोटीसा काढून,त्यांचे लेखी खुलासे मागविणेत आले होते. तथापि, श्री.बनसोडे यांना सदर कारणे दाखवा नोटीसा काढून,त्यांचे लेखी खुलासे मागविणेत आले होते. तथापि, श्री.बनसोडे यांना सदर कारणे दाखवा नोटीसा काढून अनुक्रमे दि.१५-०१-२०१४,दि.२१-०१-२०१४,दि.२६-०२-२०१४,दि.२४-०३-२०१४,दि.२१-०५-२०१४,दि.२५-०६-२०१४,दि.१४-०७-२०१४ रोजी प्राप्त् होऊन देखील त्यांनी लेखी खुलासे सादर केलेले नाहीत.यावरुन सदर गैरशिस्त वर्तन केल्याचे त्यांना मान्य असल्याचे दिसून येते

म्हणून श्री.बनसोडे यांना जा.नं. एसएसएस/वशी-७ए/२१२३/२०१४ दि.१८-०८-२०१४ अन्वये आरोपपत्र् देवून, त्यांचेवर दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टॅडिंग ऑडर्स) अॅक्ट,१९४६ चे कलम क्र.२४ (एफ),२४ (एल) व २४ (एक्स) प्रमाणे नेहमी रजेशिवाय गैरहजर राहणे किंवा रजेशिवाय सलग दहापेक्षा जास्त दिवस गैरहजर राहणे. आस्थापनेच्या जागेत शिस्तीला व सव्दर्तनाला बाधक ठरेल असे कोणतेही कृत्ये करणे, स्टॅडिंग ऑडर्स अनुसाराचे आरोपपत्र आदेश किंवा इतर पत्र घ्यायला नकार देणे इ.कृत्ये हे दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टॅडिंग ऑडर्स) अॅक्ट १९४६ चे कलम नंबर २४ (एफ),२४ (एल) व २४ (एक्स) अन्वये गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडतात. सदर गैरशिस्त वर्तन श्री.बनसोडे यांनी केलेले असल्याचा आरोप त्यांचेवर ठेवणेत आले होते.

श्री.किशोर मार्कस बनसोडे,सफाई कामगार,आरोग्य विभाग यांचे विरुध्द दि.१८-०८-२०१४ रोजी ठेवणेत आलेल्या आरोप पत्रातील आरोपांची खातेचौकशी अॅडव्होकेट श्री.बी.वाय.काळवाघे,कोपरगाव,खाते चौकशी अधिकारी यांनी पूर्ण करुन, त्यांचा दि.०१-१२-२०१४ रोजीचा खाते चौकशी निष्कर्ष अहवाल संस्थानला सादर केला आहे.त्यात त्यांनी खालीलप्रमाणे निष्कर्ष काढलेला आहे.

**आदेश-**

श्री.किशोर मार्कस बनसोडे,सफाई कामगार,आरोग्य विभाग यांचेवर ठेवलेले आरोप शाबीत झाल्याने ते दोषी आहेत.श्री.बनसोडे यांनी दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टॅडिंग ऑडर्स) अॅक्ट,१९४६ मधील मॉडेल स्टॅडींग ऑटर्स कलम २४ (एफ),२४ (ए),२४ (एफ),२४ (एक्स) चा भंग केल्याने ते दोषी आहेत.

श्री.किशोर मार्कस बनसोडे,सफाई कामगार,आरोग्य विभाग यांनी यापूर्वी केलेल्या गैरशिस्त वर्तनाचा तपशिल व त्यांना यापूर्वी करणेत आलेल्या शिक्षेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.बनसोडे हे दि.२५-०५-२०११ रोजी विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले म्हणून त्यांना दि.२५-०८-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून सक्त ताकीद देणेत आली.

२) श्री.बनसोडे हे दि.२४-०८-२०११,दि.२५-०८-२०११,दि.३१-०८-२०११ अखेर या कालावधीत विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि.२४-१०-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून सक्त ताकीद देणेत आली.

३) श्री.बनसोडे हे दि.०७-१०-२०११,दि.१९-१०-२०११,दि.२०-१०-२०११,दि.२८-१०-२०११ ते दि.२०-११-२०११ असे २७ दिवस विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि.२३-१२-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून दोन दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आले.

४) श्री.बनसोडे हे दि.३०-११-२०११ ते दि.०२-१२-२०११,दि.११-१२-२०११,ते दि.१४-१२-२०११ अखेर ०७ दिवस या कालावधीत विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहिले.म्हणून त्यांना दि.३०-०१-२०१४ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून ताकीद देणेत आली.

५) श्री.बनसोडे हे दि.११-०१-२०१२ रोजी विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि.११-०२-२०१२ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून सक्त ताकीद देणेत आली.

६) श्री.बनसोडे हे दि.२३-०२-२०१२,दि.२४-०५-२०१२ अखेर या कालावधीत विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि.१२-०४-२०१२ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून सक्त ताकीद देणेत आली.

७) श्री.बनसोडे हे दि.०९-०५-२०१२ रोजी विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि.०५-०७-२०१२ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून सक्त ताकीद देणेत आली.

८) श्री.बनसोडे हे दि.१०-०६-२०१२ ते दि.३०-०९-२०१२ अखेर ११३ दिवस या कालावधीत विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहिले. म्हणून त्यांना दि.२७-१०-२०१२ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून चार दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आले.

९) श्री.बनसोडे हे दि.१३-११-२०१२ ते दि.३१-०१-२०१३ अखेर ८० दिवस या कालावधीत विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि.१९-०३-२०१३ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून चार दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आले.

१०) श्री.बनसोडे हे दि.०१-१०-२०१२ ते दि.२८-१०-२०१२ अखेर २८ दिवस या कालावधीत विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि.२३-०३-२०१३ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून एक दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आले.

११) श्री.बनसोडे हे दि.०१-०२-२०१३ ते दि.१९-०३-२०१३ अखेर ४७ दिवस या कालावधीत विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि.०८-०५-२०१३ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून तीन दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आले.

१२) श्री.बनसोडे हे दि.१७-०५-२०१३ रोजी विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि.१०-०७-२०१३ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून ताकीद देणेत आली.

१३) श्री.बनसोडे हे दि.२६-०६-२०१३ ते दि.२८-०९-२०१३ अखेर ९५ दिवस या कालावधीत विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि.०७-११-२०१३ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून चार दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आले.

१४) श्री.बनसोडे हे दि.११-१०-२०१३ रोजी विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि.२८-१२-२०१३ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून ताकीद देणेत आली.

१५) श्री.बनसोडे हे दि.१४-१०-२०१३ रोजी विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि.०४-१२-२०१३ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून ताकीद देणेत आली.

१६) श्री.बनसोडे हे दि.२०-११-२०१३,दि.२३-१२-२०१३ ते दि.२९-०८-२०१४ अखेर २५१ दिवस या कालावधीत विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि.१८-०८-२०१४ रोजीचे आदेशान्वये खाते चौकशीकामी आरोपपत्र देण्यात आलेले असून त्यांचा खाते चौकशी अहवाल प्राप्त झालेला असून त्यात ते दोषी आहेत.

अशाप्रकारे श्री.बनसोडे यांना यापूर्वी गैरशिस्त वर्तनाबाबत एकूण १५ वेळा शिक्षा झालेली असून,त्यांचे सेवेत व वर्तनात सुधारणा होत नसल्याचे दिसून येते.

श्री.बनसोडे यांचे विरुध्द गैरशिस्त वर्तनाबाबत ठेवणेत आलेल्या आरोपपत्रातील आरोप सिध्द झालेले आहेत. आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेल्या अथवा दोषी आढळुन आलेल्या कर्मचा-यास गैरशिस्त वर्तनाबाबत दि.बॉम्बे इंडस्ट्रीयल एम्प्लॉयमेंट (स्टँडींग ऑडर्स) रुल्स १९५९ चे कलम २५ (१) अन्वये खालीलप्रमाणे शिक्षा करणेची तरतुद आहे.

अ) ताकीद द्यावी किंवा ठपका द्यावा.

ब) पेमेंट ऑफ वेजेस अॅक्ट, १९३६ हयाच्या तरतुदींच्या मर्यादेत राहुन आणि त्यानुसार दंड करावा. (एकुण वेतनाचे ३/ इतका दंड)

क) चार दिवसांपेक्षा जास्त नाही इतका काळ त्याला व्यवस्थापकाच्या सहीच्या लेखी आदेशाने सस्पेंड करावे.

ड) नोटीशी शिवाय बडतर्फ (डिसमीस) करावे.

सबब, श्री.किशोर मार्कस बनसोडे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने व ते खातेचौकशीत दोषी आढळुन आलेले असल्याने, त्यांना आरोप पत्रात नमुद केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत वरील अ,ब,क,ड या चार शिक्षेपैकी एक शिक्षा देता येईल.

तसेच श्री.बनसोडे यांना ड प्रमाणे शिक्षा करावयची झाल्यास त्यांना प्रथम संस्थान सेवेतुन बडतर्फ (डिसमीस) का करु नये अशी सेकंड शोकॉज नोटीस देवुन, त्यासोबत दि.०१-१२-२०१४ रोजीचा खातेचौकशी निष्कर्ष अहवाल श्री.बनसोडे यांना पाठवावा लागेल. त्याकामी श्री.बनसोडे यांचेविरुध्द संस्थानचे वतीने मा.कामगार व औद्योगिक न्यायालय, अहमदनगर व मा.दिवाणी न्यायालय सिनीयर डिव्हीजन,कोपरगाव व ज्युनियर डिव्हीजन, राहाता येथे कॅव्हेट अर्ज दाखल करावे लागले.

तरी श्री.किशोर मार्कस बनसोडे,सफाई कामगार,आरोग्य विभाग यांना वरील चार शिक्षे पैकी कोणती शिक्षा करावयाची याबाबत पुढील आदेश होणेस विनंती.याबाबत विषय मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेसमोर दि.१८-०२-२०१५ रोजी सादर करणेत आला होता.

दि.१८-०२-२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेत विषय नं.१८ निर्णय क्रं.४६ नुसार, दि.०१-०१-२०१५ पासुन संस्थान कर्मचा-यांना नवीन सेवानियम लागू केलेले असुन श्री.किशोर मार्कस बनसोडे,सफाई कामगार, आरोग्य विभाग यांची गैरशिस्त वर्तनाबाबतची चौकशी जुन्या सेवासेवानियमास अनुसरुन झालेली असल्यामुळे त्यांना गैरशिस्त वर्तनाबाबत शिक्षाही जुन्या सेवा नियमास अनुसरुन करणेत यावी,असे समितीचे मत आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.किशोर मार्कस बनसोडे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने व ते खातेचौकशीत दोषी आढळून आलेले असल्याने, तसेच आरोपपत्रातील आरोपांचे गांभीर्य विचारात घेऊन, त्यांना दि.बॉम्बे इंडस्टियल एम्प्लॉयमेंट (स्टँडिंग ऑडर्स) रुल्स १९५९ चे कलम २५ (१) मधील ड प्रमाणे संस्थान सेवेतुन नोटीशीशिवाय बडतर्फ का करणेत येऊ नये अशी अंतिम कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी व त्या नोटीसीसोबत खाते चौकशी निष्कर्ष अहवालाची प्रत पाठविणेत यावी. सदर नोटीसीस अनुसरुन श्री.बनसोडे यांनी लेखी खुलासा सादर केलेनतर पुन्हा प्रस्ताव त्रिसदस्य समितीसमोर सादर करणेत यावा, असा निर्णय झालेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णायास अनुसरुन श्री.बनसोडे यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१०२/२०१५ दि.०६.०४.२०१५ अन्वये अंतिम कारणे दाखवा नोटीस काढणेत येवुन,त्या सोबत खातेचौकशी निष्कर्श अहवालाची प्रत पाठविणेत आलेली आहे व सदरची नोटीस त्यांना बजाविणेत आलेली आहे.

त्यास अनुसरुन श्री.बनसोडे यांनी दि.०७-०४-२०१५ रोजीचा लेखी खुलासा सादर केलेला असुन त्यात त्यांनी, मला संस्थान सेवेतुन डिसमीस बडतर्फ करण्यात येऊ नये याबाबतचा लेखी खुलासा मी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांना विनंती करतो कि मी येथुन पुढे विनापरवानगी शिवाय गैरहजर राहणार नाही नम्र विनंती.मी याची दक्षता घेईल व मी आपल्या नियमांचे पालन करीन तरी मे.सा.मला क्षमा करावी असे म्हटलेले आहे.

तरी दि.१८-०२-२०१५ रोजीचे त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्रं.४६ नुसार श्री.किशोर मार्कस बनसोडे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांनी दि.०६-०४-२०१५ रोजीचे अंतिम कारणे दाखवा नोटीसीस अनुसरुन उपरोक्तप्रमाणे दि.०७-०४-२०१५ रोजीचा लेखी खुलासा सादर केलेला आहे. त्यावर निर्णय होणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.४४५ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.किशोर मार्कस बनसोडे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले आहेत व ते खातेचौकशीअंती दोषी आढळुन आलेले असल्याने, तसेच श्री.बनसोडे यांना वेळोवेळी संधी देण्यात येऊनही आजतागायत ते कामावर हजर नाहीत यावरुन श्री. बनसोडे यांना संस्थान सेवेमध्ये स्वारस्य नसल्याचे दिसून येते. सबब श्री.किशोर मार्कस बनसोडे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांना दि.बॉम्बे इंडस्ट्रीयल एम्प्लॉयमेंट (स्टँडींग ऑर्डर्स) रुल्स 1959 चे कलम 25 (1) मधील "ड" प्रमाणे नोटीशी शिवाय बडतर्फ (डिसमीस) करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

विषय नं.११ **श्री.देवराम मुरलीधर बनकर, मदतनीस, श्री साईप्रसादालय यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

प्रस्ताव- श्री.देवराम मुरलीधर बनकर, मदतनीस, श्री साई प्रसादालय विभाग हे संस्थान सेवेत वर्ग 4 चे कर्मचारी म्हणून काम करीत आहेत. श्री.बनकर हे श्री साई प्रसादालय विभागात मदतनीस म्हणून कार्यरत असतांना त्यांचेकडून दि.01-12-2013 ते दि.31-07-2014 तसेच दि.01-08-2014 ते दि.01-09-2014 अखेर 275 दिवस या कालावधीत खालीलप्रमाणे गैरशिस्त वर्तन घडलेले आहे.

श्री.देवराम मुरलीधर बनकर,मदतनीस,श्री साई प्रसादालय विभाग हे दि.01-12-2013 ते दि.31-07-2014 तसेच दि.01-08-2014 ते दि.01-09-2014 अखेर 275 दिवस या कालावधीत पुर्व परवानगीशिवाय व रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले आहे. त्यामुळे कामाची गैरसोय झाली. श्री.बनकर यांना विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहण्याची सवयच झालेली आहे. असे अधिक्षक,श्री साई प्रसादालय विभाग यांची निवेदने प्राप्त झालेली आहे. श्री.बनकर यांचे सदरचे कृत्य हे बेकायदेशीर असून, गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडते.

म्हणून उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.बनकर यांना अनुक्रमे जा.नं.एसएसएस/वशी-7ए/3358/2014 दि.08-01-2014, जा.नं.एसएसएस/वशी-7ए/3785/2014 दि.15-02-2014, जा.नं. एसएसएस/वशी-7ए/5575/ 2014 दि.05-03-2014, जा.नं.एसएसएस/वशी-7ए/159/2014 दि.10-04-2014, जा.नं. एसएसएस/वशी-7ए/634/ 2014 दि.07-05-2014, जा.नं.एसएसएस /वशी-7ए/1311/2014 दि.17-06-2014, जा.नं.एसएसएस/वशी-7ए/ 1326/ 2014 दि.05-07-2014, जा.नं. एसएसएस/वशी-7ए/2300/2014 दि.09-08-2014 अन्वये कारणे दाखवा नोटीसा काढून, त्यांचे लेखी खुलासे मागविणेत आले होते. तथापि, श्री.बनकर यांना सदर कारणे दाखवा नोटीसा अनुक्रमे दि.29-01-2014, दि.07-03-2014, दि.12-03-2014, दि.12-05-2014, दि.23-06-2014 रोजी प्राप्त होऊन देखील त्यांनी लेखी खुलासे सादर केलेले नाहीत.यावरून सदर गैरशिस्त वर्तन केल्याचे त्यांना मान्य असल्याचे दिसून येते.यावरून सदर गैरशिस्त वर्तन केल्याचे त्यांना मान्य असल्याचे दिसून येते.

अशाप्रकारे श्री.देवराम मुरलीधर बनकर, मदतनीस, श्री साई प्रसादालय विभाग यांची उपरोक्त प्रमाणे नेहमी नेहमी रजेशिवाय गैरहजर राहणे किंवा रजेशिवाय सलग दहापेक्षा जास्त दिवस गैरहजर राहणे., आस्थापनेच्या जागेत

शिस्तीला व सद्वर्तनाला बाधक ठरेल असे कोणतेही कृत्ये करणे, इ.कृत्ये हे दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टॅंडींग ऑर्डर्स) ॲक्ट 1946 चे कलम नंबर 24 (एफ) व 24 (एल) अन्वये गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडतात. सदर गैरशिस्त वर्तन श्री.बनकर यांनी केलेले असल्याचा आरोप त्यांचेवर ठेवणेत आले होते.

श्री.देवराम मुरलीधर बनकर,मदतनीस,श्री साई प्रसादालय विभाग यांचे विरूध्द दि.01-09-2014 रोजी ठेवणेत आलेल्या आरोप पत्रातील आरोपांची खातेचौकशी ॲडव्होकेट श्री.बी.वाय.काळवाघे, कोपरगांव, खाते चौकशी अधिकारी यांनी पूर्ण करून, त्यांचा दि.07-06-2015 रोजीचा खाते चौकशी निष्कर्ष अहवाल संस्थानला सादर केला आहे. त्यात त्यांनी खालीलप्रमाणे निष्कर्ष काढलेला आहे.

**आदेश**

श्री.देवराम मुरलीधर बनकर,मदतनीस,श्री साई प्रसादालय विभाग यांचेवर ठेवलेले आरोप शाबीत झाल्याने ते अंशत: दोषी आहेत. रजेशिवाय गैरहजर एकुण दिवस 206 दिवसातुन आजारीपणाचा काळ 144 दिवस कमी करणेत येवून श्री.बनकर 62 दिवस रजेशिवाय कामावर गैरहजर होते.श्री.बनकर यांनी दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टॅंडींग ऑर्डर्स) ॲक्ट, 1946 मधील मॉडेल स्टॅंडींग ऑर्डर्स कलम 24(एफ), 24(एल) चा भंग केल्याने ते अंशत: दोषी आहेत.

श्री.देवराम मुरलीधर बनकर,मदतनीस,श्री साई प्रसादालय विभाग यांनी यापूर्वी केलेल्या गैरशिस्त वर्तनाचा तपशिल व त्यांना यापूर्वी करणेत आलेल्या शिक्षेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1) श्री.बनकर यांना जा.नं.एसएसएस/वशी-7ए/1267/1995 दि.04-02-1995 रोजीचे आरोपपत्रात नमुद केल्याप्रमाणे गंभीर गैरशिस्तवर्तन केल्यामुळे त्यांना खाते चौकशी पुर्ण होईपर्यंत संस्थान सेवेतुन तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आले होते.

   नैसर्गिक न्याय तत्वानुसार खाते चौकशी पुर्ण करणेत येवुन आरोप सिध्द झाल्याने ते दोषी आढळले म्हणुन त्यांना जा.नं.एसएसएस/वशी-7ए/11294/1995 दि.17-08-1995 रोजीचे आदेशान्वये संस्थान सेवेतुन दि.18-08-1995 पासुन कायम स्वरुपी बडतर्फ/डिसमीस करणेत आले होते.

2) श्री.बनकर हे दि.13-10-92 रोजी पुर्वी व दि.21-12-92 पासून पुर्व परवानगीशिवाय गैरहजर राहिले म्हणून त्यांना जा.नं.एसएसएस/वशी-7ए/3001/1993 दि.17-03-1993 रोजीचे आरोपपत्रात नमुद केल्याप्रमाणे गंभीर गैरशिस्तवर्तन केल्यामुळे त्यांना खाते चौकशीकामी आरोपपत्र बजाविणेत आले.

3) श्री.बनकर हे दि.28-08-87 रोजी विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांची दि.30-11-1987 रोजीचे आदेशान्वये अनाधिकृत गैरहजेरी धरणेत आली.

4) श्री.बनकर हे दि.09-05-89 रोजी विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.08-08-1989 रोजीचे आदेशान्वये अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

5) श्री.बनकर हे दि.12-11-89 रोजी विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.02-01-1990 रोजीचे आदेशान्वये अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

6) श्री.बनकर हे दि.04-05-90 ते दि.26-05-90 रोजी विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.04-06-1990 रोजीचे आदेशान्वये अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

7) श्री.बनकर हे दि.14-08-90 ते दि.27-08-90,दि.03-11-90 ते दि.11-11-90,दि.29-01-91 ते दि.08-01-91,दि.19-03-91 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणून दि.22-04-1991 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची विनावेतन रजा मंजुर करणेत येवुन,दोन दिवसाचे मुळ वेतना इतके म्हणजेच 51.60 पैसे दंड करण्यात आला.

8) श्री.बनकर हे दि09-06-91 ते दि.24-07-91,दि.01-12-91 ते दि.15-12-91,दि.08-02-92 ते दि.11-02-92,दि.22-02-92 ते दि.25-02-92 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.20-04-1992 रोजीचे आदेशान्वये विनावेतन रजा मंजुर करणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

9) श्री.बनकर हे दि.22-04-92 ते दि.28-04-92 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.18-08-1992 रोजीचे आदेशान्वये विनावेतन रजा मंजुर करणेत आली.

10) श्री.बनकर हे दि.19-05-92 ते दि.19-06-92 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.02-10-1992 रोजीचे आदेशान्वये विनावेतन रजा मंजुर करणेत आली.

11) श्री.बनकर हे दि.15-12-92 ते दि.18-12-92,दि.21-12-92 ते दि.23-12-92 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.08-02-1993 रोजीचे आदेशान्वये दि.15-12-92 ते दि.18-12-92 या कालावधीची विनावेतन रजा मंजुर करुन व दि.21-12-92 ते दि.23-12-92 या कालावधीची आजारी रजा मंजुर करणेत आली.

12) श्री.बनकर हे दि.10-11-92 ते दि.16-11-92 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.03-12-1992 रोजीचे आदेशान्वये पाच दिवस किरकोळ व दोन दिवस विनावेतन रजा मंजुर करुन सक्त ताकिद देणेत आली.

13) श्री.बनकर हे दि.25-02-91,दि.03-04-91 ते दि.05-04-91 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.06-09-1991 रोजीचे आदेशान्वये अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन,तीन दिवस मुळ वेतनाचे इतका रु.77.40 इतका दंड करणेत आला.

14) श्री.बनकर हे दि.05-04-93 ते दि.08-04-93 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.07-06-1993 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची विनावेतन रजा मंजुर करुन सक्त ताकिद देणेत आली.

15) श्री.बनकर हे दि.08-05-93 रोजी विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.02-07-1993 रोजीचे आदेशान्वये ताकिद देणेत आली.

16) श्री.बनकर हे दि.19-05-93 ते दि.04-07-93 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.27-07-1993 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची विनावेतन रजा मंजुर सन 1994 मध्ये देय असलेली एक वार्षीक वेतनवाढ एक वर्षासाठी स्थगीत करणेत आली.

17) श्री.बनकर हे दि.07-10-93 रोजी विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.23-10-1993 रोजीचे आदेशान्वये विनावेतन रजा मंजुर करणेत येवुन ताकिद देणेत आली.

18) श्री.बनकर हे दि.09-11-93 ते दि.10-11-93 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.23-11-1993 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची विनावेतन रजा मंजुर करणेत येवुन ताकिद देण्यात आली.

19) श्री.बनकर यांना जा.नं.एसएसएस/वशी-7ए/3001/1993 दि.17-03-1993 अन्वये गंभीर गैरशिस्त वर्तनाबाबत आरोपपत्र देणेत येवून खाते चौकशी करणेत आली त्यांचेवर आरोप सिध्द झाल्याने दि.30-11-1993 रोजीचे आदेशान्वये त्यांचे पुर्वीचे मुळवेतन कमी करुन रु.750/-इतके करणेत आले.

20) श्री.बनकर हे दि.29-01-94 ते दि.12-03-94 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.16-09-1994 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची विनावेतन रजा धरणेत येवुन ताकिद देण्यात आली.

21) श्री.बनकर हे दि.18-06-94 ते दि.02-10-94 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.26-10-1994 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची विनावेतन रजा मंजुर करुन सुधारणेकरीता शेवटची संधी देण्यात आली.

22) श्री.बनकर यांना सेवेतुन कमी केल्याने त्यांनी मा.कामगार न्यायालय, अहमदनगर येथे सादर केलेली तक्रार यु.एल.पी.क्रं.24/2000 चे तडजोड होवुन मा.व्य.समितीचे दि.13-03-2005 रोजीचे सभेतील निर्णयास अनुसरुन व पुन्हा असे गैरशिस्तवर्तनाचे कृत्य करणार नसल्याचे रु.100/- चे हमीपत्रावर लिहुन दिल्याने त्यांना दि.10-08-2015 रोजीचे आदेशान्वये दि.11-08-2015 रोजी कामावर हजर करुन घेण्यात आले.

23) श्री.बनकर हे दि.01-12-2007 ते दि.04-12-2007,दि.19-12-2007 ते दि.20-12-2007 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांची दि.15-02-2008 रोजीचे आदेशान्वये दि.01-12-2007 ते दि.04-12-2007 या कालावधीची अर्जित रजा मंजुर करणेत येवुन उर्वरित कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी समजण्यात आली.

24) श्री.बनकर हे दि.23-01-2008 ते दि.28-01-2008 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन दि. 25-05-2008 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन ताकीद देण्यात आली

25) श्री.बनकर हे दि.16-04-2008 ते दि.22-04-2008 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.28-05-2008 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन शिक्षा म्हणुन त्यांना ताकिद देण्यात आली.

26) श्री.बनकर हे दि.23-04-2008 ते दि.03-05-2008 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन दि.01-08-2008 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन ताकीद देण्यात आली.

27) श्री.बनकर हे दि.19-06-2008 रोजी विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.01-08-2008 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन ताकीद देण्यात आली.

28) श्री.बनकर हे दि.14-08-2008 ते दि.18-08-2008 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्याची दि.25-12-2008 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी समजणेत आली.

29) श्री.बनकर हे दि.13-01-2009 ते दि.15-01-2009,दि.22-01-2007 ते दि.07-02-2009 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन दि.06-03-2009 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकीद देण्यात आली.

30) श्री.बनकर हे दि.26-04-2009 ते दि.04-05-2009 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.29-07-2009 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकीद देण्यात आली.

31) श्री.बनकर हे दि.31-12-2009 रोजी विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.16-03-2010 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकीद देण्यात आली.

32) श्री.बनकर हे दि.01-07-2010 ते दि.04-07-2010 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.20-10-2010 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकीद देण्यात आली.

33) श्री.बनकर हे दि.12-06-2010 ते दि.18-06-2010,दि.20-06-2010 ते दि.30-06-2010 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.20-10-2010 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन वर्तनात व सेवेत सुधारणा करणेकामी अंतिम संधी देणेचे दृष्टीने शिक्षा म्हणुन दोन दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आले.

34) श्री.बनकर हे दि.21-10-2010 ते दि.22-10-2010 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.29-01-2010 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

35) श्री.बनकर हे दि.15-01-2011 ते दि.20-01-2011 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.12-04-2011 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

36) श्री.बनकर हे दि.21-01-2011 ते दि.22-01-2011 व दि.01-02-2011 ते दि.08-02-2011 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.25-04-2011 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

37) श्री.बनकर हे दि.01-05-2011, दि.03-05-2011 व दि.14-05-2011 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.12-08-2011 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

38) श्री.बनकर हे दि.14-07-2011 रोजी विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.24-08-2011 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

39) श्री.बनकर हे दि.04-09-2011, दि.06-09-2011 व दि.08-09-2011 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.06-10-2011 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

40) श्री.बनकर हे दि.24-07-2011, दि.17-08-2011 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.08-10-2011 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

41) श्री.बनकर हे दि.29-09-2011 रोजी विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.05-11-2011 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

42) श्री.बनकर हे दि.17-10-2011 ते दि.20-10-2011 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.15-11-2011 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

43) श्री.बनकर हे दि.07-07-2012, दि.09-07-2012 व दि.10-07-2012 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.01-08-2012 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

44) श्री.बनकर हे दि.21-03-2012 रोजी विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.24-05-2012 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

45) श्री.बनकर हे दि.12-03-2012 ते दि.20-03-2012 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.18-04-2012 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन एक दिवस संस्थान सेवेतुन तात्पुरते सेवानिलंबीत करणेत आले.

46) श्री.बनकर हे दि.13-01-2012, दि.19-01-2012 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.06-03-2012 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

47) श्री.बनकर हे दि.27-10-2011, दि.15-11-2011 ते दि.17-11-2011 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.24-12-2012 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

48) श्री.बनकर हे दि.28-11-2011 ते दि.01-12-2011, दि.08-12-2011 ते दि.16-12-2011 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.01-01-2012 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन एक दिवस संस्थान सेवेतुन तात्पुरते सेवानिलंबीत करणेत आले.



49) श्री.बनकर हे दि.26-12-2011 ते दि.29-12-2011,दि.01-01-2012 ते दि.02-01-2012,दि.05-01-2012 ते दि.12-01-2012 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.07-02-2012 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन दोन दिवस संस्थान सेवेतुन तात्पुरते सेवानिलंबीत करणेत आले.

50) श्री.बनकर हे दि.11-07-2012 ते दि.12-07-2012, दि.28-07-2012 व दि.31-07-2012 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.19-09-2012 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

51) श्री.बनकर हे दि.01-08-2012, दि.08-08-2012,दि.09-08-2012,दि.20-08-2012 ते दि.23-08-2012, दि.26-08-2012 व दि.23-08-2012 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.13-10-2012 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

52) श्री.बनकर हे दि.03-09-2012 ते दि.08-09-2012,दि.11-09-2012 ते दि.15-09-2012,दि.19-09-2012 ते दि.20-09-2012, दि.29-09-2012 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.24-10-2012 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

53) श्री.बनकर हे दि.01-10-2012, दि.02-10-2012,दि.09-10-2012,दि.16-10-2012, दि.21-10-2012, दि.29-10-2012 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.26-11-2012 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

54) श्री.बनकर हे दि.12-11-2012, दि.13-11-2012,दि.15-11-2012, दि.19-11-2012,दि.08-12-2012 ते दि.09-12-2012, दि.19-12-2012, दि.24-12-2012 ते दि.27-12-2012 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.06-02-2013 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन दोन दिवस संस्थान सेवेतुन तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आले.

55) श्री.बनकर हे दि.01-01-2013, दि.03-01-2013 ते दि.12-01-2013, दि.21-01-2013 ते दि.24-01-2013 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.04-03-2013 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन दोन दिवस संस्थान सेवेतुन तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आले.

56) श्री.बनकर हे दि.19-02-2013 ते दि.21-02-2013,दि.28-02-2013 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.13-04-2013 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

57) श्री.बनकर हे दि.31-03-2013 रोजी विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.04-06-2013 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

58) श्री.बनकर हे दि.16-07-2013 ते दि.15-09-2013 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.07-11-2013 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन तीन दिवस संस्थान सेवेतुन तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आले.

59) श्री.बनकर हे दि.26-10-2013 ते दि.28-10-2013,दि.30-10-2013 ते दि.31-10-2013 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.28-12-2013 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

60) श्री.बनकर हे दि.04-11-2013,दि.06-11-2013,दि.16-11-2013,दि.18-11-2013,दि.23-11-2013, दि.25-11-2013 ते दि.30-11-2013 अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.10-02-2014 रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन सक्त ताकिद देण्यात आली.

61) श्री.बनकर हे दि.01-12-2013 ते 31-07-2014 व दि.01-08-2014 पासुन ते आजतागायत अखेर या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.01-09-2014 रोजीचे आदेशान्वये खाते चौकशी करणेकामी आरोपपत्र बजाविणेत आलेले असुन खाते चौकशी पुर्ण होवुन अॅडव्होकेट बी.वाय.काळवाघे यांचेकडुन उपरोक्त अहवाल प्राप्त झालेला आहे.

62) श्री.बनकर हे दि.01-08-2014 ते दि.20-09-2014,दि.23-09-2014,दि.27-09-2014 ते दि.31-05-2015,दि.01-06-2015 ते आजतागायत विनापरवानगी गैरहजर राहीले आहेत म्हणुन त्यांना वेळोवेळी कारणे दाखवा नोटीसा काढणेत येवुन त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आलेला आहे परंतु अद्यापपर्यंत त्यांनी खुलासा सादर केलेला नाही.

अशाप्रकारे श्री.बनकर यांना यापूर्वी गैरशिस्त वर्तनाबाबत एकूण 61 वेळा शिक्षा झालेली असून, त्यांचे सेवेत व वर्तनात सुधारणा होत नसल्याचे दिसून येते.

श्री.बनकर यांचे विरुध्द गैरशिस्त वर्तनाबाबत ठेवणेत आलेल्या आरोपपत्रातील आरोप सिध्द झालेले आहेत. आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेल्या अथवा दोषी आढळुन आलेल्या कर्मचा-यास गैरशिस्त वर्तनाबाबत दि.बॉम्बे इंडस्ट्रीयल एम्प्लॉयमेंट (स्टॅडींग ऑर्डर्स) रुल्स 1959 चे कलम 25 (1) अन्वये खालीलप्रमाणे शिक्षा करणेची तरतुद आहे.

अ) ताकीद द्यावी किंवा ठपका द्यावा.

ब) पेमेंट ऑफ वेजेस अॅक्ट, 1936 हयाच्या तरतुदींच्या मर्यादेत राहुन आणि त्यानुसार दंड करावा. (एकुण वेतनाचे 3% इतका दंड)

क) चार दिवसांपेक्षा जास्त नाही इतका काळ त्याला व्यवस्थापकाच्या सहीच्या लेखी आदेशाने सस्पेंड करावे.

ड) नोटीशी शिवाय बडतर्फ (डिसमीस) करावे.

सबब, श्री.देवराम मुरलीधर बनकर, मदतनीस, श्री साई प्रसादालय विभाग यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने, व ते खातेचौकशीत अंशत: दोषी आढळुन आलेले असल्याने, त्यांना आरोप पत्रात नमुद केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत वरील अ, ब, क, ड या चार शिक्षेपैकी एक शिक्षा देता येईल.

तसेच श्री.बनकर यांना ड प्रमाणे शिक्षा करावयाची झाल्यास त्यांना प्रथम संस्थान सेवेतुन बडतर्फ (डिसमीस) का करु नये? अशी सेकंड शोकॉज नोटीस देवुन, त्यासोबत दि.07-06-2015 रोजीचा खातेचौकशी निष्कर्ष अहवाल श्री.बनकर यांना पाठवावा लागेल. त्याकामी श्री.बनकर यांचेविरुध्द संस्थानचे वतीने मा.कामगार व औद्योगिक न्यायालय, अहमदनगर व मा.दिवाणी न्यायालय सिनीयर डिव्हीजन, कोपरगांव व ज्युनियर डिव्हीजन, राहाता येथे कॅव्हेट अर्ज दाखल करावे लागेल.

सबब, श्री.देवराम मुरलीधर बनकर, मदतनीस, श्री साई प्रसादालय विभाग यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने व ते खातेचौकशीत अंशत: दोषी आढळुन आलेले असल्याने, तसेच श्री.बनकर यांना यापूर्वी अनेकवेळा ताकीद, सक्तताकिद, दंड व सेवेतून तात्पुरते सेवानिलंबीत, कायमस्वरुपी डिसमीस/ बडतर्फ केलेले आहे. त्यांना आरोप पत्रात नमुद केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत उपरोक्त नमुद केलेल्या चार शिक्षेपैकी "ड" प्रमाणे नोटीशी शिवाय बडतर्फ (डिसमीस) करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.४४६ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.देवराम मुरलीधर बनकर, मदतनीस, श्री साई प्रसादालय विभाग यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले आहेत व ते खातेचौकशीअंती दोषी आढळुन आलेले असल्याने, तसेच श्री.बनकर यांना यापूर्वी अनेकवेळा ताकीद, सक्तताकिद, दंड व सेवेतून तात्पुरते सेवानिलंबीत, कायमस्वरुपी डिसमीस/ बडतर्फ केलेले आहे. यावरुन श्री.बनकर यांना संस्थान सेवेमध्ये स्वारस्य नसल्याचे दिसून येते. सबब श्री.देवराम मुरलीधर बनकर, मदतनीस, श्री साई प्रसादालय विभाग यांना दि.बॉम्बे इंडस्ट्रीयल एम्प्लॉयमेंट (स्टॅंडींग ऑर्डर्स) रुल्स 1959 चे कलम 25 (1) मधील "ड" प्रमाणे नोटीशी शिवाय बडतर्फ (डिसमीस) करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

विषय नं.१२ **साईटेक प्रकल्प सद्यस्थिती, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे-ऑगस्ट २०१५ अखेर प्रलंबित बिले व त्यांचेकडून प्राप्त झालेल्या पत्राबाबत तसेच प्रलंबीत निर्णयामुळे श्री साईभक्तांना पुरविण्यात येणा-या कार्यप्रणाली अंतर्गत अत्यावश्यक सेवेवर होणा-या परिणामांबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/११/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ७९९ अन्वये माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीचे कामकाज हाती घेण्यात आलेले आहे. करारनाम्यानुसार साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करावयाच्या कार्यप्रणाली कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी संबधीत विभागांमध्ये कार्यान्वीत करुन दिलेल्या आहेत.

करारनाम्यानुसार साईटेक प्रकल्पातील सर्व कार्यप्रणाली हया अठरा (१८) महिन्यांच्या कालावधीत, एकुण सहा टप्प्यांमध्ये कार्यान्वीत करण्यात येणार होत्या. मुळ करारनाम्यानुसार प्रकल्प माहे - जानेवारी २०१० ला सुरु होऊन माहे - जुन २०११ पुर्ण होणे अपेक्षित होते. परंतु सुरवातीच्या काळात आलेल्या विविध अडचणींमुळे उदा. - सर्व्हर रुमच्या जागेतील बदल, फायबर केबल टाकणेकामी रस्त्याच्या कडेने असलेल्या दुकाने व रहदारी यांची अडचण इ. विविध कारणास्तव प्रकल्प निर्धारीत वेळेत पुर्ण करणे अशक्य झाले होते. साईटेक प्रकल्पासाठी तयार करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांना सहमतीने निर्धारीत वेळेत बदल करण्याचा अधिकार आहे. त्यानुसार साईटेक प्रकल्प उभारणीचे कामास सुरवातीस दि. १३/०३/२०१३ व दि.३०/०८/२०१३ अशी मुदतवाढ घेण्यात आलेली असून, त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे.

करारनाम्यानुसार साईटेक प्रकल्पातील पहिल्या टप्प्यातील पहिली कार्यप्रणाली संस्थानने स्वीकारलेनंतर कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना त्यांचे दरमहा पेमेंट संस्थानने अदा करणे गरजेचे आहे. साईटेक प्रकल्पातील पहिली कार्यप्रणाली दि. १४ जुलै २०११ रोजी कार्यान्वीत करण्यात आली असून, दि. ०१ ऑगष्ट २०११ रोजी ती स्वीकारण्यात आलेली आहे, सबब कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना करारनाम्यानुसार माहे - ऑगष्ट २०११ पासून पेमेंट अदा करण्यात येत आहे. करारनाम्यानुसार साईटेक प्रकल्पाचा कालावधी ६९ महिन्यांचा आहे. आजपोवतो कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना माहे - फेब्रुवारी २०१४ पर्यंतचे पेमेंट अदा करण्यात आलेले आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे- मार्च २०१४ ते माहे- जुलै २०१४ चे पेमेंटबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि. २५/०९/२०१४ रोजीच्या सभेसमोर ठेवण्यात आलेला होता. त्यावर निर्णय क्रं. ८३७ अन्वये पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले होते- *''कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांच्या हलगर्जीपणामुळे व चुकीमुळे प्रकल्प पुर्ण होण्यास दिरंगाई झालेली आहे. गेल्या तीन महिन्यांपासून कामाला गती मिळाली असून कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा पाठीमागील कटु अनुभवाचा फारसा विचार न करता केवळ प्रायोगीक तत्वावर ३ महिन्यांचा कालावधी त्यांना काम पुर्ण करण्यास वाढवून दिलेला होता. परंतु तरीही कामात फारशी प्रगती झालेली नाही, त्यामुळे काम पुर्ण झाल्यानंतर उर्वरीत बील दिले जावे. आवश्यक ऑडीट व फायनालिटी क्लॉजला अनुसरून त्यांचेबरोबरचा*

*करार रद्द केला जाईल, असे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना कळविणेत यावे. तसेच यापुढे स्टॅंडबाय अरेंजमेंट सर्वकाळ, सर्व कारणांकरीता केली जावी, असे ठरले. "*

उपरोक्त निर्णयास अनुसरुन कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी प्रकल्पाबाबत केलेली कार्यवाही पाहता त्यांना देण्याच्या नोटीस व पेमेंटबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि. ३०/०१/२०१५ रोजीचे सभेसमोर ठेवण्यात आलेला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन, निर्णय क्र. २० अन्वये पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आले - *"कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना माहे - डिसेंबर २०१३ ते माहे - फेब्रुवारी २०१४ या कालावधीतील बाकी असलेली २५% रक्कम अदा करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच सॉफ्टवेअर रिक्वॉयरमेंटचा अभ्यास करुन त्यांचे पुढील पेमेंटबाबत या प्रकल्पाची प्रगती पाहून निर्णय घेतला जाईल, असे ठरले. "*

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे - मार्च २०१४ ते माहे - डिसेंबर २०१४ चे पेमेंट अदा करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि. १२/०३/२०१५ रोजीचे सभेसमोर ठेवण्यात आला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चेअंती निर्णय क्रं. ९५ अन्वये पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आले होते- "कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे - मार्च २०१४ ते माहे - डिसेंबर २०१४ अखेरचे पेमेंट अदा करणेपुर्वी आय.टी. कमिटी व तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय घेण्यात यावा. तसेच त्यांचे अभिप्राय आल्यानंतर कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनीधींना चर्चेसाठी सभेसमोर बोलविणेत यावे, असे ठरले. "

उपरोक्त निर्णयास अनुसरुन आयटी कमिटी व तांत्रिक सल्लागार यांचे अभिप्राय इकडील विभागाने ई-मेलद्वारे मागविलेले होते. प्राप्त झालेल्या अभिप्रायांमध्ये प्रामुख्याने, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना प्रकल्पाची प्रगती पाहुन करारनाम्यांनुसार पेमेंट अदा करण्यात यावे, असे सुचित करण्यात आलेले आहे. सदर अभिप्राय व प्रकल्पाची सद्यस्थिती बाबतचा प्रस्ताव दि. ०१/०७/२०१५ रोजीच्या मंजुर टिपणीअन्वये मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेसाठी सभाकामकाज विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे. परंतु आज अखेर सदर प्रस्तावावर निर्णय होणे बाकी आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१४ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं. ९१२ अन्वये साईटेक प्रकाल्पाचे कामकाजासंबधीचा Support व Development कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी बंद केल्यास पर्यायी व्यवस्था राबविणेकामी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावावर मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार साईटेक प्रकल्प आऊटसोर्समार्फत चालविणेकामी माहिती तंत्रज्ञान विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे मदतीने मान्यतेने निवीदा प्रक्रीया तात्काळ सुरु करुन दोन महिन्यांच्या कालावधीत पुर्ण करावी. त्यानुसार महाराष्ट्र शासनास दि.१५/१२/२०१४, दि. २३/०२/२०१५ व दि.०९/०५/२०१५ रोजी वेळोवेळी स्मरणपत्र देखील देण्यात आलेले असुन सदरहु कामी महाराष्ट्र शासनाचे मंत्रालयात वेळोवेळी मिटींग आयोजित करण्यात आली होती.त्यानुसार दि.०१/०५/२०१५ रोजीचे टिपणीअन्वये मा. व्यवस्थापन समितीचेनिर्णयानुसार साईटेक प्रकल्प व्यवस्थापनासंदर्भात चालु असलेल्या कार्यवाहीबाबतचा प्रस्ताव माहिती तसेच नोंद घेणेकामी सादर करण्यात आला आहे.

सदर महाराष्ट्र शासनाचे प्रतिनीधींनी याबाबत सदरचे काम माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नामांकीत एजन्सीमार्फत आऊटसोअर्स पद्धतीने राबवीणे योग्य ठरेल असे सुचित केले आहे. तसेच दि.२५/०५/२०१५ रोजीचे प्रस्तावावर मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी दिलेल्या निर्देशानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१४ रोजीचे निर्णयानुसार महाराष्ट्र शासनाचे संबंधीत प्रतिनीधींशी पाठपुरावा करुन अथवा महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान संचनालय विभागाचे GAD-मातंस 080/4/2014-0/0 DIRECTORATE OF IT-DIT(MH) Mantralaya, Mumbai-400032, Date: 01/07/2014 अध्यादेशानुसार नेमलेल्या अधिकृत कंन्सलटंन्सी सर्व्हिसेस पुरविणा-या कंपनीशी संपर्क साधुन कार्यवाही अंतिम करणेबाबत प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेस्तव सादर करावा असे निर्देश दिलेले आहे. त्यानुसार साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल निवीदा प्रक्रिया महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान संचनालय विभागाचे अध्यादेशातील अधिकृत कंन्सलटंन्सी कंपनीकडुन अंतिम करणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव दि.२४/०७/२०१५ अन्वये प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत आलेला आहे. परंतु आज अखेर सदर प्रस्तावावर निर्णय होणे बाकी आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे दि. २७/०८/२०१५ रोजीचे आवक क्रं. १०६३७ चे पत्र इकडील विभागास प्राप्त झालेले आहे. सदर पत्राद्वारे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी त्यांचे माहे - जुलै - २०१५ पर्यंतचे पेमेंट लवकरात लवकर मिळण्यासाठी विनंती केलेली आहे. सदर पत्रामध्ये कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी साईटेक प्रकल्पासाठी कार्यान्वीत करण्यात आलेल्या Hardware devices, Network devices & Software AMC (Annual Maintainance Contract) चा कालावधी संपत आलेला आहे. तसेच काही Software Licences Renewal करणेही अत्यंत गरजेचे आहे. परंतु कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे पेमेंट माहे - मार्च २०१४ पासून अदा झालेले नसल्याने सदर AMC (Annual Maintainance Contract) चे नुतनीकरण करण्यास त्यांनी असमर्थता दाखविलेली आहे. सबब, दरम्यानच्या काळात सदरचे तांत्रिक उपकरणे काही कारणास्तव बंद पडल्यास AMC (Annual Maintainance Contract) चे Renewal झालेले नसल्याने त्यांचे पुरवठाधारकांकडून त्यांना मदत मिळणे शक्य नसल्याचे कळविलेले आहे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे ऑगष्ट-२०१५ अखेरची बीले (एकुण रक्कम रुपये ५,०१,३४,७०८.८८) अदा होणे बाकी आहे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनिधींनी त्यांचे पेमेंट मिळणेबाबत तसेच मा. व्यवस्थापन समितीचे समोर चर्चाकरणेकामी वेळ मिळणेबाबत वेळोवेळी विनंती केलेली आहे.

तसेच साईटेक प्रकल्पाअंतर्गत वापरण्यात येणा-या ११८ पैकी ३७ प्रिंटर्सचा कालावधीही २०१५ अखेर दि.१२/०८२०१५ रोजीचे पत्रासोबतचे तपशीलात नमुद केलेनुसार संपुष्टात येत आहे. त्यानुसार संस्थानच्या दैनंदिन कामकाजासाठी प्रिंटर्स संस्थानचे विहीत पद्धतीने खरेदी करणेकामी प्रस्ताव दि.०३/०८/२०१५ रोजीच्या मंजुर

टिपणीअन्वये मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेसाठी सभाकामकाज विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे. परंतु आज अखेर सदर प्रस्तावावर निर्णय होणे बाकी असल्यामुळे पुरवठाधारकाने सदरचे पिंटर्स काढुन घेतल्यास तांत्रिक सेवा केव्हाही विस्कळीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी त्यांचे दि. २७/०८/२०१५ रोजीचे पत्रात नमुद केलेप्रमाणे AMC (Annual Maintenance Contract) पेमेंट अभावी प्रलंबित असल्याने, साईटेक प्रकल्पातील खालील सेवा-सुविधा विस्कळीत होवुन, साईभक्तांना पुरविणेत येणा-या सेवा-सुविधांवर त्याचा परिणाम होऊन, संस्थानचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

१. Printer Manage Services Contract.
२. Network Switches AMC.
३. UPS Battery Procurement and it's AMC.
४. ERP Applications Licence Renewal.
५. Database Oracle Software Licence Renewal.

**साईटेक प्रकल्प सद्यस्थिती-** साईटेक प्रकल्पाअंतर्गत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून आतापर्यंत पुढीलप्रमाणे कामे पुर्ण करण्यात आलेली आहेत.

**नेटवर्क-** साईटेक प्रकल्पाअंतर्गत विविध विभागात कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणाली हया मुख्य सर्व्हरला जोडण्यासाठी नेटवर्कची उभारणी करण्यात आलेली आहे.

1. कॅट-6 केबलद्वारे संस्थानचे विविध विभाग, डेटा सेंटर, डी आर व विविध शहरामध्ये असलेली माहिती सुविधा केंद्रे असे एकुण सर्व मिळुन ४८१ नेटवर्क डेटा पॉईट कार्यरत करण्यात आलेले आहेत.
2. शिर्डीमधील संस्थानचे विविध इमारतीमध्ये असलेल्या विभागांना जोडण्यासाठी फायबर केबलद्वारे दोन मार्गांची सोय उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. काही कारणांमुळे पहिला मार्ग बंद पडल्यास, कार्यप्रणाली तात्काळ दुसऱ्या मार्गावर कार्यान्वीत होते.
3. फायबर केबलचे दोन्ही मार्ग काही कारणास्तव बंद पडल्यास Wi-Max या तंत्रज्ञानाचा उपयोग करुन कार्यप्रणाली कार्यरत ठेवण्याची तजवीज केलेली आहे.
4. संस्थानचे मुंबई, बैंगलोर, सिकंदराबाद व चेन्नई येथील कार्यालय व्हीपीएन या तंत्रज्ञानाचा उपयोग करुन सर्व्हरला जोडलेली आहेत.

**हार्डवेअर-** प्रकल्पाअंतर्गत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून पुढीलप्रमाणे हार्डवेअर संस्थानला प्राप्त झालेले असुन ते कार्यरत आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. संगणक | - | 168 |
| 2. संगणक (Dual Monitor) | - | 16 |
| 3. लॅपटॉप | - | 15 |
| 4. सर्व्हर | - | 16 |
| 5. किऑस्क (टच स्क्रीन) | - | 06 |
| 6. युपीएस | - | 26 (विविध क्षमतेचे) |
| 7. प्रिंटर्स | - | 118 |

**डेटा सेंटर-** साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणाली हया सुरळीत चालाव्यात व सर्व माहिती सुरक्षित राहावी या करीता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत अद्यावत तंत्रज्ञानाचा उपयोग करुन आयटी विभागामध्ये डेटा सेंटरची उभारणी करण्यात आलेली आहे. सदर डेटा सेंटरमध्ये पुढीलप्रमाणे उपरोक्त नमुद हार्डवेअर, सर्व्हर व नेटवर्क कार्यान्वित असुन खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

1. Fire Detection.
2. Fire Seperation.
3.Biomatric and Card reader Access Control.

काही तांत्रिक कारणांमुळे सदरचे Data Centre (DC) बंद पडल्यास कार्यप्रणाली चालू राहण्यासाठी Disaster Recovery (DR) ची उभारणी साईआश्रम भक्तनिवास क्र. 1 या ठिकाणी करण्यात आलेली आहे.

**सॉफ्टवेअर-** करारनाम्यानुसार एकुण ३७ कार्यप्रणाली साईटेक प्रकल्पाअंतर्गत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी विकसीत करुन विविध विभागात कार्यान्वीत केलेल्या आहेत. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी सदरच्या ३७ कार्यप्रणाली व्यतिरीक्त संस्थानचे मागणीनुसार ऑनलाईन सर्व्हिसेस ही अतिरीक्त कार्यप्रणाली दि.१४/०७/२०११ रोजी विकसीत करुन कार्यान्वीत केलेली आहे. सदर कार्यप्रणालीद्वारे इंटरनेटवर श्री साईभक्तांसाठी ऑनलाईन आरती/दर्शन पास, रुम बुकींग, देणगी, साईलीला सभासद, भक्तमंडळ सभासद इ. सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. दिवसेंदिवस सदरच्या कार्यप्रणालीला साईभक्तांचा उल्लेखनिय प्रतिसाद मिळत आहे.

साईटेक प्रकल्पांतर्गत ऑनलाईन सर्व्हिसेसला साईभक्तांचा लक्षणीय प्रतिसाद लाभत असल्याने सुरवातीस याकामी कार्यान्वीत करण्यात आलेल्या सर्व्हरची क्षमता अपुरी पडू लागली. सबब, साईभक्तांना सदर सुविधेचा लाभ घेण्यास अनेक अडचणी येऊ लागल्यानंतर कार्यप्रणाली सुरळीत चालावी व श्री साईभक्तांना विनासायास या सुविधेचा लाभ घेता यावा, यासाठी मा.श्री.के.व्ही.रमणी यांनी देणगीस्वरुपात उच्च क्षमतेचे दोन सर्व्हर दिलेले असुन कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत ते कार्यान्वीत करण्यात आलेले आहेत. तसेच कार्यप्रणालीसाठी बीएसएनएल ची 10

एमबीपीएस लिंक संस्थानमार्फत कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. बीएसएनएलची 10 एमबीपीएसची लिंक काही कारणास्तव बंद पडल्यास, कार्यप्रणाली अखंड कार्यान्वीत राहावी यासाठी विभागामार्फत एअरटेल कंपनीची 10 एमबीपीएस ची लिंक घेणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. परंतु सदर प्रस्ताव मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणे आवश्यक असल्याने सदर प्रस्तावास विलंब होत असल्याने सदर एअरटेल कंपनीची 10 एमबीपीएस ची लिंक कार्यान्वीत करणेकामीचा खर्च आयटी कमिटी अध्यक्ष मा.श्री.के.व्ही.रमणी सो. यांनी देणगी स्वरुपात दिलेला आहे.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालींमधुन थेट साईभक्तांना पुरविण्यात आलेल्या सेवा-सुविधा व त्यामार्फत जमा झालेली रक्कम यांचा दि.११/०९/२०१५ अखेर तपशीलवार माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| Particular | No. of Transactions | No. of devotees | Amount |
|---|---|---|---|
| Online system | 12,52,969 | 41,11,474 | 92,06,14,769 |
| Mumbai | 2,793 | 12,843 | 43,78,116 |
| Chennai | 4,426 | 26,036 | 74,82,133 |
| Bengaluru | 11,828 | 64,199 | 1,41,52,620 |
| Hyderabad | 9,874 | 41,338 | 80,87,945 |
| Remote Info-centers Total - | 28,921 | 1,44,416 | 3,41,00,814 |
| Total (OLS + Info-centre) | 12,81,890 | 42,55,890 | 95,47,15,583 |
| Transactions done in Application installed in Shirdi | 1,62,75,242 | 3,41,74,549 | 370,56,87,722 |
| Total (SaiTech Applications) | 1,75,57,132 | 3,84,30,439 | 466,04,03,305 |

तसेच प्रकलपाअंतर्गत प्रशासकीय कामकाजासाठी पगारबील, कामगार, वर्क फ्लो सिस्टिम, इनवर्ड, वाऊटवर्ड, टेलिफोन सिस्टिम यासारख्या कार्यप्रणालींचा दैनंदिन वापर संबधीत विभागामार्फत चालू आहे.

साईटेक प्रकल्पातील कार्यप्रणालीचा वाढता वापर पाहता, कार्यप्रणालींमधुन साईभक्तांना देण्यात येणा-या सेवा-सुविधा सुरळीत सुरु राहणेकामी सध्यस्थितीतील Infrastructure हे Upgrade होणे अत्यंत गरजेचे आहे. सबब, त्याकरीता विभागामार्फत Future Capacity Plan तयार करण्यात आला असुन त्यास आयटी कमिटीचा अभिप्राय प्राप्त झालेनंतर त्यावर संस्थानचे विहीत पद्धतीने कार्यवाही करता येईल. तसेच सध्यस्थितीत कार्यरत असलेल्या सर्व्हरची क्षमता अपुरी पडत असल्याने एक नग नविन सर्व्हर महाराष्ट्र शासनाचे व आयटी कमिटीचे अभिप्रायानुसार तातडीने खरेदी करणेकामी प्रस्ताव दि.०४/०८/२०१५ अन्वये प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात आलेला आहे. परंतु सदर विषयावर दि. ०८/०९/२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होवुन याकामी लागणारी Space बाबत शासनाचे NIC कडे उपलब्ध असलेबाबतची माहिती घेणेत यावी, असे सभाकामकाज विभागाकडुन समजले. तद्नंतर सदरकामी महाराष्ट्र शासनाचे माहिती व तंत्रज्ञान संचनालय विभागाशी दि.१०/०९/२०१५ रोजीचे ई-मेलद्वारे विचारणा केली असता त्यांनी दि. ११/०९/२०१५ रोजीचे (संदर्भ क्र.७) ई-मेलद्वारे खालीलप्रमाणे आपला अभिप्राय कळविला आहे.

"Saibaba Sansthan have its own DC and Near DR at Shirdi, technically, it will not possible to share any infrastructure resources from MH-SDC or NIC. Sansthan will have to scale up their own capacity. Further, MH-SDC or NIC (Meghraj) provide cloud services and Sansthan have dedicated infrastructure. In such scenario, it is advisable to augment the infrastructure resources at the DC and near DR of Sai Sansthan. Please refer to the recommendations made in the Capacity planning document recommended by the SaiTech IT committee."

करारनाम्यानुसार कार्यान्वीत करावयाच्या ३७ कार्यप्रणालींपैकी दर्शन पास-2 व इंटीग्रेशन वुईथ एचएमएस हया दोन कार्यप्रणाली कार्यान्वीत करणे अद्याप बाकी आहे. सदर कार्यप्रणालीपैकी दर्शनपास -२ या कार्यप्रणालीबाबत प्रात्यक्षिक मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात येवुन त्याबाबत सभाकामकाज विभागाकडुन इकडील विभागास कार्यवाहीची प्रत मिळालेनंतर पुढील कार्यवाही करता येईल. तसेच इंटीग्रेशन वुईथ एचएमएस दोन्ही रुग्णालयात कार्यान्वीत करणे मा. वैद्यकिय संचालक निर्णयावर अवलंबुन असुन याबाबत त्यांना दि. २७/०५/२०१४, दि. १२/०९/२०१४ व दि. ०२/०१/२०१५ रोजीचे पत्रान्वये कार्यवाही करणेकामी कळविण्यात आले आहे.

**साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालींची सद्यस्थिती पुढीलप्रमाणे आहे-**

| अ.क्रं. | कार्यप्रणाली | सद्यस्थिती |
|---|---|---|
| 1 | अकाऊंट | अकाऊंट विभागात चालणाऱ्या सर्व व्यवहारांची नोंद सध्या कार्यप्रणालीमध्ये घेण्यात येत आहे.<br>नविन कार्यप्रणालीमध्ये आवश्यकतेप्रमाणे सुधारणा तथा बदल वेळोवेळी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून करुन घेण्यात येत आहेत. |
| 2 | प्रसादालय | चालू आहे. |

| अ.क्र. | कार्यप्रणाली | सद्यस्थिती |
|---|---|---|
| 3 | खरेदी | चालू आहे. |
| 4 | भांडार | चालू आहे. |
| 5 | रुम रिझर्वेशन | चालू आहे. |
| 6 | दर्शन पास – १ | चालू आहे. |
| 7 | चेक / डीडी | चालू आहे |
| 8 | देणगी कार्यालय | चालू आहे. |
| 9 | पगारबील | चालू आहे.<br>वेतन निश्चिती, फरक बीले संदर्भातील कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. |
| 10 | कामगार | चालू आहे.<br>विभागाने कार्यप्रणालीसंदर्भात काही सुधारणा तथा बदल सुचविलेले आहेत. |
| 11 | लाडू प्रसाद | चालू आहे. |
| 12 | मनी ऑर्डर | चालू आहे. |
| 13 | टेलिफोन बीलींग | चालू आहे. |
| 14 | कँटीन | चालू आहे. |
| 15 | इन्फॉर्मेशन फॉर सिनीअर ऑफीसर्स (वर्क फ्लो) | चालू आहे. |
| 16 | इनवर्ड / आऊटवर्ड | चालू आहे.<br>कार्यप्रणाली इतर सर्व विभागांमध्ये कार्यान्वीत करणे प्रस्तावीत आहे. |
| 17 | भक्तमंडळ सभासद | चालू आहे. |
| 18 | प्रकाशने | चालू आहे. |
| 19 | साईलीला | चालू आहे. |
| 20 | विद्युत विभाग | चालू आहे. |
| 21 | किऑस्क | चालू आहे. |
| 22 | विधी विभाग | चालू आहे. |
| 23 | सभा कामकाज | चालू आहे. |
| 24 | वाहन विभाग | चालू आहे. |
| 25 | पाणी पुरवठा | चालू आहे. |
| 26 | कापड कोठी / विक्री | चालू आहे. |
| 27 | बांधकाम | चालू आहे. |
| 28 | गेस्ट ईन्फॉर्मेशन | चालू आहे. |
| 29 | वैद्यकिय अनुदान | चालू आहे. |
| 30 | एमआयएस | कार्यान्वीत झालेल्या काही कार्यप्रणालींच्या रिपोर्ट कार्यप्रणालीमध्ये विकसीत करण्यात आलेले आहेत. अद्याप काही रिपोर्टबाबतची कार्यवाही होणे बाकी आहे. |
| 31 | संरक्षण विभाग | चालू आहे. |
| 32 | शैक्षणिक संकुल | आयटीआय व इंग्लीश मेडीअम स्कुल यांनी कार्यप्रणालीचा वापर सुरु केलेला आहे.<br>कार्यप्रणालीमध्ये आवश्यक बदल तथा सुधारणा करण्याची कार्यवाही कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून अंतिम टप्प्यात आहे. |
| 33 | उत्सव | चालू आहे. |
| 34 | इंटीग्रेशन वुईथ एचएमएस | एचएमएस हि कार्यप्रणाली संस्थान (रुग्णालये) मार्फत सुरु केलेनंतर सदरची कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यात येणार आहे. |
| 35 | ओल्ड डेटा मायग्रेशन | पुर्ण झालेले आहे. |
| 36 | Proxy & Email integration/setup | पुर्ण झालेले आहे. |
| 37 | रेकॉर्ड | चालू आहे. |
| 38 | दर्शन पास-2 | कार्यप्रणाली कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी विकसीत केलेली आहे. कार्यप्रणाली कार्यान्वीत करणे संस्थान निर्णयावर अवलंबीत आहे. |
| 39 | ऑनलाईन सर्व्हिसेस | चालू आहे. |

संस्थानचे विनंतीनुसार माहिती तंत्र संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी साईटक प्रकल्पाचे दि. १४/०८/२०१४ ते दि. १६/०८/२०१४ या काळात शिर्डी येथे येऊन Third Party Audit केलेले आहे. तसेच संस्थानचे विनंतीवरून लेखापरिक्षक अभयशास्त्री अँड असोसिएटस् यांनी शिर्डी येथे येऊन अकाऊंट विभागात कार्यान्वीत करण्यात आलेल्या ईआरपी या कार्यप्रणालीची पाहणी करुन त्याचा अहवाल संस्थानला दिलेला होता.

साईटक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या Software, Hardware, Network, Infrastructure, Printer Service, Helpdesk, Data Base & System Admin Support, Application Support, ERP, OFC Splicing Etc., चे देखभाल/दुरुस्तीसाठी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे मार्फत २७ तांत्रिक कर्मचारी शिर्डी येथे वेगवेगळया शिफ्टमध्ये काम करत आहेत. तसेच कार्यप्रणालीमध्ये आवश्यक सुधारणा तथा बदल करणेसाठी २० तांत्रिक कर्मचारी पुणे येथील कार्यालयात काम करत आहेत. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे असे एकुण ४७ अनुभवी, उच्च शिक्षीत तांत्रिक कर्मचारी साईटेक प्रकल्पावर काम करत आहेत. सदर कंपनीस माहे - मार्च २०१४ ते माहे – ऑगष्ट २०१५ अखेर करारनाम्यानुसार पेमेंटची रक्कम मिळत नसल्याने कंपनीस प्रकल्पावर काम करणा-या कर्मचा-यांचे वेतन अदा करणेस तसेच उपरोक्त नमुद केलेल्या सेवा-सुविधा आहोरात्र कार्यरत ठेवणेकामी लागणारे तांत्रिक साहित्य तातडीने उपलब्ध करण्यास असंख्य अडचणी निर्माण होत आहे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे पेमेंटबाबत महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्र संचनालयाचे प्रतिनीधींनी समक्ष कार्यकारी अधिकारी सो. यांची भेट घेवुन प्रकल्पाची व्याप्ती व कार्यरत असलेल्या सेवा सुविधाबाबत सविस्तर माहिती देवुन, पुरवठाधारकाचे पेमेंट अदा करणेबाबत तसेच तांत्रिक साहित्य तातडीने वेळेवर खरेदी करणेबाबत सुचित करुनही, कुठलाही निर्णय होत नसल्याने सध्यस्थितीत विभागाचे कामकाज चालविणे अत्यंत कठिण होवुन बसले आहे. आयटी क्षेत्रात कामकाज करताना सर्व गोष्टींची तरतुद ही आगाऊ व तात्काळ करावी लागत असल्याचे मत तत्कालीन प्रधान सचिव श्री राजेश अग्रवाल माहिती तंत्रसंचनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांनी शिर्डी येथे व्यक्त केले होते. परंतु महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्र संचनालय विभागाचे वेळोवेळी घेतलेल्या अभिप्रायानुसार, प्रलंबीत प्रस्तावावर कुठलिही कार्यवाही तातडीने होत नसल्याने पुढील काळात साईटेक प्रकल्पांतर्गत श्री साईभक्तांना पुरविण्यात येणा-या देणगी काऊंटर, रुम रिझर्वेशन, प्रसादालय कुपन विक्री, कॅन्टीन कुपन विक्री, प्रकाशने विभाग (पुस्तके/फोटो विक्री), भक्तमंडळ सभासद, चेक/डीडी, मनी ऑर्डर, जनसंपर्क कार्यालय, कापड कोठी/विक्री, ऑनलाईन सर्व्हिसेस व माहिती केंद्रे या सारखी द्यावयाच्या थेट सेवेंवर परिणाम होवून त्या विस्कळीत होण्याची दाट शक्यता निर्माण होत आहे.

तसेच उपरोक्त नमुद केलेली कार्यप्रणाली / साईटेक प्रकल्पांमार्फत पुरविण्यात येणा-या सेवा खंडीत झाल्यास पर्यायी कार्यप्रणाली संस्थानचे सद्यस्थितीतीत कार्यरत असलेल्या नेटवर्कवर सुरु करणे तांत्रिक दृष्टया अशक्य आहे. सबब दुर्दैवाने वरील नमुद केलेल्या कारणांमुळे कार्यप्रणाली बंद पडल्यास सदर ठिकाणी मॅन्युअल सिस्टिम सुरु करावी लागणार आहे. त्याबाबतीत सर्व संबधीतांना सुचना द्याव्या लागतील, असे इकडील विभागाचे स्पष्ट मत आहे. सदर विभागाचे मतास माहिती तंत्र संचनालय, महाराष्ट्र शासन यांचे प्रतिनीधी श्री मुकेश सोमकुवर यांनी देखील चर्चेअंती दुजोरा दिला असुन याबाबत संस्थान प्रशासनास/व्यवस्थापनास काही शंका अथवा अडचण असल्यास अधिकृत चर्चेसाठी शिर्डी येथे येणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले आहे.तसेच कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनीधींनी देखील मा. व्यवस्थापन समितीचे वेळ मिळणेकामी विनंती केलेलीआहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे मार्च-२०१४ ते डिसेंबर २०१४ पेमेंटमधील रकमेच्या २०% रक्कम, राहीलेल्या त्रुटींचे निरसण होईपर्यंत राखीव ठेवुन, उर्वरीत रक्कम अदा हाणेच्या निर्णयास्तवचा प्रस्ताव, माहिती तंत्रज्ञान विभागाची दि. ०१/०७/२०१५ रोजीच्या मंजुर टिपणी अन्वये प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत आलेला आहे. परंतु आजअखेर प्रस्तावावर निर्णय होणे बाकी आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे जानेवार-२०१५ ते ऑगष्ट-२०१५ पर्यंतचे बीले इकडील विभागास प्राप्त झालेली असून त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| Month | Invoice No & Date | Description | Net Amount |
|---|---|---|---|
| January 2015 | IN214-0000003949 | Service rendered for the month of January 2015 | 21,24,702.88 |
| | IN214-0000000861 | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |
| February 2015 | IN214-0000003950 | Service rendered for the month of February 2015 | 21,24,702.88 |
| | IN214-0000000861 | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |
| March 2015 | IN214-0000004118 | Service rendered for the month of March 2015 | 21,24,702.88 |
| | IN214-0000000861 | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |
| April 2015 | IN214-0000004729 | Service rendered for the month of April 2015 | 21,24,702.88 |
| | IN214-0000000861 | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |
| May 2015 | IN214-0000005236 | Service rendered for the month of May 2015 | 21,55,714.92 |
| | IN214-0000000861 | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **28,09,382.08** |
| June 2015 | IN214-0000005538 | Service rendered for the month of June 2015 | 21,55,714.92 |
| | IN214-0000000861 | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **28,09,382.08** |

| Month | Invoice No & Date | Description | Net Amount |
|---|---|---|---|
| July 2015 | IN214-0000005883 | Service rendered for the month of July 2015 | 21,55,714.92 |
| | IN214-0000000861 | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **28,09,382.08** |
| August 2015 | IN214-0000006251 | Service rendered for the month of August 2015 | 21,55,714.92 |
| | IN214-0000000861 | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **28,09,382.08** |
| | | **Grand Total** | **2,23,51,008.48** |

उपरोक्तप्रमाणे साईटेक प्रकल्प सद्यस्थिती, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे - मार्च २०१४ ते माहे - ऑगष्ट २०१५ अखेर प्रलंबित बिले, एकुण रक्कम रुपये ५,०१,३४,७०९ (अक्षरी – पाच कोटी एक लाख चौतीस हजार सातशे नऊ रुपये मात्र) व त्यांचेकडुन प्राप्त झालेले पत्राबाबत तसेच, वेळोवेळी विभागामार्फत सर्व बाबींचा केलेला पाठपुरावा तसेच सर्व सुविधा अद्यावत होणेकामीचे प्रस्ताव, दाखल करुनही त्यावर यथोचित निर्णय न झाल्याने प्रलंबीत असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, सर्व कार्यवाही प्रलंबीत असल्याने यापुढे श्री साईभक्तांना पुरविण्यात येणा-या सेवेवर होणा-या परीणामाबाबत, इकडील विभागाचा उपरोक्त नमुद अहवालाची नोंद घेणेकामी तथा निर्णयास्तव प्रस्ताव मा. त्रिसस्य समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.४४७** **उपरोक्त प्रस्तावावर व विभागाच्या अभिप्रायावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, दि.०८.१०.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३३० नुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे मार्च २०१४ ते डिसेंबर २०१४ या कालावधीतील बीले आदा करणेबाबत चर्चा होऊन, काही अटींवर मान्यता देण्यात आलेली आहे. त्यापुढील जानेवारी- २०१५ ते ऑगष्ट- २०१५ अखेरची बीले अदा करणेसाठीही या निर्णयाप्रमाणेच त्यांच्या बीलातून २०% रक्कम राखीव ठेवणेत येऊन उर्वरित रक्कम त्यांना अदा करणेसाठी संस्थान वकिलामार्फत सविस्तर बाबी नमूद करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेसाठी अर्ज सादर करणेत यावा.**

**तसेच प्रास्ताविकेमध्ये नमुद केलेल्या त्रुटींचे निरसण करण्यास किती कालावधी आवश्यक आहे, याबाबत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून लेखी मागविणेत यावे.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१३** **श्रीमती गऊबाई कचरु गुंजाळ, रा.पाथरे खु., ता.सिन्नर यांचे मालकीचे ११ गुंठे क्षेत्र देणगी घेणेचा प्रस्ताव रद्द करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीमती गऊबाई कचरु गुंजाळ, रा.पाथरे खु.,ता.सिन्नर,जि.नाशिक यांनी दि.२९/९/२०१४ रोजी अर्ज केलेला असून अर्जात नमुद केले आहे की, मला श्री क्षेत्र साईबाबा शिर्डी संस्थानसाठी मौजे पाथरे खु. ता.सिन्नर,जि.नाशिक येथील माझ्या स्वमालकीची व उपभोगातील गट नं.१६६/३ मधील क्षेत्र १ हेक्टर २५ आर यापैकी माझ्या मालकीचे क्षेत्रातील ०.११ आर शिर्डी सिन्नर हायवे लगत साईबाबा संस्थान शिर्डी यास दान द्यावयाचे आहे.

प्रस्तुत जागेची पाहणी करुन तसेच कागदपत्रांची माहिती घेऊन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करता येईल. अशा आशयाचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. त्यावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.९/१२/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१०२४ खालील प्रमाणे झालेला आहे.

"उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती गऊबाई कचरु गुंजाळ, रा.पाथरे खु., ता.सिन्नर या संस्थानला देणगीदाखल देत असलेल्या जागेची कार्यकारी अधिकारी यांनी पाहणी करावी व त्या जागेसंदर्भातील संपुर्ण कागदपत्रांची माहिती घेऊन, सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले."

श्रीमती गऊबाई कचरु गुंजाळ यांनी दि.२५/३/२०१५ रोजीचे पत्रान्वये, आता माझी सदर ११ आर जागा देण्याची इच्छा नाही. तरी माझा दि.२९/९/२०१४ रोजीचा अर्ज रद्द समजण्यात यावा अशी विनंती केली आहे.

श्रीमती गुंजाळ यांनी दि.२५/३/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविल्याप्रमाणे संस्थानला जागा देणगी देण्याची इच्छा नाही. ही बाब मा.त्रिसदस्य समितीचे निदर्शनास आणून सदरचे प्रकरण नस्तीबध्द करणेबाबत इकडील दि.१/४/२०१५ रोजी कार्यालयीन टिपणी सादर करणेत आलेली आहे. त्यावर मा.व्यवस्थापन समितीपुढे विषय सादर करणेपुर्वी अर्जदार यांचेकडे त्यांचा प्रस्ताव रद्द करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर करणेत येत आहे, असे समक्ष किंवा रजि.पोस्टाने कळविणेत येऊन त्यानंतर एक महिन्याने मा.व्यवस्थापन समितीपुढे विषय सादर करणेबाबत निर्देश आहेत.

त्यानुसार श्रीमती गऊबाई कचरु गुंजाळ, रा.पाथरे खु.,ता.सिन्नर,जि.नाशिक यांना इकडील जा.नं.एसएसएस/ मालमत्ता/ २४१/२०१५ दि.१५/४/२०१५ रोजीचे पत्रान्वये आपण केलेल्या विनंतीनुसार जागा देणगी देणेबाबतचा प्रस्ताव रद्द करीत असल्याची माहिती संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर करणेत येत असलेबाबत कळविणेत आलेले आहे. त्यावर श्रीमती गुंजाळ यांचेकडून काहीही प्रत्युत्तर मिळालेले नाही.

तरी सदरचे प्रकरण फाईल करणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्रीमती गऊबाई कचरु गुंजाळ, रा.पाथरे खु., ता.सिन्नर यांचे मालकीचे ११ गुंठे क्षेत्र देणगी घेणेचा प्रस्ताव रद्द करणेस व सदरहू प्रकरण दप्तरी दाखल करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.१४** **मालमत्ता विभागाकरीता ऑफिस फर्निचर खरेदीकामी प्रस्ताव निरस्त करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान आस्थापनेवर मालमत्ता विभाग नव्याने सुरु करण्यात आलेला असून मालमत्ता विभागाचे कार्यालय रुम नं. ६५ येथे सुरु करण्यात आलेले आहे. मालमत्ता विभागाचे नवीन कार्यालयासाठी फर्निचर खरेदीकामी विहित पध्दतीने दरपत्रके मागवून फर्निचर खरेदी करणेस व त्याकामी अंदाजे येणाऱ्या रु.१,८७,६००/- पर्यंतचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५/०५/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१४४ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

फर्निचर खरेदीकामी जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेचे दृष्टीने निविदा मागविणेसाठी जाहिरात जनसंपर्क कार्यालयामार्फत दैनिक सार्वमत या वर्तमान पत्रात दि.३०/०६/२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्यामध्ये निविदा विक्रीची मुदत दि.०१/०७/२०१५ ते १५/०७/२०१५ पर्यंत व निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.१७/०७/२०१५ अखेर (कार्यालयीन वेळेत) देण्यात आलेली होती.

त्यानुसार दि.१७/०७/२०१५ अखेर खालीलप्रमाणे निविदा इकडील कार्यालयास प्राप्त झालेल्या होत्या.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | जावक नं व दिनांक |
|---|---|---|
| ०१ | मे. रोहन एंटरप्रायजेस, अहमदनगर | ७२४१ – १६/०७/२०१५ |
| ०२ | मे. खंडेलवाल स्टील फर्निचर, अहमदनगर | ७२४२ – १६/०७/२०१५ |
| ०३ | मे. श्रध्दा ट्रेडर्स, अहमदनगर | ७२४३ – १६/०७/२०१५ |

वरीलप्रमाणे प्राप्त सिलबंद निविदा दि.२०/०७/२०१५ रोजी मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब यांचे समक्ष उघडण्यात आलेल्या असून तुलनात्मक दराचे तक्त्यात निविदाधारकांनी खुप जास्त प्रमाणात दर आकारलेले दिसून येतात, त्याचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे –

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | एकुण रक्कम रु. |
|---|---|---|
| ०१ | मे. रोहन एंटरप्रायजेस, अहमदनगर | २,२५,८३५/- |
| ०२ | मे. खंडेलवाल स्टील फर्निचर, अहमदनगर | २,२७,८४०/- |
| ०३ | मे. श्रध्दा ट्रेडर्स, अहमदनगर | २,४२,१९८/- |

वरीलप्रमाणे प्राप्त दर हे खरेदीकामी मंजुर रक्कम रु.१,८७,६००/- पेक्षा खुपच जास्त होते, त्यामुळे दि.२१/०७/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये सदरचे खरेदीकामी प्राप्त निविदा रद्द करुन प्राप्त निविदाधारकांनी निविदेसोबत दिलेली अनामत रक्कम त्यांना परत करणेस तसेच सदरहू फर्निचर एखादया साईभक्ताकडून देणगी दाखल मिळत असेल तर ते स्विकारणेस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे ऑफीस फर्निचर साईभक्त श्री.चंद्रकांत एल. ठक्कर, पुणे यांचेकडून देणगी स्वरुपात स्विकारलेले असून त्यांना इकडील पत्र क्र.एसएसएस/मालमत्ता/३४५७/२०१५ दि.१७/०९/२०१५ अन्वये देणगी पावती (पावती क्र.२०३८० दि.१०/०९/२०१५) पाठविलेली आहे.

तरी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५/०५/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१४४ अन्वये मालमत्ता विभागाकरीता खरेदी करावयाचे ऑफीस फर्निचर खरेदीकामीचा प्रस्ताव निरस्त होणेसाठी सादर.

**निर्णय क्र.४४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मालमत्ता विभागासाठी आवश्यक असलेले फर्निचर देणगी स्वरुपात प्राप्त झालेले असल्यामुळे यापुर्वी यासंदर्भात झालेला दि.०५.०५.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१४४ निरस्त करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.१५** **श्री.गणेश बापुराव बनकर, भागवत बापुराव बनकर व विजया बापुराव बनकर, रा.शिर्डी यांनी त्यांचे मालकीची मौजे शिर्डी येथील स.नं.२०६ क्षेत्र ०१ हेक्टर १ आर जमीन संस्थानने विकत घेणेसाठी दिलेल्या प्रस्तावाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद–

अधिनियमाचे कलम १७ (समितीची कर्तव्ये व अधिकार) मधील

पोट कलम (२) चा खंड (ट) अन्वये "विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी, तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दीष्ठे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील."

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी सिव्हील ॲप्लीकेशन नं.१२०५६/२०१२, पी.आय.एल. नं.१८/२०११ मध्ये दिनांक १६ ऑक्टोबर, २०१२ रोजी समितीला खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

**(6) We direct that, without prior permission of this Court, the Committee,-**

(a) shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the respondent No.2- trust;

(b) shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.2- trust;

(c) shall not take any major financial decision of whatsoever nature;

**प्रस्ताव–** श्री. गणेश बापुराव बनकर, श्री भागवत बापुराव बनकर व श्रीमती विजया बापुराव बनकर यांनी त्यांचे मालकीची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर २०६/२ क्षेत्र १.०१ आर जमीन संस्थानने विकत घ्यावी म्हणून प्रस्ताव दिलेला आहे. सोबत ७/१२ उतारा जोडलेला आहे त्याप्रमाणे स्थिती खालीलप्रमाणे-

| अ.नं. | गाव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.मी.चौ.आर. | जमीन मालकाचे व | इतर हक्क |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | शिर्डी | २०६/२ | १.०१ | १. गणेश बापुराव बनकर<br>२. भागवत बापुराव बनकर<br>३. विजया बापुराव बनकर | राष्ट्रीयकृत बँक गहाण<br>शिर्डी सोसायटी इ.प.क.घे. |

श्री. बनकर यांनी अर्जात नमुद केल्यानुसार प्रस्तुत क्षेत्र ते बाजारभावाप्रमाणे (सरकारी व्हॅल्युएशन) संस्थानला कायम खरेदी देण्यास तयार आहेत. सन २०१५ चे रेडीरेकनर नुसार मौजे शिर्डी येथील स.नं.२०६ चे शासकीय दर रु. ८७००/- प्रति चौ.मीटर दर्शविलेले आहेत.

शिर्डी वाढीव हद्दीच्या विकास आराखडयानुसार खालीलप्रमाणे क्षेत्र संस्थानसाठी आरक्षित करण्यात आलेले आहे.

| अ.नं. | आरक्षण क्र. | आरक्षणाचा हेतु | अंदाजे क्षेत्र हेक्टर आर | सर्व्हे नंबर | विकसण यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | १ | पार्कींग | २.५९ | २०७,२०८,२१५ ते २१९ | श्री साईबाबा संस्थान |
| ०२ | २ | उद्यान | २.९७ | २०५, २०६ | श्री साईबाबा संस्थान |
| ०३ | ४ | वृध्दाश्रम | १.०० | २२१ ते २२३ | श्री साईबाबा संस्थान |
| ०४ | ७ | संस्थान हेतु | २.०० | २०२,२०३ | श्री साईबाबा संस्थान |
| ०५ | २२ | शैक्षणिक हेतु करीता | ६.५५ | १९५,१९६,२१२,२१३ | श्री साईबाबा संस्थान |

प्रस्तुत क्षेत्र शिर्डी वाढीव हद्दीच्या विकास आराखडयानुसार आरक्षण क्र.२, उद्यान (सर्व्हे नं.२०५,२०६ क्षेत्र २ हेक्टर ९७ आर) करीता आरक्षित आहे.

**इकडील विभागाचे मत-** शिर्डी वाढीव विकास आराखडयानुसार प्रस्तुत क्षेत्रावर संस्थानकरीता आरक्षण दर्शविलेले आहे. दुय्यम निबंधक, राहाता यांचेकडून सदर जमीनीचे मुल्यांकन घेऊन तसेच श्री.बनकर यांचेशी प्रत्यक्ष चर्चा करुन जमीनीची निश्चित किंमत ठरवून सदर जमीन खरेदीबाबतची कार्यवाही करता येईल, असे नम्र मत आहे. जमीन खरेदीबाबत निर्णय झाल्यास मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे मान्यतेसाठी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मा.न्यायालयाचे आदेशाने/ मान्यतेने पुढील कार्यवाही करता येईल.

मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर.

निर्णय क्र.४५० **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री.गणेश बापुराव बनकर, भागवत बापुराव बनकर व विजया बापुराव बनकर, रा.शिर्डी यांनी, त्यांचे मालकीची मौजे शिर्डी येथील स.नं.२०६ क्षेत्र ०१ हेक्टर १ आर जमीन बाजारभावाप्रमाणे (सरकारी व्हॅल्युएशन) संस्थानला कायम खरेदी देण्यास तयार आहेत, असे अर्जामध्ये नमुद केले आहे. त्यामुळे सदरहू क्षेत्र ते बाजारभावाप्रमाणे संस्थानला देणार कि सरकारी व्हॅल्युएशनप्रमाणे देणार हे स्पष्ट होत नाही. सबब याबाबत अर्जदार यांचेशी चर्चा करावी व ते सदरहू क्षेत्र सरकारी व्हॅल्युएशनप्रमाणे देण्यास तयार असल्यास त्यास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग/ विधी अधिकारी)

---

विषय नं.१६ **एकाच वेतश्रेणीत सलग १२ वर्ष सेवा पुर्ण केलेल्या सहा.शिक्षिकेस (श्रीमती यास्मिन सिकंदर शेख) वरिष्ठ वेतनश्रेणी देणेबाबत.**

प्रस्ताव- शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र.पावेआ १०९९/(४८/९९) माशि-२, दि.१३ मे, १९९९ चे सहपत्र अन्वये एकाच वेतनश्रेणीत सलग १२ वर्षे सेवा पुर्ण केलेल्या सहा.शिक्षकांस वरिष्ठ वेतनश्रेणी देणेबाबत निर्णय झालेला आहे. सदर निर्णयामध्ये खालील अटी व शर्तीची पुर्तता करत असलेल्या सहा.शिक्षकांस वरिष्ठ वेतनश्रेणी देय राहील असे नमुद करण्यात आलेले आहे.

१. प्रशिक्षण अर्हतेसह १२ वर्षांची अर्हताकारी सेवा.

२. या कामासाठी नियुक्त केलेल्या समितीला उमेदवारांचे कामकाज समाधानकारक वाटणे.

३. त्याने/तिने विभागाने विहित केलेले किमान तीन आठवड्याचे सेवांतर्गत प्रशिक्षण पुर्ण करणे.

उपरोक्त अटी व शर्तीनुसार यापुर्वी मा.त्रिसदस्य समितीचे दि.१५.०३.२०१४ रोजीचे सभेतील निर्णयान्वये जा.क्र.एसएसएस/ ई.मि.स्कुल, कन्या विद्या मंदिर/५४६/२०१४ दि.१३.०५.२०१४ चे आदेशान्वये इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडील प्राथमिक व माध्यमिक विभागाकडील ०६ व श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागाकडील ०१ असे एकुण ०७ सहा.शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ लागू करण्यात आलेला आहे.

त्यानुसार संस्थानचे शैक्षणिक संकूलातील श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडे एकाच वेतनश्रेणीत सलग १२ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या खालील सहा. शिक्षिका यांनी उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीची पात्रता पुर्ण केलेली आहे.

**माध्यमिक विभाग**

**सध्याची वेतनश्रेणी – पी.बी.२- रु.९३००-३४८०० + ग्रेड पे ४३००/-**

**देय होत असलेली वरिष्ठ वेतनश्रेणी – पी.बी.२ – रु.९३००-३४८०० + ग्रेड पे ४४००/-**

| अ. नं. | सहा.शिक्षक नांव, शैक्षणिक पात्रता, पदनाम व विभाग | नेमणुक दिनांक | १२ वर्षे सलग सेवा पुर्ण झाल्याची दिनांक | वरिष्ठ वेतनश्रेणी मंजुर करावयाची दिनांक | वरिष्ठ वेतनश्रेणी पात्र होणेसाठी अटी/शर्ती | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अर्हतेसाठी १२ वर्षाची अर्हताकारी सेवा | उमेदवारांचे कामकाज | तीन आठवड्याचे सेवातंर्गत प्रशिक्षण पुर्ण केले आहे काय ? |
| ०१ | श्रीमती यास्मिन सिकंदर शेख (एम.ए.बी.एड.) (सहा.शिक्षिका) माध्यमिक विभाग | ०१.११.२००३ | ०१.११.१५ | ०१.११.१५ | पुर्ण | समाधानकारक | प्रशिक्षण पुर्ण |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलीत श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल ही शाळा कायम विना अनुदानीत तत्वावर चालविली जाते. शासन निर्णयानुसार सहा.शिक्षक यांना वेतन दिले जाते. शासनाच्या तरतुदीनुसार श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडील उपरोक्त सहा.शिक्षिका श्रीमती यास्मीन सिंकदर शेख यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या (रकाना क्र.५) तारखेपासून वरिष्ठ वेतनश्रेणी देय होत आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल शाळेकडील सहा. शिक्षिका श्रीमती यास्मीन सिंकदर शेख यांना एकच वेतनश्रेणीमध्ये सलग १२ वर्ष सेवा पुर्ण झालेली असल्याने, त्यांना दि.०१.११.२०१५ पासून वरिष्ठ वेतनश्रेणी (रु.९३००-३४८०० + ग्रेड पे ४४००/- ) लागू करणेकामी मान्यता मिळणेसकामी निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४५१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्रीमती यास्मिन सिकंदर शेख, सहा.शिक्षिका, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल यांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करणेसाठी कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे गोपनीय अहवाल व वरिष्ठ वेतनश्रेणी देणेबाबतचे इतर शासन नियम तपासून निर्णय घ्यावा.**

**तसेच यापुढे अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवाविषयक प्रस्तावांवर कार्यकारी अधिकारी यांनी शासन निर्णय व सेवानियम यास अनुसरुन प्रशासकीय स्तरावर निर्णय घ्यावेत, असे ठरले.**

(कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

विषय नं.१७ **कनकुरी साठवण तलाव वर्कशॉप येथील लाईट फिटींग करणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

संस्थानचे पाणीपुरवठा विभागाचे कनकुरी साठवण तलाव वर्कशॉप येथील लाईट, ड्रील मशीन, लेथ मशिन, वेल्डींग मशिन इत्यादि करीता वायर फिटींग करुन टेम्परी बोर्ड फिटींग करण्यात आलेली होती. परंतू सततच्या वापरामुळे सदरची लाईट फिटींग खराब झालेली आहे. विद्युत विभागामार्फत प्रत्यक्ष पाहणी करुन लाईट फिटींग करुन मिळणेकामी पाणीपुरवठा विभागाने मागणी केलेली आहे. त्यानुसार प्रत्यक्ष पाहणी केली असता सदरचे काम करुन देण्यासाठी खालीलप्रमाणे खर्च येणे अपेक्षित आहे. तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr. no | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | Non C.S.R. | Point wiring for Light / Fan in pvc pipe (Welding of Spacer if required) with 3 x 1.5 Sq.mm. FR Grade copper wire 3 Plate Celing rose and Modular Accessaries complete on PVC surface box. | 20 Nos. | 700.00 | Rs. 0,14,000.00 |
| 02) | 2-13-3 | Supplying and erecting regular/ standard model Ceiling fan of 1200 mm. sweep complete erected in position as per specifcation no. FG | 10 Nos | 1883.70 | Rs.0,18,837.00 |
| 03) | 2-1-10 | Supplying and erecting T8 Fluroscent tube day light 1200mm 36 W | 15 Nos. | 59.85 | Rs.0,00,897.75 |
| 04) | 2-4-5 | Supplying & erecting approved make 1 x 36/40W white stove enamelled / powder coated, decorative end caps box type fluo.fitting with 40 W electronic ballast having pf>0.9 fixed at ceiling or on wall as per specification No. FG-IDF/BFF | 15 Nos | 630.00 | Rs.0,09,450.00 |
| 05) | 1-8-23 | Supplying and erecting modular type electronic step regulator for fan two module ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 10 Nos. | 417.90 | Rs.0,04,179.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 06) | 1-3-5 | Supplying & erecting mains with 2x2.5 sq.mm F.R stranded/solid copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places. as per specification No: WG-MA/BW | 50 Mtr. | 54.60 | Rs. 0,02,730.00 |
| 07) | 1-3-7 | Supplying & erecting mains with 2x4 sq.mm F.R stranded/solid copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places as per specification No: WG-MA/BW | 50 Mtr. | 77.70 | Rs. 0,03,885.00 |
| 08) | 1-8-7 | Supplying and erecting modular type switch one way 16 / 20 A, ISI mark, approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete with neon indicator. | 20 Nos. | 181.65 | Rs. 0,03,633.00 |
| 09) | 1-8-11 | Supplying and erecting modular type 3 pin 6 / 16A multi socket with safety shutter ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 20 Nos. | 226.80 | Rs. 0,04,536.00 |
| 10) | 1-8-10 | Supplying and erecting modular type 3 pin 6A multi socket safety shutter ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 15 Nos. | 105.00 | Rs. 0,01,575.00 |
| 11) | 1-8-1 | Supplying and erecting modular type switch 6A / 10A ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 30 Nos. | 90.30 | Rs. 0,02,709.00 |
| 12) | 1-8-31 | Supplying and erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 6 module duly erected in an approved manner. | 08 Nos. | 231.00 | Rs.0,01,848.00 |
| 13) | 1-8-32 | Supplying and erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 8 module duly erected in an approved manner. | 03 Nos. | 308.70 | Rs.0,00,926.10 |
| 14) | 1-8-33 | Supplying and erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 12 module duly erected in an approved manner. | 04 Nos. | 358.05 | Rs. 0,01,432.20 |
| 15) | 1-2-8 | Supplying and erecting rigid PVC conduit 25mm. dia with PVC accessories on wall/ceiling as per specification No: WG-MA/CON, para no.1.1.1 | 50 Mtr. | 79.80 | Rs.0,03,990.00 |
| 16) | 5-6-7 | Providing, erecting & commissioning RCCB of electro magnetic type with 30/100/300 mA sensitivity and having capacity of 80A. 4 pole complete as per specification No. SWRCCB/RCCB | 01 No. | 4940.25 | Rs.0,04,940.25 |
| 17) | 2-1-25 | Supplying and erecting CFL 27 to 36 W with ceramic adopter p.f. morethan 0.9 | 30. Nos. | 362.25 | Rs.0,10,867.50 |
| 18) | 2-1-26 | Supplying and erecting CFL 45 to 65 W with ceramic adopter p.f. morethan 0.9 | 02. Nos. | 743.40 | Rs.0,01,486.80 |
| 19) | 5-4-23 | Supplying & erecting CRCA sheet metal one way enclosures suitable for D.P.M.C.B. /T.P. M.C.B. /F.P M.C.B. complete erected on angle iron frame. | 01 No. | 433.65 | Rs.0,00,433.65 |
| 20) | 9-1-5 | Supply, Installation, Testing and commissioning of UL Certified / CPRI Tested Maintenance Free Earthing comprising of Electrode of 17.2 mm | 01 No. | 15764.7 0 | Rs. 0,15,764.70 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | diameter Low Carbon Steel with 250 micron Molecular Copper Bonded Earthing Rod of Length 3m along with 25 kg Carbon Based environment friendly back fill Ground Enhancing compound required to fill up the excavated earth with required quantity as per specification no EA-MOBI | | | |
| 21) | 9-2-4 | Supplying and erecting Annealed bare copper wire of high purity of different sizes used for earthing on wall with necessary copper clamps fixed on wall/ cable/ conduit with screws in an approved manner. | 05 Kgs. | 632.10 | Rs. 0,03,160.50 |
| 22) | 2-6-4 | Supplying and erecting CFL Street light fitting suitable for 2x above 18to 36W CFL , electronic ballast having pf > 0.9 complete with accessories on provided bracket as per specification no. FG-ODF/CSL | 15. Nos. | 2194.60 | Rs.0,32,919.00 |
| 23) | 2-8-4 | Supplying and erecting street light Wall bracket made from 40 mm. dia 'B'class G.I. pipe 1.2 m in total length complete as per specificationno. FG-BKT/WB | 15. Nos. | 612.15 | Rs.0,09,182.25 |
| 24) | 2-3-17 | Supplying & erecting approved type suspension type decorative fitting with rise /fall arrangement, 1 light inside semi circular metallic reflector with counterweight with guide pulley / spring buffer with work shop type copper flexible wire complete with necessary hook, if required | 02. Nos. | 1543.50 | Rs.0,03,087.00 |
| | | | | **Total Rs:-** | Rs.1,56,469.70 |
| | | | | **Round up Total Rs.** | **Rs.1,56,470.00** |

उपरोक्तप्रमाणे कनकुरी साठवण तलाव वर्कशॉप येथील लाईट फिटींगचे काम करणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये १,५६,४७०/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर ही जाहिरात अपलोड करुन टेंडर मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कनकुरी साठवण तलाव वर्कशॉप येथील लाईट फिटींग करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साहित्य खरेदीकामी विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन कोटेशन मागविणेस तसेच त्याकामी येणा-या अंदाजे रु.१,५६,४७०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यता आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.१८** **श्री साईप्रसादालय येथील वाढीव लोड करीता P.T. व Meeting Cubical खरेदी करुन बसविणे व C.T.P.T. Testing फी भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१(क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री साई प्रसादालयाकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून उच्चदाब वीजपुरवठा जोडून घेण्यात आलेला आहे. या वीजपुरवठयाकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण 450 KW (450KVA) इतका वीजभार मंजूर झालेला आहे. परंतू आता त्याठिकाणी साईटक प्रोजेक्टच्या मशिनरी, R.O.Plant च्या मशिनरी, श्री साई प्रसादालयातील चपाती तयार करण्याच्या मशिनरी तसेच बायोगॅस प्लँटच्या मशिनरी इत्यादि मशिनरींमध्ये वेळोवेळी वाढ झालेली असल्याने तसेच दिवसेंदिवस भक्तांची गर्दी वाढत असल्याने सर्व मशिनरी सतत कार्यान्वित असतात. या कारणाने सध्याचा प्रसादालयाच्या एकुण वीजभार हा ४५० KW (450KVA) वरुन 550 KW (550KVA) च्या आसपास गेलेला आहे. त्यामुळे सदरील ठिकाणचा वीजभार वाढवून घेणेबाबत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने संस्थानला SE / ANRC /TECH/15936 दि.२७-०८-२०१३ नुसार पत्र पाठवून कळविले होते.

त्यानुसार संस्थानमार्फत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे पत्रव्यवहार केल्यानंतर महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीने संस्थानला पत्र क्र.SE / ANRC/TECH/HTB/09478 दि.१०-०६-२०१४ नुसार पत्र पाठवून वाढीव लोडकरीता विविध चार्जेसची रुपये १०,५०,३०९/- इतकी रक्कम भरणे व अनुषंगिक साहित्य खरेदी करुन बसविणे कामाचे इस्टीमेट पाठविले होते. संस्थानने दिनांक ३०-१०-२०१४ रोजी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे विविध

सादर करावा असे ठरले. त्यानुसार महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई यांचेकडे सदर शब्दकोश पडताळणीसाठी पाठविण्यात आला होता.

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई यांचे दि.२८.०२.२०१५ रोजीचे प्राप्त पत्रान्वये श्री साईसच्चरित मराठी पोथीतील संस्कृत प्रचुर शब्दांची त्याच्या अर्थाची पडताळणी करण्यात आलेली आहे. प्रा.डॉ.अंजली मा.पर्वते, किसानवीर कॉलेज, वाई या तज्ज्ञांकडून ही पडताळणी करुन घेण्यात आली आहे. त्याबबातच्या सर्व दुरुस्त्या योग्य त्या ठिकाणी दर्शविण्यात आलेल्या आहेत. प्रा.डॉ.अंजली मा.पर्वते, किसनवीर कॉलेज, वाई यांनी सदर शब्दकोशाबाबत म्हटले की साईभक्तांना साईसच्चरिताचे आकलन अधिक सुलभतेने करुन देण्यास उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई यांनी शब्दकोशात सर्व दुरुस्त्या योग्य त्या ठिकाणी दर्शविण्यात आल्याप्रमाणे दुरुस्त्या करुन श्री साईसच्चिरत-मराठी पोथीचे ५३ अध्याय एकुण ७४४ पानांनतर शब्दकोशाचे २६५ पाने समाविष्ठ करणेस किंवा स्वतंत्ररित्या श्री साई चरित्र पोथीतील मराठी शब्दकोश नावाचे पुस्तक संस्थानमार्फत प्रकाशित करुन भक्तांना उपलब्ध करुन देता येईल.

निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईचरित्र पोथीमध्ये शब्दकोश समाविष्ट केल्यास पोथीमधील पानांची संख्या व पोथीच्या किंमतीतही वाढ होईल. तसेच प्रस्तावित शब्दकोश सर्वांना आवश्यक असेल असेही वाटत नाही. त्याकरिता सदरहू शब्दकोश संस्थानमार्फत स्वतंत्र प्रकाशित करणेत यावा.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.२३** **साईलीला व्दैमासिके छपाईकामी माहे सप्टेंबर २०१५ ते ऑगस्ट २०१६ चे प्राप्त तांत्रिक (Technical Bid) व दरपत्रके (Commercial Bid) उघडणेबाबतचा अहवाल.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२.०६.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५०६ व मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने पी.आय.एल. नं. १८/२०११ मधील सिव्हील अर्ज क्र. ३४९८/२०१५ मध्ये दि. १३.०३.२०१५ नुसार माहे सप्टेंबर २०१५ ते ऑगस्ट २०१६ या कालावधीसाठी साईलीला व्दैमासिके छपाई करुन घेणेकामी येणा-या रक्कम रु. २३,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यात देण्यात आली आहे. त्यानुसार साईलीला व्दैमासिक छपाई करुन घेणेकामी दि.०२.०७.२०१५ ते दि.१४.०७.२१५ या कालावधीत प्रेसधारकांकडून ई निविदा मागविण्यात आल्या होत्या. खालील प्रमाणे प्रेसधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत. सदरच्या ई निविदेतील तांत्रिक (Technical Bid) निविदा मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समोर दि.२८.०७.२०१५ रोजी उघडण्यात येऊन, तांत्रिक ई निविदेतील कागदपत्रे मुख्य लेखाधिकारी यांचेकडून तपासून घेण्यात आले आहेत.

| अ. नं. | प्रेसधारकाचे नाव | आवक नंबर/ तारीख |
|---|---|---|
| ०१ | टॅको व्हीजन्स प्रा.लि. मुंबई | मुंबई कार्यालय २८७ / १४.०७.२१५ |
| ०२ | सॅप प्रिंट सोल्युशन प्रा.लि.मुंबई | मुंबई कार्यालय २८५ / १४.०७.२१५ |
| ०३ | निट प्रिंटर्स, अहमदनगर | शिर्डी कार्यालय ७५८८ / २२.०७.२०१५ |
| ०४ | मनिपाल टेक्नॉलॉजिस लि, मनिपाल | मुंबई कार्यालय २८८ / १४.०७.२१५ |
| ०५ | ओरियंट प्रेस लि. मुंबई | मुंबई कार्यालय २८४ / १४.०७.२१५ |

वरील तक्त्यातील १ ते ५ प्रेसधारक हे तांत्रिक (Technical Bid) निविदेत पात्र असल्याने सदरच्या प्रेसधारकांचे किंमतीचे दरपत्रके (Commercial Bid) दि. १०.०८.२०१५ रोजी सायंकाळी ४ वाजता उघडण्याचे ठरले. त्यानुसार उपरोक्त तक्त्यातील प्रेसधारकांना सदरचे दिवशी ४ वाजता साईनिवास अतिथीगृहात हजर राहणेबाबत दि.०८.०८.२०१५ रोजी दुरध्वनी व ई मेलव्दारे कळविण्यात आले होते.

दि.१०.०८.२०१५रोजी सायंकाळी ४ वाजता तक्त्यातील अं. नं.१) मे. टॅको व्हीजन्स, प्रा.लि. मुंबई यांचे प्रतिनिधी श्री. संतोष कडू व अं.नं. ३) मे. निट प्रिंटर्स, अहमदनगर यांचे प्रतिनिधी श्री. गोरे हे साईनिवास अतिथीगृहात उपस्थित होते. त्यांचे समक्ष व मा. प्रशासकीय अधिकारी व मुख्य लेखाधिकारी यांचे समक्ष किंमतीचे दरपत्रके (Commercial Bid) उघडण्यात आले आहेत. प्रेसधारकांनी देवू केलेल्या तपशिल खालील प्रमाणे.

| अ. नं. | तपशिल | सप्टेंबर २०१५ ते ऑगस्ट २०१६ (१ वर्षाकरीता छपाई संख्या ) | निट प्रिंटर्स, अहमदनगर | सॅप प्रिंट सोल्युशन प्रा.लि.मुंबई यांचे दर | ओरियंट प्रेस लि. मुंबई याचे दर | टॅको व्हीजन्स प्रा.लि, मुंबई यांचे दर | मनिपाल टेक्नॉलॉजि लि, मनिपाल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईलीला अंक मराठी (अंक ५) ३२ पाने ४+= ३६ पाने ९०००x ५ अंक | ४५००० नग | १४.५० | १२.५० | ११.०० | १२.३४ | १६.४५ |
| ०२ | श्री साईलीला अंक हिंदी इंग्रजी ३२ पाने ४+= ३६ पाने १४०००x ५ अंक | ७०,००० | १३.०० | ११.७५ | ११.०० | ११.४२ | १४.५० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०३ | दसरा विशेषांक मराठी (अंक १)६४४+= ६८ पाने | ९,००० नग | २४.५० | २१.३० | १६.०० | २०.६३ | २७.५० |
| ०४ | दसरा विशेषांक हिंदी-(अंक १) इंग्रज६४४+= ६८ पाने | १४,००० | २३.५० | १९.९० | १६.०० | १९.६४ | २४.४५ |

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०९.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२९७ नुसार सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईलीला व्दैमासिक छपाईकामी आलेले नवीन दर व मागील मंजूर दर यांचा समावेश करणेत येऊन सुधारीत प्रस्ताव सादर करण्यात यावा असे ठरले प्रमाणे मागील सन २०१३-२०१४ चे साईलीला अंक छपाईकामी टॅंको व्हीजन्स प्रा.लि.मुंबई यांचे निम्नतम दर होते याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अं.नं. | तपशिल | प्रति महा छपाई संख्या | मागिल मंजूर दर रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ०१ | साईलीला अंक मराठी (५ अंक) ३२+४ पाने = ३६ पाने ९०००x ५ अंक | १५,०००० | १०.७५ |
| ०२ | श्री साईलीला अंक हिंदी इंग्रजी ३२+४ पाने = ३६ पाने १४०००x ५ अंक | १७,०००० | १०.६५ |
| ०३ | दसरा विशेषांक मराठी (१ अंक) ६४+४= ६८ पाने | १५,०००० | १८.३० |
| ०४ | दसरा विशेषांक हिंदी-इंग्रज (१ अंक) ६४+४= ६८ पाने | १७,००० | १८.०० |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेप्रमाणे मागिल सन २०१३-२०१४ व चालू वर्षातील सन २१५-२०१६ या वर्षात प्राप्त झालेल्या दरांचा तुलनात्मक विचार करता अं.नं.१ साईलीला मराठी रु.०.२५ पैसे व साईलीला हिंदी-इंग्रजी रु. ०.३५ पैसे दराने अंकात वाढ झाली आहे व दसरा विशेषांक मराठी रु. २.३० पैसे व दसरा विशेषांक हिंदी-इंग्रजी रु. २.०० ने दर कमी आले आहेत.

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने पी.आय.एल. नं.१८/२०११ मधील सिव्हील अर्ज क्र.३४९८/ २०१५ मध्ये दि.१३.०३.२०१५ रोजी केलेल्या आदेशान्वये साईलीला व्दैमासिके छपाईकामीचे रक्कम रु. २३,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त तक्त्यातील कॉलम नं. ६ मधील आधोरिखित केलेले ओरियंट प्रेस लि., मुंबई यांचे निम्नतम दर आहेत. त्यांना साईलीला व्दैमासिक छपाईकामी माहे सप्टेंबर २०१५ ते ऑगस्ट २०१६ चा छपाई कामाचा कार्यादेश देणेस व छपाईकामी येणा-या रक्कम रु.१६,३३,०००/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.४५८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे सप्टेंबर २०१५ ते ऑगस्ट २०१६ मध्ये साईलीला व्दैमासिके छपाईकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेचे अवलोकन करणेत येऊन, या प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक ओरियंट प्रेस लि., मुंबई यांना सदरहूकामी छपाईचा आदेश देण्यास व याकामी येणा-या रु.१६,३३,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.२४** **शिर्डी साई ग्लोबल फाऊन्डेशन, नोएडा (उत्तर प्रदेश) येथील ग्रंथालयास संस्थानने भेट देणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी साई ग्लोबल फाऊंडेशन नोयडा (उत्तरप्रदेश) यांचा दि.१७.१०.२०१५ चे ईमेलने डॉ. चंद्रा भानु सतपती यांचे मार्गदर्शनाखाली सुरु करण्यात आलेल्या ग्रंथालयास शिर्डी संस्थानने भेट देणे बाबत आमंत्रित केले आहे.

दि. २०.०८.२०१५ रोजी झलेल्या शिर्डी भेटीत मा. उपकार्यकारी अधिकारी साहेब यांचेशी चर्चा करण्यात आली आहे. सदर चर्चेत मा. उपकार्यकारी अधिकारी यांनी सहमती दर्शविली असलेबाबत कळविले आहे. साई संस्थानने सदरचे ग्रंथालय हे साई करुना धाम, ई-४, सेक्टर-६१, नोयडा, उत्तरप्रदेश याठिकाणी आहे. साई संस्थानने सदरचे ग्रंथरालयास भेट दिल्यास त्यांना अभिमान वाटून आनंद होईल.

त्यांचे ग्रंथालयात अतिशय संशोधनात्मक, इतर माहितीपर, साईबाबांचे जीवनावरील, पुराण वस्तुशास्त्रासंबंधी उत्कृष्ट, अनेक प्रकारचे धार्मिक प्रकाशने,वाङ.मयात्मक पुस्तके, मासिके, दररोज होणा-या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडी लोकांना माहिती व्हाव्यात म्हणून दररोज वर्तमानपत्र वाचनासाठी ठेवण्यात येतात. तेथे वाचनासाठी येणा-या लोकांना डॉ. सतपती हे मार्गदर्शन करतात.

संस्थानने खालीलप्रमाणे तारखांना दिलेल्या वेळेत नियोजन केल्यास डॉ. सतपती हे भेटू शकतील १) दि. १६ व २९ ऑक्टोबर २०१५ किंवा दि. ०६ व १० नोव्हेंबर २०१५ या दिवशी किंवा संस्थानने १० नोव्हेंबर २०१५ नंतर येण्याचे नियोजन असल्यास श्री. सौरभ वत्सा व डॉ. सतपती यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा करुन नियोजनाबाबत ठरवावे असे ईमेलपत्रात नमुद केले आहे.

सदर ग्रंथालयास भेट दिल्यास ग्रंथालय कशा पध्दतीचे आहे. ग्रंथालयातून लोकांना/ भक्तांना काय मिळते, कोणकोणत्या प्रकारचे पुस्तके ठेवण्यात आले आहे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे कोणत्या प्रकारचे मासिके,वर्तमानपत्र वाचनीय ठेवण्यात आले आहे. संशोधानात्मक त्याठिकाणी कोणत्या प्रकारचे पुस्तके आहे. याबाबत संस्थानला अभ्यास करण्यास मदत होईल. व त्या धर्तिवर संस्थानला त्यांचे मार्गदर्शन घेऊन पुस्तके प्राप्त करुन शिर्डी येथे ग्रंथालय चालू करता येईल. शिर्डी येथे येणा-या साईभक्तांना ग्रंथालयतून अनेक प्रकारच्या पुस्तकातून मार्गदर्शन मिळू शकेल शिर्डी हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे धार्मिक स्थळ असल्याने भक्तांची मोठयाप्रमाणात गर्दी होत असते. त्यामुळे शिर्डी याठिकाणी ग्रंथालय असणे गरजेचे आहे.



अभ्यासदौरा करणेकामी संस्थानचे प्रतिनिधी उपरोक्त नमूद केलेल्या तारखांना किंवा संस्थानचे सोईस्कर असलेल्या तारखेस डॉ. सतपती यांच्याशी संपर्क करुन वेळ घेऊन भेट देता येईल व तदनंतर पुढील कार्यवाही करता येईल.

निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी साई ग्लोबल फाऊन्डेशन, नोएडा (उत्तर प्रदेश) येथील ग्रंथालयास संस्थानने भेट देणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.२५** **शिर्डी शहराचे प्रस्तावित City CCTV Surveillance प्रकल्पाबाबत.**

**प्रस्ताव-** मा. कार्यकारी अधिकारी सो.ा., यांचे निर्देशानुसार त्यांचे उपस्थितीत दि. 16/08/2015 रोजी विषयांकीत प्रकरणी तत्कालीन सीसीटीव्ही विभागाचे प्रमुख श्री विनोद कोते यांचे समवेत समक्ष चर्चा करण्यात आली आहे. त्यानुसार दि. 03/08/2015 रोजी शिर्डी City CCTV Surveillance प्रकल्पाची ई-निविदा www.mahatenders.gov.in या शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार प्राप्त पुरवठाधारकांची प्री-बीड मिटींग दि. 10/08/2015 रोजी साईनिवास येथील मिटींग हॉलमध्ये पार पडली. सदर मिटींगमध्ये संबंधित पुरवठा धारकांनी उपस्थित केलेल्या विविध मुद्यावरील उत्तरे सल्लागाराने दोन दिवसात तयार करुन देणे अपेक्षित होते. परंतु त्यांचा अभिप्राय दि. 15/08/2015 रोजी ई-मेलवर प्राप्त झालेला आहे.

त्यानुसार दि.10/08/2015 रोजीचे प्री-बीड मिटींगमध्ये पुरवठाधारकांनी उपस्थित केलेल्या मुद्यावर सल्लागार यांनी तयार केलेली उत्तरे याचे अवलोकन करता खालील प्राथमिक मुद्यावर अधिक स्पष्टता होण्याची आवश्यकता असल्याने याकामी दि.19/08/2015 चे ई-मेलनुसार MIPL या कंपनीचे सल्लागार श्री सारंग देशपांडे यांनी खालील मुद्यानुसार आपला खुलासा कळविला आहे :-

**1. शिरडी शहरातील सीसीटीव्ही Surveillance केबल बाबत :-** शिरडी City CCTV Surveillance च्या केबल शिरडी शहरात Overhead टाकणेकामी परवानगी देण्यात यावी. परंतु तांत्रिक व सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन Overhead केबल टाकणे भविष्यात योग्य होणार नाही. तसेच सदरहु प्रकल्पाचा स्कोप किमान पाच वर्ष कालावधीचा असल्याने केबल ही जमीनीखालुन उच्च प्रतीचे पाईपमधुन टाकणे केव्हाही उचित ठरेल, असे नम्र मत आहे.

Clarification from MIPL Consultant: The timeline and the budgetary constraints were considered for choosing the aer/ial OFC cable. The overhead cable is mainly used for the city surveillance applications nowadays. The successful Surat & Nanded Safe City model and the upcoming city surveillance projects in Kolhapur and Aurangabad are using overhead cables.

**2.** केबल Overhead टाकावयाची झाल्यास त्यास कुठलीही सुरक्षितता राहणार नसुन त्यास शासनाचे विद्युत विभाग व स्थानिक नगर परिषदेची पुर्व परवानगी घ्यावी लागेल.

Clarification from MIPL Consultant: Yes, permission for right of use of existing light poles from the local governance body is required to be obtained, Which is normally obtained without any financial burden incase of overhead cabling. However incase of underground cabling, right of way charges are applicable.

**3. निविदेमध्ये सीसीटीव्ही Surveillance कामी वापरण्यात येणाऱ्या केबलच्या लांबी व किंमतीबाबत:-** शिरडी City CCTV Surveillance कामी वापरण्यात येणाऱ्या केबलची लांबी व किंमत नमुद नसल्यामुळे त्यावरील खर्च व परिमाण याबाबत पुरवठाधारकाने उपस्थित केलेली शंका योग्य वाटते.

Clarification from MIPL Consultant : The tender allows the bidders to offer a) wired option - with conventional network b) wired option with GPON network or c) a leased line option. The cable distances & type of cable may vary as per the bidder-proposed solutions. Therefore, bidders are advised to make their own estimations with regard to cable types & lengths proposed based on the Lat-long coordinates of the locations. A detailed BoQ (unpriced) mentioning the types, quantities & makes of all the networking components is required to be provided by the bidders as a part of their respective technical bids. The Lat-long coordinates, enable bidder to estimate the exact cable distances and design the network solution. We should be looking for the bandwidth provided at each location by the Bidder.

**4. शिरडी शहरातील सीसीटीव्ही Surveillance कामी प्रस्तावित असलेल्या कॅमेऱ्याच्या कंपनीचे दर्जाबाबत :-** शिरडी City CCTV Surveillance कामी काढण्यात आलेल्या निविदेमध्ये Sony, Panasonic, Samsung या कंपन्याबरोबरच Infonova यासारख्या कंपनीचा देखील उल्लेख आहे. तसेच नमुद कंपन्यांचे कॅमॅऱ्यं ाचा दर्जा एकाच पातळीतील आहे किंवा कसे याबाबतचे Parameter निविदेमध्ये स्पष्टपणे नमुद नाहीत. त्यामुळे कंपनीच्या दर्जानुसार किंमतीमध्ये मोठी तफावत राहु शकते. त्यामुळे फायदा पर्यायाने कमी दर्जाच्या कंपनीला मिळण्याची शक्यता जास्त प्रमाणात असते. तसेच निविदेमध्ये नमुद केलेल्या नेटवर्क स्विच बाबत देखील कॅमेरेप्रमाणेच विविध कंपन्यांचे स्वीच नमुद असुन, त्यांचा दर्जा एकाच पातळीतील आहे किंवा कसे याबाबतचे Parameter निविदेमध्ये स्पष्टपणे नमुद नसल्याचे निदर्शनास येत आहे.

Clarification from MIPL Consultant : Yes, the camera OEMs mentioned in the approved makes list are equal in quality and have comparable costs. As for your specific apprehension for the inclusion of Infinova brand in the approved camera OEM list, the Infinova cameras are being used in Mumbai city surveillance project and hence included.

**5.** उपरोक्त प्राथमिक ढोबळ क्युरीबाबत सल्लागाराचे अभिप्राय कोरीडेंजम क्युरी अपलोड करणेकामी दि.20/08/2015 रोजी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर केला असता, सदर प्रस्तावावर मा.कार्यकारी अधिकारी सो. यांनी - "सल्लागाराने दिलेली उत्तरे सकृतदर्शनी समाधानकारक वाटत नाहीत. याबाबत अधिक सखोल तपासणी होण्याची गरज वाटते. केवळ निविदा प्रक्रीयेचे वेळापत्रक ध्यानात घेता सध्या सल्लागाराने प्रस्तावीत केलेली उत्तरे लोड करण्यापुर्वी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या निर्दशनास आणणे उचित होईल. " असे निर्देश दिलेले आहेत.

**6. शिरडी शहरातील सीसीटीव्ही Surveillance प्रकल्पाचे विम्याबाबत :-** शिरडी City CCTV Surveillance हा प्रकल्प शिरडी पोलीस स्टेशनचे अधिकार कक्षेत ठेवण्याचे प्रस्तावित असल्याने याचा विमा उतरविण्याची, सर्व साहित्याची AMC/CMC कालावधीतील तसेच भविष्यातील दुरुस्ती देखभाल संबधीची कार्यवाही संबधीची सर्वस्वी जबाबदारी त्यांचेवर सोपविणे उचित राहील, असे नम्र मत आहे.

दि.03/08/2015 रोजीचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या ई-निविदेतील उपरोक्त नमुद मुद्देनिहाय फक्त प्राथमिक ढोबळ बाबीच सद्यस्थितीत निदर्शनास आले असुन सदर विभागाचा अतिरिक्त पदभार संदर्भ क्रं 04 चे आदेशान्वये माझेकडे सोपविण्यात आला आहे. सदर आदेशाची प्रत मला दि. 17/08/2015 रोजी दुपारी 12.45 वा. मिळाली आहे.

सदरहु विषयांकीत प्रकरणाबाबत मी पुर्णत: अनभिज्ञ असुन शिरडी City CCTV Surveillance प्रकल्पाचा स्कोप विचारात घेता संपुर्ण तांत्रिक बाबींचा सखोल अभ्यास करणे आवश्यक असल्याने त्यास मला माहिति तंत्रज्ञान विभागाचा कार्यभार सांभाळुन सदरकामी या क्षेत्रातील तसेच City CCTV Surveillance प्रकल्पावर प्रत्यक्ष काम केलेल्या तज्ञांची संस्थानचे विहीत पध्दतीने नेमणुक करुन तसेच शासनाच्या अधिकृत तज्ञांची मदत मिळणे आवश्यक असुन याकामी कालावधी अपेक्षित आहे.

तसेच विषयांकीत प्रकरणी खालील नमुद मुद्यावर देखील अहवाल मागविणे तथा कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

1. सदरहु प्रकल्प हा शासनाचे शिरडी पोलीस स्टेशनकरीता तयार करुन त्यांना हस्तांतरीत करावयाचा असल्याचे प्रस्तावित असल्याने प्रकल्पाचा सर्व खर्च श्री साईबाबा संस्थान करणार असल्याचे समजते. तेव्हा सदर निधी/खर्च श्री साईबाबा संस्थानचे Act नुसार करता येईल किंवा कसे? याबाबत श्री साईबाबा संस्थानचे विधी विभागामार्फत हायकोर्ट ॲडव्होकेट यांचे कायदेशीर मत प्रथमत: घेणे उचित ठरेल.

1. विषयांकीत प्रकरणी संदर्भ क्रं. 01 अन्वये www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या ई-निविदेतील (RFP Draft) ही City CCTV Surveillance प्रकल्पावर प्रत्यक्ष काम केलेल्या अनुभवी, उच्च शिक्षित तज्ञ सल्लागाराची संस्थानचे विहीत पध्दतीने नेमणुक करुन करणे गरजेचे असुन, याकामी शासनाच्या अधिकृत तज्ञांचे तसेच आर्थिक व कायदेशीर बाबींसंबधी संस्थानचे लेखाशाखा व विधी विभागाचे मत घेणे उचित ठरेल, असे नम्र मत आहे. तसेच सदरचा प्रकल्प ज्या राज्यात राबविला आहे, त्याठिकाणी संबंधित तज्ञांमार्फत प्रत्यक्ष भेट देऊन, तेथील प्रकल्पाचा प्रथमत: प्राथमिक सर्व्हे करुन, सदरहु ठिकाणी City CCTV Surveillance प्रकल्प उभारणीकामी आलेल्या तांत्रिक अडचणी विचारात घेऊन, त्यानुसार शिर्डी शहराकरीता अत्याधुनिक City CCTV Surveillance प्रकल्प उभारणी करणे आवश्यक आहे.

2. सदर प्रकल्पासाठी अधिकृत नेमण्यात आलेल्या सल्लागाराकडुन प्रथमत: सदर प्रकल्पाचे सविस्तर डीझाईन तयार करण्यात येऊन, त्याचे प्रात्यक्षिक पोलीस, संरक्षण विभागातील वरीष्ठ अधिकारी तसेच इतर संबंधितांचे उपस्थितीत मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणे अपेक्षित असुन, उपस्थितांचे अभिप्राय त्यात नोंदवुन, निविदा प्रक्रीयेस अंतिम स्वरुप देणे योग्य राहील.

3. त्याचप्रमाणे दि.10/08/2015 रोजी विषयांकीत प्रकरणी कन्सल्टंन्सी प्री-बीड मिटींग झाल्याचे समजते. सदर मिटींगमध्ये उपस्थित असलेल्या प्रत्येक बीडरचे नावांचा व क्युरीजचा उल्लेख सल्लागारामार्फत झालेला नसल्याचे निर्दशनास येत आहे. त्यामुळे इतर बीडरने विचारलेल्या क्युरीज बाबत सल्लागाराकडुन लिखीत स्वरुपात शहानिशा होणे अत्यंत गरजेचे आहे.

4. तसेच विषयांकीत प्रकरणी निविदा प्रक्रियेस तसेच याकामी सल्लागाराची नेमणुकीबाबत संस्थानचे विहित पध्दतीने कार्यवाही करणेपुर्वी प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन त्यास संस्थान वकीलामार्फत सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची तसेच शासनाचे संबधीत विभागाची मान्यता घेणे अत्यंत आवश्यक आहे.

उपरोक्त सर्व नमुद बाबींचा तसेच मुद्यांचा सारासार विचार होणे अपेक्षित असल्याने सदरहु प्रस्तावाची कार्यवाही करणेपुर्वी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीची सभेपुढे आदेशार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.४६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहराचे प्रस्तावित City CCTV Surveillance प्रकल्प राबविणेसाठी महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रसंचनालय विभागाचे मार्गदर्शन घेण्यात यावे व त्यानुसार पुढील कार्यवाही ही पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी करावी तसेच त्यासाठी त्यांना एक ठरावीक मर्यादेपर्यंत ठोक रक्कम देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख)

**विषय नं.२६** **साईप्रसादालयातील फुड लॅब, गॅस प्लॅट व मेन गेट सिक्युरीटी केबीन येथे नविन अंडरग्राऊंड टेलीफोन केबल टाकणेचे कामाबाबत मुदतवाढीची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** साई प्रसादालयातील फुड लॅब, गॅस प्लॅंट व मेन गेट सिक्युरीटी केबीन येथे नविन अंडरग्राऊड टेलीफोन केबल टाकणेचे कामाबाबत विहीत पध्दतीने टेंडर मागवून काम करुन घेणेसाठी येणारे रक्कम रुपये ३,१३,५११/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती. त्यानुसार वर्तमानपत्रात व संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात देण्यात आलेली होती. टेंडर जमा करणेचे मुदतीत ०८ टेंडर प्राप्त झालेले होते. जमा झालेले टेंडर दि.०२/०३/२०१५ रोजीचे मा.उपसमितीचे सभेत उघडण्यात आलेले असुन मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२/०३/२०१५ रोजी झालेल्या सभेत विषय क्र.२ निर्णय क्र.७४(८) नुसार प्रकल्प इन्स्ट्रुमेंटस, अहमदनगर यांचे रु.२,९१,५६५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा अशी मान्यता मिळालेली असुन दि.०६/०६/२०१५ रोजी प्रकल्प इन्स्ट्रुमेंटस, अहमदनगर यांना कामाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

सदर कामाचा करारनामा करुन घेणेसाठी आवश्यक असणा-या कागदपत्रांची आवश्यकता असल्याने त्यांना कागदपत्रे सादर करणेसाठी वेळोवेळी फोनव्दारे व लेखी स्वरुपात कळविणेत आलेले आहे. परंतु त्यांचेकडुन वेळेवर कागदपत्रे न मिळाल्याने करारनामा करण्यास उशिर झालेला आहे. तसेच सदरचे काम पुर्ण करण्याची मुदत कार्यादेश स्विकारणेत आलेपासून पुढील १ महीन्याची होती. परंतु ठेकेदाराकडुन काम पुर्ण करण्याची कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे कामास २ महीने विलंब झालेला आहे. दि.२२/०८/२०१५ रोजी ठेकेदाराने शिर्डी येथे येऊन करारनामा केलेला आहे. तसेच त्यांनी आम्हाला काम करावयाचे आहे असे तोंडी सांगीतलेले आहे. त्यांना लेखी स्वरुपात पत्र देण्यासाठी सांगीतलेले असता त्यांनी दि.१२/०९/२०१५ रोजी पत्र दिलेले असुन सध्या सिंहस्थ कुंभमेळयाची भक्तांची गर्दी चालु असल्याने संस्थान परीसरात केबल टाकणेसाठी खोदाई करणे शक्य नसल्याने सदरचे काम सिंहस्थ कुंभमेळा संपल्यानंतर प्रकल्प इन्स्ट्रुमेंटस, अहमदनगर यांचे मार्फत करता येईल.

तरी साई प्रसादालयातील फुड लॅब, गॅस प्लॅंट व मेन गेट सिक्युरीटी केबीन येथे नविन अंडरग्राऊड टेलीफोन केबल टाकणेचे कामासाठी ठेकेदार यांना मुदतवाढ देऊन त्यांचेकडुन सिंहस्थ कुंभमेळयाची भक्तांची गर्दी संपल्यानंतर काम करुन घेणेसाठीचे मान्यतेसाठी मा.त्रिसदस्यीय समितीसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.४६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईप्रसादालयातील फुड लॅब, गॅस प्लॅट व मेन गेट सिक्युरीटी केबीन येथे नविन अंडरग्राऊंड टेलीफोन केबल टाकणेच्या कामाचे ठेकेदार प्रकल्प इन्स्ट्रुमेंटस, अहमदनगर यांच्या मुदतवाढ मिळणेबाबतचे पत्राचा विचार करता त्यांना सदरहूकाम पुर्ण करणेसाठी ०१ महिना मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- ध्वनिक्षेपण विभागप्रमुख)

---

**विषय नं.२७** **शैक्षणिक संकुल परिसरात नविन दुरध्वनी केबल टाकणेचे कामाबाबत मुदतवाढीची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** शैक्षणिक संकुल (आयटीआय,इंग्लिश मिडीयम स्कुल,कन्या शाळा) परीसरात नविन दुरध्वनी केबल टाकणेचे कामाबाबत विहीत पध्दतीने टेंडर मागवून काम करुन घेणेसाठी येणारे रक्कम रुपये २,६५,१७९/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती. त्यानुसार वर्तमानपत्रात व संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात देण्यात आलेली होती.टेंडर जमा करणेचे मुदतीत ०७ टेंडर प्राप्त झालेले होते.जमा झालेले टेंडर दि.०२/०३/२०१५ रोजीचे मा.उपसमितीचे सभेत उघडण्यात आलेले असुन मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२/०३/२०१५ रोजी झालेल्या सभेत विषय क्र.२ निर्णय क्र.७४(५) नुसार प्रकल्प इन्स्ट्रुमेंटस, अहमदनगर यांचे रु.२,४६,६१६/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा अशी मान्यता मिळालेली असुन दि.०६/०६/२०१५ रोजी प्रकल्प इन्स्ट्रुमेंटस, अहमदनगर यांना कामाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

सदर कामाचा करारनामा करुन घेणेसाठी आवश्यक असणा-या कागदपत्रांची आवश्यकता असल्याने त्यांना कागदपत्रे सादर करणेसाठी वेळोवेळी फोनव्दारे व लेखी स्वरुपात कळविणेत आलेले आहे.परंतु त्यांचेकडुन वेळेवर कागदपत्रे न मिळाल्याने करारनामा करण्यास उशिर झालेला आहे. तसेच सदरचे काम पुर्ण करण्याची मुदत कार्यादेश स्विकारणेत आलेपासून पुढील १ महीन्याची होती. परंतु ठेकेदाराकडुन काम पुर्ण करण्याची कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.त्यामुळे कामास २ महीने विलंब झालेला आहे. दि.२२/०८/२०१५ रोजी ठेकेदाराने शिर्डी येथे येऊन करारनामा केलेला आहे.तसेच त्यांनी आम्हाला काम करावयाचे आहे असे तोंडी सांगीतलेले आहे.त्यांना लेखी स्वरुपात पत्र देण्यासाठी सांगीतलेले असता त्यांनी दि.१२/०९/२०१५ रोजी पत्र दिलेले असुन सध्या सिंहस्थ कुंभमेळयाची भक्तांची गर्दी चालु असल्याने संस्थान परीसरात केबल टाकणेसाठी खोदाई करणे शक्य नसल्याने सदरचे काम सिंहस्थ कुंभमेळा संपल्यानंतर प्रकल्प इन्स्ट्रुमेंटस, अहमदनगर यांचे मार्फत करता येईल.

तरी शैक्षणिक संकुल (आयटीआय, इंग्लिश मिडीयम स्कुल, कन्या शाळा) परीसरात नविन दुरध्वनी केबल टाकणेचे कामासाठी ठेकेदार यांना मुदतवाढ देऊन त्यांचेकडुन सिंहस्थ कुंभमेळयाची भक्तांची गर्दी संपल्यानंतर काम करुन घेणेसाठीचे मान्यतेसाठी मा.त्रिसदस्यीय समितीसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.४६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक संकुल परिसरात नविन दुरध्वनी केबल टाकणेच्या कामाचे ठेकेदार प्रकल्प इन्स्ट्रुमेंटस, अहमदनगर यांच्या मुदतवाढ मिळणेबाबतचे पत्राचा विचार करता त्यांना सदरहूकाम पुर्ण करणेसाठी ०१ महिना मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- ध्वनिक्षेपण विभागप्रमुख)

---

**विषय नं.२८** **सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षातील श्री साई प्रसादालयातील धान्य-कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद**:- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

**प्रस्ताविक :-** श्री साई प्रसादालयामध्ये दररोज अंदाजे ३५ ते ४० हजार साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेत असून उत्सवामध्ये ही संख्या वाढून ६५ ते ७० हजार पर्यंत जाते. दररोज सुमारे सरासरी ९ हजार अन्नपाकीटे तयार करून विक्री होतात. त्याकामी लागणारा किराणा माल, धान्य- कडधान्य व डाळी साफ केल्यानंतर वापरासाठी देण्यात येतात. सदर माल मशिनव्दारे व मनुष्यबळाकरवी साफ करण्यात येतो, निवडला जातो. गहू व हरबरा दाळ दळण्यात येत असून दळल्यानंतर काही प्रमाणात घट येते. त्याचप्रमाणे वजनातही घट येते. या सर्व कारणांमुळे व प्रक्रिया करतांना किराणा मालामध्ये घट- तुट येत असते.

मा. व्यवस्थापन समिती दि.२८/०६/२००८ चे सभेतील निर्णय क्र. ५६० अन्वये सन २००७- २००८ या वर्षात आलेली प्रत्यक्ष घट- तुट खर्ची टाकण्यात आलेली होती. मात्र सदरील घट- तुटीस मान्यता देतांना मा.श्री. अभय शास्त्री, मा.श्री.ए.जी.लोंगाणी, अंतर्गत लेखापरिक्षक व मुख्य लेखाधिकारी यांनी पुढील कालावधीसाठी खालीलप्रमाणे सुचना (नियमावली) सुचविलेली होती. त्यास मा.व्यवस्थापन समिती दि.२८/०६/२००८ चे सभेतील निर्णय क्र. ५६० नुसार मान्यता मिळालेली आहे.

१) सन २००७- २००८ मध्ये प्रसादालयात प्रत्यक्ष आलेली घट- तुट इतर देवस्थान व संस्था यांचेकडील प्रचलित घट-तुटीचे प्रमाण पाहता आपलेकडील आलेली सरासरी घट-तुट योग्य असून इतरांचे तुलनेने कमी असलेने दर सहा महिन्यानंतर प्रस्तावित प्रमाणानुसार घट-तुट नांवे टाकण्यात यावी.

२) दर सहा महिन्यानंतर प्रत्यक्ष मालाचा साठा व रजिष्टरप्रमाणे दिसणारा मालाचा साठा याची पडताळणी करावी.

३) दर सहा महिन्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक माल व रजिष्टरप्रमाणे दिसणारा साठा याची तपासणी केल्यानंतर तपासणी अंती आलेली घट-तुट प्रस्तावित सरासरी पेक्षा कमी आढळलयास त्याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल मा.व्यवस्थापन समिती समोर अवलोकनार्थ सादर करावा. मात्र प्रस्तावित सरासरी पेक्षा आलेली घट-तुट जादा असेल तर त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी.

उपरोक्त नियमावलीनुसार दरवर्षी प्रसादालयातील आर्थिक वर्षामध्ये एकुण खर्ची पडलेल्या किराणा मालात प्रत्यक्ष आलेल्या घट- तुटीस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे.

**मागणी :-** सन २०१३- २०१४ या आर्थिक वर्षामध्ये दर सहा महिन्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक किराणा मालाचा साठा व रजिष्टरप्रमाणे खर्ची पडलेला किराणा माल याची तपासणी करण्यात आली होती. खालील घट- तुटीचे अवलोकन करता प्रत्यक्ष आलेली घट- तुट ही मान्य असलेल्या घट- तुटीच्या प्रमाणापेक्षा कमी आलेली आहे. त्यामुळे सदरील घट- तुट नांवे टाकण्याच्या नियमावली क्र.०३ नुसार घट- तुटीचा वस्तुनिष्ठ अहवाल मा.त्रीसदस्य समिती सभेपुढे अवलोकनार्थ सादर करावा लागणार आहे.

**सन २०१४- २०१५ मध्ये धान्य- कडधान्य व किराणा मालामध्ये आलेल्या घट- तुटीचा तपशिल.**

| अ.नं. | मालाचा तपशिल | दि.०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१५ अखेर | | घट- तुटीचे प्रमाण | मान्य घट- तुटीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रत्यक्ष झालेला खर्च | प्रत्यक्ष आलेली घट- तुट | | |
| | | कि. ग्रॅ. | कि. ग्रॅ. | कि. ग्रॅ. | कि. ग्रॅ. |
| १ | गहू | १२७१३०५.००० | ३४६११.००० | २.७२२ | ३.००० |
| २ | तांदूळ | ८४११३८.००० | ७२११.००० | ०.८५७ | १.००० |
| ३ | तुरदाळ | १९६४२३.००० | १६५१.००० | ०.८४१ | १.००० |
| ४ | हरबरा दाळ | ४३९७७४.००० | ६०२५.००० | १.३७० | २.००० |
| ५ | मुगदाळ | २१९००.३०० | १४३.००० | ०.६५३ | १.००० |
| ६ | गुळ | २६३३४.१०० | २१६.००० | ०.८२० | १.००० |
| ७ | रवा | २४८८८.००० | २०५.००० | ०.८२४ | १.००० |
| ८ | शेंगदाणे | ४२३७५.२०० | ४०४.००० | ०.९५३ | १.००० |
| ९ | मिरची | १७१६१.००० | ६४१.५०० | ३.७३८ | ४.००० |
| १० | हळद | १०१४२.००० | ३७९.००० | ३.७३७ | ४.००० |
| ११ | मोहरी | ५३३८.५०० | ७०.००० | १.३११ | २.००० |
| १२ | जिरे | ५८५७.१०० | ७२.००० | १.२२९ | २.००० |
| १३ | मसाला | ३१७५.५५० | ७१.००० | २.२३६ | २.२५० |
| १४ | धने पावडर | १२२१७.५०० | ३२३.००० | २.१२३ | २.५०० |
| १५ | खोबरे वाटी | १३६५४.३०० | ११८.००० | ०.८६४ | १.००० |
| १६ | हिरवी विलायची | २३९०.८०० | २३.५०० | ०.९८२ | १.००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७ | हरबरा | ६३७८८.००० | ५९८.००० | ०.९३७ | १.००० |
| १८ | वाटाणा | ५८२३०.००० | २०४.००० | ०.९०० | १.००० |
| १९ | मुग | ७६३५१.००० | ७३२.००० | ०.९५९ | १.००० |
| २० | मठ | ९९८३५.००० | ८४०.००० | ०.८४१ | १.००० |
| २१ | मेथी | १३८.७५० | ३.०५० | २.१९८ | २.२५० |
| २२ | सुंठ | २९०.९०० | १४.९०० | ५.१२२ | ५.२५० |
| २३ | मैदा | ६१९६०.००० | २५८.००० | ०.४१६ | ०.५०० |
| २४ | भगर | २८१.५०० | ५.२५० | १.८६५ | २.००० |
| २५ | साबुदाणा | २६४११.००० | २८६.००० | १.०८३ | १.२५० |
| २६ | कच्चे पोहे | ६३४.५०० | ६.००० | ०.९४६ | १.००० |
| २७ | भाजके पोहे | २९९१.५०० | १०५.००० | ३.५१० | ४.००० |
| २८ | डाळया | ६९२.५०० | ७.००० | १.०११ | १.२५० |

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** तरी उपरोक्त प्रमाणे सन २०१४- २०१५ या आर्थिक वर्षामध्ये झालेल्या घट- तुटीच्या अहवालास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४६३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षातील श्री साई प्रसादालयातील धान्य-कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबतच्या अहवालाचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रसादालय विभाग)

---

विषय नं.२९ **श्री साईप्रसादालयातील रिकाम्या तेला-तुपाच्या व काजूच्या डब्यांचा माहे एप्रिल- २०१४ ते मार्च-२०१५ अखेर अहवाल.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतूद :-** अधिनियम २००४ कलम १७ (४) नुसार निरुपयोगी वस्तूंची विल्हेवाट लावणे.

**मा.व्यवस्थापन समिती सभा ठराव:-** मा.व्य. समिती सभा दिनांक १७/०७/२०१४ मधील निर्णय क्र.५९२.

**प्रस्ताविक:-** मा.व्य. त्रिसदस्य समिती सभा दि.१७/०७/२०१४ निर्णय क्र. ५९२ नुसार असे ठरले आहे की, तेला- तुपाचे एकुण डबे, रिकामे डबे कुठे वापरण्यात आले याच्या नोंदी ठेवणेत येऊन, त्याचा मासिक अहवाल मा.कार्यकारी अधिकारी यांचेसमोर व वार्षिक अहवाल मा.त्रिसदस्य समितीसमोर सादर करणेत यावा.

श्री साई प्रसादालयात सकाळी १०.०० ते रात्री १०.०० या वेळेत साईभक्तांना प्रसादभोजन पुरविले जाते. या सर्व भक्तांना जेवणामध्ये चपाती, पुरी, भाजी, बर्फी, इ. पदार्थ दिले जात असून साईभक्तांना प्रसाद बनविण्यासाठी खाद्यतेल, गावरान तुप, वनस्पती तुप व काजू वापरले जात असून सदर डब्यांचा मध्यवर्ती भांडारकडून पज्याच्या डब्यात पुरवठा होत असतो. सदरील रिकाम्या डब्यांची विक्री ही अभिलेख कक्षामार्फत केली जाते. प्रसादालयात साधारणत: महिन्याकाठी १५-२० डबे गिरण्यांना जाते टाकल्यानंतर पॅकींग म्हणून व प्रसादालयातील साफसफाईकामी वापरले जातात व ते प्रसादालय खाती खर्ची टाकण्यात येतात.

**मागणी:-** मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानुसार तेला-तुपाचे एकूण डबे, रिकामे झालेले डबे व रिकामे डबे कुठे वापरणेत आले याच्या नोंदी ठेवणेत येऊन, त्याचा मासिक अहवाल मा. कार्यकारी अधिकारी यांचेसमोर व वार्षिक अहवाल मा. त्रिसदस्य समितीसमोर सादर करण्यात यावा असे ठरले होते. त्यानुसार माहे एप्रिल-२०१४ ते मार्च-२०१५ चा डब्यांच्या कार्यवाहीचा अहवाल आपले माहितीस्तव पुढीलप्रमाणे सादर.

**(अ) मागील शिल्लक व आवक होऊन रिकामे झालेले डबे- माहे एप्रिल-१४ ते मार्च-१५ अखेर**

| **महिना** | **गावराण तुप डबे (आवक)** | **खाद्यतेल डबे (आवक)** | **वनस्पती तूप डबे (आवक)** | **काजू डबे (आवक)** |
|---|---|---|---|---|
| मागील शिल्लक डबे | १२०० | २३३८ | २६० | १५३० |
| माहे एप्रिल-२०१४ | ४२५० | १६५० | २२९ | १६० |
| माहे मे-२०१४ | ४६०० | २८३७ | १४० | १४३ |
| माहे जून-२०१४ | ५०५० | १०६२ | १५० | ९० |
| माहे जुलै-२०१४ | ४९२४ | २२५३ | ४९८ | ५० |
| माहे ऑगस्ट-२०१४ | ४४१३ | १९१६ | २७२ | १२७ |
| माहे सप्टेंबर-२०१४ | ३५०० | २१४७ | ३३७ | १२५ |
| माहे ऑक्टोबर-२०१४ | --- | १०६० | २०४ | --- |
| माहे नोव्हेंबर-२०१४ | --- | १०५० | २५३ | --- |
| माहे डिसेंबर-२०१४ | --- | १५१३ | १६८ | --- |
| माहे जानेवारी-२०१४ | --- | २००० | ३०४ | --- |
| माहे फेब्रुवारी-२०१५ | --- | १२४७ | २५४ | --- |
| माहे मार्च-२०१५ | --- | २३४८ | ४३९ | ०५ |
| **रिकामे झालेले एकुण डबे=** | **२७९३७** | **२३४२१** | **३५०८** | **२२३०** |

**(ब) अभिलेख कक्षामार्फत विक्री करण्यात आलेले रिकामे डबे-**

| महिना | गावराण तुप डबे | खाद्यतेल डबे | वनस्पती तूप डबे | काजू डबे |
|---|---|---|---|---|
| माहे एप्रिल-२०१४ | --- | --- | --- | १२३० |
| माहे मे-२०१४ | ६३४४ | २९२५ | ४०० | --- |
| माहे जून-२०१४ | ६१८९ | ४१४८ | --- | --- |
| माहे जुलै-२०१४ | ४१३८ | २३२४ | --- | ४४५ |
| माहे ऑगस्ट-२०१४ | ३०५० | १००० | --- | --- |
| माहे सप्टेंबर-२०१४ | ६६०८ | २५३६ | --- | ४५१ |
| माहे ऑक्टोबर-२०१४ | १५६६ | ९९० | ६८५ | --- |
| माहे नोव्हेंबर-२०१४ | ४२ | १५०० | ८८८ | --- |
| माहे डिसेंबर-२०१४ | --- | १८१३ | ३१० | --- |
| माहे जानेवारी-२०१५ | — | १३६२ | — | — |
| माहे फेब्रुवारी-२०१५ | --- | २१७८ | ४६२ | --- |
| माहे मार्च-२०१५ | --- | २०१५ | ३९५ | ९९ |
| **एकुण विक्री केलेले डबे-** | **२७९३७** | **२२७९१** | **३१४०** | **२२२५** |

**(क) प्रसादालयामध्ये गिरणी पॅकींग व साफसफाईकामी वापरलेले रिकामे डबे-**

| महिना | गावराण तुप डबे | खाद्यतेल डबे | वनस्पती तूप डबे | काजू डबे |
|---|---|---|---|---|
| माहे एप्रिल-२०१४ | --- | --- | १८ | --- |
| माहे मे-२०१४ | --- | --- | १८ | --- |
| माहे जून-२०१४ | --- | --- | १८ | --- |
| माहे जुलै-२०१४ | — | — | २० | — |
| माहे ऑगस्ट-२०१४ | --- | --- | १८ | --- |
| माहे सप्टेंबर-२०१४ | --- | --- | आरोग्य विभाग १००<br>प्रसादालय १९ | --- |
| माहे ऑक्टोबर-२०१४ | --- | --- | --- | --- |
| माहे नोव्हेंबर-२०१४ | --- | --- | १३ | --- |
| माहे डिसेंबर-२०१४ | --- | मंदिर विभाग ०१ | --- | --- |
| माहे जानेवारी-२०१५ | — | — | — | — |
| माहे फेब्रुवारी-२०१५ | --- | --- | ०६ | --- |
| माहे मार्च-२०१५ | --- | --- | --- | --- |
| **एकूण वापरलेले डबे =** | | **०१** | **२३०** | **—** |

**समरी तक्ता- माहे एप्रिल-२०१४ ते मार्च-२०१५ अखेर**

| | गावराण तुप डबे | खाद्यतेल डबे | वनस्पती तूप डबे | काजू डबे |
|---|---|---|---|---|
| 'ब' नुसार खर्च डबे | २७९३७ | २२७९१ | ३१४० | २२२५ |
| 'क' नुसार खर्च डबे | --- | ०१ | २३० | --- |
| 'ब' व 'क' नुसार खर्च डबे | २७९३७ | २२७९२ | ३३७० | २२२५ |
| 'अ' नुसार आवक डबे | २७९३७ | २३४२१ | ३५०८ | २२३० |
| 'ब' व 'क' नुसार खर्च डबे | _ २७९३७ | _ २२७९२ | _ ३३७० | _ २२२५ |
| एकुण शिल्लक डबे माहे मार्च- २०१५ अखेर | — | ६२९ | १३८ | ०५ |

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** माहे एप्रिल- २०१४ ते मार्च- २०१५ अखेर एकुण रिकामे झालेले डबे व त्यांची विल्हेवाट व याबाबतचा शिल्लक डब्यांच्या अहवालास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे माहे एप्रिल- २०१४ ते मार्च-२०१५ अखेरच्या श्री साईप्रसादालयातील रिकाम्या तेला-तुपाच्या व काजूच्या डब्यांच्या अहवालाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रसादालय विभाग)

**विषय नं.३०** **नाष्टापाकिट उत्पादन खर्चात वाढ झाल्याने विक्री दरामध्ये वाढ करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतूद:-** सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 14 (भाग-4) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील 21 (1 घ) नूसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

**प्रास्तविक:-** सन 1989-1990 पासून साईभक्तांचे सोईसाठी नाष्टापाकीटे तयार करुन विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. सदर नाष्टापाकीटामध्ये खालीलप्रमाणे पदार्थ देण्यात येतात.

1) पुरी नग - 05 अंदाजे वजन - 125 ग्रॅम
2) कडधान्य भाजी अंदाजे वजन - 050 ग्रॅम
3) बर्फी वडी अंदाजे वजन - 025 ग्रॅम
**एकूण वजन - 200 ग्रॅम**

नाष्टापाकीटाची विक्री सुरु करतांना रु.2.50 प्रमाणे विक्री करण्यात आलेली आहे. सन 2004 मध्ये प्रती पाकीटास रु.4.25 खर्च येत असल्याने व सुट्टया नाणी व अपुर्णांकीत रक्कम या अडचणीबाबत विचार होऊन मा.व्यवसस्थापन समिती दिनांक 17/11/2004 चे सभेतील निर्णय क्रं.115 अन्वये दिनांक 1 जानेवारी 2005 पासून नाष्टापाकीटाची किंमत रु.2.50 ऐवजी रु.3.00 करण्यात आलेली होती. त्यानंतर नाष्टापाकीटाचा उत्पादन खर्च वाढल्याने मा.व्यवस्थापन समिती दि.19/02/2012 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.255 अन्वये नाष्टापाकीटाची किंमत रु.3.00 ऐवजी रु.4.00 करण्यात आलेली आहे. तेव्हांपासून आजतागायत नाष्टापाकीटाची किंमत प्रती पाकीटास रु.4/- घेण्यात येत आहे.

कॅन्टीन विभागाकडील दि.05/05/2014 रोजीचे चहा, कॉफी, दुधाचे दरवाढीबाबतचे टिपणीवर तत्कालीन मा.का.अ.साहेब यांनी नाष्टापाकीटाचे दर रु.4/- ऐवजी 5/- करणेत यावे अशी लेखी सुचीत केले होते. त्यानूसार सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन त्रिसदस्सीय समिती सभा दि.12/06/2014 रोजीचे सभेत सादर करणेत आलेला होता. त्यावर निर्णय क्रं.509 अन्वये सदरचा प्रस्ताव अमान्य करणेत आलेला आहे.

सध्या सर्वच किराणा मालाचे व मजुरीचे दरात वाढ झाल्यामुळे नाष्टापाकीटाचे उत्पादन खर्चात मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. माहे एप्रिल-2014 ते मार्च-2015 या आर्थिक वर्षात नाष्टापाकीटे तयार करणेकामी झालेल्या खर्चाचा सर्व समावेषक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| महिना/वर्षे | प्रती पाकीटास येणारा खर्च रु. पै. | महिना/वर्षे | प्रती पाकीटास येणारा खर्च रु. पै. | एकूण | एकूण महिने | प्रती पाकीट वार्षिक सरासरी पडलेला अंदाजे दर |
|---|---|---|---|---|---|---|
| एप्रिल-14 | 10.72 | ऑक्टोबर-14 | 11.29 | | | |
| मे-14 | 10.92 | नोव्हेंबर-14 | 11.65 | | | |
| जुन-14 | 10.94 | डिसेंबर-14 | 11.58 | | | |
| जुलै-14 | 11.43 | जाने. 2015 | 11.13 | | | |
| ऑगस्ट-14 | 10.89 | फेब्रुवारी-2015 | 11.96 | | | |
| सप्टेंबर-14 | 11.15 | मार्च-2015 | 11.30 | | | |
| **एकूण वार्षिक खर्च =** | **66.05** | **एकूण =** | **68.91** | **134.96** | **12** | **= रु.11.24** |

उपरोक्तप्रमाणे प्रती नाष्टापाकीटास सरासरी **रु.11.24पै.** इतका खर्च येत असून संस्थानकडून साई भक्तांच्या सेवेसाठी फक्त रु.4.00 या सवलतीचे अल्पदरात विक्री करण्यात येत आहे, प्रती अन्नपाकीटामागे संस्थानला **रु.7.24** इतकी जादा तुट येते.

साईभक्तांचे गर्दीचे प्रमाणानूसार प्रती दिनी 8000 ते 15,000 नाष्टापाकीटाची विक्री होत असते. त्यानूसार माहे एप्रिल-2014 ते मार्च-2015 या 12 महिन्यात खालीलप्रमाणे नाष्टापाकीटांची विक्री झालेली आहे.

| महिना/वर्षे | नाष्टापाकीटे विक्री संख्या | महिना/वर्षे | नाष्टापाकीटे विक्री संख्या | 1 वर्षातील नाष्टापाकीटे विक्री संख्या |
|---|---|---|---|---|
| एप्रिल-14 | 2,87,490 | ऑक्टोबर-14 | 2,95,315 | |
| मे-14 | 3,21,880 | नोव्हेंबर-14 | 3,21,534 | |
| जुन-14 | 3,21,410 | डिसेंबर-14 | 3,40,050 | |
| जुलै-14 | 3,49,854 | जानेवारी-2015 | 3,36,502 | |
| ऑगस्ट-14 | 2,97,550 | फेब्रुवारी-2015 | 2,89,140 | |
| सप्टेंबर-14 | 2,68,313 | मार्च-2015 | 2,92,075 | |
| **एकूण =** | **18,46,497** | **+ एकूण =** | **18,74,616** | **= 37,21,113** |

**= एकूण पाकीट विक्री संख्या 37,21,113 ( 365 दिवस = 10,195 प्रती दिनी सरासरी**

| | |
|---|---|
| 1 वर्षातील एकूण नाष्टापाकीटे विक्री संख्या | 37,21,113 |
| प्रती नाष्टापाकीटास होणारी तुट x | रु. 7.24 |
| **सन 2014-2015 या वर्षातील नाष्टापाकीटाचे निर्धारीत विक्रीतून एकूण झालेली वार्षिक तुट रुपये =** | **2,69,40,858/-** |

कॅन्टीन विभागाकडील दिनांक 05/05/2014 रोजीचे चहा, कॉफी, दुधाचे दरवाढीबाबतचे टिपणीवर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी नाष्टापाकीटाचेही दर रु.4 ऐवजी रु.5/- करणेबाबत सुचना केलेली आहे. त्यानूसार नाष्टापाकीटाचे प्रती नग विक्री किंमितीत रु.1/- (रु.4/- ऐवजी रु.5/-) ने वाढ केल्यास वरील होणारी तुट अंदाजे रक्कम रु.35,00,000/- ते 40,00,000/- ने कमी होईल. म्हणजेच साईभक्तांना नाष्टापाकीटाचे स्वरुपातून वार्षिक रु.2,69,40,858/- (अक्षरी रु.दोन कोटी एकोणसत्तर लाख चाळीस हजार आठशे अठ्ठावन्न मात्र) रक्कमेची आर्थिक सवलत दिली जाणार आहे.

**मागणी:-** साईभक्तांना अन्नपाकीटे विक्रीकामी रु.**1/-** चे सुट्टे नाणे टंचाईमुळे आर्थिक देवाण-घेवाण कामी अडचण येत आहे तसेच वर नमूद केलेप्रमाणे सर्वच किराणा मालाचे व मजुरीचे दरात वाढ झाल्यामुळे नाष्टापाकीटाचे उत्पादन खर्चात मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यामुळे प्रस्तावित केलेप्रमाणे सदरचा विषय मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णयार्थ सादर करता येईल.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान :-** आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** नाष्टापाकीटाचे उत्पादन खर्चात मोठया प्रमाणात वाढ झालेली असल्यामुळे व साईभक्तांना अन्नपाकीटे विक्रीकामी रु.1/- चे सुट्टे नाणे टंचाईमुळे आर्थिक देवाण-घेवाण कामी अडचण येत असल्याने भक्तांना सुटया पैशांसाठी सुध्दा वेळप्रसंगी रांगेत थांबावे लागते. तसेच नाष्टापाकीटे बनवून विक्री करतांना संस्थानला होणाऱ्या तुटीचा खर्च या सर्व बाबींवर विचार होवून नाष्टापाकीटाचे विक्रीचे दरात वाढ करणेबाबत प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईप्रसादालय विभागाच्या अभिप्रायानुसार अन्न पाकिटाचे उत्पादन खर्चात मोठया प्रमाणात झालेली वाढ व विक्रीकामी सुट्टया नाण्यांची अडचण याचा विचार करता, अन्न पाकिट विक्रीचे दरात रु.१/- मात्रने वाढ करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच अन्न पाकिट विक्रीचे नवीन दर रु.५/- मात्र दि.०१ डिसेंबर २०१५ पासून लागू करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय/ विभाग प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग/ मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३१** **सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षातील लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागातील कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ भाग क्र.४ मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावीत केलेले अध्याधेश व केलेले विनियम मधील २१(१ घ) नुसार साईभक्तांना मोफत प्रसाद पुरविणे व लाडूप्रसादाची विक्री चालविणे.

**प्रस्ताविक**– लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागांतर्गत दररोज अंदाजे ५० ते ५५ हजार मोफत बुंदी प्रसाद पाकिटांचे वाटप केले जाते व अंदाजे २५ ते ३० हजार लाडू प्रसाद पाकिटांची विक्री केली जाते. श्रींचे उत्सवामध्ये ही संख्या वाढून अंदाजे ६५ ते ७० हजार मोफत बुंदी प्रसाद पाकिटांचे वाटप केले जाते व अंदाजे ३५ ते ४० हजार लाडू प्रसाद पाकिटांची विक्री केली जाते. सदरकामी लागणारे कडधान्य (हरबरा डाळ) मशिनव्दारे व मनुष्यबळाकरवी साफ करण्यात येते. हरबरा डाळ दळावी लागते, दाळ दळल्या नंतर तिच्या वजनामध्ये घट-तुट येते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८-०६-२००८ चे सभेतील निर्णय क्र.५६० अन्वये सन २००७-२००८ या आर्थिक वर्षात आलेली प्रत्यक्ष घट/तुट खर्ची टाकण्यात आलेली होती. मात्र सदरील घट तुटीस मान्यता देतांना मा.श्री.अभयशात्री, मा.श्री.ए.जी.लोंगाणी, अंतर्गत लेखापरीक्षक व मुख्य लेखाधिकारी यांनी पुढील कालावधीसाठी खालीलप्रमाणे सुचना (नियमावली) सुचविलेली होती त्यास मा.व्यवस्थापन समितीने दि. २८/०६/२००८ चे सभेतील निर्णय क्र.५६० नुसार मान्यता मिळालेली आहे.

१. सन २००७-२००८ मध्ये प्रसादालयात प्रत्यक्ष आलेली घट-तुट इतर देवस्थान व संस्था यांचेकडील प्रचलित घट-तुटीचे प्रमाण पाहता आपलेकडील आलेली सरासरी घट-तुट योग्य असून इतरांचे तुलनेने कमी असल्याने दर सहा महीन्यांनंतर प्रस्तावीत प्रमाणानुसार घट तुट नांवे टाकणेत यावी.

२. दर ६ महीन्यांनी प्रत्यक्ष मालाचा साठा व रजिष्टर प्रमाणे दिसणारा साठा याची पडताळणी करावी.

३. दर सहा महीन्यांतर प्रत्यक्ष शिल्लक माल व रजिष्टर प्रमाणे दिसणारा साठा याची तपासणी केल्यानंतर तपासणी अंती आलेली घट-तुट प्रस्तावित सरासरी पेक्षा कमी आढल्यास त्याबाबतचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीसमोर अवलोकनार्थ सादर करावा मात्र प्रस्तावीत सरासरीपेक्षा आलेली घट-तुट जादा असेल तर त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी.

उपरोक्त नियमावलीनुसार दरवर्षी प्रसादालयातील आर्थिक वर्षामध्ये एकूण खर्ची पडलेल्या किराणा मालातील प्रत्यक्ष आलेली घट व तुटीस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे.

**मागणी-** सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये दर सहा महीन्यांनंतर प्रत्यक्ष शिल्लक किराणा मालाचा साठा व रजिष्टरप्रमाणे खर्ची पडलेला किराणामाल याची तपासणी करण्यात आली होती. खालील घट- तुटीचे अवलोकन करता प्रत्यक्ष आलेली घट- तुट ही मान्य असलेल्या घट तुटीच्या प्रमाणापेक्षा कमी आलेली आहे. त्यामुळे सदरील घट

तुट नांवे टाकण्याच्या नियमावली क्र.०३ नुसार घट तुटीचा वस्तुनिष्ठ अहवाल मा. त्रिसदस्य समितीपुढे अवलोकनार्थ सादर करावा लागणार आहे.

सन २०१४-१५ मध्ये कडधान्य व किराणामालामध्ये आलेल्या घट-तुटीचा तपशिल-

**(कालावधी – दिनांक ०१/१०/२०१४ ते ३१/०३/२०१५ अखेर)**

| अ.नं. | मालाचा तपशिल | दि.०१/१०/२०१४ ते दि.३१/०३/२०१५ अखेर | | | घट- तुटीचे प्रमाण (प्रति क्विंटलला) | मान्य घट- तुटीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | आलेला माल | झालेला खर्च | प्रत्यक्ष आलेली घट- तुट | | |
| | | कि.ग्रॅम | कि.ग्रॅम | कि.ग्रॅम | कि.ग्रॅम | कि.ग्रॅम |
| १. | हरबरा दाळ | ४४१६४९.०० | ४१०१९५.०० | ५५५४.०० | १.३५४ | २.०० |
| २. | हिरवी विलायची | १२५०.०० | ११७९.०० | ४.७१६ | ०.४०० | १.०० |

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत-** लाडू व बर्फी निर्मिती विभाग हा दि.०१/१०/२०१४ पासून स्वतंत्र झालेला आहे. यापुर्वी लाडू प्रसाद निर्मिती विभाग हा प्रसादालय विभागाचे अंतर्गत होता. प्रसादालयाने दि.०१/०४/२०१४ ते दि.३०/०९/२०१४ या कालावधीतील किराणा माल तसेच कडधान्याचे घट-तुटी बाबतचा अहवाल स्वतंत्र सादर केला आहे.

लाडू व बर्फी निर्मिती विभागाकडील दिनांक ०१/१०/२०१४ ते ३१/०३/२०१५ या कालावधीत झालेल्या घट तुटीच्या अहवालास मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.४६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे लाडू व बर्फी निर्मिती विभागाकडील दि.०१/१०/२०१४ ते दि.३१/०३/२०१५ या कालावधीतील घट-तुटीच्या अहवालाचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी निर्मिती विभाग)

---

**विषय नं.३२** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या निधीतून शिर्डी शहरातील व्दितीय प्राधान्य गटातील भू-संपादनासह ०७ रस्ते व भू-संपादनाची आवश्यकता नसलेल्या १७ रस्त्यांचे विकसनाबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) २००४ चे कलम २१ (२) खालील प्रमाणे तरतुद आहे.

पोट कलम (१) आणि (१ क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल.

(दोन) स्थानिक नागरी सेवा सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्यासाठी.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:**

०१. निर्णय क्र. २६३ दि. २४/०४/२००६.
०२. निर्णय क्र. १६ (ब) दि. १०/०१/२०१०.
०३. निर्णय क्र. ५३८ दि. २४/०७/२०११.
०४. निर्णय क्र. ७०६ दि. २४/०९/ २०११.
०५. निर्णय क्र. ७८ दि. ०८/०१/२०१४.
०६. निर्णय क्र. ७५० दि. ११/०९/२०१४.
०७. निर्णय क्र. ७९९ दि. ११/०९/२०१४.

**मा. शासन निर्णय :** मा. विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.

१. सासंवि/२००६/८७६/(१३१) का.सोळा, दि.०४/०९/२०१४

२. सासंवि-२०११/५१४/ प्र. क्र. ७४/का.१६, दि.२१/०८/२०१४

**प्रस्तावना:** शिर्डी नगरपंचायतीचे विनंतीवरुन शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पातंर्गत संस्थान निधीतून शिर्डी शहरातील रस्ते विकसीत करणेकामास मा. व्यवस्थापन समिती ठराव क्र.२६३ दि.२४/०४/२००६ अन्वये मान्यता देण्यात आली होती. सदरहु रस्ते विकसन प्रकल्पाची सद्यस्थिती खालीप्रमाणे आहे.

**(अ) प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्ते विकसीत करणे** - उपरोक्त मान्यतेनुसार शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावांतर्गत प्रथम प्राधान्य गटातील अकरा रस्ते विकसीत करणेकामीचे प्रस्तावास दि.०४ सप्टेंबर, २०१४ अन्वये रुपये ८८ कोटी खर्चास मान्यता देण्यात आली असून, आजअखेर सदरहू प्रकल्पावर रु. ७०,०४,०७,८५०/- रक्कम खर्च करणेत आलेली आहे. सदरहू ११ रस्त्यांपैकी रस्ता क्र. ०९ अ चे भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण न झाल्यामुळे प्रलंबीत आहे. उर्वरीत रस्त्यांपैकी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत ५ रस्ते पूर्ण झाले असून संस्थान ठेकेदार रोमन टारमॅट लि. यांचेमार्फत ६ रस्त्यांपैकी ४ रस्त्यांचे उपलब्ध भागातील कामे पुर्णत्वावर आहेत. तसेच रस्ता क्र.०५ चे काम प्रगतीपथावर आहे.

**(ब) व्दितीय प्राधान्यगटातील एकूण २४ रस्ते विकसन करणे-** शिर्डी नगरपंचायतीचे दि.१६/०७/२०११ रोजीचे पत्रान्वये ढोबळमानाने व्दितीय प्राधान्यगटातील एकूण २३ रस्ते विकसन करणेकामी सहा रस्त्यांचा भूसंपादन खर्च रु. ४३.७३ कोटी व २३ रस्त्यांचे विकसनासाठी रु.८२.८३ कोटी असा एकूण रु.१२६.१०० कोटी खर्चाचा प्रस्ताव सादर केला होता. त्यावर मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४/०७/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५३८ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली. तसेच नगर-मनमाड रस्त्याचे पश्चिम बाजूने जाणा-या ४५ मीटर बायपास रस्त्याचा (४ कि. मी. लांबीचा) व पिंपळवाडी रस्ता ५६५ मी. ऐवजी १ कि. मी. पर्यंत समावेश करुन, प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देणेत आली."

मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.२१/०८/२०१५ रोजीचे पत्राने व्दितीय प्राधान्यगटातील भूसंपादनाची आवश्यकता नसलेले १७ रत्यांपैकी ८ रस्ते महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राजस्तर) योजनेत मंजूर झालेले असल्याचे कळविले आहे. व्दितीय प्राधान्यगटातील रस्त्यांचे प्रस्तावात समावेश असलेल्या खालील रस्त्यांपैकी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राजस्तर) योजनेत मंजूर झालेल्या रस्त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| **(अ)** | **भूसंपादनाची आवश्यकता नसलेले १७ रस्ते.** | |
| ०१ | डॉ. हेडगेवार नगरमधील रस्ता लांबी ६०० मी. रुंदी ५ मी. | व्दितीय प्राधान्य गट |
| ०२ | वितरीका क्र. १२ बंदीस्त करुन त्यावर रस्ता विकसीत करणे. लांबी १८०० मी. रुंदी ५.५० मी. | |
| ०३ | शिर्डी-साकुरी शिव रस्ता (पूर्व बाजू) लांबी १००० मी. रुंदी ३.५० मी. | **महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राजस्तर) योजनेत मंजूर** |
| ०४ | शिर्डी-साकुरी शिव रस्ता (पश्चिम बाजू) लांबी१५०० मी. रुंदी ३.५०मी. | |
| ०५ | नांदुर्खी शिव ते साकुरी शिव रस्ता लांबी ९५० मी. रुंदी ३.५० मी. | |
| ०६ | ५००रुम ते साईश्रध्दा हौसींग सोसायटीकडे जाणारा रस्ता लांबी १२०० मी. रुंदी ९ मी. | |
| ०७ | पुखराज लोढा ते पिंपळवाडी रस्ता लांबी ४१० मी. रुंदी ३.०० मी. | व्दितीय प्राधान्य गट |
| ०८ | सन एन् सॅन्ड ते कंम्पोस्ट डेपो पर्यंत रस्ता लांबी२५०० मी. रुंदी ३.५० मी. | **महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राजस्तर) योजनेत मंजूर** |
| ०९ | बिरेगांव नाला रोड (लुटे वस्ती ते गणेश बंधारा पर्यंत) लांबी ३००० मी. रुंदी ४.००मी. | |
| १० | चौफुली रोड ते कंम्पोस्ट डेपो ( सर्व्हे नं. १३६ ते राहाता नगरपरिषद कंम्पोस्ट डेपो पर्यंत) लांबी १५०० मी. रुंदी ३.५० मी. | |
| ११ | पुनमनगर गल्ली क्र.०१ ते आर. के. कोते यांचे घरापर्यंत.लांबी ३५० मी. रुंदी ४.५०मी. | व्दितीय प्राधान्य गट |
| १२ | श्रीकृष्ण नगर मधील रस्ते लांबी ७०० मी. रुंदी ३.५० मी. | |
| १३ | सर्व्हे नं. १३४ सर कॉलनी रस्ते. लांबी २५० मी. रुंदी ३.५० मी. | |
| १४ | बन रस्ता -वराह चौक ते सौंदडी देवस्थान पर्यंतचा रस्ता. लांबी ८०० मी. रुंदी ५.००मी. | **महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राजस्तर) योजनेत मंजूर** |
| १५ | गणेशवाडी मधील रस्ते. लांबी ८०० मी. रुंदी ३.०० मी. | व्दितीय प्राधान्य गट |
| १६ | शिर्डी शहरातील नगरमनमाड रस्ता कॉक्रीटीकरण करणे. लांबी २५०० मी रुंदी ३०.०० मी. | शिर्डी शहरातील नगर-मनमाड रस्ता डांबरीकरण काम जो कोणी ठेकेदार घेईल त्यास या अंतरातील कॉक्रीटीकरण कामासाठी येणारा अतिरिक्त भार संस्थानमार्फत उचलण्यास मान्यता देणेत आली. |
| १७ | हॉटेल श्रध्दापार्क ते पुखराज लोढा पर्यंतचा रस्ता. लांबी १५०० मी. रुंदी ३.०० मी. | व्दितीय प्राधान्य गट |
| **(ब)** | **भूसंपादनाची आवश्यकता असलेले ०७ रस्ते.** | |
| ०१ | विकास योजनेतील २४ मीटर रुंदीचा रस्ता (साई श्रध्दा सोसायटी कॉर्नर ते सन एन सॅन्ड हॉटेल रस्ता) लांबी २६५० मी. रुंदी २४ मी. | **व्दितीय प्राधान्य गट -** सन २०११ मध्ये नगरपंचायतीने भूसंपादन व विकसन खर्चाची रक्कम ढोबळमानाने कळविलेली होती. सध्याचे दरसुचीनुसार भूसंपादन व विकसन खर्चात मोठया प्रमाणात वाढ अपेक्षित आहे. |
| ०२ | विकास योजनेतील १२ मिटर रुंदीचा रस्ता (हॉटेल गोराडीया समोरील पिंपळवाडी रस्ता ते निमगांव शिव रस्ता) लांबी ५५० मी. रुंदी १२ मी. | |
| ०३ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा रस्ता-बिरेगांव रस्ता (नविन पिंपळवाडी रस्ता- वराह चौक ते कालिकानगर-१५ मीटर व पुढे वहिवाटीनुसार) लांबी ५०० मी. रुंदी १५ मी. | |
| ०४ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा रस्ता (जैन मंदिरालगत नगर-मनमाड ते १८ मीटर वळण रस्ता) लांबी ३२० मी. रुंदी १५ मी. | |
| ०५ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा रस्ता (जुना पिंपळवाडी रस्ता-पुष्पांजली हॉटेल चौक ते पिंपळवाडी शिव हद्दीपर्यंत) लांबी ५६५ मी. रुंदी १५ मी. | |

| | | |
|---|---|---|
| ०६ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा रस्ता (पिंपळवाडी रस्ता ते १८ मीटर रस्ता यांना जोडणारा निता हॉटेल पश्चिमबाजूकडील दक्षिणोत्तर रस्ता) लांबी ३०० मी. रुंदी १५ मी. | |
| ०७ | नगर-मनमाड रस्त्याचे पश्चिम बाजूने जाणारा ४५ मीटर बायपास रस्ता (४ कि. मी. लांबीचा) | **व्दितीय प्राधान्य गट** -भूसंपादन व विकसन खर्चाचा तपशील प्राप्त नाही |

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०८/२०११ रोजीचे सभेतील नि. क्र. ६७१ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाचे कामांतर्गत शिर्डी शहरातील नगर-मनमाड रस्ता- शिर्डी–साकुरी शिव ते शिर्डी निमगाव शिव या अंतरातील रस्त्याचे डांबरीकरणाचे काम जो कोणी ठेकेदार घेईल त्यास या अंतरातील कॉक्रीटीकरण कामासाठी येणारा अतिरिक्त भार संस्थानमार्फत उचलण्यास मान्यता देणेत आलेली असल्याने व्दितीय प्राधान्यगटातून शिर्डी शहरातील नगर-मनमाड रस्ता कॉक्रीटीकरण करणेचे काम वगळण्यात आले आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सविस्तर प्रस्ताव मागविण्यात आला होता.

त्यानंतर मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४/०९/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७०६ अन्वये ठरल्यानुसार भूसंपादनाची आवश्यकता नसलेले व साईभक्त / नागरीकांचे दैनंदिन वापरातील १७ रस्ते प्रथमतः विकसीत करणेस मान्यता मिळणेकामी इकडील जा. नं. ३५५९/२०११ दि. ०७/१०/२०११ रोजीचे पत्रान्वये मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे रु.३५ कोटी खर्चाचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. तसेच या रस्त्यांचे विकसनांसाठी सुधारीत अंदाजे रु.४७,०२,४४,९७८/- निधी उपलब्ध करुन देणेस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. विधी व न्याय विभाग यांचेकडे इकडील जा. नं. ४६२०/२०१४ दि.०७/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये सादर करणेत आला. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७८ अन्वये सुधारीत रु. ४७,०२,४४,९७८/- इतक्या खर्चास व केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

मा. कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक सासंवि-२०११ /५१४/ प्र. क्र. ७४/का. सोळा, दि. २१/०८/२०१४ रोजीचे पत्रान्वये खालील प्रमाणे शासन निर्णय झाला असल्याचे कळविले आहे.

''श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या निधीतून शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्प- शिर्डी शहरातील व्दितीय प्राधान्य गटातील भूसंपादनाची आवश्यकता नसलेले १७ रस्ते विकसीत करण्यासाठी येणा-या रु.४७,०२,४४,९७७/- इतक्या खर्चाचा प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून शासनाची तत्वतः मान्यता देण्यात येत आहे.

(i) सदर प्रस्तावाबाबत अंतिम आदेश काढण्यापूर्वी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील त्रिसदस्यीय समितीची सदर प्रस्तावास सहमती घेण्यात यावी.

(ii) सदर प्रस्तावाबाबत अंतिम आदेश काढण्यापूर्वी सदर प्रस्तावास मा. उच्च न्यायालयाची पूर्व मान्यता घेण्यात यावी.

(iii) सदर प्रस्तावात प्रस्तावित केलेले व्दितीय प्राधान्य गटातील १७ रस्ते फक्त सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विकसित करण्यात यावेत. श्री साईबाबा संस्थानला स्वतंत्रपणे स्वतः संस्थानमार्फत निविदा काढून सदरचे रस्ते विकसित करता येणार नाहीत.

२. सदर रस्ते विकसित करण्यासाठी अंदाजपत्रकात दर्शविण्यात आलेल्या अंदाजित खर्चापेक्षाजास्त खर्च न होण्याची दक्षता कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी. तसेच सदर कामाबाबत प्रगती अहवाल वेळोवेळी संबंधित अभियंत्यांकडून प्राप्त करुन शासनास सादर करण्यात यावा.

सदर रस्ते विकसित करण्यासाठी लागणारा निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या निधीतून कामाच्या प्रगतीनुसार संबंधितांना टप्प्या टप्याने अदा करुन त्याबाबतचा स्वतंत्र लेखा ठेवून त्याचा अहवाल संस्थानच्या त्या वर्षाच्या वार्षीक अहवालाव्दारे सादर करण्यात यावा. ''

मा. शासनाने उपरोक्त आदेशात नमूद केलेनुसार कायर्वाही करणकामी मान्यता मिळणेबाबत मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक ११ सप्टेंबर, २०१४ रोजीचे सभेत सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर निर्णय क्र. ७९९ खालील प्रमाणे संमत करणेत आला आहे.

“.. यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.”

सदर मान्यतेनुसार व्दितीय प्राधान्य गटातील भूसंपादनाची आवश्यकता नसलेल्या १७ रस्त्यांचे विकसनाकरीता रु.४७,०२,४४,९७७/- मात्र इतका निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे टप्प्या-टप्प्याने अदा करणेसाठी मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन नं.५०७२/२०१५ अन्वये सादर करणेत आला आहे.

**(क)** तसेच उपरोक्त निर्णयानुसार भुसंपादनाची आवश्यकता असलेल्या सात रस्त्यांपैकी सहा रस्त्यांचे कामासाठी येणारे अंदाजे रु.१०१.०१ कोटी खर्चाचा प्रस्ताव इकडील जा. नं. १००/२०१२ दि. ०४/०४/२०१२ रोजीचे पत्रान्वये मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे सादर करणेत आला होता. त्यानंतर सदरचे सहा रस्त्यांचा भूसंपादन खर्च रु. ४३.७३ कोटी ऐवजी उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग यांनी कळविलेल्या रु. ५४.२६ या सुधारीत भूसंपादनखर्चासह रु. १११.५४५ कोटी सुधारीत खर्चास मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र. ७८ दि. ०८/०१/२०१४ अन्वये मान्यता देण्यात आली.

त्यानुसार जा. नं. ४६६७/२०१४ दि. १०/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये सादर केलेल्या सुधारीत प्रस्तावाचे अनुषंगाने शासनाचे विधी व न्याय विभागाने दि.१८/०२/२०१४ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

"..भुसंपादनाची आवश्यकता असणारे ७ रस्ते विकसीत करण्याबाबतच्या प्रस्तावास सद्यस्थितीत कार्यरत त्रीसदस्य समितीची मान्यता घेऊन मा.उच्च न्यायालयाच्या सिव्हील अप्लीकेशन क्र.१२०५६/२०१२ दि. १६/१०/२०१२ च्या आदेशानुसार उच्च न्यायालयाकडे जाऊन प्रथम मान्यता घेण्यात यावी ".

सदर निर्णयानुसार व्दितीय प्राधान्य गटातील भूसंपादनाची आवश्यकता असलेल्या ०७ रस्त्यांचे भूसंपादनासाठी आवश्यक असणारा रु.१११.५४५ कोटी मात्रचा निधी उपलब्ध करुन देणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील अर्ज क्र. ८७०९/२०१४ अन्वये सादर करणेत आला आहे. उपरोक्त सहा रस्त्यांचे भूसंपादन करणेकामी मा. उपविभागीय अधिकारी यांनी पुर्वी कळविलेला खर्च रु.५४.२६ कोटी ऐवजी आता रु.१,५०,१८,८८,७९७/- इतका कळविलेला आहे. याकामी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ११ सप्टेंबर, २०१४ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र. ७५० अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

" यावर सविस्तर चर्चा होऊन, यापूर्वी प्रस्तावित कामी येणा-या रु.१११.५४५ कोटी मात्र रकमेच्या खर्चास मान्यता मिळणेसाठी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये अर्ज सादर केलेला असून, अद्याप पर्यंत या अर्जावर काहीही निर्णय झालेला नाही. मा. औरंगाबाद खंडपीठाकडे याबाबत पाठपुरावा करणेत यावा व मा. औरंगाबाद खंडपीठाचे मंजूरी मिळालेनंतर वाढीव रकमेचा प्रस्ताव समितीपुढे सादर करणेत यावा असे ठरले."

**प्रस्ताव:** शिर्डी नगरपंचायतीने दि.१५/०२/२०१४ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेत नागरी तिर्थ क्षेत्रांचा सुनियोजित विकास करणे, कार्यक्रमातंर्गत शिर्डी हद्दीतील २७ रस्त्यांची कामे करणेसाठी नगरपंचायतीच्या कर्जाच्या हिश्याची रक्कम मिळणेबाबत मागणी केली होती. सदर मागणीबाबत सामान्य प्रशासन – वशी-०३ यांनी सादर केलेले प्रस्तावावर मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५/०६/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४३५ अन्वये मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी असे ठरले.

त्यानुसार मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील अॅप्लीकेशन नं.५०६५/२०१५ अन्वये दाखल करणेत आले होते. सदरचे प्रस्तावास मा. उच्च न्यायालयाने दि.०७/०८/२०१५ रोजी मान्यता दिली असल्याचे विधी विभाग यांनी त्यांचेकडील दि.०१/०८/२०१५ रोजीचे पत्राने कळविले असून, उपरोक्त प्रस्तावातील रस्ते व द्वितीय प्राधान्यगट प्रस्तावातील नमूद केलेले रस्ते एकच आहेत किंवा कसे याबाबत खात्री करून अहवाल पाठविणेबाबत इकडील विभागास कळविले आहे.

दरम्यान मुख्यधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.२१/०८/२०१५ रोजीचे पत्राने खालील प्रमाणे कळविले आहे.

"..व्दितीय प्राधान्य गटातील भूसंपादनाची आवश्यकता नसलेल्या १७ रस्ते विकसन प्रस्ताव १६/०७/२०११ रोजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे निधी मागणीसाठी सादर करण्यात आलेला आहे. तथापी, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राजस्तर) योजना अंतर्गत शिर्डी नगरपंचायतीने शिर्डी शहरातील विविध २५ रस्त्यांच्या विकास कामांचा प्रस्ताव मे. शासनास सादर केला होता. त्यास शासन निर्णय क्र. नगरो-२०१४/प्र.क्र.१२५/नवि-३३ मंत्रालय, मुंबई दि.१६/०७/२०१४ अन्वये मंजूरी मिळालेली आहे. तसेच नजिकच्या कालावधीत रस्त्यांचे कामे लवकरच सुरु होणार आहे.

सदर २५ रस्त्यांच्या रस्ते विकसन प्रकल्पात व्दितीय प्राधान्य गटातील भूसंपादनाची आवश्यकता नसलेल्या १७ रस्त्यांपैकी खालील रस्ते मंजूर झालेले आहेत.

| अ.नं. | रस्त्याचे नांव |
|---|---|
| ०१. | शिर्डी साकुरी शीव रस्ता (पुर्व बाजू) |
| ०२. | शिर्डी साकुरी शीव रस्ता (पश्चिम बाजू) |
| ०३. | नांदुर्खी शीव रस्ता (नांदुर्खी शीव रस्ता-साकुरी शीव रस्ता दक्षीणउत्तर |
| ०४. | ५०० रुम भक्तनिवास ते साईश्रध्दा हौसींग सोसायटी रस्ता (नगर-मनमाड रस्ता ते बिरेगाव शिव रस्ता) |
| ०५. | सन अॅड सॅड ते कम्पोस्ट डेपो रस्ता |
| ०६. | बिरेगाव नाला रस्ता (लुटे वस्ती ते गणेश बंधारा –साकुरी शीव रस्ता) |
| ०७. | चौफुली ते कंम्पोस्ट डेपो (सर्व्हे नं. १३६ ते पूर्वेस राहाता संयुक्त कंपोस्ट डेपो |
| ०८. | बन रस्ता (वराह चौक ते १२ चारी ते पूर्व बाजू सौंदडी देवस्थान) |

तरी सदर व्दितीय प्राधान्य गटातील भूसंपादनाची आवश्यकता नसलेल्या १७ रस्ते प्रस्तावातील वरील ०८ रस्ते महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राजस्तर) योजनेत मंजूर झालेली असल्यामुळे वगळणे आवश्यक आहे. तसेच खालील १७ रस्त्यांपैकी उर्वरीत ०९ रस्ते मंजूर करण्यात यावेत.

| अ. नं. | रस्त्याचे नांव |
|---|---|
| ०१. | डॉ. हेडगेवार नगरमधील रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे. (दोडीया गल्ली) |
| ०२. | १२ चारी रस्ता (स्वागत कक्ष ते नांदुर्खी शीव रस्ता १२ चारी बंदीस्त करणे. |
| ०३. | पुखराज लोढा ते पिंपळवाडी रस्ता |
| ०४. | रज्जाक शेख लगत पुनमनगर गल्ली क्र.०१ ते रावजी कोंडाजी कोते यांचे घरापर्यंत रस्ता |

| | |
|---|---|
| ०५. | श्रीकृष्ण नगर मधील रस्ते |
| ०६. | सर्व्हे नं. १३४ सर कॉलनी रस्ते. |
| ०७. | गणेशवाडी मधील रस्ते. |
| ०८. | शिर्डी शहरातील नगर-मनमाड रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| ०९. | हॉटेल श्रध्दापार्क ते पुखराज लोढा- १२ चारी इनामवाडी रस्ता. |

तरी उपरोक्त शिल्लक ०९ रस्त्यांसाठी निधी मंजूर करण्यात यावा. विनंती आहे."

उपरोक्त बाबी विचारात घेता, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी कळविले नुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राजस्तर) योजनेतंर्गत व्दितीय प्राधान्य गटातील भूसंपादनाची आवश्यकता नसलेल्या १७ रस्त्यापैकी ०८ रस्ते विकसीत करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे व्दितीय प्राधान्य गटातील भूसंपादनाची आवश्यकता नसलेले उर्वरीत ०९ रस्त्यांचे विकसनासाठी नव्याने अंदाजपत्रके तयार करुन घ्यावे लागणार आहेत. भूसंपादनाची आवश्यकता असलेल्या ०६ रस्त्यांचा भूसंपादन खर्च मा. उपविभागीय अधिकारी यांनी पुर्वी कळविलेल्या रु.५४.२६ कोटी रकमेऐवजी रु.१,५०,१८,८८,७९७/- मात्र इतका कळविलेला आहे. तसेच नगर-मनमाड रस्त्याचे पश्चिम बाजूने जाणा-या ४५ मीटर बायपास रस्त्याचा (४ कि. मी. लांबीचा) भूसंपादन व विकसन खर्चाचा तपशील अद्याप प्राप्त झालेला नाही.

करिता व्दितीय प्राधान्य गटात नमूद केलेल्या उर्वरीत सर्व रस्त्यांची सद्य:स्थिती, निकड, खर्चाची रक्कम आदि बाबी तपासून संपूर्ण रस्तेविकसन प्रकल्पाचा एकत्रित आढावा घेतल्यानंतर अत्यावश्यक रस्ते विकसीत करणेसाठी व भूसंपादनासाठी प्रचलित दराने अंदाजपत्रके तयार करुन घ्यावे लागतील.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, व्दितीय प्राधान्य गटात नमूद केलेल्या १७ रस्त्यापैकी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राजस्तर) योजनेत मंजूर झालेले ०८ रस्ते वगळणेत येऊन, उर्वरीत ०९ रस्त्यांची सद्य:स्थिती, निकड, खर्चाची रक्कम यासह सुधारीत खर्चाचा प्रस्ताव तयार करावा तसेच भूसंपादनाची आवश्यकता असलेल्या ०६ रस्त्यांचे भूसंपादन व इतर अनुषंगीक खर्चाबाबतचा सुधारीत तपशील शिर्डी नगरपंचायतीकडून घेण्यात यावा व त्यासह सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.३३** **साईनगर कर्मचारी वसाहत परिसरात साईनगर, समर्पन व साईध्यान इमारतीचे भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी प्राप्त ई-निविदांवर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा.त्रीसदस्य् समितीचे सभेतील निर्णय:** मा.त्रिसदस्य् समितीचे दिनांक ०८/१०/२०१२ रोजीचे सभेत निर्णय क्र.८११ खालील प्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगर कर्मचारी वसाहत परिसरात साईचिंतन, समर्पण व साईध्यान इमारतीचे भोवती पेव्हिंग ब्लॉक बसविणेस व त्याकामी येणा-या रु.१४,३१,५००/- मात्रचे खर्चास तसेच सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस मान्यता देणेत आली."

**मा.मुंबई उच्च् न्यायालय खंडपीठ परवानगी आदेश.:** C.A. No. 13281 of 2013 In P.I.L. NO. 18 of 2011 dt. 26/09/2014 अन्वये परवानगी मिळालेली आहे.

**प्रस्तावना:** साईनगर कर्मचारी वसाहत परिसरातील समर्पण, साईनगर, साईध्यान नं. ०१ व ०२ या इमारतींचे मागील भागातून ड्रेनेज व पाण्याच्या लाईन गेलेल्या आहेत, तसेच सदरचे भागात पावसाळ्याचे दिवसात पाणी साचून, गवताची वाढ होऊन मोठ्या प्रमाणात डासांचा प्रादुर्भाव होत असतो, तसेच सदर भागाची साफ सफाई करणे जिकरीचे होत असल्याने सदर भागात सुमारे १८०० चौ. मीटर पेव्हिंग ब्लॉक बसविणे आवश्यक आहे.

**प्रस्ताव:** मा. त्रिसदस्य् समितीचे उपरोक्त् निर्णयानुसार व मा. मुंबई उच्च् न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार सदरहू कामासाठी इकडील विभागामार्फत निविदा तयार करुन संस्थानचे संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द् करून ई-निविदा मागवित आल्या असून, याकामी खालील सहा ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केलेल्या आहेत.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| 01. | Juned Ahmed Shaikh, Ahmednagar |
| 02. | Ravindra Sahebrao Shinde, Kolhar |
| 03. | Dadasaheb B.Phopse, Vaijapur |
| 04. | M/s. A. S. Construction, Aurangabad |
| 05. | S.S. Construction, Nashik |
| 06. | Chandragupta Constructions, Sakuri |

विषयांकीत कामासाठी वरील प्रमाणे प्राप्त् झालेल्या सहा ई-निविदांचा लिफाफा क्र.०१ (Technical bid) दि.१८/०२/२०१५ रोजी मा.प्रशाकिय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आले असून, प्राप्त कागदपत्रांची छाननी केल्यानंतर त्यामध्ये खालील चार ठेकेदार पूर्व पात्रता निकषांची पुर्तता करत असल्याने पात्र होत आहेत.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| 01. | Dadasaheb B.Phopse, Vaijapur |
| 02. | M/s. A. S. Construction, Aurangabad |
| 03. | S.S. Construction, Nashik |
| 04. | Chandragupta Constructions, Sakuri |

वरीलप्रमाणे चार पात्र ठेकेदारांचे लिफाफा क्र.०२ (Commercial bid) मा.कार्यकारी अधिकारी, प्रशाकिय अधिकारी यांचे समक्ष दि.११/०४/२०१५ रोजी उघडणेत आले असून, त्यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Sl.No | Bidder Name | Estimated Rate | Quoted Percentage | Rate |
|---|---|---|---|---|
| 1 | Dadasaheb B.Phopse | 1431499.455 | -3.37 | 1383258.00 |
| 2 | AS Construction | 1431499.455 | -5.05 | 1359209.00 |
| 3 | S S CONSTRUCTION | 1431499.455 | -3.5 | 1381397.00 |
| 4 | chandragupta construction | 1431499.455 | -11.3 | **1269740.00** |

उपरोक्त तपशिलानुसार विषयांकीत कामासाठी चंद्रगुप्त कन्स्ट्रक्शन, साकुरी यांनी देऊ केलेले दर निम्नतम स्वरुपाचे आहेत, तरी त्यांचे निम्नतम दर स्विकारणेस व त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.४६८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगर कर्मचारी वसाहत परिसरात साईनगर, समर्पन व साईध्यान इमारतीचे भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली. परंतु सदरहू निविदा प्रक्रियेला सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधी झालेला असल्यामुळे याकामीचे निम्नतम दरधारक चंद्रगुप्त कन्स्ट्रक्शन, साकुरी यांना कार्यादेश देणेपूर्वी लेखा परिक्षणाच्या दृष्टीकोनातून लेखाशाखा विभागाचा अभिप्राय घेण्यात यावा व त्यांचे अभिप्रायानुसार कार्यादेश देता येत नसेल तर सदरहूकामी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.३४ **साईआश्रम भक्तनिवास येथील ॲम्फिथिएटरच्या पूर्व बाजूचे मोकळया जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी प्राप्त ई-निविदांवर निर्णय होणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:**

अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम (१) च्या खंड (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" अशी तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समिती निर्णय:**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.०२ (११) अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत करणेत आलेला आहे.

*"... उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम भक्तनिवास येथील ॲम्फिथिएटरच्या पूर्व बाजूचे मोकळया जागेत पेव्हिंग ब्लॉक बसविणेचे काम करुन घेणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या रु.९,२७,९६०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उप समितीची शिफारस मान्य करण्यात आली".*

**प्रस्तावना:** मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.०२ (११) अन्वये या कामी इकडील विभागामार्फत ई-निविदा, जाहीरात व किमान पात्रता निकष (Minimum Qualifying Criteria) तयार करुन दि.१८/०५/२०१५ चे मंजूर टिपणी अन्वये, वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर (Second Call) जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदरहू ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आलेली होती. ई-निविदा प्रक्रियेच्या तारखांचा तपशिल खालीलप्रमाणे होता.

| Sr. No. | Activity | Date & Time |
|---|---|---|
| 1) | Tender publishing date: | 08/06/2015. |
| 2) | Tender document download start date: | 08/06/2015 from 11:00 Hrs. |
| 3) | Tender document download end date: | 22/06/2015 upto 17:00 Hrs. |
| 4) | Bid submission start date: | 08/06/2015 from 12:00 Hrs. |
| 5) | Bid submission closing date: | 22/06/2015 upto 17:00 Hrs. |
| 6) | Technical bid hard copy submission date: | 24/06/2015 upto 17:00 Hrs. |
| 7) | Bid opening date (Technical): | 27/06/2015 at 11:00 Hrs. (If possible). |
| 9) | Bid opening date (Commercial): | 27/06/2015 at 12:00 Hrs. (If possible). |

उपरोक्तकामी विहीत मुदतीत खालील ०७ ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केलेल्या आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | A. S. Construction, Aurangabad. | 2) | S. G. Gaikwad, Rahata. |
| 3) | J. D. Dighe, Sangamner. | 4) | M/s. N. K. Gade, Sangamner. |
| 5) | D. B. Phopse, Vaijapur. | 6) | Krushna Infrastructure, Sangamner. |
| 7) | Shri Ram Majoor Sahakari Sanstha, Sangamner. | | |

वरीलप्रमाणे अपलोड झालेल्या ई-निविदांचा लिफाफा क्र.०१ (Technical Bid) दि.२७/०६/२०१५ रोजी सकाळी ११:०० वाजता मा. प्रशासकिय अधिकारी व लेखाधिकारी यांचे समक्ष उघडणेत येऊन निविदाधारकांनी अपलोड केलेल्या कागदपत्रांची छाननी करणेत आली असुन, त्याचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Name of Contractor | Remarks |
|---|---|---|
| 1) | A. S. Construction, Aurangabad. | Qualify. |
| 2) | S. G. Gaikwad, Rahata. | Qualify. |
| 3) | J. D. Dighe, Sangamner. | Qualify. |
| 4) | M/s. N. K. Gade, Sangamner. | Qualify. |
| 5) | D. B. Phopse, Vaijapur. | Qualify. |
| 6) | Krushna Infrastructure, Sangamner. | Qualify. |
| 7) | Shri Ram Majoor Sahakari Sanstha, Sangamner. | Does not qualify as Tender Fee DD, EMD Fee DD not attached and hard copies of other relevant documents not submitted. |

वर नमुद केलेप्रमाणे पात्रताधारक ०६ ठेकेदारांच्या वाणिज्यीक निविदा (Commercial Bid) त्याच दिवशी दि.२७/०६/२०१५ रोजी दुपारी १२:२६ वाजता मा.प्रशासकिय अधिकारी व उपस्थित ठेकेदार यांचे समक्ष उघडणेत आलेल्या आहेत. ठेकेदार यांनी देऊ केलेल्या दरांचा तपशिल खालीलप्रमाणे आहेत.

**ESTIMATED VALUE : Rs,8,83,771/-.**

| Sr. No. | Name of Contractor | Quoted Percentage | Remarks |
|---|---|---|---|
| **1)** | **A. S. Construction, Aurangabad.** | **- 24.19 %** | **L1** |
| 2) | D. B. Phopse, Vaijapur. | - 13.91 % | L2 |
| 3) | S. G. Gaikwad, Rahata. | - 12.50 % | L3 |
| 4) | Krushna Infrastructure, Sangamner. | - 12.21 % | L4 |
| 5) | J. D. Dighe, Sangamner. | - 7.86 % | L5 |
| 6) | M/s. N. K. Gade, Sangamner. | 0.00 % | L6 |

**प्रस्ताव:** तरी उपरोक्त विषयांकित कामाचे ई-निविदांचे तुलनात्मक तक्त्यानुसार या कामासाठी ठेकेदार ए. एस. कन्सट्रक्शन, औरंगाबाद यांचे दर निम्नतम आलेले आहेत. तरी सदरचे कामासाठी त्यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४६१** **यावर सविस्तर चर्चा हाऊन, साईआश्रम भक्तनिवास येथील ॲम्फिथिएटरच्या पूर्व बाजूचे मोकळया जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहूकामी उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या तुलनात्मक तक्त्यामधील ए.एस.कन्सट्रक्शन, औरंगाबाद यांचे निविदादरामध्ये २४.१९% कमी हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.३५** **शैक्षणिक संकुल इमारतीतील आतील भागास रंगकाम करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदांबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा.त्रीसदस्य् समितीचे सभेतील निर्णय:** मा. त्रिसदस्य् समितीचे दिनांक १५/०३/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.१९८ खालील प्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक संकुलाकडील वर्ग खोल्या विद्यार्थ्यांच्या वाढत्या संख्येमुळे कमी पडत असल्याने शैक्षणिक संकुलाचे स्थलांतर करणेबाबत विचाराधीन आहे. त्यामुळे मा. कार्यकारी अधिकारी तथा सदस्य यांनी शैक्षणिक संकुलांची पहाणी करावी व रंगकाम करण्याची आवश्यकता असल्यास याकामी येणा-या रु. १७,०९,३१४/- मात्रचे खर्चास संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च् न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले."

**मा. मुंबई उच्च् न्यायालय खंडपीठ परवानगी आदेश.:** C.A. No. 8698 of 2014 In P.I.L. NO. 18 of 2011 dt. 14/01/2015 अन्वये परवानगी देण्यात आलेली आहे.

**प्रस्ताव:** मा.त्रिसदस्य् समितीचे उपरोक्त् निर्णयानुसार व मा. मुंबई उच्च् न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार सदरहू कामासाठी इकडील विभागामार्फत निविदा तयार करुन संस्थानचे संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द् करून ई-निविदा मागवित आल्या असून, याकामी खालील ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केल्या आहेत.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| 01. | Chandragupta Constructions, Sakuri |
| 02. | chandram n ashanna (C.N.A. Infrastructure), Aurangabad |
| 03. | Shri. Sanjay Ganpat Gaikwad, Rahata |
| 04. | Atul V. Chavan, A.nagar |

विषयांकीत कामासाठी वरील प्रमाणे अपलोड झालेल्या चार ई-निविदांचा लिफाफा क्र.०१ (Technical bid) दि.११/०४/२०१५ रोजी प्रशासकिय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आले असून, प्राप्त कागदपत्रांची छाननी केल्यानंतर त्यामध्ये वरील चारही ठेकेदार पूर्व पात्रता निकषांची पुर्तता करत असल्याने पात्र होत असल्याने, उपरोक्त ठेकेदारांचे लिफाफा क्र.०२ (Commercial bid) प्रशासकिय अधिकारी यांचे समक्ष दि.०२/०५/२०१५ रोजी उघडणेत आले असून, त्यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Bidder Name | Estimated Rate | Quoted Percentage | Rate |
|---|---|---|---|---|
| 01. | chandragupta construction | 1709314.026 | -1.6 | 1681965.00 |
| 02. | chandram n ashanna (C.N.A. Infrastructure, Aurangabad) | 1709314.026 | -13.19 | 1483856.00 |
| 03. | Sanjay Gaikawad | 1709314.026 | -2.01 | 1674957.00 |
| 04. | Shri.Atul Vitthal Chavan | 1709314.026 | -17.77 | **1405569.00** |

उपरोक्त तपशिलानुसार विषयांकीत कामासाठी Shri. Atul Vitthal Chavan, Ahmednagar यांचे ई-निविदेतील दर निम्नतम (L-1) स्वरुपाचे आहेत, तरी त्यांचे निम्नतम दर स्विकारणेस व त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.४७० **यावर सविस्तर चर्चा हाऊन, शैक्षणिक संकुल इमारतीतील आतील भागास रंगकाम करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली. परंतू सदरहू निविदा प्रक्रियेला सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधी झालेला असल्यामुळे याकामीचे निम्नतम दरधारक श्री.अतुल विठ्ठल चव्हाण, अहमदनगर यांना कार्यादेश देणेपूर्वी लेखा परिक्षणाच्या दृष्टीकोनातून लेखाशाखा विभागाचा अभिप्राय घेण्यात यावा व त्यांचे अभिप्रायानुसार कार्यादेश देता येत नसेल तर सदरहूकामी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.३६** **श्री साईप्रसादालयातील प्रतिक्षालयातील रेलिंगला संरक्षण कठडे (बॅरेकेडींग) करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम- २००४ मधील तरतुद -**

अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:** सिंहस्थ कुंभमेळा २०१५ निमित्त दि.२७/०८/२०१५ ते दि.२६/०९/२०१५ या कालावधीत शिर्डी येथे साईभक्तांची प्रचंड गर्दी होण्याची शक्यता आहे. प्रसादालयात प्रसाद भोजनासाठी येणारे साईभक्तांना काही वेळ रेलींगमध्ये प्रतिक्षा करावी लागते. त्यातील काही तरुण भक्त रेलींगवरुन उडया मारतात. अशावेळी रांगेतुन जाणारे भक्त व रेलींगवरुन उडया मारुन जाणारे साईभक्त यांच्यात गोंधळ होतो. अशावेळी चेंगराचेंगरी होते. असा प्रकार गर्दीच्या कालावधीत होऊन नये यासाठी दि.२७/०८/२०१५ ते दि. २६/०९/२०१५ या कालावधीत उत्सवाप्रमाणे प्रसादालयाचे प्रतिक्षालयातील रेलींगचे दोन्ही बाजूस बांबुचे संरक्षक कठडे बांधुन मिळणेबाबत प्रसादालय विभागाने जा.नं.५४/२०१५ दि.३०/०६/२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

**प्रस्ताव:** उपरोक्त विषयांकीत कामासाठी कुंभमेळा कालावधीसाठी मागविण्यात आलेल्या मंडपाच्या निविदेतील निम्नतम दरधारक लल्लुजी अॅण्ड सन्स, अहमदाबाद यांचे मंजूर निविदेतील बॅरेकेडींग करीता येणा-या मंजूर दर रु.१००/- प्रती तीस दिवस प्रती रनिंग फुट नुसार सदरचे काम करता येईल. त्यासाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं | कामाचा तपशिल | परिमाण / एकक | दर | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई प्रसादालयाचे प्रतिक्षालयातील रेलिंगला बॅरेकेडींग बांधणे. (दि.२८/०८/२०१५ ते दि.२६/०९/२०१५ या ३० दिवसांकरीता) | ७०० र. फुट | रु.१००/- प्र.तिस दिवस प्र.र.फुट | ७०,०००/- |
| | | | **एकूण रक्कम रु.** | ७०,०००/- |

तरी विषयांकीत कामासाठी वरील प्रमाणे रक्कम रु.७०,०००/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास व सदरचे काम कुंभमेळा कालावधीसाठी मागविण्यात आलेल्या मंडपाच्या निविदेतील लल्लुजी अॅण्ड सन्स, अहमदाबाद यांचे मंजूर दराने करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४७१** **यावर सविस्तर चर्चा हाऊन, श्री साईप्रसादालयातील प्रतिक्षालयातील रेलिंगला संरक्षण कठडे (बॅरेकेडींग) करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणा-या अंदाजे रु.७०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.३७** **समाधी मंदिरामध्ये रथ पालखी ठेवलेल्या ठिकाणी अॅल्युमिनिअम पार्टीशनबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

अधिनियमाचे कलम २१ (१) मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्त व्यवस्थेचा मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्त व्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करणे तरतूद आहे.

**प्रस्ताव:-** श्रीं चे समाधी मंदीरामध्ये दक्षिण व्दाराचे शेजारी रथ व पालखी ठेवण्यात आलेल्या आहेत. रथ पालखी मिरवणूकीचे वेळी बाहेर काढल्या जातात. मंदीर सुरक्षेकरीता असलेल्या डॉग स्कॅाड सुरक्षा पथकाचे अधिकारी यांनी रथ पालखीचे समोरील बाजुस पार्टिशन करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. या ठिकाणी अज्ञात व्यक्तीने काही घातक वस्तु ठेवल्यास समस्या निर्माण होऊ शकते, असे जा.नं.एसएसएसटी/मंदिर/३७८/२०१४ दि.१२/१२/२०१४ रोजीचे पत्राने मंदिर विभागाने कळविले आहे.

श्रीं चे समाधी मंदीरामध्ये दक्षिण व्दाराचे शेजारी रथ व पालखी ठेवण्याच्या जागेला अॅल्युमिनिअम मध्ये पार्टीशन करून दोन स्लायडींग दरवाजे बसविता येतील यासाठी येणा-या रक्कम रुपये ९२,४००/- मात्रचे खर्चास व याकामासाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस मा. त्रिसदस्य समितीचे दि.३०/०१/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ०३ अन्वये मान्यता देण्यात आली.

१. त्यानुसार याकामी दि.०३/०३/२०१५ रोजीचे मंजूर टिपणीन्वये दि. १८/०३/२०१५ रोजीचे दै. सार्वमत, श्रीरामपूर व दै.बहूजनरत्न लोकनायक, नाशिक या वर्तमान पत्रातून निविदा सूचना हि जाहिरात प्रसिध्दीस देण्यात आलेली होती. दि.२७/०३/२०१५ रोजी पर्यंतच्या को-या निविदा विक्रीच्या अंतिम मुदतीत एकता ग्लास अॅण्ड अॅल्युमिनिअम, साकुरी या एकाच ठेकेदाराने घेतलेली निविदा अंतिम मुदतीत जमा केली.

२. उपरोक्त कामी फक्त एकच निविदा जमा झाल्यामुळे या कामी फेर निविदा मागविणेसाठी दि.११/०४/२०१५ रोजीच्या टिपणी अन्वये मान्यता घेण्यात आली. त्यानुसार दि.२८/०४/२०१५ रोजीचे दैनिक पुढारी या वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली. दि.३०/०४/२०१५ ते दि.०७/०५/२०१५ या निविदा विक्रीचे कालावधीत एकही निविदा विक्री झाली नाही.

३. त्यामुळे या कामासाठी तिस-यांदा फेर निविदा मागविण्यासाठी दि.२१/०५/२०१५ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये दि.०७/०६/२०१५ रोजीचे दैनिक श्रीरामपूर एक्सप्रेस श्रीरामपूर या वर्तमान पत्रातून व गतीपत्र, अहमदनगर या साप्ताहीकातून निविदा सुचना प्रसिध्दीस देण्यात आलेली होती. सदरचे निविदा विक्रीचा कालावधी दि.०८/०६/२०१५ ते दि. १५/०६/२०१५ अखेर देणेत आला होता. या विहित मुदतीत श्री.एस.जी.गायकवाड,राहाता या एका ठेकेदाराने कोरा निविदा अर्ज विकत घेतला होता. सिलबंद निविदा सादर करण्याचे अंतिम मुदत दि.११/०५/२०१५ रोजी पर्यंत देणेत आली होती. या मुदतीत ठेकेदार यांनी सिलबंद निविदा सादर केलेली नाही.

अशा प्रकारे सदर कामासाठी तिन वेळेस वर्तमान पत्रातील जाहीराती व्दारे निविदा मागवूनही एकता ग्लास अॅन्ड अॅल्युमिनिअम, साकुरी यांची एकच निविदा प्राप्त झाली आहे. त्यामुळे उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली निवीदा मा.उपसमितीचे सभेपुढे उघडुन त्यावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिरामध्ये रथ पालखी ठेवलेल्या ठिकाणी अॅल्युमिनिअम पार्टीशन करुन घेणेसाठी तीन वेळेस निविदांची मागणी करुनही एकच निविदा प्राप्त झालेली असल्याने सदरहू निविदा उपसमिती सभेत उघडणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.३८** **निमगांव- को-हाळे येथील वर्ग ४ कर्मचारी निवासस्थान पाठीमागे व दक्षिण बाजू कंम्पाऊंड लगत पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद-**

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये,मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतुद आहे.

**प्रस्ताव:–** निमगांव को-हाळे हद्दीत वर्ग ४ कर्मचारी यांचे निवासाकरिता सेवाधाम निवासस्थान बांधण्यात आलेले आहे. त्यातील A, B, C, व D इमारतीचे मागील व दक्षिण बाजू कंम्पाऊंड लगतची जागा मोकळी असून तेथील घुशींनी जमीन भुसभुशीत केली आहे. त्या ठिकाणी जमीनीवर गवत व झाडे झुडपे वाढलेली आहेत. त्यामुळे त्याठिकाणी साप व सरपटणारे प्राणी निघतात असेवर्ग ४ स्टाफ क्वार्टर मधील रहिवाशी कर्मचारी यांनी दि.०४/१०/२०१४ रोजीच्या अर्जात नमूद केले आहे. सदर इमारती पाठीमागे व दक्षिण बाजू कंम्पाऊंड लगत पेव्हर ब्लॉक बसविल्यास आरोग्य विभागाचे कर्मचा-यांना तेथील सफाई करणे सोयीचे होईल.

याकामी दि.३०/०१/२०१५ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत खालील प्रमाणे निर्णय क्र.०३ (१७) संमत झालेला आहे.

*"मौजे निमगांव को-हाळे येथील वर्ग ४ कर्मचारी निवासस्थान पाठीमागे व दक्षिण बाजू कंम्पाउंड लगत पेव्हींग ब्लॉक बसविणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.९,२७,५८६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली".*

१) त्यानुसार याकामी दि.१८/०३/२०१५ रोजीच्या दै.सार्वमत, श्रीरामपूर व दै. बहूजनरत्न लोकनायक, नाशिक या वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. सिलबंद निविदा सादर करण्याचे दि.३१/०३/२०१५ अखेर पर्यंतचे मुदतीत खालील दोन ठेकेदारांनी सिलबंद निविदा सादर केल्या.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | आवक क्र/ दिनांक |
|---|---|---|
| १ | श्री. एन. बी. औताडे, पोहेगांव | ०००१२८/दि.३१.०३.२०१५ |
| २ | श्री. एस. जी. गायकवाड, राहाता | ०००१२९/दि.३१/०३/२०१५ |

२) उपरोक्त कामी दोनच निविदा प्राप्त झाल्याने दि.११/०४/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये याकामी फेर ई- निविदा मागविणेस मान्यता देणेत आली. त्यानुसार दि.२९/०४/२०१५ रोजीच्या दै.सार्वमत वर्तमानपत्रात याकामी निविदा सुचना प्रसिध्द करणेत येऊन, ई- निविदा अपलोड करणेसाठी दि.१४/०५/२०१५ अखेर मुदत देण्यात आली होती. सदर मुदतीत दोनच ठेकेदारांनी ई- निविदा अपलोड केलेल्या होत्या.

३) इकडील विभागाचे दि.२१/०५/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये दोनच ई- निविदा प्राप्त झाल्याने विषयांकित कामासाठी तिस-यांद फेर ई- निवीदा मागवीणेस मान्यता देणेत आली. त्यानुसार दि.०९/०६/२०१५ रोजीचे दैनिक गांवकरी, नाशिक या वर्तमानपत्रात ई- निवीदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. ई- निवीदा अपलोड करण्याचे दि.२०/०६/२०१५ पर्यंतचे मुदतीत ०६ ठेकेदारांनी ई- निवीदा अपलोड केली होती. तसेच दि. २२/०६/२०१५ रोजी पर्यंत खालील ०५ ठेकेदारांनी तांत्रिक माहितीचे लिफाफे जमा केलेले आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | आवक क्र/ दिनांक |
|---|---|---|
| १ | श्री. एस. जी. गायकवाड, राहाता | ५४४७/ दि.२२/०६/२०१५ |
| २ | ए.एस.कन्सट्रक्शन, औरंगाबाद | ५३९६/ दि.२२/०६/२०१५ |
| ३ | जे.डी. दिघे, संगमनेर | ५४७३/ दि.२३/०६/२०१५ |
| ४ | एन.के.गाडे, संगमनेर | ५४७६/ दि.२३/०६/२०१५ |
| ५ | कृष्णा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. संगमनेर | ई- मेल दि.२४/०६/२०१५ |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ई- निवीदांचा तांत्रिक माहितीचा लिफाफा दि.२५/०६/२०१५ रोजी मा. प्रशासकिय आधिकारी यांचे समक्ष उघडणेत आला. त्यानुसार एकुण ०६ ठेकेदारांपैकी पात्र होणा-या ०५ ठेकेदारांचा ई- निवीदांचा वित्तीय लिफाफा दि.०७/०७/२०१५ रोजी उघडणेत आला. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| SCHEDULE OF WORK / ITEM(S) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Sl.No | Bidder Name | Estimated Rate | Quoted Percentage | Quoted Rate in Figures and Words | |
| | | | | Rate | Amount |
| 1 | Shri. J.D.Dighe | 927586.25 | -9.99 | **834920.38** | Eight Lakh Thirty Four Thousand Nine Hundred and Twenty |
| 2 | M/s N.K. Gade | 927586.25 | 0.00 | **927586.25** | Nine Lakh Twenty Seven Thousand Five Hundred and Eighty Six |
| 3 | Sanjay Gaikawad | 927586.25 | -21.00 | **732793.14** | Seven Lakh Thirty Two Thousand Seven Hundred and Ninty Three |
| 4 | A.S. Construction | 927586.25 | -23.57 | **708954.17** | Seven Lakh Eight Thousand Nine Hundred and Fifty Four |
| 5 | Krushna Infrastructure | 927586.25 | -12.21 | **814327.97** | Eight Lakh Fourteen Thousand Three Hundred and Twenty Seven |
| **Lowest Amount Quoted BY: A.S. Construction (708954.17)** | | | | | |

तरी वरीलप्रमाणे निम्नतम दर देणारे ठेकेदार ए.एस. कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांना विषयांकित कामाचा कार्यादेश देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानने कायम कर्मचा-यांना निवासासाठी माफक दरामध्ये निवासस्थाने उपलब्ध करुन दिलेली असून त्या परिसरातील साफ-सफाई तेथे निवास करणा-या कर्मचा-यांनी श्रमदानातून करावी. सबब निमगांव- को-हाळे येथील वर्ग ४ कर्मचारी निवासस्थान पाठीमागे व दक्षिण बाजू कंम्पाऊंड लगत पेव्हींग ब्लॉक बसविणेचा उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.३९ साईप्रसाद नं.२ उत्तर बाजूकडील संरक्षण भिंतीचे बांधकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद** – अधिनियमाचे कलम -१४ चे पोट-कलम (२) च्या खंड (घ) अन्वये "कार्यकारी अधिकारी यांना भक्तांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेण्याचा अधिकार आहे.

**प्रस्तावना–** दि. १३/०३/२०१५ रोजी झालेल्या अवकाळी / वादळी पावसामुळे साईप्रसाद इमारतीचे उत्तरेस संरक्षण भिंतीलगत असलेले सुबाभळीचे मोठे झाड झुकुन पडल्यामुळे संरक्षण भिंतीस मोठया प्रमाणात तडे पडलेले आहेत. तसेच भिंत आतिल बाजूस झुकलेली आहे. याबाबत संरक्षण अधिकारी यांचे सुचनेनुसार सदरहू संरक्षण भिंतीची पाहाणी इकडील विभागामार्फत तातडीने करून बगीचा विभागामार्फत सदर झाडाच्या झुकलेल्या फांदया तातडीने तोडण्यात आल्या आहेत. तसेच प्र.संरक्षण अधिकारी यांनी त्यांचे संदर्भिय पत्राव्दारे विषयांकीत संरक्षण भिंतीचे बांधकाम करून मिळणेबाबत इकडेस कळविलेले आहे. त्यामुळे सदरहू भिंतीचे बांधकाम करणे आवश्यक आहे.

**प्रस्ताव–** विषयांकित काम इकडील विभागामार्फत मटेरिअल खरेदी करून विभागामार्फत काम पूर्ण करून घेता येईल. यामध्ये प्रामुख्याने जुनी भिंत तोडून मटेरिअल वाहतुक करणे, बांधकाम करणे, कोपींगसाठी कॉक्रीटकरणे, वाय सेक्शन मध्ये बारबेड वायर फेन्सिंग करणे, प्लास्टर करणे, इ, कामाचा समावेश आहे. यासाठी ॲन्गलला वेल्डींग करण्याचे काम मॅकेनिकल विभागामार्फत करून घेता येईल. त्यास मान्यता असावी. उपरोक्त प्रमाणे संरक्षण भिंतीचे बांधकाम करणेसाठी अंदाजे खालील तपशिलाप्रमाणे मटेरिअल व मजुरीखर्च अपेक्षित आहे.

**(अ) मटेरिअल खर्च-**

| अ.नं | मटेरिअलचा तपशिल | परिमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | विटा (३"x४"x९") | ७००० | नग | ४.०० | २८,०००.०० |
| २. | वाळू | ०५ | ब्रास | १८००/- | ९,०००.०० |
| ३. | खडी (२० एम.एम) | ०१ | ब्रास | २०००/- | २,०००.०० |
| ४. | सिमेन्ट | ६० | गोणी | २९०/- | १७,४००.०० |
| ५. | टी.एम.टी स्टिल ८ mm | १३० | किलो | ४५/- | ५,८५०.०० |
| ६. | एम. एस ॲगल ४०x४०x६ | ११० | किलो | ४७/- | ५,१७०.०० |
| ७. | काटेरी तार | ७० | किलो | ६२/- | ४,३४०.०० |
| ८. | सिमेन्ट पेंन्ट (स्नो.सेम) | ५० | किलो | ४०/- | २,०००.०० |
| | | | | "अ" एकुण रक्कम | ७३,७६०.०० |

**(ब) मजुरी खर्च**

| अ.नं | तपशिल | एकूण कर्मचारी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | गंवडी कुशल (कंत्राटी) | ४२ | २९६.५८ | १२,४५६.३६ |
| २) | सुतार कुशल (कंत्राटी) | ०४ | २९६.५८ | १,१८६.१२ |
| ३) | अकुशल, मदतनीस(कायम) | ८५ | ४९६.५३ | ४२,२०५.०५ |
| | | | "ब" एकुण रूपये – | ५५,८४७.५३ |
| | | | **एकुण पूर्णांकीत रक्कम रू.- अ + ब** | **१,२९,६०८/-** |

तरी सदरहू भिंत आतिल बाजूस झुकलेली असल्याने ती त्वरीत काढून नवीन भिंतीचे बांधकाम करणे आवश्यक आहे. तरी त्यासाठी उपरोक्त प्रमाणे आवश्यक मटेरिअल पैकी खडी, सिमेन्ट, टीएमटी स्टील, व काटेरी तार इत्यादी मटेरिअल इकडील विभागाकडे शिल्लक असलेल्या मटेरिअल मधून वापराता येईल व उर्वरित मटेरिअल विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व सदरहू बांधकाम विभागांतर्गत करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती तसेच उपरोक्त प्रमाणे एकुण रू.१,२९,६०८/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.उपसमिती सभेपूढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४७४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईप्रसाद नं.२ उत्तर बाजूकडील संरक्षण भिंतीचे बांधकाम करणेसाठी आवश्यक असलेले साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१,२९,६०८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.४० श्री साईआश्रम भक्त निवास येथे साईभक्तांसाठी कॅन्टीन करीता शेड उभारणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (त्र) अन्वये, भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे संयुक्त विद्यामाने साईआश्रम प्रकल्प सन-२०१२ मध्ये साईभक्तांकरीता खुला करणेत आलेला आहे. सदरहु ठिकाणी साईभक्तांना निवासव्यवस्था, प्रसादभोजन, चहा नाष्टा कॉफी इ. सुविधा माफक दरात पुरविल्या जातात. मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी दि. ०३/०९/२०१५ व दि. ०४/०९/२०१५ रोजी सर्व निवासस्थाने परिसरात राऊंड घेऊन पाहणी केली. सदर पाहणीत मा. कार्यकारी अधिकारी यांनी श्री साईबाबा भक्तनिवास (५००रुम्स) या ठिकाणी पुर्वी चालु असलेली चहा कॅन्टीन नव्याने सुरु करणेत यावी. तसेच साईआश्रम भक्तनिवास येथे चहा कॅन्टीन सुरु करणेकरीता साईभक्तांचे सोईसाठी शेडची व्यवस्था करणेत यावी असे सुचविले. याबाबत जा. नं. एसएसएसटी/वशी-काअ/२१७४/२०१५, दि.०८/०९/२०१५ रोजीचे आदेशान्वये इकडील विभागास कळविले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. १३ अन्वये, साईआश्रम भक्तनिवास येथे साईभक्तांकरीता उपहारगृहाचे बांधकाम करणेकामी येणारे रु.४८.४२ लक्ष मात्रचे खर्चास व याकामी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे परवानगी घेणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेस मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साई आश्रम भक्तनिवास येथिल इमारतीलगत १६१४ चौ. फुट क्षेत्रफळ असलेले ०२ उपहारगृहाचे बांधकाम प्रस्तावित आहे. सदरहु प्रस्तावास अद्याप मा. उच्च न्यायालयाची मान्यता प्राप्त नाही. सदरचे प्रस्तावास मान्यता मिळणेकामी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. तथापी साईभक्तांचे सोयीसाठी प्रस्तावित ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपाचे टेन्साईल फॅब्रीक शिटचे छत असलेले शेड उभारता येईल.

त्यानुसार इकडील विभागामार्फत सदरहु ठिकाणी उभारावयाच्या शेडच्या जागेची पाहणी करुन मोजमापे घेण्यात आली. कॅन्टीन करीता उभारावयाचे शेड हे नविन पध्दतीचे टेन्साईल फ्रॅब्रीक मटेरिअलमध्ये खोल फिटींग स्वरुपाचे उभारता येईल त्यासाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशिल | साईज | परिमाण / एकक | अंदाजे दर (.रु) | रक्कम (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १ | कॅन्टीनकरीता साईभक्तांचे सोईसाठी टेन्साईल फॅब्रीक शिट रुफींगमध्ये शेड तयार करणे. | १४.००मी. X १४.०० मी. | १९६ चौ. मी. | ५०००/- प्रती चौ. मी. | ९,८०,०००/- |
| | | | | **एकूण रक्कम रुपये: -** | ९,८०,०००/- |

साई आश्रम भक्तनिवास येथे कॅन्टीन सुरु करणेकरीता साईभक्तांचे सोईसाठी शेड तयार करणेकामी उपरोक्तप्रमाणे प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रु.९,८०,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदर नियोजित शेड Design & Build तत्वावर निविदा मागवून करुन घेता येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे नमूद केलेल्या रु.९,८०,०००/- मात्रचे प्रस्तावित खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम भक्तनिवास येथे साईभक्तांचे सोईसाठी कॅन्टीन सुरु करणेकरीता आवश्यक असलेले शेड तयार करुन घेणेकामी Design & Build तत्वावर ई-निविदांची मागणी करणेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली. परंतु कॅन्टीन उभारावयाच्या शेडचे Design तयार करुन ते मान्यतेसाठी समितीसमोर ठेवावे व त्यानंतर पुढील कार्यवाही करावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.४१** **शिर्डी पोलीस स्टेशन नुतनीकरण व विस्तारीकरण.**

**प्रस्ताव-** मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी सिंहस्थ कुंभमेळा -२०१५ निमित्त शिर्डी पोलीस स्टेशनची कार्यालयीन इमारत ही कामकाजाकरीता अपुरी पडत असून इमारतीचे पार्कींगमध्येच उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, शिर्डी भाग शिर्डी असून सिंहस्थ कुंभमेळ्याचे बंदोबस्ताचे अनुषंगाने बंदोबस्ताकरीता येणारे पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांची व्यवस्था तसेच सदर बंदोबस्ताचे कंट्रोलींग त्याकरीता विस्तारीकरण तसेच कार्यालयीन फ्लोरींग, खिडक्या, टेबल इत्यादीचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने शिर्डी पोलीस स्टेशन नुतनीकरण व विस्ताराकरीता मेसर्स पी. बी. डांगे एंटरप्रायजेस, राहाता यांचे शिर्डी पोलीस स्टेशन विस्तारीकरण कोटेशन रु. १६,५५,७५०/- व शिर्डी पो. स्टे. नुतनीकरण कोटेशन रु. ९,२२,१९२/- कोटेशन यासमवेत पुढील कार्यवाहीस्तव संस्थानकडे पाठविले आहे.

संस्थानने सन १९८६ साली भक्तांच्या सुरक्षितता विचारात घेऊन स्वत:चे शिर्डी बस स्थानकासमोरील जागेत शिर्डी पोलीस स्टेशनसाठी इमारत बांधून दिली होती. तसेच सन २००१ साली पोलीस विभागाचे जागेवर रक्कम रु. १५,६४,३२३/- खर्च करुन सध्याची इमारत बांधून दिलेली आहे. याशिवाय सन २०१० साली व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे सदर इमारतीलगतच ठाणे अंमलदार कार्यालयासाठी एक रुम बांधून दिलेली आहे. तसेच त्याचवेळेस पोलीस स्टेशन इमारत रंगकाम व स्वच्छतागृह, ड्रेनेज दुरुस्ती करुन दिलेली आहे. या कामासाठी एकूण रक्कम रु. २,३१,१८७/- मात्र खर्च आलेला होता.

याकामी संस्थानने महाराष्ट्र शासनाचे विधी विभागाकडे दि. २८/१०/२००९ रोजी मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविला होता. तथापी छाननी समितीची मान्यता घेऊन प्रस्ताव शासनास प्राप्त न झाल्यामुळे तसेच अधिनियमात तरतूद नसल्यामुळे संस्थानच्या आर्थिक सहाय्यातून शिर्डी पोलीस कार्यालयासाठी एका खोलीचे बांधकाम व संपूर्ण कार्यालयास रंगकाम करुन देण्याचा रु. २,७८,४०१/- इतक्या रकमेचा सदर प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे असे कक्ष अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि. ०४ जून, २०१४ रोजीचे पत्राने कळविले आहे.

याबाबत सामाजिक कार्यकर्ते श्री संजय भास्करराव काळे, कोपरगाव यांनी सदर खर्चाची वसुली त्यावेळचे मा. कार्यकारी अधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी वगैरे अधिका-यांचे पगारातून करणेबाबत संस्थानचे मा.अध्यक्ष महोदय यांचेकडे लेखी तक्रार केलेली आहे. शिवाय सदर रक्कम संस्थानने अनाधिकृतपणे पोलीस स्टेशनच्या बांधकामासाठी खर्च केलेबाबत संस्थानच्या विरोधात मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका क्रं. २७/२०१५ दाखल केली असून यामध्ये चौकशी करुन संबंधीत जबाबदार असणा-या विरुध्द कारवाई करण्याची विनंती केली आहे.

मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी उपरोक्त संदर्भिय पत्रासोबत शिर्डी पोलीस स्टेशन विस्तारीकरण व नुतनीकरण कामासाठी एकूण रक्कम रु.२५,७७,९४२/- मात्रचे खर्चाचे इस्टिमेट पाठविले आहे. परंतु प्रस्तावित कामी त्यांनी पुढीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे गरजेचे आहे.

१) विस्तारीत इमारत बांधणेसाठी निश्चित केलेल्या जागेचा ७/१२ उतारा.

२) नूतनीकरण व विस्तारीकरण कामासाठी सा.बांधकाम विभागाचे तांत्रिक मान्यतेसह सविस्तर अंदाजपत्रक.

३) नियोजित बांधकामाचे मंजूर ले-आऊट व बांधकाम नकाशे.

४) या कामासाठी आर्थिक तरतुदीकरीता शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे? काय नसल्यास त्याची कारणे.

५) या कामासाठी शासनाकडून निधीची तरतूद केलेली नसलेबाबत संबंधीत विभागाचा दाखला.

परंतु ते सादर केले नाही. तथापी सदर बाबींचे अगर आणखी काही आवश्यक बाबींची पुर्तता करुन मा. व्यवस्थापन समितीने सदर प्रस्ताव तत्वतः मान्य केलातर करुन घेण्यात येईल. याकामी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी प्रथम हा प्रस्ताव सादर करावा लागेल. मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर सदरचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालयाचे दि. १६/१०/२०१२ चे निर्देशानुसार Major Financial Expenditure मध्ये मोडत असल्यामुळे मा. उच्च न्यायालयाचे मान्यतेसाठी सादर करावा लागेल. तसेच संस्थान व्यतिरिक्त शासकिय विभागासाठी खर्च होणार असल्यामुळे मा. विधी व न्याय विभागाची मान्यताही याकामी घ्यावी लागेल.

संस्थानचे व्यवस्थापनासाठी असलेल्या अधिनियम क्रं. १४/२००४ मध्ये शासकिय उपक्रमांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी- "कलम २१-(१क) पोट-कलम (१) च्या तरतुदींना अधीन राहून, विश्वस्तव्यवस्थेस, राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीने, आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तीच्या अधीन राहून, भक्तांच्या सोईसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यांसारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकिय विभागांना, शासकिय महामंडळांना, शासकिय कंपन्यांना किंवा शासकिय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल, " अशी तरतूद आहे.

तरी मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी वरील संदर्भिय पत्रासोबत सादर केलेल्या इस्टिमेटप्रमाणे रक्कम रु. २५,७७,९४२/- मात्रचा खर्च संस्थानमार्फत करावा अगर कसे ? याबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, यापुर्वी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी पोलिस स्टेशन संदर्भातील प्रकरण अमान्य केलेले असून त्याबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी मा.उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली आहे. सबब शिर्डी पोलीस स्टेशन नुतनीकरण व विस्तारीकरणबाबतचा उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला. तसेच शिर्डी पोलिस स्टेशन, शिर्डी यांनी प्रस्तावित मागणी शासनाच्या गृह विभागाकडे करावी, असे त्यांना कळविणेत यावे.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.४२** **हायड्रोलिक पॅलेट ट्रक खरेदीकरणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** लाडू प्रसाद निर्मिती विभागाकडील दि.१५.७.२०१५ रोजीचे मंजूर टिपणीनुसार लाडू विभागातील बुंदी ने आण करणे, उपभांडार मधून किचनमध्ये रॉ मटेरियलची ने आण करणे एकच हायड्रोलीक पॅलेट ट्रक असल्याने कामे करण्यास अडचण येत आहे. त्यामुळे दोन नविन हायड्रोलिक पॅलेट ट्रक मेकॅनिकल विभागाकडून खरेदी करणेस मान्यता मिळालेली आहे.

भांडार विभागाकडील दि. २४.७.२०१५ रोजीचे मंजूर टिपणीनुसार भांडार विभागाकडील किराणा माल कॅन्टीन, प्रसादालय व लाडू विभागाकडे घेऊन जातांना मालवाहतुक गाडीपर्यंत ने आण करणेकरीता नविन दोन हायड्रोलिक पॅलेट ट्रक मेकॅनिकल विभागामार्फत खरेदी करुन मिळणेस मान्यता मिळालेली आहे.

श्री साईप्रसादालयाकडील दि. १०.८.२०१५ रोजीचे मंजूर टिपणीनुसार प्रसादालयातील मुख्य भांडार कडून आलेला माल उतरुण घेणे, मुख्य किचन, चपाती किचन, नाष्टापाकीट किचनमध्ये मालाची ने आण करणेकरीता नविन सहा नग हायड्रोलिक पॅलेट ट्रकची आवश्यकता असल्याचे कळविलेले आहे.

उपरोक्त मागणी नुसार प्रसादालय, भांडार व लाडू प्रसाद निर्मीती विभागाकरीता खालील स्पेशिफिकेशनच्या नामांकित कंपनीच्या नविन १० नग हायड्रोलिक पॅलेट ट्रक खरेदी करता येतील.

| Sr.No. | Description | Specification |
|---|---|---|
| 1 | Capacity | 2500 Kg |
| 2 | Lift Height | 200 MM |
| 3 | Levered fork height | 85 MM |
| 4 | Fork length | 1150 MM |
| 5 | Fork width | 160 MM |

| | | |
|---|---|---|
| 6 | Width over the fork | 550 MM |
| 7. | Steering wheel | 200 MM |
| 8. | Fork Wheel | 80 MM |

दहा नग हायड्रोलिक पॅलेट ट्रक खरेदीकरीता रक्कम रु. २,३०,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदरच्या खर्चास मा. त्रिसदस्यीय समिती सभेमध्ये प्रशासकिय मान्यता घेणे आवश्यक आहे. मा. त्रिसदस्य समितीचे मान्यता मिळालेनंतर विहीत पद्धतीने दहा नग हायड्रोलिक पॅलेट ट्रक खरेदी करता येईल्.

तरी श्रीसाईप्रसादालय, भांडार व लाडू प्रसाद निर्मीती विभागाकरीता २.५ टन क्षमतेच्या नविन १० नग हायड्रोलिक पॅलेट ट्रक विहीत पद्धतीने खरेदीकरणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु. २,३०,०००/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकिय मान्यता घेणेकामी प्रस्ताव मा. त्रिसदस्य समिती सभेमध्ये सादर.

निर्णय क्र.४७७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईप्रसादालय, भांडार व लाडू प्रसाद निर्मीती विभागाकरीता आवश्यक असलेल्या २.५ टन क्षमतेच्या नविन १० नग हायड्रोलिक पॅलेट ट्रक विहीत पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.२,३०,०००/- मात्रच्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं.४३ **एल.पी.गॅस प्लॅन्ट ते किचनपर्यत स्टॅन्डबाय गॅस पाईप लाईन बनविणेबाबत.**

प्रस्ताव- **सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 14 (भाग 4)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयममधील 14(2-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

**प्रास्ताविकः-** प्रसाद भोजन घेणा-या साईभक्तांची वाढते प्रमाणानुसार 8 जानेवारी 2009 पासून नविन साई प्रसादालय सुरु करण्यात आलेले आहे. नविन प्रसादालय सुरु केलेनंतर प्रसाद भोजन तयार करणेसाठी इंधन म्हणून एल.पी. गॅसचा वापर करण्यात येत आहे. त्याकरीता 10 मे. टन क्षमतेच्या दोन टॅंक बसविण्यात आलेल्या आहे. माहे मे, 2015 पासून जुन प्रसादालयातील लाडू किचन व कॅन्टीन श्री साई प्रसादालयाकडे सथलांतरीत केलेनंतर गॅसचा खर्च प्रति दिवसासाठी 1400 किलो वरुन 2200 किलो झालेला आहे.

गॅस प्लॅन्ट ते प्रसादालयातील मुख्य किचन यामध्ये ११०० फुट अंतर असून दोन इंच एम एस पाईप लाईनद्वारे गॅस किचनमध्ये पुरविणते येत आहे. सदरची गॅस पाईपलाईन् गेल्या सात वर्षापासून वापरात आहे. ऊन, वारा, पाऊस यामुळे सदरची पाईपलाईन काही ठिकाणी गंजणेस सुरवात झालेली आहे. त्यामुळे लिकेज होण्याची शक्यता नाकरता येत नाही. पर्यायी व्यवस्था नसल्याने गॅस लाईन लिकेज झालेस तात्काळ गॅस पुरवठा बंद करुन गॅस पाईप लाईन पुर्णपणे रिकामी करुन नंतर दुरुस्तीचे काम करावे लागेल. दुरुस्तीचे काम होईपर्यंत गॅस पुरवठा बंद ठेवल्याने, प्रसाद भोजन, लाडु प्रसादाची बुंदी व चहा तयार करणेचे काम बंद ठेवावे लागेल. पर्यायाने भक्तांची मोठी अडचण होईल. त्याकरीता स्टॅन्डबाय गॅस पाईपलाईन असणेआवश्यक आहे. स्टॅन्डबाय पाईपलाईन तयार करणेकरीता खालील मटेरीलयची आवश्यकता आहे.

| Sr. No. | Description | QTY | Unit |
|---|---|---|---|
| 1 | MS Pipe MSL Make sd 40 Seamless "2" | 1160 | feet |
| 2 | Ball Valve "2" 150# F.E.Nylon Make | 2 | nos. |
| 3 | MS Socket Bend "2" Welded | 15 | nos. |
| 4 | MS Flanges "2" 150# | 3 | set |
| 5 | MS "T" Connection Socket Welded "2" | 2 | nos. |
| 6 | Copeer Jumpper "2' 150 # | 20 | nos. |
| 7 | Pressure Guage "4" 4kg Capacity 3/8" | 1 | nos. |
| 8 | MS Adaptor 3/8" | 1 | nos. |
| 9 | Needle Control Valve 3/8" | 1 | nos. |
| 10 | MS Elbow 3/8" | 1 | nos. |
| 11 | MS Angle Bracket Heavy Duty 40x 5mm | 110 | nos. |

**मागणी**– उपरोक्तप्रमाणे स्टॅन्डबाय गॅस पाईपलाईन तयार करणेकामी अंदाजे रक्कम रुपये 3,80,000/- पर्यंत खर्च अपक्षित आहे. सदरच्या खचा्रस मा.त्रिसदस्यीय समितीची मान्यता घेऊन विहीत पध्दतीने ई-निविदेव्दारे एक्सप्लोझीव्ह विभागाचे मान्यता प्राप्त एजन्सी यांचेकडून निविदा मागविता येतील.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार अनुमान** : तांत्रिक व आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**: तरी साई प्रसादालयातील मुख्य किचन ते गॅस प्लॅन्ट स्टॅन्ड बाय एल.पी. गॅस पाईप लाईन विहीत पध्दतीने बनवून घेणेस व त्याकामी रक्कम रुपये 3,80,000/- (अक्षरी रुपये तीन लाख, ऐंशी हजार) मात्र पर्यतच्या खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहीरात देऊन ई-निविदा मागविणेकरीता सदरील विषय मा. त्रीसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, एल.पी.गॅस प्लॅन्ट ते साई प्रसादालयातील मुख्य किचन पर्यंत स्टॅन्ड बाय एल.पी. गॅस पाईप लाईन बनवून घेणेसाठी एक्सप्लोझीव्ह विभागाच्या मान्यता प्राप्त एजन्सींकडून विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.३,८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.४४** **श्री साईप्रसादालय स्टीम बॉयलर व थर्मिक फ्लुड हिटरचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 14 (भाग 4)**: महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील 14(2-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम व 21(1-घ) नुसार भक्तांना जेवन पुरवणे व अन्नछत्र चालवणे.

**प्रस्ताविक**: सन 1999 पासून प्रसादालयात अन्न शिजविणेसाठी थरमॅक्स कंपनीचा RXG-4 स्टीम बॉयलर वापरणेत येत आहे. माहे जानेवारी 2009 पासून नविन प्रसादालय सुरु करतांना थरमॅक्स कंपनीचा RXD-850 स्टीम बॉयलर बसविणेत आलेला आहे. त्याशिवाय मोतीचूर लाडू प्रसाद बनविणेकामी थर्मिक फ्ल्युड हिटींग यंत्रणेसाठी थरमॅक्स कंपनीचा थर्मिक फ्ल्युड हिटर ऑगष्ट, 2009 पासून कार्यान्वित करणेत आलेला आहे.

सन 1999 पासून RXG-4 स्टीम बॉयलरकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट थरमॅक्स कंपनीने झोनप्रमाणे ठरवून दिलेला अधिकृत फ्रॅंचीसला दयावे लागत असल्याने सन 2010 पासून दोन स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट मे. मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना देण्यात आलेला आहे. सन 2014-15 या वर्षाचे RXG-4, RXD-850 या स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट हे 30/09/2015 रोजी संपणार आहे. मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांनी वार्षिक सर्व्हीसिंगचे काम समाधानकारक व वेळेत पूर्ण करुन दिलेले आहे.

सन 2015-2016 करीता दोन स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटर सुस्थितीत ठेवून कार्यान्वित राहणेसाठी वार्षिक सर्व्हीसिंग कॉन्ट्रक्ट देणे गरजेचे असल्यामुळे मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांनी दिनांक 15/09/2015 चे कोटेशनव्दारे सन 2015-2016 (दि. 01/10/2015 ते 30/09/2016) या वर्षासाठी RXG-4, RXD-850 व थर्मिक फ्ल्युड हिटरसाठी खालीलप्रमाणे वार्षिक सर्व्हीसिंगचे दर कळविलेले आहे. सदर वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्टमध्ये दोन महिन्यांनी एक याप्रमाणे प्रत्येक युनिटसाठी सहा सर्व्हीसिंग करुन देणार आहे.

| अ.नं. | बॉलयरचे नांव | सन २०१४-१५ वार्षिक सर्व्हीसिंगचे दर रु. | सन २०१५-१६ वार्षिक सर्व्हीसिंगचे दर रु. |
|---|---|---|---|
| १ | RXG-4 | २९,५००/- + सर्व्हीस टॅक्स | २९,५००/- + सर्व्हीस टॅक्स |
| २ | RXD-850 | २९,५००/- + सर्व्हीस टॅक्स | २९,५००/- + सर्व्हीस टॅक्स |
| ३ | थर्मिक फ्ल्युड हिटर | २९,५००/- + सर्व्हीस टॅक्स | २९,५००/- + सर्व्हीस टॅक्स |
| | एकूण रुपये : | ८८,५००/- + सर्व्हीस टॅक्स | ८८,५००/- + सर्व्हीस टॅक्स |

**मागणी**: दोन स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटर सुस्थितीत ठेवून कार्यान्वित राहणेसाठी वार्षिक सर्व्हीसिंग कॉन्ट्रक्ट देणे गरजेचे असल्यामुळे थरमॅक्स कंपनीचे अधिकृत डिलर मे. मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट देणे आवश्यक आहे.

मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांनी दिलेले दरपत्रक मध्ये 50% अॅडव्हान्स व टेक्नीशियन यांना राहण्याची व्यवस्था होणेबाबतची मागणी केलेली आहे. परंतु सर्व्हीसिंगसाठी येणा-या टेक्नीशियन यांना यापूर्वी आपण निवास व्यवस्था दिलेली नाही. तसेच कॉन्ट्रक्टची रक्कम दर दोन महिन्यांनी यानुसार सहा हप्त्यात सर्व्हीसिंग झालेनंतर रक्कम अदा करणेत येते. त्यामुळे त्याबाबत त्यांना तसे कळविण्यात येईल. तसेच कॉन्ट्रक्ट दिनांक 30/09/2015 रोजी संपणार असल्याने सदर प्रस्तावाची कार्यवाही दिनांक 30/09/2015 पूर्वी पूर्ण करावी लागणार आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार अनुमान**: तांत्रिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**: तरी थरमॅक्स कंपनीचे अधिकृत फ्रॅंचीस मे. मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना सन 2015-2016 या वर्षाकरीता दोन स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरचे सर्व्हीस कॉन्ट्रक्ट देणेस व त्याकामी सर्व्हीस फी रक्कम रुपये 88,500/- + सर्व्हीस टॅक्स (लागू असेल तो) चे खर्चास मान्यतेसाठीचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, थरमॅक्स कंपनीचे अधिकृत डिलर मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना श्री साईप्रसादालयामधील दोन स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरचे सन 2015-2016 या कालावधीकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट देणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.८८,५००/- + सर्व्हीस टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.४५** **द्वारावती इमारतीमधील लिफ्टचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मे.कोने इलेव्हेटर्स (इंडिया) प्रा.लि., नाशिक यांनी व्दारावती इमारतीमध्ये साईभक्तांकरीता स्टेनलेस स्टील ऑटोमॅटीक डोअर्सच्या 4 लिफ्टस् बसवून कार्यरत करुन दिल्या आहेत. सदरील लिफ्ट कार्यरत झाल्यानंतर मे. कोने इलेव्हेटर्स (इंडिया) प्रा. लि., नाशिक यांनी निविदेतील व कार्यादेशातील अटीनुसार सलग तीन वर्ष मोफत सेवा उत्तमप्रकारे दिली आहे. त्यानंतरचे प्रत्येक वर्षाकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देण्यात येते. सध्या मे. कोने इलेव्हेटर्स (इंडिया) प्रा. लि., नाशिक देण्यात आलेल्या असलेल्या वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) चा कालावधी दिनांक 31/10/2015 रोजी पुर्ण होत आहे.

व्दारावती इमारतीमधील लिफ्टसाठी रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट केलेले नसेल आणि लिफ्टला मेकॅनिक प्रॉब्लेम आले किंवा लिफ्टचे मेकॅनिकल स्पेअर्स बदलण्याची गरज लागली तर या स्पेअर्स बदलणेकामी वेगळे बील भरावे लागते. शिवाय लिफ्टचे स्पेअरपार्ट लगेचच उपलब्ध होतील याची शास्वती नसते. यासाठी मे. कोने इलेव्हेटर्स (इंडिया) प्रा. लि., नाशिक यांचेशी रिस्क प्रोटेक्शन टाईप कॉन्ट्रक्ट करण्यात येते.

वरील कॉन्ट्रक्टमध्ये सर्व मेकॅनिकल स्पेअर्स कोणतीही किंमत न घेता कंपनीकडून बदलून मिळतात, शिवाय वर्षातून दरमहा कंपनीच्या प्रशिक्षित एक्सपर्ट मेकॅनिक शिर्डी येथे येऊन लिफ्टची साफसफाई करुन क्लिनिक करुन सेटींग करुन देत असतात, जेणेकरुन लिफ्ट सुरळीत सतत चालू राहणे शक्य होत आहे. या कॉन्ट्रक्ट कालावधीमध्ये लिफ्टचा कोणताही पार्ट नैसगिकरित्या (लिफ्टशी कन्झुमरने कोणतीही छेडछाड केलेली नसल्यास) खराब झाल्यास तो बदलून देणे कंपनीला सक्तीचे आहे.

आता, मे. कोने इलेव्हेटर्स (इंडिया) प्रा. लि., नाशिक यांनी व्दारावती इमारतीमधील 4 लिफ्टचे दिनाक 01/11/2015 ते 31/10/2016 या कालावधीसाठी रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टकामी दिनांक 2 जुलै, 2015 चे पत्रान्वये खालीलप्रमाणे रकमेचा तपशील कळविलेला आहे:

| **अ.नं.** | **लिफ्ट नंबर** | **मागील वर्षी दि . 01/11/2014 ते 31/10/2015 या कालावधीसाठी देण्यात आलेली सर्व करांसहीत AMC रक्कम** | **या वर्षी दि .01/11/2015 ते 31/10/2016 या कालावधीसाठी कळविण्यात आलेली सर्व करांसहीत AMC रक्कम** | **या वर्षी रकमेत झालेली वाढ** |
|---|---|---|---|---|
| .1 | 55862 | 1,80,656.50 | 1,98,750.00 | 10% |
| .2 | 55863 | 1,80,656.50 | 1,98,750.00 | 10% |
| .3 | 55864 | 1,80,656.50 | 1,98,750.00 | 10% |
| .4 | 55861 | 1,80,656.50 | 1,98,750.00 | 10% |
| | **एकूण रुपये :** | **7,22,626.00** | **7,95,000.00** | 10% |

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 20/05/2007 रोजीचे सभेतील निर्णय क्र.386 अन्वये "दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशीनरीचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागातील विविधी मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईबाबा रुग्णालयातील विविध मशीनरी, एअर कडीशनर, वायुवीजन यंत्रणा वगैरे) यांचे वार्षिक मेन्टेनंन्स सर्व्हीस कॉन्ट्रक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हीस कॉन्ट्रक्ट हे त्या-त्या मशीनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशीनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हीस डिलरला देण्यात यावे" असे ठरलेले आहे.

तरी उपरोक्त निर्णयानुसार व्दारावती इमारतीमधील 4 लिफ्टची उत्पादक कंपनी मे. कोने इलेव्हेटर्स (इंडिया) प्रा. लि., नाशिक यांना दिनांक 01/11/2015 ते 31/10/2016 या कालावधीसाठी सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप) देणेकामी एकत्रीत रक्कम रुपये 7,95,000/- (सात लाख, पंच्यानो हजार) मात्र अदा करणेबाबतच्या प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती इमारतीमधील ४ लिफ्टची उत्पादक कंपनी मे.कोने इलेव्हेटर्स (इंडिया) प्रा. लि., नाशिक यांना दिनांक ०१.११.२०१५ ते ३१.१०.२०१६ या कालावधीसाठी सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप) देणेस व याकामी येणा-या एकत्रित रु.७,९५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.४६** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय येथील सौर उर्जा सुविधा यंत्रणेचे सन २०१५-१६ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणे व इतर आवश्यक दुरुस्ती करणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय या ठिकाणी साईभक्तांना स्नानाकरीता गरम पाण्याची सोय व्हावी म्हणून सोलर वॉटर हिटींग सिस्टीमस् बसविण्यात आलेल्या आहेत. या यंत्रणेमध्ये काचेचे रिफ्लेक्टर, पाण्याच्या स्टोअरेज टाक्या व जी.आय. पाईप यांचा समावेश असतो. या यंत्रणेमध्ये काही बिघाड झाल्यास तो त्वरीत दुरुस्त करुन घ्यावा लागतो. सोलर वॉटर हिटर सिस्टीम यंत्रणा सतत कार्यान्वित राहण्यासाठी सर्व ठिकाणच्या सिस्टीमचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणे गरजेचे असते. या सर्व्हीस कालावधीत कलेक्टरची काच फुटली तर ती बदलण्यात येते. तसेच इतर लिकेज काढणे, व्हाल्व्ह मेन्टेनंन्स करणे, दैनंदिन साफसफाई ठेवणे इत्यादी कामे करण्यात येतात. यासाठी वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणे आवश्यक आहे.

मागील सन 2014-2015 या वर्षाकरीता मा. त्रिसदस्यीय समितीचे दिनांक 12/06/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 452(10) अन्वये भक्तनिवासस्थान, साईनिवास अतिथीगृह व व्दारावती इमारत या ठिकाणच्या सोलर यंत्रणेचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेकामी रक्कम रुपये 3,61,955/- मात्र रकमेचा तसेच श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटल येथील सोलर यंत्रणेचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेकामी रक्कम रुपये 2,72,362/- तसेच सहा सोलर हॉट वॉटर टॅंक नविन खरेदीकामी (जुने बायबॅक देवून) रक्कम रुपये 3,55,683/- अशा एकत्रित रक्कम रुपये 9,90,000/- मात्रचा जा.नं. एसएसएसटी/मेकॅनिकल/2481/2014 दिनांक 19 ऑगष्ट, 2014

अन्वये मे. युनिक सोलर सिस्टीम्स, नाशिक यांना दिनांक 01/08/2014 ते 31/07/2015 या कालावधीकरीता कार्यादेश देण्यात आला होता. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट कालावधीमध्ये त्यांनी सर्व्हीस दिली असून, सर्व यंत्रणा सुरळीत कार्यान्वित आहेत. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक 31/07/2015 रोजी संपुष्टात आलेला आहे.

आता, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय या ठिकाणच्या सोलर यंत्रणेचे सन 2015-2016 करीता एक वर्ष कालावधीसाठी वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) द्यावे लागणार आहे. तसेच या यंत्रणेतील काही नविन कलेक्टर पॅनल ग्लास बसविणे, श्री साईनाथ हॉस्पीटल येथील जुने खराब टॅंक बायबॅक करुन नविन 1500 लिटरचे टॅंक बसविणे तसेच इतर आवश्यक दुरुस्ती कामे करणे आवश्यक आहे. यासाठी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षीत आहे:

| अ.क्र. | तपशील | प्लॅन्ट कॅपासिटी | युनिट | एकूण क्षमता | नविन कलेक्टर पॅनल ग्लास खरेदी संख्या | जुने टॅंक बायबॅक करुन, नविन लिटरचे 1500 टॅंक बसविणे | वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट नविन टॅंक + दीचे एकत्रितखेरक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री साईनाथ हॉस्पीटल | 1,500 | 12 | 18,000 | 6 | 6 | 7,00,000-/ |
| | | 1,000 | 02 | 2,000 | | | |
| २ | श्री साईबाबा हॉस्पीटल | 4,000 | 02 | 8,000 | -- | -- | |
| | | 2,500 | 02 | 5,000 | | | |
| | | 2,000 | 02 | 4,000 | | | |
| | | 1,000 | 01 | 1,000 | | | |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय या ठिकाणच्या सोलर यंत्रणेचे सन 2015-2016 करीता एक वर्ष कालावधीसाठी वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेकामी, नविन कलेक्टर पॅनल ग्लास खरेदी करणे, श्री साईनाथ हॉस्पीटल येथील 1500 लिटरचे टॅंक स्टॅन्डसह (जुनी बायबॅक देऊन) नविन 6 टॅंक खरेदी करणे तसेच इतर आवश्यक दुरुस्ती करणे याकामी अंदाजे रक्कम रुपये 7,00,000/ (अक्षरी रुपये सात लाख) मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय या ठिकाणच्या सोलर यंत्रणेचे सन 2015-2016 करीता एक वर्ष कालावधीसाठी वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणे व इतर आवश्यक दुरुस्ती करणेकामी येणा-या अंदाजे रुपये 7,00,000/- खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहीरात देऊन ई-निविदा मागविणेकामी सदर प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय येथील सौर उर्जा सुविधा यंत्रणेचे सन २०१५-१६ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणे व इतर आवश्यक दुरुस्ती करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.७,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.४७** **श्री साईबाबा हॉस्पिटल CVTS OT-2 मधील सेंट्रल ए.सी. प्लॅंट डक्ट क्लिनीक करुन हेपा फिल्टर बदली करणेकामी येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटलमधील CVTS OT– 2 मध्ये तापमान नियंत्रणासाठी सेंट्रल ए.सी. प्लॅन्ट् कार्यरत आहे. दिनांक 10/04/2015 रोजी पहाटे चारचे सुमारास ऑपरेशन थिएटरमध्ये आग लागली होती. आगीमुळे निर्माण झालेला धुर सेंट्रल ए.सी. चालू करुन रिटर्न डक्टव्दारे बाहेर काढला गेला. त्यामुळे रिटर्न व सप्लाय डक्टमध्ये कार्बन जमा झाला तसेच शुध्द् हवा पुरवठा करणेसाठी असलेल्या हेपा फिल्टरमध्ये कार्बन जमा झालेला होता. अशाच स्थितीत ए.सी. वापर केल्यास पेंशटला इनफेक्शन झाले असते. त्यामुळे सदरचे सेंट्रल ए.सी. वापर सुरु करणेपूर्वी डक्ट क्लिनिंग करुन हेपा फिल्टर् बदलणे आवश्यक होते.

श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटल येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे दिनांक 01/10/2014 ते 30/09/2015 या कालावधीकरीता मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांना CAMC कॉन्ट्रक्ट देण्यात आलेले आहे. CAMC कामाकरीता देण्यात आलेल्या कार्यादेशानुसार त्यांनी माहे फेब्रुवारी 2015 मध्ये डक्ट क्लिनिंग करुन हेपा फिल्टर बदली करुन दिले होते. त्यामुळे सदरचे कामाकरीता मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचेकडून कोटेशन घेतले असता त्यांनी एकूण रक्कम रुपये 44,356/- खर्च कळविला होता.

श्री साईबाबा हॉस्पीटल CVTS OT – 2 मधील ए.सी. यंत्रणा त्वरीत कार्यान्वित करणे आवश्यक असल्याने इकडील विभागाच्या दिनांक 4 मे, 2015 चे मंजूर टिपणीन्वये मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचेकडून यांचेकडून डक्ट क्लिनीग करुन, हेपा फिल्टर बदली करुन घेण्यात आलेले आहे, त्यापोटी त्यांनी खालील तपशीलाप्रमाणे रकमेची मागणी केलेली आहे :

A) **नविन फिल्टर् टाकणे -**

| अ.नं. | तपशिल | नग | दर रु. | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | HEPA Air Filter DYNA Make | 04 | 5850.00 | 23,400.00 |
| | Excise Duty 12.5% : | | | 2,925.00 |

| | | |
|---|---|---|
| | Vat 12.5% : | 3,290.62 |
| | Freight : | 2200.00 |
| | **Total :** | **31,815.62** |
| | **R/o. Total (A) :** | **31,816.00** |

B) **डक्ट क्लिनिंग करणे -**

| **अ.नं.** | **तपशिल** | **जॉब** | **रक्कम रु.** |
|---|---|---|---|
| 1 | Duct Cleaning | 1 | 11,000.00 |
| | Service Tax 14 % : | | 1,540.00 |
| | **Total (B) :** | | **12,540.00** |
| | **Grand Total (A+B) :** | | **44,356.00** |

**अक्षरी रुपये चव्वेचाळीस हजार, तीनशे छपन्न मात्र**

उपरोक्तप्रमाणे बीलाची रक्कम रुपये 44,356/- मात्र वित्त विभागामार्फत मे. कैलास रफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांना अदा करणेत आलेली आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पीटलमधील CVTS OT-2 मधील ए.सी. यंत्रणा तातडीने कार्यान्वित करणेकामी डक्ट क्लिनींग व हेपा फिल्टर बदली करुन घेणेकामी आलेल्या रुपये 44,356/- मात्रचे खर्चास व त्याअनुषंगाने मे. कैलास रेफ्रिजेरेशन वर्क्स, मुंबई यांना अदा केलेल्या रकमेस कार्यात्तर मान्यतेसाठी प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.४८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.४८** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय येथील संपुर्ण ए.सी. यंत्रणेचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) ला मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये सर्व ऑपरेशन शिएटर्स व आय.सी.सी.यु. मध्ये सेंट्रल ए.सी. प्लांटच्या एकूण 13 यंत्रणा तसेच स्पिलट टाईप ए.सी. एकूण 71 नग, मॉरच्युरी 2 नग, मेडीसीन कोल्ड स्टोअर 1 नग आणि डोमेस्टिक फ्रिज एकूण 26 नग कार्यान्वित आहे. त्याचप्रमाणे श्री साईनाथ हॉस्पीटलमध्ये स्पिलट टाईप ए.सी. एकूण 38 नग आणि डोमेस्टिक फ्रिज एकूण 24 नग कार्यान्वित आहे. ऑपरेशन शिएटरमध्ये ऑपरेशन करतेवेळी व नंतर आय.सी.यु. वॉर्डमध्ये ठेवण्यात येते. काही वेळा या यंत्रणेमधील काही स्पेअरपार्ट खराब झाल्यास ते तातडीने बदलणे गरजेचे असते. त्याकरीता सदरचे स्पेअरपार्टची खरेदी करावी लागते. प्रत्येक कंपनीचे स्पेअरपार्ट हे दुस-या कंपनीच्या स्पेअरपार्ट पेक्षा वेगळे असल्याने तसेच सदरचे स्पेअरपार्ट हे जवळपास उपलब्ध होत नसल्याने ते थेट मुंबई, पुणे येथून खरेदी करावे लागतात. त्यामुळे हे स्पेअरपार्ट मिळवून फिटींग करुन यंत्रणा कार्यान्वित होईपर्यत पर्यायाने ए.सी. यंत्रणा काही वेळा बंद ठेवावी लागते अथवा कमी क्षमतेवर कार्यान्वित ठेवावी लागते. सदरचा स्पेअरपार्ट उपलब्ध झाल्यानंतर तो बसवून ए.सी. यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित केली जाते किंवा एखाद्या वेळी संबंधीत कंपनीचे प्रतिनिधी यांना बोलावून दुरुस्ती करुन घ्यावी लागते. यासाठी प्रत्येक वर्षी सदर यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती करणेकामी वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देण्यात येते.

मागील सन 2014-2015 या वर्षाकरीता मा. त्रिसदस्यीय समितीचे दिनांक 12/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 460 अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी मे.कैलास रेर्फिजरेशन वर्क्स, मुंबई यांना जा.नं. एसएसएसटी/ मेकॅनिकल/ 3236/ 2014 दिनांक 7 आक्टोबर, 2014 अन्वये अन्वये 10,00,000/- इतक्या रकमेचा दिनांक 01/10/2014 ते 30/09/2015 या कालावधीकरीता कार्यादेश देण्यात आला होता. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट कालावधीमध्ये त्यांनी सव्हीसेस दिली असून, सर्व यंत्रणा सुरळीत कार्यन्वित आहेत. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक 30/09/2015 रोजी संपत आल्याने, पुढील 2015-2016 या एक वर्षाचे कालावधीसाठी CAMC देणे आवश्यक आहे. यासाठी मा. त्रिसदस्यीय समितीचे दिनांक 08/09/2015 रोजीचे सभेमध्ये विषयाकिंत CAMC देणेकामी येणा-या रुपये 14,00,000/- खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहीरात देऊन ई-निविदा मागविणेकामी प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदर बैठकीतील निर्णयान्वये " श्री साईनाथ व साईबाबा हॉस्पीमधील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे सन 2015-2016 साठी वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे अर्ज दाखल करुन मान्यता घेण्यात यावी, त्याचबरोबर मा.उच्च न्यायालयाचे निर्णयास अधिन राहून ई-निविदा प्रक्रिया सुरु करावी व मा.उच्च न्यायालयाचे मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करण्यात यावी " असे ठरले आहे.

उपरोक्त निर्णयानुसार श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी मान्यतेकरीता संस्थान वकिलामार्फत मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे अर्ज दाखल करण्याची तसेच ईनिविदा प्रक्रियेची कार्यवाही चालू करण्यात येत आहे. सदर कार्यवाही पूर्ण होण्यासाठी बराच कालावधी लागणार आहे. श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ऑपरेशन शिएटर्स व आय.सी.सी.यु. तसेच इतर महत्वाचे ठिकाणी मध्ये तापमान नियंत्रित ठेवणकरीता असलेले ए.सी.



प्लांट सुरळीत कार्यान्वित राहणे अत्यावश्यक असल्याने सदरील प्लांट बंद पडून रुग्णांना देण्यात येणा-या सेवामध्ये अडचण येऊ नये यासाठी सध्या जा.नं.एसएसएसटी/ मेकॅनिकल/ 3236/ 2014 दिनांक 7 आक्टोबर, 2014 अन्वये कार्यादेश देण्यात आलेल्या मे. कैलास रेर्फिजरेशन वर्क्स, मुंबई यांना पुढील दिनांक 01/10/2015 ते 31/12/2015 या तीन महिन्यांचे कालावधीकरीता श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ए.सी. यंत्रणेचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट मुदतवाढ देण्यात यावे, असे मत आहे. दिनांक 01/10/2014 ते दिनांक 30/09/2015 या कालावधीतील CAMC करीता मे.कैलास रफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचेशी करण्यात आलेल्या करारनामातील तरतूद 2.0 मध्ये नमूद The Department reserves the right to extend the contract period by 3 months with mutual consent नुसार मुदतवाढ देता येईल. तीन महिने मुदतवाढ देणेकामी रक्कम रुपये 2,50,000/- मात्रचा खर्च येणार आहे.

तरी मे.कैलास रेर्फिजरेशन वर्क्स, मुंबई यांना दिनांक 01/10/2015 ते 31/12/2015 या तीन महिन्यांचे कालावधीकरीता श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ए.सी. यंत्रणेचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट सध्या त्यांना देण्यात आलेल्या सन 2014-2015 कालावधीतील कार्यादेशातील दरानुसार मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या रक्कम रुपये 2,50,000/- खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र. ४८३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय येथील संपुर्ण ए.सी. यंत्रणेच्या वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) ला मागील मंजूर दराने दिनांक 01/10/2015 ते 31/12/2015 या ०३ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या रु.२,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच पुढील कालावधीसाठीची प्रक्रिया तात्काळ सुरु करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं.४९ **व्दारावती भक्तनिवासस्थान विभागाकडील बेडशीट, उशीकव्हर, चादर, ब्लॅंकेट आऊटसोर्सिंग पध्दतीने धुलाईसाठी देणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद -:**

०१) – २१ चा (१) चा (ग) -साईभक्तांना मंदिरात श्रींच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी / सुविधा पुरविणे...

०२)– (ख) साईभक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे.

**प्रस्तावीक-** श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) विभागाकडे सन-२००० पासून लॉन्ड्री युनिट कार्यान्वित करणेत आलेले आहे. यामध्ये व्दारावती भक्तनिवास, साईप्रसाद निवासस्थान, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, मंदिर विभाग, वाहन विभाग, शैक्षणिक संकुले, प्रशासन शाखा, इ .विभागांचे कपडे धुऊन इस्त्री करुन दिले जातात .

सध्या श्री साईबाबा भक्तनिवासस्थान लॉण्ड्रीमध्ये खालीलप्रमाणे मशिनरी कार्यान्वित आहेत.

| अ.नं | मशिनचे नाव | क्षमता | नग | किंमत | मशिन खरेदी दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | वॉशिंग मशिन (कपडे धुण्याचे मशिन) | ५० किलो | ०१ | ८६,५२१/- | ०७/०४/२००० |
| ०२ | वॉशिंग मशिन (कपडे धुण्याचे मशिन) | ३० किलो | ०१ | १,१९,५१९- | १६/०९/२००६ |
| ०३ | हायड्रोएक्सट्रॅक्टर मशिन (कपडे पिळण्याचे मशिन) | ३० किलो | ०१ | ६५,०००/- | १६/०९/२००६ |
| ०४ | हायड्रोएक्सट्रॅक्टर मशिन (कपडे पिळण्याचे मशिन) | ३० किलो | ०१ | ४५,०२८/- | २३/०२/२०१३ |
| ०५ | ड्रायर मशिन (कपडे सुकविण्याचे मशिन) | ३० किलो | ०१ | ७३,७०३/- | ०७/०४/२००० |
| ०६ | कॅलेंडर मशिन (बेडशिट, उशिकव्हरला सुकवून इस्त्री केली जाते) | ---- | ०१ | ३,४६,५१४/- | ३१/१२/२००९ |
| ०७ | स्टिम बॉयलर | २०० किलो | ०१ | ४,८५,८९३/- | ०३/०३/२००१ |

वरील सर्व मशिनरीव्दारे दररोज एका शिप्ट कामाचे पाळीमध्ये ७५० ते ८०० कपडे व दोन कामाच्या शिप्ट पाळीमध्ये सुमारे १५०० ते १६०० कपडे धुऊन /इस्त्री केली जातात.

उपरोक्तप्रमाणे मशिनरी १० ते १५ वर्षापासून सतत वापरात असल्याने वारंवार नादुरुस्त होतात .दुरुस्तीची कामे संस्थानचे मेकॅनिकल विभागामार्फत केली जातात .सध्या श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ) ५०० रुम ) विभागाकडील वरील तक्त्यामधील अ.नं ३ व ४ मध्ये नमुद असणारे हायड्रोएक्सट्रॅक्टर मशिन (कपडे पिळण्याचे मशिन) सुमारे ३० ते ४० दिवसांपासून नादुरुस्त असल्याने बंद आहे.

अ.नं .३ चे मशिन दि.०६/०६/२०१५ पासून नादुरुस्त असल्याने बंद आहे. सदर मशिन दुरुस्तीची कार्यवाही मेकॅनिकल विभागामार्फत सुरु आहे .तसेच अ.नं.०१ चे ५० किलो क्षमतेचे कपडे धुण्याचे मशिन मागील महिन्यात १० ते १२ दिवस बंद होते.

सध्या पावसाळ्याचे दिवस सुरु झाले असल्याने व ढगाळ वातावरणामुळे तसेच मशिनरी वारंवार नादुरुस्त होत असल्याने व्दारावती भक्तनिवास विभागाकडील चादर ,बेडशीट ,उशीकव्हर धुणेस उशिर होत आहे .अशीच परिस्थितीत साईभक्तांची मोठया प्रमाणात गैरसोय होऊन भक्तांच्या तक्रारी होऊ नये म्हणुन श्री साईआश्रम भक्तनिवास विभागाचे कपडे धुलाई ठेकेदार मे.साई श्रध्दा लॉण्ड्री ॲन्ड सर्व्हिसेस, प्रोप्रा.विजय अशोक चव्हाण, जी.आर.बी .वाडी, सावळीविहीर खुर्द, ता.राहाता यांचेकडून श्री साईआश्रम भक्तनिवास विभागाचे मंजुर दरात धुऊन / इस्त्री करुन घेतल्यास ऐनवेळी साईभक्तांची गैरसोय व तक्रारी होणार नाही ,असे नम्र मत आहे.

उपरोक्तचे संदर्भिय आदेशान्वये संस्थानचे श्री साईआश्रम भक्तनिवासस्थान विभागाचे कपडे धुणे/इस्त्री करण्याची कामे मे.साई श्रध्दा लॉण्ड्री अॅन्ड सर्व्हिसेस, प्रोप्रा.विजय अशोक चव्हाण, जी.आर.बी .वाडी, सावळीविहीर खुर्द, ता.राहाता जि.अ.नगर यांचेकडून करुन घेतली जातात .

कपडयांची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे -:

| अ.नं | लॉण्ड्री कपडयाचा तपशिल | प्रति नग दर रुपये/पैसे | टॅक्स |
|---|---|---|---|
| ०१ | खिडक्यांचे पडदे | रुपये :- १५=०० | + लागु असलेला सर्व्हिस टॅक्स |
| ०२ | डबल बेडशिट | रुपये :- १२=०० | |
| ०३ | ब्लॅकेट | रुपये :- १२=०० | |
| ०४ | चादर | रुपये :- १०=०० | |
| ०५ | सिंगल बेडशिट | रुपये :- ०७=०० | |
| ०६ | टॉवेल | रुपये :- ०४=००- | |
| ०७ | उशिकव्हर | रुपये :- ०३=०० | |

श्री.विजय अशोक चव्हाण ,सावळीविहिर यांना उपरोक्त आदेशातील नमुद दरामध्ये व्दारावती भक्तनिवासस्थान विभागाकडील दैनंदिन साईभक्तांनी वापरलेले कपडे धुणेबाबत दुरध्वनीव्दारे दिनांक १६/०६/२०१५ रोजी संपर्क साधुन विचारणा केली असता ,त्यांनी श्री साईआश्रम भक्तनिवास विभागाचे मंजुर दरात व्दारावती भक्तनिवास विभागाकडील कपडे धुऊन /इस्त्री करुन देणेबाबत सहमती दर्शविली असून तसे दि.१७/०६/२०१५ रोजी लेखी पत्र सादर केलेले आहे.

व्दारावती विभागाकडील दैनंदिन धुलाई कामी कपडे व त्याकरीता लागणारा अंदाजिय खर्चाचा तपशिल :-

| अ.नं. | लॉण्ड्री कपडयाचा तपशिल | दैनंदिन कपडे धुलाई संख्या | कपडे धुलाई प्रति नग दर | दैनंदिन एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | खिडक्यांचे पडदे | ०५ | रुपये :- १५=०० | रुपये :- ०७५=०० |
| ०२ | डबल बेडशिट | ८० | रुपये :- १२=०० | रुपये :- ९६०=०० |
| ०३ | ब्लॅकेट | ०५ | रुपये :- १२=०० | रुपये :-०६०=०० |
| ०४ | चादर | १० | रुपये :- १०=०० | रुपये :-१००=०० |
| ०५ | सिंगल बेडशिट | ६०० | रुपये :- ०७=०० | रुपये :- ४,२००=०० |
| ०६ | टॉवेल | १०० | रुपये :- ०४=००- | रुपये :- ४००=०० |
| ०७ | उशिकव्हर | ७०० | रुपये :- ०३=०० | रुपये :- २,१००=०० |
| | एकुण धुलाई कपडे संख्या | १,५०० नग | दैनंदिन एकुण खर्च रुपये :- ७,८९५=०० | |

(१ दिवसाकरीता कपडे धुलाई व इस्त्री करणेकामी अंदाजे अक्षरी रुपये- सात हजार, आठशे, पंच्यान्नव मात्र खर्च अपेक्षित आहे.)

व्दारावती विभागाकडील दैनंदिन कपडे धुलाई व इस्त्री करणेकामी अंदाजे रुपये- सात हजार, सातशे, पंच्यान्नों मात्र खर्च अपेक्षित आहे. व प्रत्येक महिनासाठी अंदाजे खर्च १ दिवस रुपये- ७,८९५X ३० दिवसाकरीता अंदाजे रुपये- २,३६,८५०/- ( अक्षरी रुपये- दोन लाख, छत्तीस हजार, आठशे, पन्नास मात्र ) खर्च अपेक्षीत आहे.

**अधिनियम २००४ नुसार छाननी करुन अनुमान:-** उपरोक्तप्रमाणे वरील तक्त्यात दर्शविलेले कपडे आऊटसोर्सिंग पध्दतीने धुणेकरीता देणेस नमुद अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन तथा संमत आदेशानुसार देता येईल . याकामी दररोज रुपये- ७,८९५/- व प्रति महिना रुपये- २,३६,८५०/- अधिक लागु असलेला सर्व्हिस टॅक्स इतका खर्च अपेक्षित आहे .सदरचा खर्च सन २०१५-२०१६ चे सुधारित अंदाजपत्रकीय तरतुदीस मान्यता घेऊन व्दारावती भक्तनिवासस्थान खर्चातुन करता येईल.

**व्दारावती विभागचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** व्दारावती भक्तनिवास विभागाकडील माहे एप्रिल २०१५ ते जून -२०१५ अखेर ए..सी./नॉन ए.सी. खोल्याचा सेवा आकार संस्थान खाते जमा झालेला असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे :-

| अ.नं. | महिना | ऑनलाईन भरणा | मॅन्युअल भरणा | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | एप्रिल -२०१५ | रुपये- ४२,३०,३००/- | रुपये-१८,२७,३९४/- | रुपये- ६०,६६,६९४/- |
| ०२ | मे-२०१५ | रुपये- ४७,७४,२५०/- | रुपये- १९,५८,८५८/- | रुपये- ६७,३३,१०८/- |
| ०३ | जून -२०१५ | रुपये-४३,९८,९५०/- | रुपये- २१,०४,७९०/- | रुपये- ६५,०३,७४०/- |

आज अखेर व्दारावती भक्तनिवास विभागाचे सर्व लॉन्ड्रीचे कपडे श्री साईबाबा भक्तनिवासकडील लॉन्ड्री विभागाकडून धुऊन इस्त्री करुन घेण्यात येत होते. त्यामुळे कपडयांची धुलाई बजेट तरतुद वार्षिक अंदाज पत्रक सन २०१५-१६ मध्ये करण्यात आलेली नाही. त्यामुळे व्दारावती विभागाकडील मुळ अंदाज पत्रकामधील फर्निचर खरेदी खाते रुपये- ९,६०,०००/- ( अक्षरी रुपये- नऊ लाख, साठ हजार मात्र ) इतकी तरतुद करण्यात आलेली असून सदरचे बजेट धुऊन इस्त्रीकामी वापरता येईल, असे मत आहे. किंवा सन २०१५-१६ चे सुधारीत बजेटमध्ये लॉन्ड्री (कपडे धुऊन व इस्त्री करणे) खर्चासाठी तरतुद करुन भक्तांची गैरसोय दुर करता येईल.

श्री साईबाबा भक्तनिवासकडील (५०० रुम) लॉन्डीचे तांत्रिक अडचणीचे काळात साईभक्तांना बेडशीट व उशीकव्हर, चादर, व ब्लँकेट पुरविणेकामी भक्तांची गैरसोय होऊ नये, म्हणुन तुर्तास काही कालावधीसाठी श्री साईबाबा भक्त (५०० रुम) निवासस्थानाची मशिनरी चालू होईपर्यंत आवश्यकतेनुसार वरील तक्त्यातील कपडे आऊट सोर्सिंगने पध्दतीने धुऊन व इस्त्री करुन श्री साईआश्रम भक्तनिवासस्थानचे मंजुर दराने प्रोप्रा.विजय अशोक चव्हाण, मे.साई श्रध्दा लॉण्ड्री अॅन्ड सर्व्हिसेस, जी.आर.बी.वाडी, सावळीविहीर खुर्द, ता.राहाता यांचेकडून धुऊन घेणेस व याकामी एका दिवसांस अंदाजे दररोज रुपये- ७,८९५/- (अक्षरी रुपये- सात हजार, आठशे, पच्यांन्नो मात्र) व प्रति महिना रुपये- २,३६,८५०/- (अक्षरी रुपये- दोन लाख, छत्तीस हजार, आठशे, पन्नास) + लागु असलेला सर्व्हिस टॅक्स इतका अंदाजे खर्च अपेक्षित असून तुर्त लॉन्डीचे तांत्रिक अडचणीचे काळात साईभक्तांना बेडशीट व उशीकव्हर, चादर, व ब्लँकेट पुरविणेकामी भक्तांची गैरसोय होऊ नये, म्हणुन प्रति महिना रुपये-२,३६,८५०/- (अक्षरी रुपये- दोन लाख, छत्तीस हजार, आठशे, पन्नास) अधिक सर्व्हीस टॅक्ससह मे.साई श्रध्दा लॉण्ड्री अॅन्ड सर्व्हिसेस, सावळीविहीर यांचेकडून मंजुर दरात धुऊन व इस्त्री करुन घेणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवासस्थान विभागाकडील बेडशीट, उशीकव्हर, चादर, ब्लँकेट आऊटसोर्सिंग पध्दतीने धुलाईसाठी देणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**तसेच साईबाबा भक्तनिवासकडील लॉन्ड्री मशिनची दुरुस्ती तातडीने करुन घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, द्वारावती भक्तनिवास/ प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.५०** **सन २०१६-१७ करीता (दि.०१/०४/२०१६ ते ३१/०३/२०१७) अखेर साई धर्मशाळा विभागाकडील पेस्ट कंन्ट्रोल, रोडेंट, फॉगींग, ट्रीटमेंट (धुरीकरण) व डास अळी प्रतीबंधक औषध फवारणी (Anti larval) चे कॉन्ट्रक्ट देणेबाबत.**

**प्रस्ताव-** साई धर्मशाळा हा विभाग दि.१८/०७/२०१३ पासुन सुरु करण्यात आला आहे. यामध्ये एकुण सहा इमारती असुन पैकी एक इमारत श्री साईबाबा संस्थान संचलीत कनिष्ठ महाविद्यालय यांना वापरास देण्यात आलेली असून सहा इमारतीमध्ये एकुण १९२ हॉल आहे. त्यापैकी पाच इमारतीच्या १६० हॉलमध्ये पालखी/ पदयात्रीतील, सहलीतील सहभागी साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येत आहे.

सन २०१५ या वर्षा करीता दि. (०१/०१/२०१५ ते ३१/१२/२०१५ अखेर) साई धर्मशाळा विभागाकडील उपरोक्त विषयांकीत कामाची वर्तमान पत्रातुन जाहिरात देणे, निविदा मागविणे, न्युनतम दरधारकांस कार्यादेश देणे, करारनामा करुन घेणे, या विदीत पध्दतीने कार्यवाही केलेली असून मे. स्टर्लिग पेस्ट कंट्रोल सर्व्हीसेस, प्रा.लि.,३ ठाणे या न्युनतम दरधारकास रु. १,३२,७१८/- एवढ्या रकमचे पेस्ट कंट्रोल, फॉगींग औषध फवारणीचे वार्षिक कामाचे कॉन्ट्रक्ट देणेत आलेले आहे. माहे ऑगस्ट २०१५ अखेर सदर कंत्राटदाराकडून खालील प्रमाणे पेस्ट कंट्रोल फवारणी करुन घेण्यात आलेली आहे.

| अ.नं. | तपशिल | सदर कामासाठी अदा करण्यात आलेली रक्कम |
|---|---|---|
| १ | पहिली पेस्ट कंट्रोल फवारणी माहे फेब्रुवारी-२०१५ | २१,७०२.०० |
| २ | दुसरी पेस्ट कंट्रोल फवारणी माहे मार्च -२०१५ | २१,७०२.०० |
| ३ | तिसरी पेस्ट कंट्रोल फवारणी माहे जुन -२०१५ | २१,५९०.०० |
| ४ | चौथी पेस्ट कंट्रोल फवारणी –जुलै -२०१५ | २१,५९०.०० |
| | एकुण - | ८६,५८४.०० |

वरील प्रमाणे चार पेस्ट कंट्रोल फवारण्या करुन घेणेत आलेल्या आहेत. इमारतीमध्ये ढेकुण, डास अळी प्रादुर्भाव झालेस आवश्यकते नुसार औषध फवारण्या करुन घेण्यात येतात. माहे ऑगस्ट २०१५ ते डिसेंबर २०१५ अखेर आणखी दोन पेस्ट कंट्रोल फवारण्या करणेचे नियोजन असुन या कामी रु.४५,०००/- अंदाजे खर्च येईल, म्हणजे रु. ८६,५४८ + रु. ४५,०००/- = एकुण रु. १,३१,५४८/- इतका सन २०१५ करीता खर्च अपेक्षीत आहे.

मे. स्टर्लिग पेस्ट कंट्रोल सर्व्हीसेस, प्रा.लि., ठाणे.(पं) यांनी सन २०१५-१६ साठी त्यांचे निविदामध्ये खालील प्रमाणे दर दिलेले होते.

| अ.नं. | तपशिल | दर (सर्व करासहीत) |
|---|---|---|
| १ | पेस्ट कंट्रोल व रोडंट कंट्रोल करणे प्रती चौरस फुटा प्रमाणे | ००.८२ पैसे |
| २ | फॉगींग ट्रिटमेन्ट प्रती फवारणीस (प्रती फवारणी १५ दिवसासाठी एक, महिन्यासाठी २ फवारणी) | १११/- रु. |
| ३ | डास आळी प्रबंधक ट्रिटमेन्ट प्रती फवारणीस (जुन २०१५ ते ऑक्टोबर २०१५ कालावधीसाठी, महिन्यासाठी २ फवारणी) | ५१/- रु. |

मे. स्टर्लिग पेस्ट कंट्रोल सर्व्हीसेस, प्रा.लि.,३ ठाणे.(पं) यांचे निविदा मधील दर न्युनतम असलेने त्यांना सन २०१५ (०१/०१/२०१५ ते ३१/१२/२०१५)अखेर पेस्ट कंट्रोल, रोडेंट, फॉगींग टिंट्रमेट (धुरीकरण) व डास आळी प्रतीबंधक औषध फवारणी (Anti Larval) कामाचा संदर्भीय क्रं. ०२ चे पत्राने कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर कार्यादेशाची मुदत दि. ३१/१२/२०१५ अखेर संपुष्टात येत आहे.

सन २०१६-१७ करीता दि. करीता दि. ०१/०४/२०१६ ते ३१/०३/२०१७ या कालावधीमध्ये साई धर्मशाळा विभागाकडील पेस्ट कंट्रोल, रोडेंट, फॉगींग ट्रिटमेट (धुरीकरण) व डास आळी प्रतीबंधक औषध फवारणी (Anti Larval) ही कामे करण्यासाठी कंत्राटदाराकडुन सिलबंद निविदा मागविणे आवश्यक आहे.

माहे डिसेंबर -२०१५ अखेर पेस्ट कंट्रोल फॉगींग औषध फवारणीचे काम संदर्भीय क्र.२ चे आदेशान्वये स्टर्लींग पेस्ट कंट्रोल सर्व्हीसेस ठाणे. यांचे कडुन करणेत येईल. माहे जानेवारी - २०१६ ते मार्च २०१६ अखेर पूर्वीच्याच मंजुर दराने पेस्ट कंट्रोल फॉगींग, औषध फवारणीचे काम स्टर्लींग पेस्ट कंट्रोल सर्व्हीसेस ठाणे, यांचे कडुन करुन घेता येईल.

सन २०१६- १७ या आर्थिक वर्षामध्ये (दि.०१/०४/२०१६ ते ३१/०३/२०१७) अखेर साई धर्मशाळा विभागाकडील पेस्ट कंट्रोल, फॉगींग ट्रिटमेंट व डास अळी प्रतिबंधक औषध फवारणी (Anti Larval) करणेच कामी रु. २,००,०००/- (अक्षरी रु.दोन लाख मात्र) खर्च अपेक्षीत आहे.

उपरोक्त प्रस्तावास व खर्चास तसेच वर्तमान पत्रातुन जाहीरात देवुन विहीत पध्दतीने निविदा मागविता येतील त्यास मान्यता मिळणे कामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४८५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६- १७ या आर्थिक वर्षामध्ये साई धर्मशाळा विभागाकडे पेस्ट कंट्रोल, फॉगींग ट्रिटमेंट व डास अळी प्रतिबंधक औषध फवारणी (Anti Larval) करणेकामी विहीत पध्दतीने वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, कोटेशन्सची करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा)

---

विषय नं.५१ **साई दर्शनासाठी व्ही.आय.पी. पास देण्यासाठी जनसंपर्क कार्यालय २४ तास सुरु करण्याबाबत.**

प्रस्ताव- संदर्भ क्रमांक १ अन्वये श्री.ल.वि.सावंत, कार्यासन अधिकारी यांनी त्यांचे उपरोक्त संदर्भीय पत्रात, "विषयांकीत प्रकरणी, श्री.सुनिल प्रभु, विधानसभा सदस्य यांच्या दिनांक १३.०४.२०१५ च्या आणि डॉ.राजेंद्र म.पिपाडा यांच्या दिनांक ०८.०४.२०१५ च्या पत्राची प्रत यासोबत जोडण्यात येत आहे. त्याबाबत आपला अहवाल शासनास तातडीने सादर करावा, ही विनंती." असे कळविले होते.

उपरोक्त पत्रासोबत ०१) श्री.सुनिल प्रभु, विधानसभा सदस्य यांचे मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नांवे अग्रेषीत असलेले दिनांक १३.०४.२०१५ रोजीचे पत्रात, "शिर्डी संस्थाने व्ही.आय.पी.साई दर्शनासाठी आठवडयाच्या दर्शनासाठी पैसे देउन प्रवेश पास मिळण्यासाठी कार्यरत केलेले जनसंपर्क कार्यालय हे रात्री ९ वा बंद करण्यात येते त्यामुळे श्री साईच्या पहाटेच्या ४ वा होणा-या काकड आरतीसाठी येणारे व श्री साई दर्शन करुन सकाळी निघून जाणा-या मा.सुप्रीम कोर्ट, व उच्च न्यायालयातील न्यायधीश, खासदार,आमदार, माजी खासदार, माजी आमदार व इतर अति महत्वाच्या व्यक्ती यांचे फार मोठया प्रमाणात हाल होतात. तसेच भाविक यांचे फार हाल होतात. तसेच साई दर्शनासाठी पैसे देउन ही व्ही.आय.पी. दर्शन मिळविण्यासाठी रांग लागलेली असते त्यामुळे अतिमहत्वाच्या व्यक्तिनी व्ही.आय.पी.पास साठी रांगेत उभे रहाणे योग्य वाटत नाही. तरी आपण व्ही.आय.पी.साई दर्शनासाठी प्रवेश पास मिळण्यासाठी कार्यरत असलेले जनसंपर्क कार्यालय (पी.आर.ओ) २४ तास उघडे ठेवण्याबाबत संस्थान च्या विश्वस्तांना योग्यती दक्षता व कार्यवाही करण्याचे निदेश द्यावेत ही विनंती." असे असून त्यावर सचिव शिर्डी देवस्थान कार्यवाही करावी असे निर्देश आहेत.

०२) डॉ.राजेंद्र मदनलाल पिपाडा यांचे दिनांक ०८.०४.२०१५ चे पत्रात, "शिर्डी संस्थानने VIP साई दर्शनासाठी आठवडयाच्या सर्व दिवशी पैसे घेवून पास देण्यास सुरुवात केली आहे. परंतु PRO ऑफिस रात्री ९ वाजता बंद होते त्यामुळे पहाटेच्या ४ वाजता होणा-या काकड आरतीसाठी येणारे व सकाळी ज्यांना लवकर दर्शन घेवुन निघुन जावयाचे आहे त्यांचे फार हाल होतात कारण सकाळी PRO ऑफीस ७ वाजता उघडते. PRO ऑफीस रात्रभर उघडे ठेवणे गरजेचे आहे तसेच सुप्रीम कोर्ट व उच्च न्यायालयातील न्यायाधीश, मंत्री, खासदार, आमदार, माजी आमदार, माजी खासदार तसेच इतर काही अति महत्वाच्या व्यक्ती यांना पैसे भरुन पास काढायला लावणे योग्य वाटत नाही कारण आता कुणालाही पैसे देवुन पास मिळत असल्याने VIP पास घेण्यासाठीच रांग लागलेली असते. अति महत्वाच्या व्यक्तींना रांगेत पैसे भरुन पास घेणे योग्य वाटत नाही. दर्शन व आरतीसाठी अति महत्वाच्या व्यक्ती (VIP) व त्यांच्या बरोबर असणारे लोक यांच्यासाठी पैसे भरुन पास देण्याची पध्दत बंद करावी, पुर्वी प्रमाणे मोफत पासेस मिळावे हि नम्र विनंती." असे कळविलेले आहे.

उपरोक्त संदर्भीय पत्रासोबत असलेल्या श्री.सुनिल प्रभु, विधानसभा सदस्य व डॉ.राजेंद मदनलाल पिपाडा, राहाता यांचे पत्राचे अवलोकन करता त्यांनी पत्रात नमुद केलेली परिस्थिती वस्तुस्थितीला धरुन नाही यााबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे-

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१३ चे सभेतील निर्णय क्रमांक ९०७ अन्वये भारतीय गणराज्याचे मा.राष्ट्रपती, मा.उपराष्ट्रपती, मा.पंतप्रधान, मा.उपपंतप्रधान, महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल, भूतपुर्व मा.राष्ट्रपती, मा.उपराष्ट्रपती, मा.पंतप्रधान, भारतीय गणराज्याचे मुख्य न्यायाधीश, लोकसभा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्रीमंडळातील सर्व मंत्री, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, सर्व राज्यांचे राज्यपाल, सर्व राज्यांचे मुख्यमंत्री, सर्वोच्च न्यायालयाचे सर्व न्यायाधीश, महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळातील सर्व मंत्री, महाराष्ट्र राज्य विधान सभा अध्यक्ष व उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्याच्या उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश, महाराष्ट्र राज्याच्या उच्च न्यायालयांचे सर्व न्यायाधीश यांची दर्शन/आरतीची व्यवस्था निशुल्क राहील. असा निर्णय झालेला आहे. त्यामुळे

उपरोक्त व्यक्तींची दर्शन/आरतीची व्यवस्था निशुल्क असल्याने त्यांना पासेस घेण्याची आवश्यकता नसते. त्यांचे व्यवस्थेकरीता मा.जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर, मा.तहसिलदार राहाता, सर्कल व तलाटी शिर्डी, कोपरगांव कोर्टाचे प्रोटोकॉल अधिकारी अथवा संबंधीत शासकीय विभागाचे अधिकारी/कर्मचारी त्यांचे सोबत असतात. जनसंपर्क विभागामार्फत सदर अधिकारी/कर्मचा-याबरोबर समन्वय साधून आलेल्या मान्यवरांची संस्थानच्या प्रचलित पध्दतीने थेट दर्शन/आरतीची व्यवस्था करण्यात येते. या मान्यवरांना पासचीच आवश्यकता नसल्याने त्यांना अतिमहत्वाच्या व्यक्तींकरीता असलेल्या व्ही.आय.पी.पाससाठी रांगेत उभे रहावे लागते हे वस्तुस्थितीला धरुन नाही. तसेच या मान्यवरांपैकी आजपर्यंत कोणाचीही गैरसोय झालेली नाही.

याशिवाय श्री साईबाबांच्या दर्शनासाठी येणा-या महत्वाच्या/अतिमहत्वाच्या, मान्यवरांबाबत केंद्र शासनच्या व सर्व राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत, मा.जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत संस्थानला संदेश प्राप्त होतात. प्राप्त संदेशाच्या अनुषंगाने जनसंपर्क विभागात कर्तव्यावर असणा-या कर्मचा-यापैकी एक कर्मचारी येणा-या व्ही.आय.पी.ना अटेंड करण्यासाठी गेट नंबर ०२ वर जाऊन त्यांची भेट झाल्यावर त्यांना घेऊन लेंडीबागेतील सभागृहाजवळील व्ही.आय.पी. रुम नंबर ०१,०२ किंवा ०३ मध्ये त्यांची फ्रेश होण्याची व चहापाणाची व्यवस्था करतो. मान्यवरांचे सोबत असणारे स्वियसहाय्यक अथवा इतर व्यक्तींपैकी एका व्यक्तीला पासेस काऊंटरकडे घेवून येतो व तातडीने पास काढण्यात येऊन त्यांचे बरोबर समाधी मंदिरत जावून दर्शन/आरतीची व्यवस्था केली जाते.

जेव्हा मा.खासदार, मा.आमदार अथवा मान्यवर व्यक्ती शिर्डीत आल्यावर जनसंपर्क कार्यालाकडे दुरध्वनी वरुन दर्शन/आरतीसाठी पासेसची मागणी करतात अशावेळीही जनसंपर्क विभागातील कर्मचारी त्यांचेशी संपर्क साधून त्याचे सोबत असणारे स्वियसहाय्यक अथवा इतर व्यक्तींपैकी एका व्यक्तीला पासेस काऊंटरकडे घेवून येतो व तातडीने पास काढून त्यांची दर्शन/आरतीची व्यवस्था केली जाते.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे श्री साईबाबा समाधी मंदिरातील दैनंदीन कार्यक्रम पुढीलप्रमाणे-

| कार्यक्रम | वेळ |
|---|---|
| काकड आरती | सकाळी ०४.३० वा. |
| श्रींना मंगलस्नान | सकाळी ०५.०५ वा. |
| दर्शन प्रारंभ | सकाळी ०५.४० वा. |
| माध्यान्ह आरती | दुपारी १२.०० वा. |
| धुपारती | सूर्यास्ताचे वेळी |
| शेजारती | रात्रौ १०.३० वा. |

रात्रौ शेजारती नंतर समाधी मंदिर बंद होते. समाधी मंदिराच्या वरील नमुद वेळेप्रमाणे जनसंपर्क विभागाचे पासेस वितरणाचे कामकाज चालते. मान्यवर व्यक्तींच्या दर्शन/आरती व्यवस्थेसाठी जनसंपर्क विभागाचे पासेस वितरणाचे कामकाज सकाळी ०६.०० ते दुपारी ०२.०० वाजेपर्यंत व दुपारी ०२.०० ते रात्रौ १०.०० वाजेपर्यंत दोन शिफ्ट मध्ये चालते. त्यानुसार सकाळी ०७.०० ते ११.०० वाजेपर्यंत दर्शन व माध्यान्ह आरतीचे पासेस वितरीत करण्यात येतात. दुपारी ०१.०० ते सायंकाळी धुपारतीपुर्वी ०१ तास आगोदरपर्यंत दर्शन व धुपारतीचे पासेस वितरीत करण्यात येतात. व सायंकाळी ०७.०० ते रात्रौ ०९.०० वाजेपर्यंत दर्शन, शेजारती व काकड आरतीचे पासेस वितरीत करण्यात येतात. काकड आरतीचे पासेस एक दिवस आगोदर सायंकाळी ०७.०० ते ०९.०० वाजेपर्यंत वितरीत करण्यात येतात. प्रत्येक आरती सुरु असतांना समाधी मंदिरातील दर्शन बंद असते. रात्रीची शेजारती संपल्यानंतरही समाधी मंदिर दर्शनासाठी बंद असते. तसेच याव्यतिरिक्त रात्रौ १०.०० ते सकाळी ०६.०० यावेळेत पासेस धारक मान्यवरांच्या शेजारती व काकड आरतीच्या व्यवस्थेसाठी जनसंपर्क विभागात ०१ कर्मचारी कर्तव्यावर असतो.

मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे online.sai.org.in या संकेतस्थळावर दर्शन/आरती, निवास व देणगी सुविधा सर्वांसाठी खुली करण्यात आलेली आहे. ऑनलाईनवर प्रति आरतीसाठी १५० पासेसचा कोटा दिलेला आहे. त्याचप्रमाणे जनसंपर्क कार्यालयाकडेही प्रति आरतीसाठी १५० पासेसचा कोटा दिलेला असून काकड आरतीसाठी पासेसची मागणी मोठया प्रमाणात असल्याने काकड आरतीसाठी देण्यात येणारे पासेस (एक दिवस आगोदर सायंकाळी ०७ ते ०९) दिलेल्या वेळेत नेहमीच संपतात. शिवाय शेजारतीनंतर समाधी मंदिर बंद होत असल्याने दर्शन पासेस देण्याचा प्रश्नच येत नाही. त्यामळे दर्शन/काकड आरतीचे पासेस वितरणासाठी जनसंपर्क कार्यालय रात्रभर सुरु ठेवणे गरजेचे नाही असे वाटते.

मात्र श्री.सुनिल प्रभु, विधानसभा सदस्य व डॉ.राजेंद मदनलाल पिपाडा, राहाता यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या नांवे अग्रेषीत पत्रात मा.सुप्रीम कोर्ट व उच्च न्यायालयातील न्यायधीश, खासदार,आमदार, माजी खासदार, माजी आमदार व इतर अति महत्वाच्या व्यक्ती यांचे फार मोठया प्रमाणात हाल होतात. सुप्रीम कोर्ट व उच्च न्यायालयातील न्यायाधीश, मंत्री, खासदार, आमदार, तसेच इतर काही अति महत्वाच्या व्यक्ती यांना पैसे भरुन पास काढायला लावणे योग्य वाटत नाही. दर्शन व आरतीसाठी अति महत्वाच्या व्यक्ती (VIP) व त्यांच्या बरोबर असणारे लोक यांच्यासाठी पैसे भरुन पास देण्याची पध्दत बंद करावी. अशी मागणी केलेली आहे. उपरोक्त पत्रावरील श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेने आपला अहवाल शासनाकडे तातडीने सादर करावा असे विधी व न्याय विभागाचे कार्यासन अधिकारी ल.वि.सांवत यांनी कळविले होते.

तथापि, आता संदर्भ क्रमांक २ अन्वये श्रीमती.रा.व.चव्हाण, कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई यांनी उपरोक्त विषयासंदर्भात समक्रमांकाच्या दिनांक १३.०४.२०१५ च्या पत्रान्वये आपला अहवाल

शासनास सादर करण्याबाबत आपणांस विनंती करण्यात आली होती. मात्र अद्यापी आपला अहवाल शासनास प्राप्त झालेला नाही. सदर उत्तराअभावी शासनास प्रस्ताव सादर करण्यास विलंब होत असल्याने आपला अहवाल शासनास उलटटपाली तात्काळ सादर करण्यात यावा, ही विनंती असे कळविले आहे.

तरी उपरोक्त पत्र मा.त्रिसदस्यीय समितीचे अवलोकनार्थ सादर करुन निर्णयाअंती तसे पत्र विधी व न्याय विभागास देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.४८६** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, दि.१४.११.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९०७ अन्वये अतिमहत्वांच्या व्यक्तींची संस्थानच्या जनसंपर्क कार्यालयामार्फत दर्शन/ आरतीची विनापास निशुल्क व्यवस्था करण्यात येत आहे. तसेच संस्थानच्या online.sai.org.in या अधिकृत संकेतस्थळावर दर्शन/आरती, निवास व देणगी सुविधा २४ तास सर्वांसाठी खुली करण्यात आलेली आहे. यामुळे व्ही.आय.पी. पास देण्यासाठी जनसंपर्क कार्यालय २४ तास सुरु ठेवण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब सदरहू प्रस्ताव नामंजूर करणेत आला.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.५२** **श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांचा नोकरी मिळणेचे अर्जाबाबत मा.त्रीसदस्य समितीचे दि.२०.११.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९९४ निरस्त करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री कृष्णा विश्वनाथ वालझाडे, सेवानिवृत्त नायब तहसिलदार, संगमनेर यांनी दि.२९/१०/२०१४ रोजीचे अर्जान्वये, सेवा निवृत्तीनंतर त्यांचे नोकरीत अनुभवाचा उपयोग श्री साईबाबांच्या सेवेत होणेकामी, संस्थानमध्ये पर्यवेक्षीय दर्जाची नोकरी मिळणेची विनंती केलेली होती.

श्री साईबाबा संस्थानच्या वाढत्या विकासाच्या दृष्टीने भूसंपादन व जमीन विषयक कामे करणेकामी, यापुर्वी श्री. चंद्रकांत रणशूर, सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांची एकत्रित मानधनावर कंत्राटी सल्लागार या पदावर तात्पुरती नेमणूक करणेत आलेली होती. त्यांना सदरचे पदावर वेळोवेळी मुदतवाढ देणेत येऊन, मा.त्रिसदस्य समितीचे दि.०८/०१/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.६७ नुसार जा. क्र. एसएसएस/साप्रशा/आस्था/३८४४/२०१४ दि.२४/०२/२०१४ अन्वये दि.०१मार्च २०१४ पासून एक वर्ष (दि.२८/०२/२०१५) अखेर रु.१५,०००/- मात्र एकत्रित मानधनावर मुदतवाढ देणेत आलेली होती. तथापी श्री रणशूर हे दि.१९/०५/२०१४ पासून वैद्यकिय कारणास्तव कामावर येत नसल्याने त्यांचे ऐवजी श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे यांची कंत्राटी सल्लागार म्हणून एकत्रित मानधनावर नेमणूकीबाबतचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे दि.२०/११/२०१४ रोजीचे सभेसमोर सादर करणेत आला, त्यावर निर्णय क्र.९९४

"श्री.चंद्रकांत जयवंत रणशूर यांना कंत्राटी सल्लागार या पदासाठी दि.२८/०२/२०१५ अखेर दिलेली मुदतवाढ संपुष्टात आणणेत यावी.तसेच, संस्थानचे भू-संपादन व मालमत्ता विषयक कामांमध्ये अडचणी येऊ नयेत यासाठी सध्या संस्थानला कुशल/अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणाऱ्या ठेकेदारामार्फत एक कुशल कंत्राटी सल्लागार रु.१५,०००/- मात्र एकत्रित मासिक मानधन देण्यात येऊन, एक वर्ष कालावधीसाठी घेण्यात यावा, असा निर्णय झालेला आहे.

उपरोक्त निर्णयानुसार श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे यांना संस्थानला कुशल /अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणाऱ्या ठेकेदारामार्फत कंत्राटी सल्लागार म्हणून रु.१५,०००/- मात्रचे एकत्रित मासिक मानधनावर एक वर्षाकरीता नेमणूक देणेबाबत इकडील विभागामार्फत दि.०४/१२/२०१४ रोजी टिपणी व कार्यादेश सादर करणेत आलेला होता. तथापी सदर टिपणीवर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी, संबधीतांना मा.शासनाचे १४ जानेवारी २०१० रोजीचे शासन निर्णयानुसार, शासकीय कर्मचाऱ्यांना सेवेत मुदतवाढ/ पुनर्नियुक्ती/करार पध्दतीने नियुक्ती देता येत नसलेबाबत समक्ष तोंडी निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार संबधीतांना तात्पुरते नेमणूक देणेबाबतची कार्यवाही रद्द करणेत आलेली आहे. सबब मा.त्रिसदस्य समितीचे दि.२०/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९९४ निरस्त करणे उचित होईल, असे मत आहे.

तरी श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांचा नोकरी मिळणेच्या अर्जाबाबत मा.त्रिसदस्य समितीचे दि.२०/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९९४ निरस्त होणेबाबतचा प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे महाराष्ट्र शासनाचे दि.१४ जानेवारी २०१० रोजीचे शासन निर्णयाचा विचार करता श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांचा नोकरी मिळणेचे अर्जाबाबत दि.२०.११.२०१४ रोजीचे त्रीसदस्य समिती सभेमध्ये झालेला निर्णय क्र.९९४ निरस्त करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.५३** **वाहन क्र.एस.एच.१७/ के- ९९०९ (महिंद्रा कॅम्पर) चे झालेले दुरुस्ती खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** वाहन विभागाकडील वाहन क्रं. एमएच-१७-के-९९०९ (महिंद्रा कॅम्पर) या वाहनाचा वापर कॅन्टीन विभागाकडे चहा, कॉफी, दुध, बिस्कीटे व वॅाटर बॉक्सची इ. वाहतुक करणे कामी होत आहे.

वाहन विभागाकडील दि.०८/०६/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीनुसार, वाहन क्र.एम.एच.१७/के-९९०९ (महिंद्रा कॅम्पर) प्रस्तुत वाहनाची तपासणी केली असता, सदरील वाहनाचे ऑईल लेव्हल वाढलेली आढळली व ऑईल मध्ये डिझेल एकत्र झाल्याचे आढळले. सततचे वापराने वाहनाची पिस्टनची झीज झाल्याचे आढळुन आले होते. त्याच बरोबर बोश फयुएल पंपाचे ऑईल सिल व इतर तत्सम पार्ट सततच्या वापराने झीज होऊन खराब झाल्याचे आढळले

ओरिजनल स्पेअर पार्टसह इंजिन दुरुस्ती व बोश पंप दुरुस्तीचे काम करणे आवश्यक असल्याने तसेच इकडील विभागाचे मोटार मेकॅनिक यांचेकडे वाहन दुरुस्ती कामी आवश्यक असणारे टुल्स व इंजिन उचलण्यासाठी लागणारी लिफ्टींग यंत्रणा नसल्यामुळे तातडीने वाहनाचे दुरुस्तीचे काम अधिकृत शोरुम मध्ये करणे आवश्यक होते.

म्हणुन दि.२८/०५/२०१५ रोजी सदर वाहन महिंद्रा ॲन्ड महिंद्रा कंपनीचे अधिकृत डिलर, मे. जितेंद्र मोटर्स, नाशिक यांचेकडील मालवाहतुक वाहन शाखा कमल कार लाईन प्रा. लि. यांचेकडे पाठवून तपासणीअंती झीज झालेल्या आवश्यकत्या स्पेअरपार्टची बदली करुन दुरुसतीचे काम पुर्ण करण्यात आले आहे. या कामी रक्कम रु.३६,७६०/- (अक्षरी रक्कम रु. छत्तीस हजार सातशे साठ) मात्र खर्च आलेला आहे. सदर बिलांचे खर्चाची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे.

| अ.न | पुरवठाधारकांचे नाव | बील नंबर/दिनांक | एकुण रककम रु. |
|---|---|---|---|
| १. | कमल कार लाईन, प्रा.लि. नाशिक स्पेअर पार्ट बिल | ४०६-१२/०६/२०१५ | २३,०९३.६९ |
| २. | मजुरी बील | ४०७- १२/०६/२०१५ | १३,६६६.३२ |
| | | **एकुण रक्कम** | **३६७६०.००** |
| | | **अक्षरी रक्कम रु. छत्तीस हजार सातशे साठ मात्र.** | |

उपरोक्त प्रमाणे सदर वाहनाचा खर्च मोटारकार दुरुस्ती खर्च या अंदाजपत्रकातुन करता येईल. वर नमूद केलेप्रमाणे (महिंद्रा कॅम्पर) या वाहनाचे दुरुस्ती कामाकरिता रक्कम रु.३६,७६०/- (अक्षरी रक्कम रु.छत्तीस हजार सातशे हजार साठ) मात्र खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.४८८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वाहन क्र.एस.एच.१७/ के- ९९०९ (महिंद्रा कॅम्पर) च्या दुरुस्तीसाठी झालेल्या रु.३६,७६०/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

विषय नं.५४ **वाहन क्रं. एमएच-१७/एजी-२४१८ वाहनाचे दुरुस्ती कामाबाबत.**

प्रस्ताव- वाहन विभागाकडील वाहन क्र.एमएच-१७/एजी-२४१८ (टाटा विंगर रुग्णवाहिका) या वाहनाचा वापर श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये उपचार घेणा-या रुग्णांना पुढील उपचाराकरीता बाहेरील रुग्णालयात घेवुन जाणे तसेच डिस्चार्ज झालेले रुग्ण घरी सोडविणे कामी होत आहे. वाहन चालक यांचे तक्रारी नुसार, सदर वाहन चालवितांना सस्पेंशन मध्ये आवाज येत असलेने वाहनाची ट्रायल घेवुन तपासणी केली असता पुढील सस्पेंशन, बेअरींग व सस्पेंशन प्लेट इ. सततच्या वापराने खराब झाल्याचे आढळुन आले.

सदर वाहनाचे सस्पेंशनचे काम करणेसाठी आवश्यक असणारी यंत्रणा वाहन विभागाकडे उपलब्ध नसलेने, प्रस्तुत वाहनाचे दुरुस्तीचे काम अधिकृत सर्व्हिस / डिलर यांचेकडून करणे बाबत इकडील मोटार मेकॅनिक यांनी त्यांचे वर्कशॉप रिपोर्ट मध्ये नमुद केलेली आहे. अवलोकनार्थ वर्कशॉप रिपोर्ट सोबत देत आहोत. या कामी अंदाजे रक्कम रु.३५,०००/- (अक्षरी रक्कम रु. पस्तीस हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्च मोटारकार दुरुस्ती खर्च या अंदाजपत्रकातुन करता येईल. रुग्णवाहीका ही अत्यावश्यक सेवा असलेने तसेच सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ माहे ऑगस्ट ते सप्टेंबर या महिन्यात असल्याने सदर रुग्णवाहीका तातडीने दुरुस्त होणे गरजेचे आहे.

तरी वरील प्रमाणे वाहन क्र.एमएच-१७/एजी-२४१८ (टाटा विंगर रुग्णवाहीका) या वाहनाचे दुरुस्तीचे काम टाटा कंपनीचे अधिकृत डिलर, स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर यांचेकडून करुन घेणेस व या कामी येणा-या अंदाजे रु.३५,०००/- (अक्षरी रक्कम रु. पस्तीस हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.४८९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन क्रं. एमएच-१७/एजी-२४१८ वाहनाची दुरुस्ती करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणा-या अंदाजे रु.३५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

विषय नं.५५ **शिर्डी ते नगरसुल रेल्वे स्टेशन चालणा-या बसेसचा वार्षिक टॅक्सचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम-२०१४ मधील तरतुद:-** १७ (०१), २१ (०१-ग,ज).

**प्रस्ताविक:-** वाहन विभागाकडील बस क्रं.एमएच-१७/टी-७१०९ व टी-७११० या दोन बसेसचा वापर साईभक्तांना नगरसुल रेल्वेस्टेशन येथे घेवुन जाणे व येणे कामी होत आहे. दोन्ही बसेसच्या वार्षिक टॅक्सची मुदत दि.३१/०८/२०१५ रोजी संपुष्टात येत असलेने दि.२६/०६/२०१५ रोजी मा. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर यांनी एटी फॉर्मनुसार, खालील तपशिलाप्रमाणे मा.उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपुर यांचे नांवे ॲडव्हान्स रक्कमेचा डी.डी. घेण्यात आला होता.

| अ.नं. | बँकेचे नांव | डी.डी. नं/ दिनांक | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| ०१ | भारतीय स्टेट बँक शाखा-शिर्डी | ७०५५०६-२५/०७/२०१५ | ५,९४,०००.०० |
| | | **एकुण रक्कम (रु.)** | **५,९४,०००.००** |

सदर कामाकरीता झालेल्या खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.नं. | बस क्रमांक | पावती नं. / दिनांक | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| ०१ | एमएच-१७-टी-७१०९ | ४०४२६८-३०/०७/२०१५ | २९७०००.०० |
| ०२ | एमएच-१७-टी-७११० | ४०४२६७-३०/०७/२०१५ | २९७०००.०० |
| | | **एकुण रक्कम (रु.)** | **५,९४,०००.००** |

उपरोक्त प्रमाणे ०२ बसेस वाहनांचा आर.टी.ओ. कार्यलयात वार्षिक टॅक्स भरणे कामी रु.५,९४,०००/- (अक्षरी रक्कम रु.पाच लाख चौ-यान्नव हजार) मात्र खर्च झालेला आहे. सदर खर्च मोटारकार कर व भाडे या अंदाजपत्रकातुन करता येईल.

**मागणी:-** तरी वरील प्रमाणे दोन बसेस वाहनांच्या वार्षिक टॅक्सची रक्कम भरणे कामी झालेल्या एकुण रक्कम रु.५,९४,०००/- (अक्षरी रक्कम रु.पाच लाख चौ-यान्नव हजार) मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांच्या सोयीसाठी शिर्डी ते नगरसुल रेल्वे स्टेशन चालणा-या बसेसचा वार्षिक टॅक्स भरणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी आलेल्या रु.५,९४,०००/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.५६** **वाहन क्रं. एमएच-१७/एजी-२०३१ (तवेरा रुग्णवाहीका) चे दुरुस्ती कामांबाबत.**

**प्रस्ताव-** वाहन विभागाकडील दि.१९/०८/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीनुसार, वाहन क्रं.एम.एच.१७/एजी-२०३१ (तवेरा रुग्णवाहीका) या वाहनास वाहन चालक यांचे तक्रारीनुसार, सततचे वापराने गिअर बॉक्स मध्ये आवाज येत असलेने, सदर वाहन दि.०८/०८/२०१५ रोजी तवेरा रुग्णवाहीका गाडी शेवरोलेट कंपनीचे अधिकृत डिलर, साईदिप कार्स प्रा.लि., अहमदनगर यांचेकडे तपासणी करीता पाठविली असता त्यांनी ई-मेल पत्राद्वारे दुरुस्ती कामाकरीता रु.४३,८३३/- मात्र खर्च येणार असलेचे कळविलेले होते. रुग्णवाहीका ही अत्यावश्यक सेवा असलेने तसेच सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ माहे ऑगस्ट ते सप्टेबर या महिन्यात असल्याने सदर रुग्णवाहीका क्रं.एम.एच.१७/एजी-२०३१ (तवेरा रुग्णवाहीका) या वाहनाचे दुरुस्ती काम साईदिप कार्स, प्रा.लि., अहमदनगर यांचेकडून करुन घेणेस व याकामी येणा-या खर्चाचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करणेस मान्यता देण्यात आली होती.

उपरोक्त मान्यतेनुसार, साईदिप कार्स, प्रा.लि., अहमदनगर यांना रुग्णवाहीका क्रं.एम.एच.१७/एजी-२०३१ (तवेरा रुग्णवाहीका) या वाहनाचे दुरुस्ती काम करणेबाबत कळविले होते. त्यानुसार त्यांनी दि.०३/०९/२०१५ रोजीचे ई-मेल पत्रानुसार, दुरुस्तीचे काम पुर्ण केलेनंतर वाहनाची ट्रायल घेतली असता पुन्हा गिअर बॉक्स मध्ये आवाज येत असलेने गिअर बॉक्स खोलुन तपासले असता, काऊंटर शाफ्ट खराब असल्याचे अढळुन आलेने सदर पार्ट बदली करुन वाहनाचे दुरुस्तीचे काम करुन घेणेस व याकामी सोबतच्या इस्टीमेंटनुसार, एकुण रु.५१,२९७/- मात्र खर्च येणार असलेचे कळविलेले आहे.

तरी साईदिप कार्स प्रा.लि., अहमदनगर यांचेकडून त्यांचे दि.०३/०९/२०१५ रोजीचे ई-मेल पत्रानुसार रुग्णवाहीका क्रं.एम.एच.१७/एजी-२०३१ वाहनाचे दुरुस्तीचे काम करुन घेणेस व याकामी येणा-या रु.५१,२९७/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.४९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन क्रं. एमएच-१७/एजी-२०३१ (तवेरा रुग्णवाहीका) चे दुरुस्ती करणेच्या उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी आलेल्या रु.५१,२९७/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.५७** **देणगी अग्नीशामक वाहनाचे विमा खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** आग्नीशामक वाहन (फोमटेंडर) करीता आवश्यक असलेली आयशर कंपनीची चेसी (मॉडेल-20.16CWC PS CR BS-III) साईभक्त, श्री मिरपुरी यांचेकडून मे.लक्ष्मी इंटरनॅशनल, लॉस एंजेलिस, यु.एस.ए. यांनी दि.२६/०८/२०१४ रोजी देणगी दिलेली होती. तसेच सदर चेसीवर अग्नीशामक वाहना (फोमटेंडर) करीता बॉडी बांधणीचे काम शासकिय दरानुसार (रु.१९,६०,०००/-) सर्व खर्चासह मे.देवी फायर सर्व्हिसेस, सोलापुरचे मालक, साईभक्त, श्री दिलीप राऊत हे देणगी स्वरुपात तयार करुन देत आहेत.

अग्नीशामक वाहनाकरीता देणगी स्वरुपात मिळालेल्या चेसीचा विमा दि.०१/०९/२०१४ ते दि.३१/०८/२०१५ अखेर एक वर्षाकरीता दि.न्यू इन्डिया एश्योरन्स कंपनी लि. यांचेकडून उतरविण्यात आला होता. सदर विमा पॉलीसीची मुदत दि.३१/०८/२०१५ रोजी संपुष्टात येत असलेने पुढील वर्षाकरीता विमा पॉलीस नुतनीकरण करणे आवश्यक आहे.

सन २०१५-१६ या वर्षा करीता संस्थानकडील सर्व वाहनांचा विमा दि.न्यू इन्डिया एश्योरन्स कंपनी लि., यांचेकडे उतरविण्यात आलेला आहे. नवीन देणगी अग्निशामक वाहनाची (फोमटेंडर बॉडीसह) विमा पॉलीसी नुतनीकरण बाबत दि.न्यू इन्डिया एश्योरन्स कंपनी लि. यांचेशी विचारणा केली असता त्यांनी दि.२८/०८/२०१५ रोजीचे पत्राने अग्नीशामक वाहनाची पुढील एक वर्षाचा विमा नुतनीकरण करणे कामी रु.३५,४५६/- मात्र खर्च येणार असले बाबत कळविलेले आहे. सदरचा खर्च मोटारकार विमा खर्च या अंदाजपत्रकातुन करता येईल.

तरी उपरोक्त प्रमाणे नवीन आग्निशामक वाहनाची (फोमटेंडर बॉडीसह) विमा पॉलीसी नुतनीकरण करणे कामी येणा-या रक्कम रु.३५,४५६/- (अक्षरी रक्कम रु. पस्तीस हजार चारशे छपन्न) मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता असावी.

**निर्णय क्र.४९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नवीन आग्निशामक वाहनाची (फोमटेंडर बॉडीसह) विमा पॉलीसी नुतनीकरण करणेच्या उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी आलेल्या रु.३५,४५६/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.५८** **कै.वामन गोंदकर यांचे छायाचित्र सभामंडपात लावणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री अमृतराव मुरलीधर गोंदकर पाटील, रा.शिर्डी यांनी आ.नं.२३४७५, दि.११/०३/२०१५ रोजीचे पत्रान्वये विनंती केलेली आहे, "कै.वामनराव माणकोजी पा. गोंदकर हे श्री साईबाबांचे समकालीन भक्त होते. श्रीसाईबाबा गावात पाच घरी भिक्षा मागत. त्यापैकी पहिले घर कै.वामन गोंदकर यांचे होते. असा उल्लेख श्रीभक्तिसारामृत या ग्रंथाचे पान क्र.२६९, ओवी क्र.८३,८४ व ८५ मध्ये आहे. श्रीसाईबाबा रोज लेंडीबागेतील झाडांना पाणी घालत असत. त्यासाठी बाबांना लागणारी मडकी कै.वामनराव पा. गोंदकर हे पुरवित असत असा उल्लेख श्रीसाई चरित्र या ग्रंथाचे पा.क्र.५८, अध्याय क्र.५ ओवी क्र.४६,४७,४८,४९ मध्ये आहे. तसेच एक दिवस श्रीसाईबाबांनी राधाकृष्णमाई यांचे घराकडे जाण्यास कै.वामनराव पा. गोंदकर यांचे घराला लावण्यात आलेल्या शिडीवरुन गेले असा उल्लेख श्रीसाई चरित्र या ग्रंथाचे पान क्र.२५४ अध्याय क्र.१९ ओवी क्र.२३५,२३६,२३७,२३८ मध्ये आहे. तरी कै.वामनराव (दादा) माणकोजी पा. गोंदकर यांचे छायाचित्र लावणेस आज्ञा व्हावी." तसेच त्यांना सुलभ संदर्भाकरीता या ग्रंथाच संबंधित पानांच्या झेरॉक्स सोबत जोडल्या आहेत.

सध्या श्रींचे समाधी मंदिराचे सभामंडपाचे चारही बाजूने पुर्वीपासुन एकूण ५३ फोटो लावण्यात आलेले आहेत व यामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही. तसेच सदर फोटोचे खालच्या बाजुस प्रत्येकाचे नामफलक लावण्यात आलेले आहेत. सध्याचे गर्दीचे प्रमाण दिवसें-दिवस वाढत आहे. त्यामुळे साईभक्तांना सदरचे फोटो व्यवस्थित पाहता येत नाही व त्या व्यक्तींसंबंधी माहितीही मिळत नाही. याबाबत संस्थानचे सल्लागार व पुरातत्व तज्ञ मा.श्री.सदाशिवराव गोरक्षकर सो. यांनी यापुढे श्री समाधी मंदिरात फोटो लावण्यात येऊ नयेत, भक्तांना त्याबाबत माहिती मिळत नाही. संस्थानचे आर्ट गॅलरी (म्युझियम) विस्तारीकरणानंतर सर्व फोटो त्यांचे माहितीसह त्याठिकाणी लावण्यात यावे, अशी सूचना केली आहे. त्याचप्रमाणे सध्या श्रींचे वस्तू संग्रहालयामध्ये जागाही अपुरी असल्याने मंदिर नुतनीकरण झाल्यानंतर त्यावेळी नवीन मोठे संग्रहालय बनविण्यात येईल व त्यावेळी सर्वच साईबाबांचे सानिध्यातील व श्रीसाईसच्चरितामध्ये उल्लेख असलेले साईभक्तांचे छायाचित्र सदर ठिकाणी लावणेबाबत विचार होऊ शकेल. सध्या असलेल्या फोटोमध्ये नवीन फोटो लावण्याचे असल्यास इतरही बरेच साईभक्तांचे वंशज त्याचा आग्रह धरतील.

यापुर्वी कै.सौ.गंगुबाई औरंगाबादकर यांचा फोटो समाधी मंदिरात लावणेबाबत श्रीदत्तात्रय वासुदेव औरंगाबद यांनी दि.२७/०६/२००७ रोजी अर्ज केला होता. त्यावेळी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०७/२००७ रोजी विषय नं.६२ अन्वये ठेवण्यात आला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन सदर प्रस्ताव तूर्त तहकूब ठेवण्यात यावा असे ठरले होते.

तरी श्री.अमृतराव मुरलीधर गोंदकर पाटील, रा.शिर्डी यांनी दिलेल्या अर्जानुसार कै.वामनराव (दादा) माणकोजी पा.गोंदकर यांचे छायाचित्र लावणेबाबत मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेमध्ये निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.४९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिरातील सभामंडपामध्ये छायाचित्र लावणेबाबतचा पूर्वीचा प्रस्ताव तहकुब ठेवण्यात आलेला असल्यामुळे सदरहू प्रस्तावही तूर्त तहकुब करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.५९** **गुरुस्थान निंबवृक्षापासून टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.08/01/2014 रोजीच्या सभेतील विषय क्रं.44 व निर्णय क्रं.43 अन्वये समाधी मंदिर परिसरातील गुरुस्थान निंबवृक्षाच्या झाडापासुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेस व याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे.

दि. 08/10/2015 गुरुवार रोजी, राहुरी कृषी विद्यापीठाला भेट दिली असता त्याठिकाणी डॉ. अशोक जाधव - टेक्नॉलजी यांचेशी गुरुस्थान निंबवृक्षापासुन टिश्युकलचर पध्दतीने रोपे तयार करणेकामी चर्चा झाली. त्यामध्ये डॉ. अशोक जाधव यांनी निंबवृक्ष हे झाड असल्याने त्याची पॅटेन होणार नाही त्यामुळे गुरुस्थान निंबवृक्षाचे रजिस्ट्रेशन करावे लागणार असलेबाबत कळविलेले आहे.

तसेच टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेसाठी एक स्वतंत्र युनीट करावी लागणार आहे. युनीट तयार करणेसाठी त्यात 1 ते 2 शास्त्रज्ञ तसेच कामगार नेमावे लागतील. तसेच या सर्वांचा खर्च(पगार) संस्थानला करावा लागणार आहे. साधारणत: शास्त्रज्ञ व कामगारांचा वार्षीक पगार, औषधांचा खर्च असाएकुण अंदाजे वार्षीक खर्च रु. 12 ते 15 लाख इतका होईल. शास्त्रज्ञ व कामगारांची युनीट ही 2 ते 3 वर्ष काम करणार आहे. त्यानंतर पोट्रोकॉल डेव्हलपमेंट होऊन सदर ठिकाणी काम करावयाचे कि संस्थानला लॅब तयार करावयाची याबाबतचा निर्णय पुढे करावा लागेल. तसेच यासाठी प्लॉस्टीक पिशव्या आणणे, रोपे तयार करणे हा पुढचा होणारा खर्च वेगळाच आहे.

माहे एप्रिल, मे या कालावधीत झाडाला नविन शेंडे उगवत असतात. त्यावेळी टिश्युकल्चरचे काम करावे लागणार आहे. त्यामुळे सदर निंबवृक्षाचे गुणधर्म तपासणे आवश्यक आहे. त्यासाठी झाडाची फिंगर प्रिंन्ट (DNA Test) करावी लागेल. यासाठी साधारणत: 1 झाडाच्या फिंगर प्रिंन्ट टेस्टसाठी रु.25,000/- मात्र खर्च येईल. तसेच DNA Test ही झाली तर 15 ते 20 दिवसात होते नाहीतर वर्षभरही होत नाही. यासाठी गुरुस्थान निंबवृक्ष तसेच अन्य दोन-चार वृक्षांची फिंगर प्रिंन्ट तपासणी करण्यात येऊन या झाडाबद्दल विशेष काय आहे ह्यासाठी तपासणी करणे महत्तवाचे आहे.

बियाणे विभागाचे श्री शेलार सो. यांचेशी समक्ष भेट घेऊन चर्चा केली असता त्यांनी झाडाचे व्हरायटी रजिस्ट्रेशन करणे गरजेचे आहे. करण यामुळे संस्थान व्यतरीक्त कोणीही रोपे तयार करणार नाही असे कळविलेले आहे. गुरुस्थान निंबवृक्ष झाडाची पाने गोड आहेत का नाही हे तपासुन रजिस्ट्रेशन होईल. व त्यानंतर त्यावर कार्यवाही होऊ शकते.

टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेसाठी डॉ.अशोक जाधव यांनी शिर्डी येथे येऊन प्रेझेन्टेशन देऊन पुढील कार्यवाही करता येईल असे सांगीतलेले आहे.

परंतु प्रथमता आपल्याला झाडांची फिंगर प्रिन्ट व बायोकेमेस्टीक लॅब कडुन पानाचे गुणधर्म तपासणे आवश्यक आहे. त्यासाठी अंदाजे रु.3,00,000/- (तिन लाख) मात्र खर्च अपेक्षीत आहे. तरी फिंगर प्रिन्ट व पानाचे गोड असल्याचा गुणधर्म तपासणी प्रथम करावी लागणार आहे त्यानुसार झाडाचे रजिस्ट्रेशन होईल.

तरी महात्मा फुले कृषी विद्यापीठ-राहुरी यांचेकडुन किंवा अन्य शासकिय लॅबकडुन/ प्रयोगशाळेकडुन झाडाची फिंगर प्रिन्ट व पानाचे गोड असल्याचा गुणधर्माची तपासणी करुन घेता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, गुरुस्थान निंबवृक्षापासून टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.६०** **चनाडाळ व मुग यांच्या बिलाबाबत.**

**प्रस्ताव-** मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांनी उपरोक्त विषयी संदर्भिय पत्र व त्यासोबत बिल क्र.२७१४ दि.२४.११.२०१४ संस्थानकडे सादर केले आहे. सदर पत्रामध्ये त्यांनी चनादाळ व मूग बील नं. २७१४ रू. ४,११,२४८/- प्रमाणे पुरवठा केलेला आहे. परंतु सदर बीलाची रक्कम आज पावेतो मिळालेली नाही. तसेच मला सदर बील रद्द करून दुसरे बील देण्यात यावे असे कळविले होते, परंतु सदर चनादाळ व मुग संस्थानने वापरून घेतली असल्यामुळे सदर बील रदद् न करता आहे ते बील ग्राहय धरून वाटल्यास नियमाप्रमाणे दंड आकारून मला रक्कम आदा करावी. अशी विनंती केली आहे.

सदर प्रकरण हे नोव्हेंबर-२०१४ मधील आहे. याबाबत कागदपत्रावरून जी वस्तुस्थिती समजते ती खालीलप्रमाणे–

माहे ऑक्टोबर-२०१२ ते मार्च-२०१५ या कालावधीतील किराणा मालाचे खरेदीसाठी मे. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांना २१ किराणा माल आयटेमसाठी ३,४९,३१,७८५/- इतक्या रकमेचा पुरवठा आदेश दिलेला होता. यामध्ये हरबरादाळ ५००० क्विंटल, प्रती क्विंटल ३६४०/- दराने रू. १८२,००,०००/- व मूग ५७५ क्विंटल ६९००/- प्रती क्विंटल दराने रू.३९,६७,५०० या मालाचा समावेश होता.

वरील पुरवठा ओदशास अनुसरून मे. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांनी दिनांक २५.११.२०१४ रोजी हरभराडाळ ८,४६६ किलो (१०० गोणी) व मूग १,४९४ किलो (३० गोणी) दि. २५.११.२०१४ रोजी पुरविले होते. भांडार माल तपासणी रजिस्टर पा.नं. ३९ अ.नं. ३ वर सदर माल नमुन्याप्रमाणे बरोबर आहे अशी नोंद असून, प्र.अधिक्षक लाडू प्रसाद विभाग, प्र. अधिक्षक खरेदी विभाग व अधिक्षक भांडार विभाग यांच्या स्वाक्ष-या आहेत.

सदर हरबरादाळ दि. २६.११.२०१४ रोजी दक्षता पथकाने तपासणीसाठी महात्मा फुले कृषी विदयापीठ, राहुरी येथे तपासणीसाठी पाठविण्यास कळविले होते. त्याप्रमाणे तपासणी कामी पाठविण्यात आलेली आहे, मात्र त्याबाबत त्यांचा काही अभिप्राय आल्याचे इकडील कार्यालयात आढळून येत नाही.

सदर हरबरादाळीबाबत खरेदी विभागाकडील दि. ०५.१२.२०१४ रोजी सविस्तर टिपणी सादर करण्यात आलेली होती. यामध्ये मे. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांना हरबरादाळ पुरविणेकामी काळया यादीत टाकणेबाबत सदरचा विषय मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत प्रस्तावित करण्यात आले होते.

त्यामध्ये मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिले होते.

१. पुरविण्यात आलेल्या डाळीचे नमुने Standarred नमुन्याच्या दर्जाशी कोणत्याही निकशावर जुळत नसल्याचे सकृत दर्शनी दिसते.

२. फरक सूपष्ट असतानाही संबंधीतांनी असा माल स्विकारुन तो वापरात आणणे अतिशय अक्षेपार्ह आहे. केवळ Vigilance branch ने पाहणी केल्यामुळे ही बाब निदर्शनास आली आहे., अन्यथा ? --------

३. सदरच्या जाणीव पुर्वक केलेल्या कृत्याप्रकरणी संबंधीत कर्मचा-यांना Show Case देऊन पुढील कारवाई करता येईल.

४. पुरवठादाराविरुध्द Contract रद्द करणे तसेच Black List करणे या सारखी कारवाई त्वरीत करावी लागेल.

५. त्रिसदस्यीय समितीच्या मान्यतेनंतर त्वरीत कारवाई करावी लागेल.

त्यास अनुसरून सदर विषय मा. त्रिसदस्यीय समितीचे दिनांक ०६.१२.२०१४ रोजी मा. अध्यक्ष महोदय यांचेकडे Circulatery अजेंडा तयार करून सादर करण्यात आला असता, "पुरवठादारास कारणे दाखवा नोटीस बजवावी. संबधीत कर्मचा-यास तशीच कारणे दाखवा नोटीस बजवावी. गुरूवार दि. १०.१२.२०१४ चे मिटींगमध्ये पुढील निर्णयास्तव ठेवावे" असे निर्देश दिलेले आहेत.

वरील निर्देशास अनुसरून जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/४२५/२०१४ दिनांक ०६.१२.२०१४ अन्वये मे. जयहिंद किराणा स्टोअर्स यांना नोटीस देऊन दिनांक ०८.१२.२०१५ पर्यंत खुलासा मागविण्यात आला होता.

मे.जयहिंद किराणा स्टोअर्स यांनी मी गेल्या कित्येक वर्षांपासून संस्थानचा पुरवठादार आहे व संस्थानला आजपर्यंत जो माल पुरवठा केलेला आहे, तो संपूर्ण माल मी संस्थानच्या नमुन्याप्रमाणेच पाठविलेला आहे व सदर चनादाळीचे १७० कट्टे आपणाकडे शिल्लक असतील, तर ते कट्टे बदलून देण्यास तयार आहे, असे म्हटले आहे.

मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांचे दिनांक ०८.१२.२०१४ चे पत्र मा. त्रिसदस्यीय समितीचे दिनांक ०९.१२.२०१४ रोजीचे सभेत सादर केले असता, " निकृष्ट दर्जाच्या मालापोटी पुरवठादाराचे देयक रद्द करण्यात यावे, असे मा.अध्यक्ष महोदय व मा.कार्यकारी अधिकारी महोदय याचे दिनांक ०९.१२.२०१४ चे चर्चेत ठरले होते. मा.अध्यक्ष महोदयांचे सदर निर्देशास अनुसरून मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांचे याकामीचे बील नं. २७१४ दि. २४.११.२०१४ रक्कम रू. ४,११,२४८/- आदा करण्यात आलेले नव्हते.

आता मे. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांनी संदर्भिय पत्राने सदर चनादाळ व मूग संस्थानने वापरून घेतली असल्यामुळे सदर बील रद्द न करता माझे ते बील ग्राहय धरून वाटल्यास नियमाप्रमाणे दंड आकारून रक्कम आदा करण्याची विनंती केली आहे.

सदर हरबरादाळ व मूग संस्थानने वापरलेले आहे ही वस्तू स्थिती आहे.

करारनाम्यातील अट शर्त क्रमांक ६ मध्ये- .

"अपवादात्मक परिस्थितीमध्ये स्विकारलेल्या मालाच्या जातीत/ दर्जात/ प्रकारात काहीही बदल आढळल्यास अथवा तो योग्य नसल्यास सदर मालाच्या बीलामधून नमुन्याच्या गुणवत्तेनुसार २% ते १०% पर्यंत रक्कम कपात करण्याचा अधिकार पार्टी नं.१ यांना राहिल," असे नमुद केले आहे.

तरी मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांचे वरील पत्रातील विनंतीबाबत उचित आदेश होणेकामी किंवा करारनाम्यातील अटी शर्तीनुसार २% ते १०% पैकी काही टक्के रक्कम कमी करुन उर्वरीत रक्कम त्यांना आदा करता येईल किंवा कसे? याबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित हरबरादाळ व मूगाचा वापर करण्यात आलेला असल्यामुळे करारनाम्यातील अट/ शर्त क्र.०६ अन्वये मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांना १०% दंड करणेत येऊन, त्यांच्या बीलाची उर्वरित रक्कम आदा करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.६१** **विद्युत विभागाचे वार्षिक साहित्य खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** विद्युत विभागास आवश्यक वार्षिक साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.१,९२,३९,२०५/- (अक्षरी रु. एक कोटी, ब्याण्णव लाख, एकोणचाळीस हजार, दोनशे पाच) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समितीचे दि.१५.०३.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २२५ नुसार मान्यता मिळालेली आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचीही मान्यता (सिव्हिल ॲप्ली नं..८६८६) दि.२६.०९.२०१४ रोजी मिळालेली आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव दि.१५.१०.२०१४ रोजी पुढील कार्यवाहीसाठी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे. त्यानंतर निविदा मसुदा मा. मुख्यलेखाधिकारीसाहेब यांचेकडून तपासून घेण्यात आला. तसेच विद्युत विभागाकडून साहित्याची यादी दि.२२.०१.२०१५ रोजी तपासून घेण्यात आली. त्यानंतर दि.२८.०१.२०१५ ते दि.१०.०२.२०१५ याकालावधीत ई-निविदा मागविणेत आलेल्या होत्या. त्यामध्ये तांत्रिक निविदा उघडल्यानंतर तीन निविदा प्राप्त झालेल्या होत्या, परंतू त्यामध्ये एक निविदाधारक तात्रिकदृष्टया अपात्र ठरल्याने फेर निविदा प्रक्रिया राबविणेत यावी असे ठरले. त्यानुसार पुन्हा दि.१७.०३.२०१५ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन फेर ई-निविदा प्रक्रिया करण्यात आलेली होती. निविदा भरण्याचा कालावधी दि.२३.०३.२०१५ रोजी सकाळी ११.०० वा पासून ते दि.०४.०४.२०१५ रोजी सायं ०५.०० वा असा ठेवण्यात होता.

ऑनलाईन निविदेसोबत सादर केलेले (Technical Bid) दि.०९.०४.२०१५ रोजी मा.प्रशासकीय अधिकारीसाहेब व मा.मुख्यलेखाधिकारीसाहेब यांचे समक्ष उघडून तांत्रिक कागदपत्रांची (Technical Bid) लेखाशाखेमार्फत पडताळणी केली असता, ऑनलाईन प्राप्त पाचही निविदाधारकांच्या निविदा तांत्रिकदृष्टया पात्र ठरविलेल्या आहेत. पाचही निविदाधारकांच्या मूळ निविदा दि.२०.०६.२०१५ रोजी मा. प्रशासकीय अधिकारीसाहेब यांचे समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत.

सदर तुलनात्मक तक्त्यातील तपशिल पाहता-

**अ) अ.नं.** - ०१,०२,०३,०४,०५,०६,०७,०८,०९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१,२२,२३,२४, २५,२६,२७,२८,२९,३०,३१,३२,३३,३४,३५,३६,३७,३८,३९,४०,४१,४२,४३,४४,४५,४६,४७,४८,४९,५०,५१, ५२, ५३,५४,५५,५६,५७,५८,५९,६०,६१,६२,६३,६४,६५,६६,६७,६८,६९,७०,७१,७२,७३,७४,७५,७६, ७७,७८, ७९,८०,८१,८२,८३,८४,८५,८६,८७,८८,८९,९०,९१,९२,९३,९४,९५,९६,९८,९९,१००,१०१,१०२,१०३,१०४, १०५, १०६, १०८,१०९,११०, १११,११२,११३,११४,११५,११६, ११७,११८,११९,१२०,१२१, १२२,१२३, १२४, १२५, १२६,१२७, १२८,१२९,१३०,१३१, १३२,१३३,१३४,१३५,१३६,१३७,१३८,१३९,१४०, १४१, १४२, १४३, १४४,१४५,१४६,१४७, १४८,१४९,१५०,१५१,१५२,१५४,१५५,१५६,१५७, १५८,१५९,१६०,१६१, १६२,१६३, १६४,१६५,१६६,१६७,१६८, १६९,१७०,१७१,१७२,१७३,१७४,१७५,१७६,१७७, १७८,१७९, १८०,१८१, १८२, १८३, १८४,१८५,१८६,१८७,१८८, १८९,१९०,१९१,१९२,१९३, १९४,१९५, १९७,१९८, १९९, २००,२०१, २०२, २०३, २०४,२०५,२०६,२०७,२०८,२०९, २१०,२११,२१२,२१३,२१४,२१५, २१६, २१७, २१८,२१९, २२०,२२१, २२२,२२३,२२४,२२५,२२६,२२७, २२८,२२९, २३०,२३१,२३२,२३३, २३४, २३५,२३६,२३७, २३८, २३९,२४०, २४१, २४२,२४३,२४४,२४५,२४६,२४७,२४८,२४९, २५०,२५१, २५२, २५३,२५५,२५६,२५७,२५८,२५९,२६०, २६१, २६३, २६४,२६६,२६७,२६९,२७०,२७१,२७३,२७४, २७५, २७६, २७७,२७९,२८०,२८१,२८२,२८३,२८४, २८५, २८६,२८७,२८८,२९१,२९२,२९३,२९४,२९५,२९६, २९७, २९८,२९९,३००,३०१,३०२,३०३,३०५,३०६, ३०७, ३०८, ३०९,३११,३१२,३१३,३१४, ३१५,३१६, ३१७, ३१८,३२०, ३२६,३२७,३२८,३२९,३३०,३३१, ३३२, ३३३, ३३४,३३५,३३६,३३७, ३३८, ३३९,३४०, ३४१,

३४२,३४३,३४५,३४७, ३५०,३५१,३५२,३५४,३५६,३६०, ३६१, ३६३,३६४,३६५, ३६६,३६९, ३७०, ३७२, ३७३,३७४,३७५,३७६,३७७,३७८, ३७९,३८०,३८१, ३८२,३८४, ३८५, ३८६,३८७,३९०, ३९१,३९२, ३९३, ३९४,३९५,३९६,३९९,४००,४०१,४०२,४०३, ४०४,४०५,४०७,४०८, ४२५, ४२६,४२८,४२९,४३२, ४३३, ४३४, ४३८,४३९,४४६,४४७,४५७,४६२,४६३,४६६,४६७, ४७०,४७१,४७२, ४७३, ४७६,४७७,४७८, ४७९, ४८०, ४८१,४८२,४८३,४८४ करीताचे साहित्याचे दर न्युनत्तम असल्याने त्यातील न्युनत्तम दरधारकांना पुरवठा आदेश देता येईल. याकामी तीन किंवा त्यापेक्षा जास्त निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले आहेत. वरील अ प्रमाणे न्युनत्तम दरधारकांना पुरवठा आदेश द्यावयाचे झाल्यास

**A) मे.एक्सल ट्रेडींग कंपनी, मुंबई** यांचे अ.नं.१०,२३,४३,७०,८५,८८,११२,११३,१३५,१३६, १३८, १४३, १४४,१४५,१८०,१८६,१८७,२००,२०१,२३४,२४०,२४२,२५३,२६१,२६४,२६७,२७०,२७७,२७९,२९१, २९२, २९३,२९७,२९९,३०२,३०३,३११,३२८,३३०,३३१,३३२,३३३,३३४,३३५,३३६,३३७,३३८,३४०, ३५२, ३५४, ३६०, ३८१,३९०,३९२,३९३,३९६,४०५,४२५,४२६,४२८,४३२,४४६,४४७,४६२, ४६३,४७३, चे साहित्यासाठी न्युनत्तम दर आलेले आहेत.

**B) मे.यशवंत इलेक्ट्रीकल्स् ॲन्ड कॉन्ट्रटर, अहमदनगर** यांचे अ.न. ०९,२१,२८, ३१,६२,६५,६७, ६८, १०४, १०५,११०,११९,१२०,१२१,१२२,१२४,१२५,१२६,१२८,१३९,१५५,१८५,२०७,२०८,२०९,२२४,२३३, २५६,२५९,२६०,२७१,२८५,२८७,२८८,२९४,२९५,२९६,३००,३०२,३०५,३०६,३०७,३२७,३४५,३४७,३५६, ३७६, ४०४, चे साहित्यासाठी न्युनत्तम दर आलेले आहेत.

**C) मे.श्री.व्यंकटेश्वरा ट्रंकी प्रोजेक्ट सोल्युशन प्रा.लि., पुणे** यांचे अ.नं. ०२,०५,०७,१३,१४, १५,१६, १७, १८, २४,२५,२९,३०,३३,३४,३५,३६,३८,३९,४०,४१,४२,५१,५२,५६,५७,५८,५९,६०,६३,६४,६५,६९,७१, ७८, ७९,८०,८१,८३,८४,८६,८७,९५,९६,९८,९९,१००,१०८,१०९,१११,११६,११७,१२७,१२९,१३०,१३१,१३२, १३३, १३४,१४१,१४८,१४९,१५१,१५४,१५८,१६०,१६२,१६४,१६५,१६७,१७१,१७२,१७५,१७६,१७७,१८१, १८२, १८३,१८४,१९२,१९३,१९४,१९५,१९७,१९९,२०२,२०३,२०६,२०७,२१०,२११,२१३,२१४,२१५,२१६, २१७, २१८, २२६,२२७,२२८,२२९,२३०,२३१,२३२,२३७,२४१,२४३,२४४,२४५,२४६,२४९,२५०,२५२,२५८, २६६, २७३,२७४, २७६,२८३,३०१,३०८,३०९,३१२,३१३,३१८,,३२०,३२६,३२९,३४१,३४२,३४३,३५०, ३५१, ३६१, ३६३,३६४,३६५,३६६,३६९,३७२,३७३,३७४,३७७,३७८,३७९,३८०,३८२,३८४,३८५,३८६,३८७, ३९१, ३९४, ३९५,३९९,४००,४०१, ४०२,४०३,४०७,४०८,४३३,४३४,४३८,४३९,४५७,४६७,४७७,४७८,४८१, ४८२, ४८३ चे साहित्यासाठी न्युनत्तम दर आलेले आहेत.

**D) मे.इंटरनॅशनल इलेक्ट्रीकल्स्, अहमदनगर** यांचे अ.नं. ०१,०३,०४,०६,०८,११,१२,१९,२०, २२,२३, २६, २७, २९,३२,४४,४५,४६,४७,४८,४९,५०,५३,५४,५५,६१,६५,६६,७२,७३,७४,७५,७६,७७,८२,८९,९१,९२, ९३, ९४,१०१,१०२,११४,११५,१२३,१४२,१४७,१५०,१५६,१५७,१५९,१६१,१६३,१६६,१६८,१६९, १७०,१७३, १७४, १७९,१९०,१९८,२०४,२०५,२१२,२१९,२२०,२२१,२२२,२२३,२२५,२३६,२३८,२३९,२४८,२५१,२५५, २५७, २६३,२७५,२८४,२९८,३३९,३७०,४६६,४७०,४७१,४७२,४७९,४८०,४८४ चे साहित्यासाठी न्युनत्तम दर आलेले आहेत.

**E) मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक** यांचे अ.नं. ३७,९०,१०३,१०६,११८,१३७,१४०,१४६, १५२, १७८, १८८,१८९,१९१,२३५,२४७,२६९,२८०,२८१,२८२,२८६,३१४,३१५,३१६,३१७,३७५,४२९,४७६ चे साहित्यासाठी न्युनत्तम दर आलेले आहेत.

**ब)** तसेच अ.न. २६२,२६५,२८९,३२१,३२२,३२३,३२४,३४४,३४६,४०६,४०९,४१०,४३०,४३१, ४३५, ४६१ चे साहित्यासाठी प्रत्येकी एकाच निविदाधारकांनी निविदा भरलेल्या आहेत.

**क)** अ.न.१०७,१५३,१९६,२५४,२६८,२७२,२७८,२९०,३०४,३१०,३१९,३२५,३४८,३४९,३५३, ३५५, ३५७, ३५८, ३५९,३६२,३६७,३६८,३७१,३८३,३८८,३८९,३९७,३९८,४११,४१२,४१३, ४१४, ४१५,४१६, ४१७, ४१८, ४१९,४२०, ४२१,४२२,४२३,४२४,४२७,४३६,४३७,४४०, ४४१,४४२,४४३,४४४,४४५, ४४८,४४९,४५०, ४५१, ४५२,४५३,४५४, ४५५,४५६,४५८,४५९,४६०,४६४,४६५,४६८,४६९,४७४,४७५,४८५ चे साहित्यासाठी प्रत्येकी दोनच निविदाधारकांनी निविदा भरलेल्या आहेत.

**ड)** अ.नं. ९७ चे साहित्य इलेक्ट्रॉनिक चोक ई टेंडर अपलोड करतांना साहित्याचा ग्रुप म्हणून समावेश झाल्यामुळे त्यासाठी दर प्राप्त झालेले नाही. त्याचा फेर ई-निविदा प्रक्रियेत सामावेश करता य़ेईल.

तरी सदरच्या तुलनात्मक तक्त्यातील अ.नं.अ मधील न्युनत्तम दरधारकांना पुरवठा आदेश देणकामी व अ.नं.ब,क,ड चे साहित्यासाठी फेर निविदा प्रक्रिया राबविणेकामी सदरचा प्रस्ताव मा. त्रिसस्य समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, विद्युत विभागाचे वार्षिक साहित्य खरेदी करणेसाठी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेचे अवलोकन करणेत येऊन, या प्रकियेच्या तुलनात्मक तक्त्यातील अ मध्ये नमुद केलेल्या साहित्यांसाठीचे निम्नतम दर, मागील वर्षीचे मंजूर दरांपेक्षा कमी असतील अशा साहित्यांसाठी संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच प्रस्तावातील ब, क, व ड मध्ये नमुद केलेले साहित्य खरेदी करणेकामी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.६२** **कार्यालयीन व संगणक स्टेशनरी खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.०२.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३० (२३) नुसार संस्थानचे विविध विभागांना आवश्यक असणारी संगणक स्टेशनरी विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.९,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच मा.व्य.समितीचे दि.१८.०२.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३० (२४) नुसार संस्थानचे विविध विभागांना आवश्यक असणारी कार्यालयीन स्टेशनरी विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.५,६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. उपरोक्त दोन्ही खरेदीकामी अंदाजे रु.१५,५०,०००/- (रु.९,९०,०००/- + रु.५,६०,०००/-) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार वरील दोन्ही स्टेशनरी खरेदीकामी जाहिरात खर्चात बचत होण्याच्या दृष्टिने एकत्रित वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. प्राप्त ई-निविदा दि.३०.०४.२०१५ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी यांचे समोर उघडल्या असता मुदतीअंती एकाच निविदाधारकाने ई-निविदा संकेतस्थळावर सादर केलेली असल्याने फेर ई-निविदा प्रसिध्द करावी असे मा.मुख्यलेखाधीकारी साहेब यांनी सुचविले होते. त्यामुळे वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन दि.०५.०६.२०१५ ते २२.०६.२०१५ अखेर डाऊनलोडसाठी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आली होती.

उपरोक्त तांत्रिक लिफाफे (Technical Bid) दि.२९.०६.२०१५ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी यांचे समक्ष उघडल्या असता तीन निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या त्यापैकी मे. कॉम्प्युलिंक्स, मुंबई यांनी निविदा किंमतीचा व बयाना रकमेचा डी.डी. Online तसेच समक्ष सादर केलेला नाही. त्यामुळे मा. मुख्यलेखाधिकारी साहेब यांनी त्यांचेकडून मुदतीच्या तारखेच्या आतला डी.डी.काढला असेल तर डी.डी. मागवून घेण्याच्या सुचना केलेल्या होत्या, परंतु सदरचे निविदाधारकांस लॅण्डलाईन दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधला असता फोन लागला नाही व तांत्रिक निविदेमध्ये दिलेला मोबाईल नंबर नऊ अंकी असल्यामुळे संपर्क होऊ शकला नाही.

त्यामुळे तिस-यांदा फेर ई-निविदा प्रक्रिया दि.२८.०७.२०१५ ते ११.०८.२०१५ अशी राबविण्यात आली आहे. उपरोक्त ई-निविदेतील तांत्रिक लिफाफे दि.२१.०८.२०१५ रोजी उघडण्यात आले. पात्र निविदाधारकांचे Commercial Bid दि. ०१.०९.२०१५ रोजी उघडण्यात आलेले आहेत, त्याचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केलेला आहे.

**अ)** सदर तुलनात्मक तक्ता पाहता कार्यालयीन स्टेशनरीसाठी –

- मे.क्लासीक स्टेशनर्स कं., मुंबई यांचे अ.क्र. १,२,३,६,१३,१५,१८,१९,२२,२३,२७, ३०,३३,३४,३५, ३६,४०,४१ या साहित्यासाठी,
- मे.रोमन स्टेशनर्स ॲण्ड प्रिंटर्स, मुंबई यांचे अ.क्र. ४,११,१४,१६,१७,२०,२२,२६,२८, २९,३१,३७ या साहित्यासाठी,
- मे.श्री ज्योती बुक सेलर्स ॲण्ड स्टेशनर्स, नाशीक यांचे अ.क्र. ५,६,७,८,९,१०,१२,१३, २१,२४,२५,३०,३२, ३८,३९,४१ या साहित्यासाठी न्युनतम दर आलेले आहेत.

वरील अ.क्र. ६, १३, २२, ३०, व ४१ या साहित्यासाठी दोन निविदाधारकांचे दर समान आल्याने त्यांना समप्रमाणात विभागून पुरवठा आदेश देता येतील.

**ब)** तसेच संगणक स्टेशनरीसाठी दोनच निविदाधारकांचे दर आल्याने सदर खरेदीकामी फेर निविदा मागविता येतील.

उपरोक्त अ व ब मध्ये नमुद कलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. त्रिसदस्य समितीपुढे सादर करणेस मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.४९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कार्यालयीन व संगणक वार्षिक स्टेशनरी खरेदीकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेचे अवलोकन करणेत येऊन, त्यामधील कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच ज्या साहित्यांसाठी समान निम्नतम दर आलेले असतील त्यासाठी समान विभागून पुरवठा देण्यात यावा व संगणक स्टेशनरी खरेदीकामी फेर ई-निविदांची मागणी करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.६३** **साईआश्रम विभागाकरीता बेडशीट व उशीकव्हर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८.०८.२०१४ रोजीचे सभेत साईआश्रम विभागाकडून प्रिंटेड बेडशीट १९,९६८ नग व प्रिंटेड उशीकव्हर १९,९६८ नग ई-निविदा पद्धतीने खरेदी करणेकामी रक्कम रु.४५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावास निर्णय क्र. ६८४ अन्वये तत्वत: मान्यता मिळालेली आहे. त्यानंतर याकामी मा.उच्च न्यायालयाने "The civil application is allowed in terms of prayer clause 'B' and disposed of." असे निर्देश दिलेले आहेत.

सदर निर्देशास अनुसरुन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. याकामी दिनांक २२.०५.२०१५ रोजी व दिनांक २९.०५.२०१५ रोजी Prebid Meeting घेण्यात आली. दिनांक २९.०५.२०१५ रोजीचे prebid meeting

मध्ये सदर बेडशीट व उशीकव्हरचे Technical Specification वाढविण्यात आले. याकामी निविदा कालावधी दिनांक १८.०५.२०१५ ते १०.०६.२०१५ व दिनांक १८.०५.२०१५ ते २२.०६.२०१५ असा दोन वेळेस वाढविण्यात आला होता.

दिनांक २५.०६.२०१५ रोजी तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या होत्या. त्यात खालील निविदाधारक पात्र ठरले.

१. मे.देवांशी एंटरप्रायजेस, मुंबई
२. मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी, नाशिक
३. मे.नयन युनिफॉर्म्स, पुणे
४. मे.रिद्धी एंटरप्रायजेस, नाशिक
५. मे.समृद्धी सेल्स कॉर्पोरेशन, इचलकरंजी
६. मे.सुपर डाईनिक क्लार्थींग प्रा.लि., मुंबई

दिनांक ०२.०७.२०१५ रोजी सदर निविदाधारकांच्या मुळ निविदा मा.प्र.प्रशासकीय अधिकारी व मा.मुख्यलेखाधिकारी यांच्या समक्ष उघडण्यात आल्या. त्याचा ई-निविदा प्रक्रियेनुसार प्राप्त तुलनात्मक तक्ता सोबत जोडलेला आहे.

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामध्ये प्रिंटेड बेडशीटसाठी मे.सुपर डाईंग क्लॉथिंग प्रा.लि., मुंबई यांचे दर रु.१६८/- प्रती नग व प्रिंटेड उशीकव्हरसाठी मे.समृद्धी सेल्स कॉर्पोरेशन, इचलकरंजी यांचे दर रु.३५/- प्रती नग न्युनतम आहेत.

तथापि, दरम्यानचे काळात RC Rate बाबत माहिती मिळाली व संस्थान रुग्णालयाचे कापडाचे कामासाठी महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ, मुंबई यांचे प्रतिनिधी श्री.गिरीश कुलकर्णी, विपणन प्रतिनिधी दिनांक १५.०७.२०१५ रोजी शिर्डी येथे आले असता, श्री साईबाबा हॉस्पिटलचा खरेदी विभाग समजुन ते खरेदी विभागाचे कार्यालयात आले होते. त्यावेळी त्यांचेशी वरीलबाबत चर्चा केली असता, संस्थानचे मागणीप्रमाणे बेडशीटचे RC Rate रु.१६१.७२ पैसे प्रती नग दिलेले आहेत. तसेच उशीकव्हर संस्थानचे साईजप्रमाणे RC Rate मध्ये उपलब्ध नसल्याचे सांगितले आहे. उशीकव्हरची RC Rate ची साईज कमी आहे. RC Rate बाबतची माहिती उशीरा प्राप्त झालेने बेडशीट व उशी कव्हर पैकी फक्त बेडशीटचेच RC Rate मध्ये दर (रु.१६१.७२ पैसे) आहेत, तसेच शासनाचे दर कराराची मुदत ३०.०६.२०१५ रोजी संपलेली आहे.

खरेदी विभागाचे दिनांक ०७.०८.२०१५ रोजी फेरसादर केलेल्या टिपणीवरील मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब यांचे निर्देशाबाबत मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचेशी दिनांक २५.०८.२०१५ रोजी त्यांचे कक्षात चर्चा केली असता, त्यांनी पुढील प्रमाणे निर्देश दिले.

"RC Rate ची माहिती घेणेपुर्वी (१) मा. त्रिसदस्य समितीची मान्यता, (२) मा. उच्च न्यायालय मंजूरी, (३) ई-निविदा या पध्दती नियमानुसार पुर्ण झालेने ई-निविदेतील न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणे उचित राहिल."

तरी सदर निर्देशाप्रमाणे साईआश्रम भक्तनिवास विभागाकरीता आवश्यक प्रिंटेड बेडशीट १९,९६८ नग खरेदीकामी मे.सुपर डाईंग क्लॉथिंग प्रा.लि., मुंबई यांना दर रु.१६८/- प्रती नग व प्रिंटेड उशीकव्हर १९,९६८ नग खरेदीकामी मे.समृद्धी सेल्स कॉर्पोरेशन, इचलकरंजी दर रु.३५/- प्रती नग या दराने पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४९८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साईआश्रम भक्तनिवास विभागाकरीता आवश्यक असलेले १९,९६८ नग प्रिंटेड बेडशीट खरेदीकामी मे.सुपर डाईंग क्लॉथिंग प्रा.लि., मुंबई यांचे प्रती नग रु.१६८/- मात्र व १९,९६८ नग प्रिंटेड उशीकव्हर खरेदीकामी मे.समृद्धी सेल्स कॉर्पोरेशन, इचलकरंजी यांचे प्रती नग रु.३५/- मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.६४ सन २०१५-१६ गावरान तूप खरेदी.**

**प्रस्ताव-** श्री.संजय भास्करराव काळे, कोपरगांव यांनी दि.१२/८/२०१५ चे मा.अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांना पाठविलेले पत्रामध्ये संस्थानने माहे जुलै २०१५ ते मार्च २०१६ या कालावधीसाठी गावरान तूप खरेदीकामी घेतलेल्या निर्णयाबाबत खालील मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

१. कोल्हापूर जिल्हा दूध संघ, कोल्हापूर यांना एक शून्य घालून त्यांनी केलेली तांत्रिक चूक सुधारण्याची संधी दिली व सर्वात कमी दर असल्याने तुपाचा पुरवठा करण्यासाठी कार्यारंभ आदेश दिला.
२. श्री. संजय भास्करराव काळे यांनी वारणा आणि अमूल हे नामांकित ब्रॅन्डचे तुप घेतले असते तर चांगले तुप मिळणेचे भाग्य मिळाले असते. (हया दोन्ही कंपन्या कमिशन देत नसाव्यात.)
३. त्रिसदस्य समितीमध्ये प्रधान जिल्हा न्यायाधीश, जिल्हाधिकारी, कार्यकारी अधिकारी (उपजिल्हाधिकारी दर्जा) असे सनदी अधिकारी आहेत. त्यांनी तांत्रिक चुक सुधारण्याची संधी देऊन सदरच्या व्यवहारात गैरव्यवहार झाला असल्याचा संशय निर्माण होण्यास संधी दिलेली आहे.
४. सदरच्या आपल्या गलथान कारभारासंदर्भात, आपलेविरुध्द उच्च न्यायालयात याचिका का दाखल करु नये?

५. त्रिसदस्य समितीचा कारभार अत्यंत पारदर्शक असावा. परंतु वारंवार तक्रारी करुन देखील आपण व आपली समिती पहिल्या विश्वस्त मंडळापेक्षा बेजबाबदार वागत असल्याचे जाणवते. आपण घेतलेले अनेक निर्णय भावनिक आहेत. त्या निर्णयांमागे भ्रष्टाचारात दुर्गंध देखील येतो.

६. आपल्या तज्ञ समितीकडून अशाप्रकारे Blunders ची अपेक्षा नव्हती व नाही. संस्थानचा कारभार सुधारावा, चांगले पायंडे पडावेत, विधी व न्यायाचे, पालन व्हावे अशी सामान्य भक्ताची अपेक्षा आहे.

७. न्यायालयात आपले वकील वारंवार आमच्यावर आरोप करतात आम्ही काम करु देत नाही. पण तुमचा कारभार सुधारणेऐवजी अधिक बिघडत चालला, त्यामुळे आम्हाला तुमच्या कारभारावर पहिल्यापेक्षा बारीक लक्ष ठेवावे लागत आहे.

सदर पत्रावर मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांनी उप कार्यकारी अधिकारी चौकशी करुन सादर करावे असे निर्देश आलेले आहेत. मा.उप कार्यकारी अधिकारी महोदय यांनी सदरच्या विषयाबाबतची वस्तुस्थिती मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने वरील पत्रात प्रामुख्याने श्री.संजय काळे, कोपरगांव यांनी उपस्थित केलेल्या गावरान तूप खरेदीबाबतची पार्श्वभूमी व वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

**<u>गावरान तुप खरेदी जुलै- २०१५ ते मार्च-२०१६ पार्श्वभूमी व वस्तुस्थिती-</u>**

माहे ऑक्टोबर २०१४ ते मार्च २०१५ या कालावधीसाठी मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेवून या कालावधीसाठी ७००० क्विंटल गावरान तूप प्रती क्विंटल रु.२७,४५०/- मात्र दराने मे. अजंता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांना पुरवठा आदेश देण्यात आला होता.

माहे फेब्रुवारी-२०१५ महिन्यामध्ये मे.अजंता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांनी पुरविलेले गावरान तुपात मॉईश्चरचा जाड थर होता म्हणून त्यांचा पुरवठा मुदतीपुर्वीच दि.०४.०३.२०१५ पासून थांबवून त्यावेळच्या गावरान तुप खरेदीतील 3rd Lowest दर रक्कमेचे मे. इंदापुर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स लि., गोखळी यांचेकडून २००० क्विंटल गावरान तुप रु.३०,९७५/- मात्र प्रती क्विंटल दराप्रमाणे खरेदी करण्याबाबत मा.व्यवस्थापन समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे (Circulatory Agenda) दिनांक २४.०३.२०१५ रोजीचे निर्णयानुसार माहे मार्च महिन्यासाठी ७०० क्विंटल गावरान तुप खरेदीची ई-मेलद्वारे तुपाचे दर बोलावून मा. उच्च न्यायालयाचे मान्यतेने ७०० क्विंटल तुप खरेदी करुन यामधील दरातील फरक मे. अजंता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांचे बीलातून वसुल करण्यात आलेला आहे व सदर गावरान तुप मे. इंदापुर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स लि., गोखळी यांचेकडून रु.२९,४००/- प्रती क्विंटल दराने मार्च-२०१५ मध्ये खरेदी करण्यात आलेले आहे.

दरम्यान माहे एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६ या कालावधीत गावरान तुप खरेदीसाठी मा. उच्च न्यायालयाने सुचविलेल्या ०६ ब्रॅन्डेड कंपन्या व इतर दुध उत्पादक/डिलर्स यांचेकडून ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. यामध्ये ५ निविदाधारकांनी भाग घेतला होता. यामध्ये मे. इंदापुर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स लि., गोखळी यांचा रु.२९,६००/- प्रती क्विंटल हा दर न्युनतम दर होता. त्यामुळे मे. इंदापुर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स लि., गोखळी यांना पुरवठा आदेश देणेकामी मा.व्यवस्थापन समितीने दिनांक १६.०४.२०१५ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर केला असता याकामी मा. उच्च न्यायालयाची परवानगी घेण्याचा निर्णय घेतला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे सदर निर्णयाप्रमाणे Civil Application तयार करुन मा. उच्च न्यायालयाकडे सादर केले असता विरुद्ध पार्टीकडून मे. इंदापूर डेअरी यांना पुरवठा आदेश देण्यासाठी Objection असल्यामुळे त्यावर दि.०७.०५.२०१५ रोजी मे. इंदापुर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स लि., गोखळी यांचेकडून फक्त दिनांक ३१.०५.२०१५ पर्यंत गावरान तुप खरेदी करण्याचे व फक्त ०६ ब्रॅन्डेड कंपन्यांचेच गावरान तुप फेर निविदा करुन खरेदी करण्याचे आदेश देण्यात आले होते.

सदर निर्देशानुसार दि.१८.०५.२०१५ ते २५.०५.२०१५ या कालावधीत फक्त ब्रॅन्डेड कंपन्यांचेच गावरान तुप खरेदीसाठी अल्प मुदतीची निविदा दुस-यांदा काढण्यात आली होती. परंतु या निविदा प्रक्रियेला प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे तिस-यांदा दि.०५.०६.२०१५ ते दि.१२.०६.२०१५ या कालावधीत पुन्हा अल्प मुदतीची निविदा प्रक्रिया काढण्यात आली होती. यामध्ये ०५ निविदाधारकांनी भाग घेतला होता.

सदर निविदा प्रक्रियेमध्ये अ.नं ०१ ते ०३ याच निविदाधारकांचे दि.१५.०६.२०१५ रोजी Comercial Bid उघडण्यात आले. त्यामध्ये खालील प्रमाणे कंपन्यांनी दर दिलेले आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | दर प्रती क्विंटल | एकुण रक्कम |
|---|---|---|---|
| १. | मे.कोल्हापुर जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापुर (गोकुळ) | ३,१९०/- | २,३९,२५,०००/- |
| २. | मे.श्री वारणा सहकारी दुध उत्पादक प्रक्रिया संघ, वारणानगर (वारणा) | ३३,०७५/- | २४,८०,६२,५००/- |
| ३ | मे.गुजरात को-ऑपरेटिव्ह मिल्क फेडरेशन लि., आनंद (अमुल) | ३५,६००/- | २६,७०,००,०००/- |
| ४ | मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई | | |
| ५ | मे. अजंता राज प्रोटीन्स प्रा.लि., आग्रा | | |

वरिल अ.नं ४ व ५ ब्रॅन्डेड तूप कंपन्या नसल्यामुळे त्यांचा निविदा प्रक्रियेत विचार केलेला नाही.

मे.कोल्हापुर जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापूर यांनी दि.१६.०६.२०१५ रोजी पत्र पाठवून, त्यांनी चुकीने प्रती क्विंटल दर रु.३१,९००/- ऐवजी प्रती १० किलोचे रु.३,१९०/- दर दिलेले असल्याचे कळविले होते.

याबाबत सविस्तर टिपणी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९.०६.२०१५ रोजीचे सभेसमोर सादर केली होती.

यामध्ये मे. कोल्हापुर जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापुर यांनी निविदेमध्ये नमुद केलेला दर हा तुपाचे बाजारातील दर पाहता चुकीने नमुद झाला आहे, हे स्पष्ट दिसुन येते. त्यांनी दिलेला खुलासा पाहता असे दिसुन येते की, क्विंटलचे दर मागविले असता नजरचुकीने १० कि.ग्रॅ.चा दर दिला गेला आहे. म्हणजेच संगणकामध्ये एक शुन्य नमुद करण्याचे राहिले आहे, हे स्पष्ट होते. कारण तुपाचा भाव रु.३१.९० पैसे कोठेही नाही. खुलासा देताना पहिला आकडा बदलून कोणताही वाढीव आकडा अथवा नंबर दोनच्या स्पर्धकापेक्षा थोडा कमी करुन दिलेला नाही. त्यामुळे तांत्रिक चुक मान्य करुन खुलासा स्वीकारण्यात यावा, असे ठरले. जर तांत्रिक बाब धरुन बसले व क्रमांक दोनला कंत्राट दिल्यास संस्थानचे उघडपणे लाखो रुपयांचे नुकसान होईल. दोन्ही दरामध्ये खुपच फरक आहे. त्यामुळे खुलाशाप्रमाणे मे. कोल्हापुर जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापुर यांचा दर न्युनतम असल्यामुळे त्यांची निविदा मान्य करणे योग्य ठरेल, असा निर्णय घेतला होता.

थोडक्यात, त्यावेळची वस्तुस्थिती, संस्थानचे आर्थिक हित या सर्व बाबींचा विचार करुन

मे.कोल्हापुर जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापूर यांना ३ महिन्यांच्या कालावधीसाठी २,५०० क्विंटल गावरान तूप पुरविणेकामी पुरवठा आदेश देण्यात आला होता.

तसेच संस्थान सध्या खरेदी करीत असलेले गाईचे गावरान तूप हे मा.उच्च न्यायालयाने दि.०७.०५.२०१५ चे आदेशामध्ये सुचविलेल्या सहा नामांकित ब्रॅन्ड पैकीच गोकुळ ब्रॅन्ड एक आहे. हे येथे प्रामुख्याने विचारात घेणे गरजेचे आहे.

संस्थानने पुरवठा आदेश दिल्यानंतर कोल्हापूर दुध संघाने पुरविलेल्या तुपाच्या लॅब तपासण्या केलेल्या आहेत. तपासणी अहवाल Food and Safty Act प्रमाणे योग्य आहेत, व वापरण्यास हरकत नाही असे सर्व लॅब रिपोर्टस् संस्थान दप्तरी आहेत.

त्यामुळे मा.व्यवस्थापन समितीने दि.८/९/२०१५ च्या सभेत, कोल्हापूर जिल्हा दूध संघ, कोल्हापूर यांचेकडून गोकुळ ब्रॅन्डचे २,५०० क्विंटल गावरान तूप, माहे ऑक्टोबर ते डिसेंबर २०१५ या कालावधीत खरेदी करणेबाबतचा निर्णय क्रं.३०३ नुसार घेतलेला आहे व त्याप्रमाणे मे.कोल्हापूर जिल्हा दूध संघ, कोल्हापूर यांना पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

वरील पार्श्वभूमी व वसुतुस्थितीचा विचार करता, संस्थानच्या मा.त्रिसदस्यीय समितीने मा.उच्च न्यायालयाने सुचविलेल्या ०६ ब्रॅन्डेड कंपन्यांपैकीच एक गोकुळ ब्रॅन्डचे गावरान तुप खरेदीचा घेतलेला निर्णय हा संस्थानचे आर्थिक हित विचारात घेऊन व प्राप्त परिस्थितीला अनुरुप असून भ्रष्ट व बेकायदेशीर नाही, हे स्पष्ट होईल.

तरी श्री.संजय भास्करराव काळे यांनी पत्रात नमूद केलेल्या मुद्दयांबाबत उचित निर्णय होण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमुद केलेली पार्श्वभूमी व वस्तुस्थितीचा विचार करता, मा.उच्च न्यायालयाने सुचविलेल्या ०६ ब्रॅन्डेड कंपन्यांपैकीच संस्थानचे आर्थीक हित विचारात घेऊन, गोकुळ ब्रॅण्डचे गावरान तुप खरेदीचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे गावरान तुपासाठी खर्च होत आहे, असे श्री.संजय काळे यांना कळविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.६५** **माहे एप्रील- २०१५ मधील तांदूळ प्रकरणाबाबत.**

**प्रस्ताव-** एप्रिल २०१५ मधील तांदूळ प्रकरणाबाबतची फाईल संस्थानचे तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा सदस्य, त्रिसदस्यीय समिती यांचेकडे चक्रीय पध्दतीने दि.२९/४/२०१५ व दि.३१/८/२०१५ रोजी सादर केलेनंतर, या तांदूळ प्रकरणाबाबत त्यांना आढळून आलेली वस्तुस्थिती वजा सविस्तर अहवाल संस्थानचे मा.अध्यक्ष महोदय यांना दि.१८/९/२०१५ चे पत्रान्वये कळविला आहे. सदरचा अहवाल परिशिष्ट "अ" म्हणून सोबत सादर केला आहे.

सदर पत्रावर मा.अध्यक्षमहोदय यांनी Put up before the Committee व मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांनी सविस्तर अहवालासह समितीसमोर सादर करावे असे निर्देशदिलेले आहेत.

त्यास अनुसरुन सदर प्रकरणाचा वस्तुस्थिती अहवाल खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

अधिक्षक, प्रसादालय, यांनी दि.९/४/२०१५ रोजीचे टिपणीनुसार प्रसादालयात सध्या वापरात असणा-या तांदूळामध्ये अळया, जाळे व बादड आढळून आलेबाबत टिपणी सादर केली होती. सदर टिपणीवर दि.१०/४/२०१५ रोजी तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी यांनी "सध्या उक्त तांदूळ वापरुन त्यामध्ये भक्तांना अळया आढळल्यास त्यामध्ये तक्रारी होऊन FDA कडून कारवाई होऊ शकते. तसेच प्रसादालयाचा दर्जा, पत याबाबत भक्तांमध्ये संभ्रम/ गैरसमज निर्माण होऊ शकतो. त्यामुळे या तांदळाचा वापर आज संबंधितासमवेत प्रत्यक्ष चर्चा झाल्याप्रमाणे त्वरित थांबविण्यात यावा व नव्याने करावयाच्या पर्यायी व्यवस्थेबाबत त्वरित कार्यवाही करावी, असे निर्देश दिले होते."

सदर तांदूळ हा दि.६/८/२०१४ ते ३०/९/२०१४ या कालावधीत ३०५० क्विंटल खरेदी केलेल्या सोना मसुरी तांदूळापैकी असून उर्वरित तांदूळ प्रसादालयाकडे वापरण्यात आलेला होता. हा तांदूळ नांदेड येथील भराडीया या व्यापा-याकडून खरेदी करण्यात आलेला होता.

वरील दि.१०/४/२०१५ चे निर्देशाप्रमाणे, सदर तांदूळाचा प्रसादालयात वापर थांबविण्यात आला होता व पर्यायी व्यवस्था खरेदी विभागामार्फत करण्यात आली होती. त्यानंतर तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशानुसार सदर तांदूळ दि.१५/४/२०१५ व दि.१६/४/२०१५ रोजी सील करण्यात आला होता. दि.१७/४/२०१५ रोजी सहाय्यक आयुक्त, अन्न, अ.नगर यांनी समक्ष शिर्डी येथे भेट देऊन तांदळाच्या साठयाची पाहणी करुन त्यामध्ये जाळी, जळमटे व कीड झाल्याचे आढळून आल्याने १७८३ क्विंटल तांदळाचा साठा वापर करण्यास प्रतिबंध केला होता.

अन्न औषध प्रशासन विभागाला इकडील दि.२१/४/२०१५ चे पत्रान्वये सदरच्या तांदूळाच्या साठयावरील कॅप काढणे व राख झटकणे तसेच जाळे जळमटे काढणेबाबत व साठयाबाबत पुढील मार्गदर्शन मिळणेची विनंती केली होती.

सहाय्यक आयुक्त, अन्न, अहमदनगर यांनी दि.२७/४/२०१५ चे पत्रान्वये या कार्यालयाने लावलेले प्रतिबंधाचे आदेश कायम ठेवून संस्थानच्या विनंतीप्रमाणे कारवाई करण्यास मान्यता दिली होती, तथापि, याबाबत संस्थानने हाती घेतलेली कार्यवाही व केलेल्या उपाययोजना इ.बाबत माहिती त्यांना कळविणेबाबतही सूचित केले होते.

त्यानुसार दि.१/५/२०१५ रोजी तांदूळाला धुरीकरणाचे लावलेले अंतर्गत सील काढून कॅप हटविण्यात आल्या होत्या. तसेच दि.२/५/२०१५ रोजी राख व धूळ इ.काढून टाकण्यात आली, दि.३-४/५/२०१५ रोजी गोडाऊन स्वच्छ करण्यात आले ही माहिती श्री.भोसले साहेब, सहाय्यक आयुक्त, अन्न, अ.नगर यांना दूरध्वनीद्वारे देण्यात आली.

सहाय्यक आयुक्त, अन्न, अहमदनगर यांनी दि.८/५/२०१५ चे पत्रान्वये सदर प्रकरणी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ कलम ३४(२) अन्वये मा.अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन,महाराष्ट्र राज्य यांचे सदर संपूर्ण साठा जनस्वास्थहितार्थ खाण्याकरीता वापरण्यात येऊ नये असे प्रतिबंधात्मक आदेश प्राप्त झालेले आहेत व त्यास अनुसरुन सदर संपूर्ण तांदूळाचा साठा हयावर योग्य प्रक्रिया करुन व उपाययोजना करुन संपूर्ण साठा जाळे जळमटे व कीडे, आळया हयापासून मुक्त झाल्याचे व तो खाण्यायोग्य असल्याचे मान्यताप्राप्त NABL विश्लेषण अहवालासह या कार्यालयास सादर करावे असे कळविण्यात येऊन त्यासोबत मा.अन्न सुरक्षा आयुक्त यांचे आदेशाचीही प्रत पाठविण्यात आलेली होती.

त्यानंतर सदर तांदूळाबाबत दि.१३/५/२०१५ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचे दि.१६/५/२०१५ रोजी पुढील कार्यवाहीबाबत कृपया त्वरित चर्चा असे निर्देश होते. त्यानुसार तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी यांनी दि.१८/५/२०१५ रोजी सदर तांदूळाची पाहणी करुन पुढील उचित कार्यवाही करणेबाबत सूचना दिल्या होत्या.

त्यास अनुसरुन व दि.२१/५/२०१५ रोजी श्री.ए.एस.गुंजाळ, जीटी पेस्ट कंट्रोल, नाशिक यांनी दि.२१/५/२०१५ रोजी केलेले समक्ष पाहणीनुसार व केलेले मार्गदर्शनानुसार प्रायोगिक तत्वावर प्रथम सदर तांदूळ उपनेर मशिनद्वारे स्वच्छ करण्यास सुरुवात केली होती व यामध्ये एकूण ११७६ गोण्या तांदूळ स्वच्छ करण्यात आल्या होता, परंतु त्यामुळे पूर्ण स्वच्छता न झाल्याचे आढळल्याने सदर काम पुढे थांबविण्यात आले.

सदर स्वच्छ केलेल्या तांदूळाबाबत मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांनी प्रथम अन्न व औषध प्रशासन, अहमदनगर, यांचे मार्गदर्शन घेणेबाबत समक्ष निर्देश दिले होते. त्यानुसार इकडील जा.क्रं.एसएसएस/ भांडार/ १६६३/ २०१५ दि.२५/६/२०१५ चे पत्रानुसार मा.सहाय्यक आयुक्त, अन्न, अहमदनगर, यांचे याबाबत मार्गदर्शनासाठी विनंती केली होती. यावर त्यांनी तांदूळावर केलेल्या प्रक्रिया, उपाय योजनांची तपशीलवार माहिती आणि सदर तांदळाचा साठा हा मानवी खाण्यायोग्य असल्याचे मान्यताप्राप्त NABL विश्लेषण् अहवाल लवकरात लवकर देणेबाबत कळविले होते.

त्यानंतर याबाबत तारांकित प्रश्नही उपस्थित झाला होता, त्यालाही उचित उत्तर देण्यात आले होते. याबाबत संस्थानचे मा.अध्यक्षमहोदय यांनी नं.३४३ दि.१०/७/२०१५ चे पत्रान्वये सदर तारांकीत प्रश्नाचे उत्तर तयार करुन त्याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांशी चर्चा करुन देणेबाबत कळविले होते तथापि मा.अध्यक्षांचे पत्र येण्यापूर्वीच याबाबत सहाय्यक आयुक्त, अन्न औषध प्रशासन, अहमदनगर यांना खरेदी विभागाकडून दि.९/७/२०१५ चे पत्रान्वये माहिती कळविण्यात आली होती. त्याचवेळी याकामी सदर तांदूळ स्वच्छ करणेकामी २५-३० दिवसांचा कालावधी वाढवून मिळणेबाबत इकडील पत्र क्रं.१९८८/२०१५ दि.९/७/२०१५ अन्वये विनंतीही केली होती.

यानंतर बचत गटाकडून तांदूळ स्वच्छ करणेबाबत मा.उप समितीचे दि.२३/७/२०१५ चे सभेतील निर्णय क्रं.२०४ अन्वये रु.४९,९२४/- मात्रचे खर्चास मान्यता घेण्यात येऊन याबाबत बचत गटाकडून कोटेशन्स मागविण्यात येऊन इकडील जा.क्रं.२२८७/१५ दि.२४/७/२०१५ ने याकामी मे.साई केटरर्स महिला स्वयं बचतगट, श्रीरामपूर यांना कार्यादेश देण्यात आला होता.

सदर बचत गटाने हे काम दि. २७/०७/२०१५ रोजी सुरु करुन दि.१४/८/२०१५ या कालावधीत पूर्ण केले आहे. यानंतर या स्वच्छ केलेल्या तांदूळामधून वेगवेगळे ५ तांदूळाचे नमुने तपासणीकामी फुड हायजीन अॅन्ड हेल्थ लॅबोरेटरी, पुणे या NABL लॅबकडून तपासून घेण्यात आले होते. त्यांनी सदर samples conforms to FSSAI Norms असा अहवाल दि.२२/८/२०१५ रोजी दिला आहे.

सदर अहवाल सहाय्यक आयुक्त, अन्न औषध प्रशासन, अहमदनगर यांचेकडे जा.कं.३०८७/२०१५ दि.२९/८/२०१५ अन्वये सादर करण्यात आला होता.

यावर त्यांनी जा.क्रं.असुमाका/२६५४/१५/३ दि.८/९/२०१५ अन्वये काही माहिती मागविली होती. ती त्यांना इकडील जा.नं.३३०७/२०१५ दि.१०/९/२०१५ अन्वये पाठविण्यात आली होती.

वरील अहवालास अनुसरुन, दि.१४/९/२०१५ रोजी मा.सर्वश्री. आर.डी.पवारसाहेब, भोसले साहेब व पवारसाहेब, सहाय्यक आयुक्त, अन्न औषध प्रशासन, अहमदनगर, यांनी शिर्डी येथे भेट देऊन सदरचे तांदूळाचे १७८३ क्विंटल साठयाची संस्थानच्या पानमळा गोडाऊनमध्ये समक्ष् पाहणी केली, त्यावेळी त्यांनी तांदूळाच्या खरेदी, साठा, खर्च व प्रयोगशाळा तपासणी याबाबतचे माहितीची समक्ष मागणी केली होती.

सदर माहिती त्यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/भांडार/३३७१/२०१५ दि.१४/९/२०१५ अन्वये समक्ष देण्यात आली.

सदर माहिती प्राप्त झालेनंतर सहाय्यक आयुक्त, अन्न औषध प्रशासन, अहमदनगर, यांनी त्यांचे पत्र क्रं.असुमाका/ २६६७/१५/३ दि.१४/९/२०१५ अन्वये सदर प्रतिबंधित तांदळाच्या साठयाची पाहणी केली असता सदर तांदूळ खाण्यासाठी वापर करण्यास योग्य असल्याचे दिसून आले आहे व त्यानुसार अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, नियम व विनियम २०११ कलम ३४(४) अन्वये दि.१७/४/२०१५ रोजीच्या आदेशान्वये प्रतिबंधित केलेला तांदळाचा साठा कायदयाचे कलम ३४(५) अन्वये मुक्त करण्यात येत आहे असे निर्देश दिलेले आहेत व यापुढे वरील बाबींची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असेही निर्देशित केलेले आहे.

वरील आदेशास अनुसरुन, सदरचा तांदूळ प्रसादालयात वापरणेसाठी मान्यता मिळणेकामी हा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०८/९/२०१५ चे सभेत सादर केला होता, त्यावेळी सदरचा तांदूळाचा वापर प्रसादालयामध्ये त्वरित सुरु करणेस व तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी, अधीक्षक-प्रसादालय व विदयमान मुख्य लेखा अधिकारी यांना नोटीस देऊन त्यांचे खुलासे मागविण्याचा निर्णय झालेला आहे. सध्या प्रसादालयात सदर तांदूळाचा वापर चालू केला असून, दि.१८/१०/२०१५ पर्यंत १७८३ क्विंटल तांदूळापैकी ६०० क्विंटल तांदूळ वापरण्यात आलेला आहे व याबाबत अदयाप कुणाचीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

तथापि मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य, त्रिसदस्यीय समिती यांचे परिशिष्ट "अ" नुसारचे सोबतचे अहवालातील नमूद केलेल्या बाबींवर उचित विचार होण्यासाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यास मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.५००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रतिबंधीत तांदूळ वापराबाबतची नोंद घेण्यात आली.**

**तसेच दि.०८.१०.२०१५ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.३५४ मध्ये ठरलेप्रमाणे संस्थानचे विद्यमान मुख्यलेखाधिकारी यांचेसह तत्कालीन कार्यकारी अधिकारी व तत्कालीन अधिक्षक, श्री साईप्रसादालय यांचेकडून लेखी खुलासे मागविणेत यावे.** (कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग/ कामगार अधिकारी)

---

**विषय नं.६६** **देणगी रवा व आटयाबाबत.**

**प्रस्ताव-** बॅबिनो अग्रो इंडस्ट्रिज लि., गुरगाव (हरियाणा) यांनी सालाबादप्रमाणे या वर्षीही शेवई, आटा, रवा व मैदा देणगी दाखल ट्रकव्दारे दि.१६.०३.२०१५ रोजी संस्थानचे भांडार विभागामध्ये पाठविली होती. त्यावेळी देणगी घ्यावी अथवा बंद करावी या बाबत मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विषय ठेवणेत आला होता व काही दिवस देणगी वस्तू (खाद्य स्वरुपातील) घेणे बंद केले होते.

उपरोक्त बाबींवर सभेपुढे चर्चा होऊन देणगी वस्तु घेणेबाबत चर्चा होऊन दि.१२.०३.२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.९२ नुसार देणगी स्विकारणे सुरु झाले आहे. या निर्णयाप्रमाणे दि.१६.०३.२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये पावती नंबर ७२४ दि.०४.०४.२०१५ रोजी खालील प्रमाणे बनवुन माल ताब्यात घेण्यात आला.

| अ.नं. | तपशील | नग | एकूण वजन (किलो) | दर (प्रती किलो) | एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | शेवई | ४४३ गोण्या प्रत्येकी २० किलो | ८,८६०.०० | ४०.०० | ३,५४,४००.०० |
| ०२. | मैदा | २० गोण्या प्रत्येकी ५० किलो | १,०००.०० | २०.४५ | २०,४५०.०० |
| ०३. | गहू आटा | ४० गोण्या प्रत्येकी ५० किलो | २,०००.०० | २०.१४ | ४०,२८०.०० |
| ०४ | रवा | १०० गोण्या प्रत्येकी ५० किलो | ५,०००.०० | २०.९७ | १,०४,८५०.०० |
| | | | | एकूण रुपये- | ५,१९,९८०.०० |

उपरोक्त माल स्विकृतीस रितसर मान्यता येईपर्यंत तो भांडार विभागात तसाच पडून राहिला. यापैकी शेवई व रवा या दोन मालासाठी लागणारे तुप, साखर व तेल हे प्रसादालय बजेटपेक्षा अधिक लागणार असल्याचे तोंडी सांगुन तत्कालीन प्रसादालय अधिक्षक यांनी उपरोक्त मालासाठी भांडार विभागाने स्वतंत्र मंजुरी घेवून (साखर, तेल, तुप) पुरवठा केल्यानंतर उपरोक्त माल वापरण्यासाठी घेतला जाईल, असे तोंडी सांगून तो माल घेणेचे टाळले. तसेच नेलेला

रवा व आटा पुन्हा (गेट पास नं ७०७, दि.१५.०४.२०१५ व गेट पास नं.७३९ दि.१९.४.२०१५ अन्वये) खराब असल्याचे कारण सांगुन परत पाठविणेत आला.

दि.२८.०४.२०१५ रोजी श्रमपरीहार भोजनाचे वेळी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी तत्कालीन अधिक्षक, प्रसादालय यांना सदर देणगी माल लवकर वापरणेबाबत सांगितले असता त्यांनी एक-दोन दिवस मोकळया हवेत ठेवून मग पाठवा असे सांगितले होते. त्याप्रमाणे उपरोक्त रवा व आटा गोण्या भांडार विभागात खाली ओतुन पंख्याचे हवेने सुकविण्यात आल्या, त्यातील एक-एक गोणी रवा, आटा दि.३०.०४.२०१५ रोजी नेवून खराब असल्याचे सांगून न वापरता परत पाठविला. त्यानंतर काही दिवसांनी त्याचा रंग काळा पडू लागल्याने तो माल तत्कालीन कार्यकारी अधिकारी व प्रशासकिय अधिकारी (भांडार विभाग) यांना समक्ष दाखविला.

इकडील दि.०२.०५.२०१५ रोजीचे टिपणीव्दारे प्रसादालय अधिक्षक यांनी साखर, तेल व तुप स्वतंत्रपणे खरेदी करुन देणेची मागणी केल्याची घटना तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांचे निदर्शनास आणून दिली. सदरचे टिपणीवर मा.महोदयांनी देणगीदाराचे सहमतीने कार्यवाही करणेबाबतचे निर्देश दिले. मा. महोदयांचे निर्देशाप्रमाणे देणगीदार कंपनीशी दि. १३.०५.२०१५ रोजी संपर्क केला असता, कंपनीचे क्वालिटी कंट्रोल मॅनेजर श्री सारस्वत साहेब यांनी यावर्षी पाऊस बेमोसमी व कमी झाल्याने माल अशाप्रकारे खराब होऊ शकतो असे सांगून, सदर माल हरयाणात परत नेणे खर्चिक व बिना उपयोगी आहे, असे सांगीतले उलट त्यामुळे इतर मालास बाधा पोहचू नये याकरीता जवळचे कोणत्याही गोशाळेस उपरोक्त खराब माल दान करणेचे फॅक्स द्वारे संस्थानला कळविले होते.

त्यानंतर दि.२०.०५.२०१५ रोजी विधी विभागाचा लेखी अभिप्राय घेउन रवा ४,७७० किलो (रक्कम रु. १,००,०२६.९०) व गहू आटा २,००० किलो (रक्कम रु. ४०,२८०.००) अशी एकूण रक्कम रु. १,४०,३०६.९० हा खराब माल येथील जवळच असलेल्या ११० देशी गायींचे साईशाम गोशाळेस त्यांचे दि. ०५.०६.२०१५ रोजीचे विनंती पत्रानुसार दिला आहे. त्याची पोहोचही त्यांनी संस्थानला दिलेली आहे. तसेच दि.०६.०६.२०१५ चे मंजूर टिप्पणीने सदर माल स्टॉक रजिष्टरमधून कमी केला आहे.

आता बॅबिनो कंपनीने मुळ पावती इकडे परत पाठवून ती रद्द करुन स्विकृत मालाची नविन पावती मिळणेस तथा गोशाळेस देणगी दिलेल्या मालाच्या पावतीची मागणी केली आहे. मुळ पावती रद्द झाल्यानंतर गोशाळेस दिलेला माल वजा करुन त्यांना खालीलप्रमाणे देणगी पावती देता येईल.

| अ.नं. | तपशील | नग | एकूण वजन (किलो) | दर (प्रती किलो) | एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | शेवई | ४४३ गोण्या प्रत्येकी २० किलो | ८,८६०.०० | ४०.०० | ३,५४,४००.०० |
| ०२. | मैदा | २० गोण्या प्रत्येकी ५० किलो | १,०००.०० | २०.४५ | २०,४५०.०० |
| ०३. | रवा | ११ गोण्या | २३०.०० | २०.९७ | ४,८२३.१० |
| | | | | एकूण- | **३,७९,६७३.१०** |

तरी उपरोक्त वस्तुस्थितीचे अवलोकन होऊन-

अ) देणगीदार भक्ताचे मागणीप्रमाणे गोशाळेस दान केलेला माल व रक्कम वजा करणेकामी पा.नं. ७२४ दि.०४.०४.२०१५ लेखाशाखेमार्फत रद्द करुन फक्त स्विकृत मालाची नवीन पावती करुन गोशाळेच्या मुळ दान पावतीसह ती भक्तांना पाठवावी, अथवा.

ब) भक्तांना त्यांची मुळ पावती व गोशाळेच्या दान पावतीची झेरॉक्स पाठवून पावती रद्द होत नसल्याचे कळवावे,

उपरोक्त 'अ' किंवा 'ब' वर निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा. उपसमितीचे सभेपुढे सादर करणेचे मान्यतेस्तव टिपणी सादर केली असता त्यावर मा. उपकार्यकारी अधिकारी सा ो. यांनी त्यावर खालीलप्रमाणे शेरा मारला आहे.

'सदरचा माल गोशाळेस देणेपुर्वी व्य.स.मान्यता घेणे गरजेचे होते. माल खराब नसतांना स्विकारला नाही. मग लेखी पत्र व्यवहार करुन प्रसादालयात देणे अपेक्षित होते. माल खराब असलेबाबत प्रयोगशाळेचे अहवाल दिसुन येत नाहीत म्हणजेच प्रसादालय प्रमुख तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे अधिकारात माल खराब आहे. असे ठरविलेले दिसते वास्तविक प्रयोगशाळेत माल पाठवुन तपासणी अहवाल व्य. समितीपुढे ठेवून कार्यवाही करणे अपेक्षित होते परंतु तसे केलेले दिसुन येत नाही. सबब व्य. समितीपुढे सादर करणेस मान्यता असावी.'

तरी उपरोक्त कार्यवाहीस मान्यता मिळून 'अ' किंवा 'ब' वर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रस्तावात नमुद केलेला देणगी रवा व आटा खराब झालेला असलेबाबत कोणत्याही प्रयोगशाळेचा अहवाल दिसून येत नाही तसेच ही बाब त्रीसदस्य समितीच्या निदर्शनास आणून दिलेली नाही व समितीच्या पूर्व-परवानगीशिवायच या मालाची विल्हेवाट लावण्यात आलेली आहे. यावरुन तत्कालीन कार्यकारी अधिकारी व प्रसादालय प्रमुख यांनी त्यांचे अधिकारात सदरहू माल खराब असल्याचे परस्पर ठरविले, असे निदर्शनास येते. याकरीता प्रस्तावित देणगी मालाच्या रकमेची तत्कालीन कार्यकारी अधिकारी व तत्कालीन अधिक्षक, श्री साई प्रसादालय यांचेकडून वसुली का करणेत येऊ नये, याबाबत त्यांचे लेखी खुलासे मागविणेत यावेत.**

(कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग/ कामगार अधिकारी)

---

**विषय नं.६७ श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर देवस्थानला नोटा मोजणीसाठी जुन्या मशिन्स देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री विठ्ठल-रक्मिणी मंदिर समिती, पंढरपुर यांनी उपरोक्त संदर्भीय पत्रन्वये, मंदिर समितीला नोटा मोजणी मशिनची आवश्यकता असल्याने संस्थानकडील जुनी नोटा/नाणी मोजण्याच्या मशिन्स मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

त्या अनुषंगाने, संस्थानने दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीच्या कामासाठी नुकतेच काही अद्ययावत नोटा मोजणी मशिन्स नव्याने खरेदी केलेले आहेत. त्यामुळे वेळेत व श्रमात मोठ्या प्रमाणावर बचत झाली आहे. नव्याने मशिन्स खरेदी केल्याने जुन्यातील नोटा मोजणीच्या साधारणत ०६ मशिन्सचा वापर होत नसून, त्य दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणी कक्षाकडे पडून आहेत.त्यातील फक्त दोन मशिन्स श्रीविठ्ठल-रक्मिणीमंदिर समिती, पंढरपूर यांना मदत म्हणुन देता येतील.परंतु,नाणी मोजणी मशिन्स सध्या संस्थानकडे उपलब्ध नसल्याने त्याचा विचार करता येणार नाही.

उपरोक्तप्रमाणे साधारणतः ०६ मशिन्स शिल्लक असून त्यापैकी ०२ मशिन्स श्री विठ्ठल-रक्मिणी मंदिर समिती, पंढरपुर यांना मदत म्हणुन देता येतील. त्यांची घसारा वजा जाता किंमत साधारणतः रक्कम रु.१७,५००/- मात्र् एवढी होत आहे.मशिनरी दिल्यानंतर त्यांच्या नोंदी रितसर संस्थानच्या डेडस्टॉकमधुन कमी करता येतील.

तरी श्री विठ्ठल-रक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर यांना नोटा मोजणीच्या ०२ मशिन्स मदत म्हणून देणेबाबत निर्णय होणेकामी मा.त्रिसदस्यीय समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.५०२ यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, सदरहु मशिन्सची संस्थानला आवश्यकता नसल्याने श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर या देवस्थानला ०२ जुन्या नोटा मोजणी मशिन्स देणेस समितीची हरकत नाही. परंतु याकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी व शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदरहू मशिन्स श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर यांना देण्यात याव्यात.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.६८ राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांकडून संस्थान, रुग्णालये मालमत्ता विमा व साईभक्त विमा पॉलीसी घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचा रुग्णालये विभागासह मालमत्तेचा व साईभक्त अपघात विमा संरक्षण घेणेकरीता दि.१६.०६.२०१५ रोजीचे मा.उपसमितीचे सभेमध्ये वृत्तपत्रामध्ये ई-निविदा सुचना देवून राष्ट्रीयकृत विमा कंपयाकडून न्युनतम प्रिमीयम दर मागविणे बाबत निर्णय संमत झाला होता. त्यास अनुसरून दि.२५.०६.२०१५ रोजीचे दै. सार्वमत वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती, शासनाच्या www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर दि.२३.०६.२०१५ ते दि.३०.०६.२०१५ अखेर कालावधीत विहीत पध्दतीने ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदर जाहिरातीस अनुसरुन संस्थान मालमत्तेसाठी ०१ निविदा , रुग्णालय मालमत्तेसाठी ०१ निविदा खाजगी विमा कंपनीकडून आली होती. तर साईभक्त अपघात विम्या करीता निरंक असा अल्प प्रतिसाद मिळाला होता. निविदा कार्यपध्दतीने किमान तीन निविदा प्राप्त होणे बंधनकारक असल्याने व राष्ट्रीयीकृत विमा कंपनी नसल्याने निविदा उघडण्यात आली नाही.

मालमत्ता विमा मुदत दि.०९ व १० जूलै, २०१५ रोजी संपत असल्याने व नियमाप्रमाणे फेर निविदा जाहीरात देवून निविदा मागविणे वेळेअभावी शक्य नसल्याने व मागील वर्षाप्रमाणे राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांना न्युनतम दर बंद पाकीटामध्ये देण्यास सुचवितण्यात आले होते. त्यास अनुसरुन एकूण चार राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांनी आपले न्युनतम दर बंद पाकीटात दिले होते. मा. कार्यकारी अधिकारी यांनी विमा उतरविण्याची मुदत संपत आल्याने व निविदा कार्यपध्दतीस राष्ट्रीयकृत विमा कंपन्या सहभागी होत नसल्याने विमा संरक्षणाशिवायचा धोका पत्करणे योग्य होणार नसल्याने मागील वर्षाप्रमाणे चार राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांनी आपले न्युनतम प्रिमीयम दर सादर केल्याने पुरेशी स्पर्धा होत असल्याने आलेल्या तुलनात्मक दर सर्वसमक्ष उघडून निर्णय घेण्यास व प्रत्येकी विमा नुतनीकरण खर्च रु. १० लाखांचे आत असल्याने मा. उप-समितीच्या सभेमध्ये मान्यता घेण्यासाठी ठेवण्याचे निर्देश दिले होते. त्यास अनुसरुन मा. कार्यकारी अधिकारी, मुख्यलेखाधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष आलेले दरपत्रके दि.०८ जुलै,२०१५ रोजी उघडण्यात येवून त्याचा तुलनात्मक तक्ता बनविण्यात आला होता. तो खालीलप्रमाणे.

१) संस्थान मालमत्ता विमा पॉलीसी –

| अनं. | विमा कंपनी | प्रिमीयम दर |
|---|---|---|
| १ | दि.युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कं.लि.शाखा शिर्डी | **९,९५,८९३/-** |
| २ | दि.ओरीएंटल इंन्शुरन्स कं.लि.शाखा कोपरगांव | १०,७५,०००/- |
| ३ | नॅशनल इंन्शुरन्स कं.लि. कोपरगांव | ११,००,०००/- |
| ४ | दि न्यु इंडिया इंन्शुरन्स कं.लि. श्रीरामपूर | १०,११,०००/- |

सदरच्या तक्त्यात युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कं.लि. यांनी रु.९,९५,८९३/- इतका न्युनतम दर दिला.

२) संस्थान साईभक्त विमा पॉलीसी –

| अनं. | विमा कंपनी | प्रिमीयम दर |
|---|---|---|
| १ | दि.युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कं.लि.शाखा शिर्डी | **९,३१,०००/-** |
| २ | दि.ओरीएंटल इंन्शुरन्स कं.लि.शाखा कोपरगांव | ९,८१,०००/- |
| ३ | नॅशनल इंन्शुरन्स कं.लि. कोपरगांव | ११,००,०००/- |
| ४ | दि न्यु इंडिया इंन्शुरन्स कं.लि. श्रीरामपूर | ९,५१,०००/- |

सदरच्या तक्त्यात युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कं.लि. यांनी रु.९,३१,०००/- इतका न्युनतम दर दिला.

३) रुग्णालय विभाग मालमत्ता विमा पॉलीसी –

| अनं. | विमा कंपनी | प्रिमीयम दर |
|---|---|---|
| १ | दि.युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कं.लि.शाखा शिर्डी | ८,७५,०००/- |
| २ | दि.ओरीएंटल इंन्शुरन्स कं.लि.शाखा कोपरगांव | ८,८९,०००/- |
| ३ | नॅशनल इंन्शुरन्स कं.लि. कोपरगांव | ११,००,०००/- |
| ४ | दि न्यु इंडिया इंन्शुरन्स कं.लि. श्रीरामपूर | ८,९७,५००/- |

सदरच्या तक्त्यात युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कं.लि. यांनी रु.८,७५,०००/- इतका न्युनतम दर दिला.

उपरोक्तप्रमाणे एकूण चार राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांनी तुलनात्मक दर दिले त्यापैकी दि.युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कं.लि. शाखा शिर्डी यांचे दर न्युनतम असल्याने त्यांचेकडून अनुक्रमे विमानुतनीकरण करुन घेण्यात आले आहे. यामध्ये साईभक्तांच्या अपघात विमा सुध्दा घेण्यात आला आहे. तरी विमानुतनीकरण प्रस्तावास मान्यता मिळणेकामी मा.उपसमितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांकडून संस्थान, रुग्णालये मालमत्ता विमा व साईभक्त विमा पॉलीसी घेणेसाठी प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करणेत येऊन, त्यामधील निम्नतम दरधारकास पुढील आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.६९** **कुंभमेळा- २०१५ चे नियोजनाकामी खरेदी करण्यात आलेले सुरक्षा साहित्यांपैकी मुदतीत प्राप्त/ मुदतीनंतर प्राप्त/ आज अखेर प्राप्त न झालेले सुरक्षा साहित्यांबाबत.**

**प्रस्ताव-** पोलिस अधिक्षक, कार्यालय अहमदनगर यांचे दि.10/06/2015 चे पत्रानुसार पोलिस विभागासाठी कुंभमेळा 2015 चे गर्दीचे नियोजनकामी आवश्यक असलेले सुरक्षा साहित्य पुरविणेकामी सी.सी.टी.व्ही. सेल विभागामार्फत निवीदाप्रक्रीया राबवून सुरक्षा साहित्य पुरवठादार यांना वर्कऑर्डर देण्यात आलेल्या आहेत. कुंभमेळा कालावधीमध्ये मुदतीचे आत प्राप्त झालेले सुरक्षा साहित्याची यादी सोबत **परिशिष्ट-अ** प्रमाणे, मुदतीनंतर प्राप्त झालेले सुरक्षा साहित्याची यादी सोबत **परिशिष्ट-ब** तसेच अद्याप प्राप्त न झालेले सुरक्षा साहित्याची यादी सोबत **परिशिष्ट-क** प्रमाणे सोबत जोडलेली आहे.

कुंभमेळा 2015 चे गर्दीचे नियोजनकामी खरेदी करण्यात आलेले सुरक्षा साहित्य हे कार्यादेशाप्रमाणे पुरवठा धारकाने निवीदेमध्ये नमूद केलेल्या अटी/ शर्तीनुसार 15 दिवसांचे आत पुरविणे आवश्यक होते. परंतू कार्यादेशातील नमूद साहित्यापैकी परिशिष्ट-अ मधील अ.नं.1 ते 3 प्रमाणे सुरक्षा साहित्य मुदतीत प्राप्त झाले असुन परिशिष्ट-ब मधील अ.नं.1 ते 14 चे सुरक्षा साहित्य मुदतीनंतर प्राप्त झालेले असुन परिशिष्ट अ व ब मधील सुरक्षा साहित्य कुंभमेळा गर्दीचे नियोजनकामी शिर्डी पोलिस स्टेशनचे ताब्यात देण्यात आलेले असुन कुंभमेळा संपलेनंतर सदरचे सुरक्षा साहित्य परत संस्थानकडे जमा करणेबाबत पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांना जा.नं.एसएसएस/वशि/संरक्षण/3706/ 2015 दि.05/10/2015 चे पत्राने कळविणेत आलेले आहे. परंतू अद्याप सुरक्षा साहित्य पोलिस विभागाने संस्थानकडे जमा केलेले नाही.

मुदतीनंतर व आज अखेर प्राप्त न झालेले साहित्य स्वीकारावे किंवा कसे तसेच या साहित्याचे बिले आदा करावीत किंवा कसे याबाबत सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त प्रस्तावावर खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**(१) परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेले सुरक्षा साहित्य मुदतीमध्ये प्राप्त झालेले असून त्यांच्या बीलांची रक्कम संबंधीतास आदा करणेत यावी.**

**(२) परिशिष्ट ब मध्ये नमुद केलेले सुरक्षा साहित्य मुदतीनंतर प्राप्त झालेले असून सदरहू साहित्यांची श्रींचे समाधी शताब्दी वर्षामध्ये आवश्यकता भासेल का, याची पोलिस विभागाकडून खात्री करुन घ्यावी व जे साहित्य आवश्यक असेल, असे साहित्य स्विकारणेत येऊन, त्याच्या बीलाची रक्कम संबंधीतास आदा करणेत यावी.**

**(३) परिशिष्ट क मध्ये नमुद केलेले सुरक्षा साहित्य अद्यापपर्यंत प्राप्त झालेले नाही. परंतु त्यामधील अ.नं.०१ चे शिर्डी पोलिस स्टेशनचे हद्दीत टॉवर उभारणीचे काम चालू असून ते वगळता इतर अ.नं.०२ ते ०५ चे साहित्य स्विकारणेत येऊ नये.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.७०** **श्री क्षेत्र शिर्डी साईबाबा संस्थान येथे पार पडलेल्या गुरुपौर्णिमा उत्सवामध्ये भाविकांच्या दर्शन व्यवस्थेतील त्रुटीबाबत कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** श्री भा.बा. इंगळे, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन क्र.संकिर्ण-0815/सं.क्र.4350/विशा 1अ, गृह विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले असुन पत्रासोबत उप आयुक्त, (जातीय) आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. जा.क्र.16/एचए/2015-2123, दि.10/08/2015 चे पत्राची प्रत सोबत जोडलेली आहे व सदरचे पत्रात नमूद केलेप्रमाणे श्री क्षेत्र शिर्डी येथे पार पडलेल्या गुरुपौर्णिमा उत्सवामध्ये भाविकांच्या दर्शन व्यवस्थेमध्ये त्रुटीबाबत भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उदभवू नये यास्तव उचित कार्यवाही तात्काळ करणेबाबत कळविलेले आहे.

उप आयुक्त, (जातीय) आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्रामध्ये नमूद केले आहे की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त्ाव्यवस्था, शिर्डीच्या वतीने प्रति वर्षाप्रमाणे या वर्षी देखील दि.30/07/2015 ते दि.01/08/2015 रोजी दरम्यान गुरुपौर्णिमा उत्स्ाव साजरा केला गेला. उत्स्ावादरम्यान तीन ते साडेतीन लाख भाविकांनी साईबाबा मंदीरास भेट दिली.

कुंभमेळयात पर्वणीच्या काळात होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभुमीवर जास्तीत जास्त्ा भाविकांना दर्शनाचा लाभ व्हावा यासाठी गुरुपौर्णिमेच्या मुख्य्ा दिवशी श्री साईबाबा संस्थान व पोलीस विभाग यांनी मंदिराचे प्रवेश करणारी जनरल लाईन गेट नं.2 च्या दोन्ही बाजू सोडून सर्वच्या सर्व गेट बंद करुन मंदिर परिसरात असलेली गर्दी ही लेंडीबागेतून गेट नं.5 मधून बाहेर काढली. त्यामुळे मंदिर परिसरात मोठया प्रमाणावर होणारी गर्दी बाहेर जाण्यास बरीच अडचण निर्माण झाली होती. मंदिरातून दर्शन घेवून बाहेर आल्यानंतर गुरुस्थान मार्गे लेंडीबाग एवढीच जागा भक्तांना वावरण्यासाठी व बाहेर जाण्यासाठी असल्याने एकाच जागी बरीच गर्दी होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त्ाव्यवस्था, शिर्डी यांच्या त्रिसदस्य्ा समितीने आरतीच्या वेळा बदलल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी झाल्याने ग्रामस्थांनी सदर आरतीच्या वेळा बदलण्याचा निर्णय रद्द व्हावा यासाठी दि.01/08/2015 रोजी 16.10 वा. ते 17.10 वा. दरम्यान श्री कैलासबापु कोते (माजी नगराध्यक्ष, शिर्डी नगरपंचायत) यांच्या नेतृत्वाखाली 30/35 ग्रामस्थ कार्यकारी श्री राजेंद्र जाधव यांचे दालनासमोर टाळ-मृदुंग वाद्यासह उपोषणास बसले होते. संस्थानच्या त्रिसदस्य्ा समितीने घेतलेला निर्णय अखेर मागे घ्यावा लागलेला आहे.

कुंभमेळयाच्या पार्श्वभुमीवर मंदिर परिसराचे सर्वच गेट बंद करणे असो अगर आरतीच्या वेळा बदलणे असो याबाबत शिर्डी ग्रामस्थंना विश्वासात न घेतले गेल्याने संस्थान प्रशासनाला आरतीच्या वेळा आहे त्याच ठेवण्याची वेळ आलेली आहे. आरतीच्या वेळा बदलताना पोलीस प्रशासनास सुध्दा सांगण्यात आलेले नव्हते.

एकंदरीत कुंभमेळाव्यात पर्वणीच्या काळात होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभुमीवर गर्दीचे व्य्ावस्थापन तसेच इतर महत्वाचे कुठलेही मोठे निर्णय घेताना मंदिर प्रशासनाने शक्यतो पोलीस प्रशासन, शिर्डी ग्रामस्थांची बैठक घेऊन समन्व्ायातून निर्णय झाल्यास कुठल्याही प्रकारचा अनुचीत प्रकार टाळण्यास मदत होईल.

कुंभमेळा पर्वणीच्या काळात होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभुमीवर जास्तीत जास्त्ा साईभक्तांना दर्शनाचा लाभ मिळावा तसेच गर्दीमध्ये चेंगराचेंगरी होवू नये म्हणून पोलीस अधिक्षक अहमदनगर यांचे सुचनेनुसार व उपस्थ्िातीत कुंभमेळयाच्या गर्दीचे पार्श्वभुमीवर गुरुपौर्णिमा उत्स्ावाचे वेळी गर्दी मंदीर परिसरातून बाहेर काढण्यासाठी रंगीत तालीम घेण्यात आली होती. तसेच कुंभमेळा गर्दीचेवेळी जास्तीत जास्त्ा साईभक्तांना दर्शनाचा लाभ मिळणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे मान्य्ातेने आरतीचे वेळेतील बदल करणेबाबत निर्णय घेणेत आलेला होता. परंतू गांवकरी यांचे विरोधानंतर आरतीचे वेळेत बदल करणेबाबत निर्णय रद्द करणेत आलेला आहे.

उप आयुक्त-, (जातीय) आयुक्त, राज्य गुप्तववार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी कुंभमेळाव्यात पर्वणीच्या काळात होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभुमीवर गर्दीचे व्य्ावस्थापन तसेच इतर महत्वाचे कुठलेही मोठे निर्णय घेताना मंदिर प्रशासनाने शक्यतो पोलीस प्रशासन, शिर्डी ग्रामस्थांची बैठक घेऊन समन्व्ायातून निर्णय झाल्यास कुठल्याही प्रकारचा अनुचीत प्रकार टाळण्यास मदत होईल असे कळविलेले आहे.

तरी उप आयुक्त, (जातीय) आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र आपले अवलोकनार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.५०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उप आयुक्त, (जातीय) आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे प्रस्तावित पत्राची नोंद घेण्यात आली. तसेच त्यांनी केलेल्या सूचनांची यापुढे अंमलबजावणी केली जाईल, असे त्यांना कळविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.७१** **डॉ.आर.प्रभाकरराव, प्र.वैद्यकिय संचालक यांचेबाबत.**

**विषय नं.७२** **डॉ.विजय बाळकृष्ण पाटील, उपवैद्यकीय संचालक यांचेबाबत.**

**निर्णय क्र.५०६** **उपरोक्त विषय नं.७१ व ७२ तूर्त स्थगित ठेवण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**<u>यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.</u>**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ चे कालावधीत श्री साईबाबांचे लाईव्ह दर्शनाकरीता ठिकठिकाणी LED Display बसविणेसाठी प्लॅटफॉर्म तयार करणेसाठी झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१) अधिनियमाचे कलम १७ (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मीक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्यकरण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ (१) मधील खंड (ग) अन्वये भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**मा उच्च न्यायालयाचे आदेश:-** पी.आय.एल.१८/२०११ मधील सिव्हील अर्ज क्र. ३५००/२०१५ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.०६/०५/२०१५ रोजीचे आदेशान्वये रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास परवानगी देणेत आलेली आहे.

**प्रस्तावना:-** नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५ मध्ये दिनांक २७ ऑगष्ट २०१५ ते २६ सप्टेंबर २०१५ या कालावधीत शिर्डी व परिसरात साईभक्तांकरीता अतिरिक्त सोयी - सुविधा उपलब्ध करणे आवश्यक होते. त्या अनुषंगाने साईभक्तांना श्री साईबाबांचे लाईव्ह दर्शन होणेसाठी सी.सी.टि.व्हि. विभागाचे मागणीनुसार दर्शन रांगेत LED Display उभा रणेसाठी६ फुट उंच ६x१२ फुटाचे एकुण ७ प्लॅटफॉर्म विहित पध्दतीने कोटेशन मागवून मंडप ठेकेदार यांचेकडून तयार करुन घेणेस तसेच मा. त्रिसदस्य समितीचे दि. ३०/०१/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ०६ अन्वये Digital Screen बसविणेसाठी येणारे रक्कम रु.२४ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. तसेच मा. उच्च न्यायालयाचे उपरोक्त परवानगीत सदरचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

Digital Screen बसविणेसाठी मंजूर असलेल्या एकुण रू. २४ लक्ष मात्र इतक्या अपेक्षित खर्चातूनच याकामी प्लॅटफॉर्म उभारणेकामी येणारा खर्च करणेस इकडील विभागाचे दि.०९/०९/२०१५ रोजीचे टिपणीनुसार रु.९६,७६८/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार इकडील विभागामार्फत जा.न. ३३१५, ३३१८, दि.१०/०९/२०१५ रोजीचे पत्रान्वये कोटेशन मागविणेत आले होते त्यामध्ये निम्नतम दर देणारे ठेकेदार बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर यांना संस्थानचे जा. क्र. ३३७९/२०१५ व ३३७८/२०१५ दि. १४ सप्टेंबर, २०१५ नुसार कार्यादेश देणेत आला. त्यानुसार ठेकेदार यांचेमार्फत दि.१२/०९/२०१५ ते दि.२७/०९/२०१५ अखेर १६ दिवसांसाठी एकुण ०७ नग LED display Screen करीता प्लॅटफॉर्म तयार करुन दिले आहेत. याकामी त्यांचे झालेल्या कामाचे बिलाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | परिमाण / एकक | दर (१६ दिवसांसाठी) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | LED display Screen करीता प्लॅटफॉर्म उभारणी करणे. साईज ६ फुट उंचीचे व ६'X१२' (एकुण ०७ नग) | ५०४ चौ. फुट | ७/- प्रती दिवस प्रती चौरस फुट | ५६४४८/- |
| | | | **एकुण रुपये ..** | **५६,४४८/-** |

तरी नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ चे निमित्त साईभक्तांना श्री साईबाबांचे लाईव्ह दर्शनासाठी दर्शन रांगांमध्ये LED Display बसविणेसाठी प्लॅटफॉर्म तयार करुन घेणेकामी उपरोक्त प्रमाणे आलेले रु.५६,४४८/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ चे कालावधीत साईभक्तांना श्री साईबाबांचे लाईव्ह दर्शन मिळावे याकरीता ठिकठिकाणी बसविण्यात आलेल्या LED Display साठी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे प्लॅटफॉर्म तयार करणेसाठी झालेल्या रु.५६,४४८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.१८२ मधील कचरा डेपोला चेनलींक जाळी बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

अधिनियमाचे कलम -२१ (१) मधिल पोटकलम (क) अन्वये, " मंदिराची व विश्वस्तव्यस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" अशी तदतूद आहे.

**प्रस्तावाना:-** संस्थानचे विविध परिसरात निघणारा दैनंदिन कनकचरा मौजे निमगांव- को-हाळे हद्दीतील संस्थान मालकीचे गट नं. १८२ मधील जागेत सन २०१२ पासून खड्डा खोदून टाकणेत येत आहे. सिंहस्थ कुंभमेळा २०१५ करीता सदरचे क्षेत्रात १००'x६०' मापाचा १५ फुट खोल खड्डा खोदणेस व याकामी येणा-या रक्कम रु.२,९५,०००/- मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि. १८/०८/२०१५ रोजीचे सभेत मान्यता देण्यात आली आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी कमी कालावधी शिल्लक असल्याने इकडील विभागाने दि.३१/०८/२०१५ रोजीचे टिपणी नुसार जे.सी.बी.धारक श्री.के.आर. वाबळे, (श्री.कल्याण रावसाहेब वाबळे, रुई) यांचेकडून वाहन विभागाकडील जे.सी.बी. वापराचे जा.क्र.२५८१/२०१५ दि.०७/०८/२०१५ रोजीच्या कार्यादेशातील मंजूर दराने घनकचरा टाकणेसाठी खड्डा खोदकाम करणेस मान्यता देणेत आली होती. त्यानुसार ठेकेदार यांचेमार्फत कार्यवाही सुरु होती.

परंतू दिनांक ११.०९.२०१५ रोजी सदरहू ठिकाणी कचरा टाकणेकामी व नविन खड्डा खोदकाम करणेसाठी निमगांव ग्रामस्थांनी विरोध केला त्यामुळे निमगांव ग्रामस्थ यांचेसमवेत मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे कक्षेत दि.१४/०९/२०१५ रोजी बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदरहू बैठकीमध्ये संस्थानचे गट नं.१८२ चे क्षेत्रास चेनलिंक जाळीचे कंपाऊंड टाकणेकामी मा.कार्यकारी अधिकारी सो यांनी सूचना केल्या आहेत.

**प्रस्ताव:-** उपरोक्त प्रमाणे मौजे निमगांव को-हाळे येथील संस्थान मालकीच्या गट नं.१८२ मध्ये घनकचरा टाकणेसाठी १०० x ६० या साईजचे खड्डया भोवती चेनलींक जाळीचे कंपाउंड करणे व गेट बसवणेसाठी जिल्हा दरसुची नुसार रक्कम रु. १,५९,२३९/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.१८२ मधील कचरा डेपोला चेनलींक जाळी बसविणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस तसेच त्याकामी येणा-या अंदाजे रु.१,५९,२३९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३** **नविन भक्त निवासस्थान साईनिवास अतिथीगृह, व्दारावती इमारत येथील सौर उर्जा सुविधा यंत्रणेचे सन २०१५-२०१६ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (AMC) देणे व इतर आवश्यक दुरुस्ती करणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे भक्तनिवासस्थान, साईनिवास अतिथीगृह व व्दारावती इमारत या ठिकाणी साईभक्तांना स्नानाकरीता गरम पाण्याची सोय व्हावी म्हणून सोलर वॉटर हिटींग सिस्टीमस् बसविण्यात आलेल्या आहेत. या यंत्रणेमध्ये काचेचे रिफ्लेक्टर, पाण्याच्या स्टोअरेज टाक्या व जी.आय. पाईप यांचा समावेश असतो. या यंत्रणेमध्ये काही बिघाड झाल्यास तो त्वरीत दुरुस्त करुन घ्यावा लागतो. सोलर वॉटर हिटर सिस्टीम यंत्रणा सतत कार्यान्वित राहण्यासाठी सर्व ठिकाणच्या सिस्टीमचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणे गरजेचे असते. या सर्व्हीस कालावधीत कलेक्टरची काच फुटली तर ती बदलण्यात येते. तसेच इतर लिकेज काढणे, व्हाल्व्ह मेन्टेनंन्स करणे, दैनंदिन साफसफाई ठेवणे इत्यादी कामे करण्यात येतात. यासाठी वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणे आवश्यक आहे.

मागील सन 2014-2015 या वर्षाकरीता मा. त्रिसदस्यीय समितीचे दिनांक 12/06/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 452(10) अन्वये भक्तनिवासस्थान, साईनिवास अतिथीगृह व व्दारावती इमारत या ठिकाणच्या सोलर यंत्रणेचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेकामी रक्कम रुपये 3,61,955/- मात्र रकमेचा तसेच साईनाथ रुग्णालय व साईबाबा हॉस्पीटल येथील सोलर यंत्रणेचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेकामी रक्कम रुपये 2,72,362/- तसेच सहा सोलर हॉट वॉटर टॅंक नविन खरेदीकामी (जुने बायबॅक देवून) रक्कम रुपये 3,55,683/- अशा एकत्रित रक्कम रुपये 9,90,000/- मात्रचा जा.नं. एसएसएसटी/मेकॅनिकल/2481/2014 दिनांक 19 ऑगष्ट, 2014 अन्वये मे. युनिक सोलर सिस्टीम्स, नाशिक यांना दिनांक 01/08/2014 ते 31/07/2015 या कालावधीकरीता कार्यादेश देण्यात आला होता. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट कालावधीमध्ये त्यांनी सर्व्हीस दिली असून, सर्व यंत्रणा सुरळीत कार्यन्वित आहेत. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक 31/07/2015 रोजी संपुष्टात आलेला आहे.

आता, भक्तनिवासस्थान, साईनिवास अतिथीगृह व व्दारावती इमारत या ठिकाणच्या सोलर यंत्रणेचे सन 2015-2016 करीता एक वर्ष कालावधीसाठी वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) द्यावे लागणार आहे. तसेच या यंत्रणेतील काही कलेक्टर पॅनल डिसक्लिनिग करणे आवश्यक आहे. तसेच इतर दुरुस्ती करावी लागणार आहे. याकामी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षीत आहे :

| अ.क्र. | तपशील | प्लॅन्ट कॅपासिटी | युनिट | एकूण क्षमता | डिसक्लिनिग करावयाची कलेक्टर पॅनल संख्या | वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट + कलेक्टर पॅनल डिसक्लिनिग एकत्रित रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | भक्तनिवासस्थान (500 रुम) | 2,250 | 06 | 13,500 | 108 | 6,00,000/- |
| 2. | साईनिवास गेस्ट हाऊस | 1,500 | 02 | 3,000 | 40 | |
| 3. | साईनिवास गेस्ट हाऊस | 1,000 | 02 | 2,000 | | |
| 4. | व्दारावती धर्मशाळा | 1,000 | 32 | 32,000 | -- | |

उपरोक्तप्रमाणे भक्तनिवासस्थान, साईनिवास अतिथीगृह व व्दारावती इमारत या ठिकाणच्या सोलर यंत्रणेचे सन 2015-2016 करीता एक वर्ष कालावधीसाठी वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेकामी तसेच कलेक्टर पॅनल डिसक्लिनिग करणे, साईनिवास अतिथीगृह येथील 1500 लिटरचे टॅंक स्टॅन्डसह (जुनी बायबॅक देऊन) नविन खरेदी करणे, इतर आवश्यक दुरुस्ती करणे याकामी अंदाजे रक्कम रुपये 6,00,000/ (अक्षरी रुपये सहा लाख) मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी भक्तनिवासस्थान, साईनिवास अतिथीगृह व व्दारावती इमारत या ठिकाणच्या सोलर यंत्रणेचे सन 2015-2016 करीता एक वर्ष कालावधीसाठी वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणे व इतर आवश्यक दुरुस्ती करणेकामी येणा-या अंदाजे रुपये 6,00,000/- खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहीरात देऊन ई-निविदा मागविणेकामी सदर प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणा-या अंदाजे रु.६,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०४** **संस्थानचे विविध ठिकाणी ए.सी.बसविणेकामी प्राप्त टेंडरधारकांपैकी निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 05/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र.375 नुसार श्री साईबाबा हॉस्पीटल ई.डी.पी. विभाग, सीसी टि.व्ही विभाग येथे प्रत्येकी एक याप्रमाणे दोन, पी.आर.ओ. येथील मिटींग हॉलजवळील व्ही.आय.पी.

क्र.1 & 2 येथे प्रत्येकी एक याप्रमाणे दोन तसेच श्री साई प्रसादालयातील व्ही.आय.पी. भोजन कक्षासाठी सहा असे एकूण दहा (10) ए.सी. खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहीरात देवून निविदा करणेस व याकामी येणाऱ्या रुपये 4,75,000/- खर्चास मान्यता घेण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त निविदा दिनांक 19/11/2014 रोजीचे मा.उप-समितीचे सभेपुढे उघडण्यात आल्या. त्यातील दरांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे:

| अ.नं. | टेंडरधारकाचे नांव | टेंडरमधील मुळ दर रुपये |
|---|---|---|
| 1. | मे .श्री रेफ्रिजरेशन, औरंगाबाद | 6,08,000/- |
| **2.** | मे .लकी रेफ्रिजरेशन, नाशिक | **5,53,375/-** |
| 3. | मे .लकी रेफ्रिजरेशन, श्रीरामपूर | 5,93,750/- (मागणी केलेल्या मालाचे दर दिलेले नसल्यामुळे अपात्र) |
| 4. | मे .साई एच.व्ही.ए.सी. सिस्टीम, ठाणे | 6,17,500/- |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त दरांबाबत सविस्तर चर्चा होऊन, मा उप-समितीने सध्या ए.सी. बसविण्याची आवश्यकता नसल्याने सदरहु विषय तुर्त स्थगित ठेवण्यात यावा अशी मा. उप-समितीचे शिफारस केली होती. सदरची शिफारस मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 20/11/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र 989 (2) नुसार मान्य करण्यात आली.

मात्र जनसंपर्क कार्यालयाजवळील व्ही.आय.पी. क्र.1 व 2 तसेच साई प्रसादालयातील व्ही.आय.पी. कक्षासाठी ए.सी. बसविणे आवश्यक आहे.

उपरोक्त तक्यातील निम्नतम दरधारक लकी रेफ्रिजरेशन, नाशिक यांना ए.सी. पुरविणेबाबत विचारणा केली असता, त्यांनी दिनांक 20 आक्टोबर, 2015 रोजीचे ई-मेल पत्राव्दारे दिनांक 19/11/2014 रोजीचे उप-समितीचे सभेत उघडणेत आलेल्या टेंडरमधील दरातच (रुपये 5,53,375/-) ए.सी. पुरविणेस सहमती दर्शविली आहे. तथापि टेंडरममध्ये 2 टन व 1.5 टन क्षमतेचे मागणी केलेले अनुक्रमे 245DX व 185DX हे मॉडेल कंपनीने बंद केलेले असून, त्याच स्पेशिफिकेशनचे 145Zya व 185Zya हे मॉडेल बाजारात आणलेले आहेत. तसेच स्लिम लाईन टॉवर ए.सी. करीता कंपनी कॉपर पाईपींग देत नसलेने इन्स्टोलेशनचे वेळी अतिरीक्त पाईपची खरेदी करावे लागतील, असे त्यांनी कळविलेले आहे.

स्लिम लाईन टॉवर ए.सी. इन्टोलेशन करतेवेळी 120 फुट कॉपर पाईप लागणार असून, त्यासाठी अंदाजे रुपये 32,000/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

तरी ई.डी.पी. विभाग, सीसी टि.व्ही विभाग येथे प्रत्येकी एक याप्रमाणे 2 टन क्षमतेचे दोन, पी.आर.ओ. येथील मिटींग हॉलजवळील व्ही.आय.पी. क्र. 1 & 2 येथे अनुक्रमे 2 टन व 1.5 टन क्षमतेचे प्रत्येकी एक याप्रमाणे दोन तसेच श्री साई प्रसादालयातील व्ही.आय.पी. भोजन कक्षासाठी 2 टन क्षमतेचे सहा टॉवर ए.सी. असे एकूण दहा (10) ए.सी. खरेदी करुन बसविणेकामी दिनांक 19/11/2014 रोजीचे मा. उप-समितीचे सभेपुढे उघडण्यात आलेल्या निविदेतील तुलनात्मक तक्यानुसार निविदेतील निम्नतम दरधारक मे. लकी रेफ्रिजरेशन, नाशिक यांना ए.सी. पुरविणेकामी रुपये 5,53,375/- मात्र रकमेचा पुरवठा आदेश देणेस तसेच अतिरिक्त कॉपर पाईपींग खरेदी करणेसाठी येणा-या अंदाजे रक्कम रुपये 32,000/- चे वाढीव खर्चास मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे दि.१६/१०/२०१५ रोजीचे आदेशानुसार संस्थान आस्थापनेवरील स्थायी व अस्थायी कर्मचा-यांना अदा करणेत आलेल्या सन २०१५ दिपावली सानुग्रह अनुदानास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी दि.१२/०९/२०१५ रोजीचे पत्रान्वये माहे नोव्हेंबर २०१५ मध्ये साज-या करणेत येणा-या दिपावली उत्सवासाठी संस्थान सेवेतील कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान मिळणेबाबत विनंती केलेली होती.

त्यास अनुसरुन आस्थापना विभागाकडून दि.२२/०९/२०१५ रोजीचे टिपणीवरील मान्यतेने सदरचा विषय निर्णयार्थ मा.त्रिसदस्य समिती दि.०८/१०/२०१५ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता. त्यावर समितीने निर्णय क्र.३२३ खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

"प्रस्तावातील अ.नं.०२ वगळता अ.नं.०१ व ०३ मध्ये नमूद केलेल्या पात्र कर्मचा-यांना सन २०१३ दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास मंजुरी मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये पी.आय.एल.१८/ २०११ सिव्हील अर्ज क्रमांक १३२८४/२०१३ दाखल असून त्या अर्जावर अद्याप निर्णय झालेला नाही. मा.खंडपीठाने या सिव्हील अर्जावर दि.२५/१०/२०१३ रोजीचे आदेशान्वये, सन २०१३ दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान तुर्तास देण्याविषयी अंतरीम आदेश केलेला आहे व जर का शासन धोरणानुसार असे अनुदान देता येणार नाही, असे मा.खंडपीठाचे मत झाले तर दिले गेलेले अनुदान संबंधीत कर्मचा-यांच्या पगारामधून पुन्हा वसुल करुन घ्यावे, अशी अट घातलीआहे.

त्यामुळे सन २०१५ चे सानुग्रह अनुदान देण्यासाठी संस्थानला आर्थिक अडचण जरी नसली, तरी सन २०१३ व २०१४ च्या सानुग्रह अनुदानाबाबत निर्णय अद्याप झालेला नाही व त्यावर मा.खंडपीठाचा अंतीम निर्णय होईपर्यंत चालु वर्षाचे सानुग्रह अनुदान देण्याविषयी समिती निर्णय घेऊ शकत नाही, असे ठरले."

तथापी, दरम्यानचे कालावधीत श्री.राजेंद्र जगताप अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी संस्थान कर्मचा-यांना सन-२०१५ चे दिपावलीकरीता सानुग्रह अनुदान मंजूर व्हावे या कारणास्तव मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन नं.१३३६६/२०१५ (जनहित याचिका क्रमांक १८/२०११) दाखल केलेले होते.

सदर सिव्हील अर्जाचे अनुषंगाने मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.१६/१०/२०१५ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

1] Heard learned counsel for the rival parties.

2] Shri.S.B.Talekar, learned counsel for the respondent nos.19 & 20 vehemently opposed the application for making ex-gratia payment to the employees.

3] We have perused the repeated orders made by this Court right from the year 2012.

4] Learned cunsel Shri.Talekar points out that the Government did not file effective reply though last order dated 13.10.2014 expected so. We do not want to go into the submissions on marits made by Advocate Shri Talekar since we think that we should not digress from the situation namely the orders passed every year by this Court right from 2012. True it is that there is no resolution passed by the Board of Trustees, but then subject to such resolution being passed, the order can be made in the same manner as was done for the last four years.

5] Shri Talekar also raised an objection that this being a PIL, the issue about the service matter cannot be raised and entertained in this PIL. As started earlier, the PIL was pending right from 2011 and no objection was raised at that time. Not only this, but the Court made orders in PIL preventing any expenditure without permission from this Court and, therefore, unless the applications are entertained, the respondent no.2 – Sansthan would not be able to spend a single pie without the orders of this Court in this PIL and, therefore, the objection is not accepted.

6] We, therefore, permit the respondent no.2 – Sansthan to disburse the amount of Rs.6,75,00,000/- provisionally, and as an interim order, to the members of the applicant as ex-gratia payment for 2015 Diwali Festival and the same would be subject to the further decision in Civil Application No.13284/2013. If the Court finds that the amount could not have been paid or less amount should have been paid, the direction, to recover that amount or to adjust that amount from the salaries of members of the applicant being paid, can be issued.

7] In our opinion, the PIL is pending since 2011 and every year on the strength of interim orders, the expenditure and payments are being disbursed from the income of the respondent no.2 – Sansthan. This cannot be allowed to go on ad infinitum and, therefore, we direct that this PIL be placed for final hearing after ensuing Diwali vacation. Civil application is accordingly diposed of.

थोडक्यात, मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.१६/१०/२०१५ रोजीचे आदेशान्वये सिव्हील अर्ज क्रमांक १३२८४/२०१३ (जनहित याचिका क्रमांक १८/२०११) मध्ये अंतिम निर्णय होईपर्यंत उपरोक्त पॅरा नं.६ प्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे कर्मचा-यांना सन-२०१५ चे दिपावली उत्सवाकरीता सानुग्रह अनुदान म्हणून रक्कम रु.६,७५,००,०००/- मात्र आदा करणेबाबत सशर्त (तात्पुरती) मंजुरी दिलेली आहे. त्यास अनुसरुन व मा.त्रिसदस्य समितीचे दि.०८/१०/२०१५ रोजीचे सभेत निर्णयार्थ सादर केलेल्या प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे संस्थान आस्थापनेवरील स्थायी व अस्थायी कर्मचा-यांना सन २०१५ चे दिपावली उत्सवाचे सानुग्रह अनुदान आदा करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ६,७५,००,०००/- (अक्षरी रुपये सहा कोटी पंच्याहत्तर लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सामान्य प्रशासन विभागाकडून दि.२१/१०/२०१५ रोजी प्रशासकीय स्तरावर टिपणी सादर करण्यात आली होती. सदर मंजूर टिपणीनुसार आदेश क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/२७९२/२०१५ दि.२३/१०/२०१५ अन्वये संस्थानचे स्थायी व अस्थायी कर्मचा-यांना दि.०१ ऑक्टोबर, २०१४ ते दि.३० सप्टेंबर, २०१५ या कालावधीत दिलेल्या एकूण वेतनाचे / पगाराच्या ८.३३ टक्के दराने होणारी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून विहित पध्दतीने लेखी हमीपत्र घेऊन अदा करणेबाबत आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

सबब, वरीलप्रमाणे मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील दि.१६/१०/२०१५ रोजीचे आदेशान्वये संस्थानचे स्थायी व अस्थायी कर्मचा-यांना सन २०१५ दिपावली उत्सवानिमित्त दिलेल्या सानुग्रह अनुदानास तसेच याकामी करण्यात आलेल्या उचित खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **पालखी सेवेक-यांना मानधन वाढ मोफत वैद्यकीय सेवा व ओळखपत्र देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.अमोल बिडवे व इतर पालखी सेवेकरी यांनी संदर्भीय दि.२४/१०/२०१५ रोजीचे विनंती अर्जान्वये पालखी सेवेक-यांना मानधनामध्ये वाढ करणे, मोफत वैद्यकीय सेवा व अधिकृत ओळखपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

संस्थानमार्फत प्रत्येक गुरुवारी श्रींची पालखी समाधी मंदिर ते द्वारकामाई, द्वारकामाईत भजन व तेथुन चावडी पर्यंत त्यानंतर चावडीमध्ये आरती व परत समाधी मंदिर अशी पालखीची मिरवणूक असते. तसेच स्थानिक उत्सव व प्रमुख तीन उत्सवाचे वेळी श्रींचे रथ/पालखीची गावातून मिरवणूक असते, यावेळी श्रींचे रथ/पालखीचे समोर पालखीधारक, अब्दागिरीधारक, मृदुंग वादक, सनई वादक, शिंग वादक, ताशा वादक, डफ वादक, बत्तीधारक इ. सेवा प्रकारे पालखी सेवेकरी म्हणून एकूण १३ सेवेकरी नेमण्यात आलेले आहेत.

मा.व्य.समितीचे दि.०५/१२/२०१० चे सभेतील विषय क्र.८२ अन्वये पालखी सेवेक-यांना वाढ देणे व सेवेक-यांना संस्थान आस्थापनेवरील कर्मचा-यांप्रमाणे श्रीसाईनाथ रुग्णालयात स्वत:, त्यांची पत्नी व मुलांना मोफत औषधोपचाराची सवलत देणेबाबत विषय ठेवण्यात आला होता परंतु, त्यावेळी त्यांच्या मानधनात वाढ करुन रु.२५०/- ऐवजी रु.५००/- देणेबाबत निर्णय झाला व त्याप्रमाणे त्यांना सध्या मानधन देण्यात येत आहे. परंतु, त्यांचे वैद्यकीय सेवेबाबत चर्चा झाली होती, निर्णय घेण्यात आला नव्हता. त्यानंतर मा.व्य.समितीचे दि.०७/०२/२०१३ रोजीचे सभेतील वि.क्र.२६ अन्वये पालखी सेवेक-यांना **१.**मानधन प्रत्येकी रु.११००/- (हजेरीप्रमाणे) **२.** वर्षातुन एक वेळेस गणवेश व **३.** सेवेकरी व त्यांचे कुंटुंबीयांना संस्थानचे कंत्राटी कर्मचा-यांप्रमाणे वैद्यकीय सेवा देणेबाबत विषय ठेवण्यात आला होता. परंतु, निर्णय क्र.८६ नुसार श्रींचे पालखी/रथ व चौघडा सेवेक-यांना सोयी-सुविधा पुरविणेबाबत सद्य:परिस्थिती चालू असलेल्या कार्यवाहीमध्ये कोणताही बदल करण्यात येऊ नये असे ठरले आहे.

तरी पालखी सेवेक-यांचे खालीलप्रमाणे मागणीबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

१. सर्व पलाखी सेवेकरी व चौघडा वादक यांना दरमहा प्रत्येकी रु.११००/-मानधन (हजेरीप्रमाणे).

२. सेवेक-यांचे कुंटुंबीयांना (आई, वडील, पत्नी व मुलांना) संस्थानचे दोन्ही रुग्णालयामध्ये आस्थापनेवरील कर्मचा-यांप्रमाणे मोफत सुविधा पुरविणे व

३. संस्थानचे सामान्य प्रशासन विभागामार्फत अथवा संरक्षण विभागामार्फत अधिकृत ओळखपत्र देणे.

तरी पालखी सेवेक-यांना उपरोक्तप्रमाणे मानधनवाढ देणे व सोयीबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५१२** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानचे श्रीसाईनाथ रुग्णालयामध्ये अत्यल्प दरामध्ये सर्वांसाठी वैद्यकिय सेवा उपलब्ध असल्यामुळे पालखी सेवेक-यांनी त्या सेवेचा लाभ घ्यावा व ओळखपत्राचा दुरुपयोग होऊ नये, याकरीता त्यांना ओळखपत्र न देता संरक्षण विभागास लेखी स्वरुपात कळविणेत यावे. तसेच वाढत्या महागाईचा विचार करता पालखी सेवेकरी व चौघडा वादक यांना दरमहा प्रत्येकी रु.११,००/- मात्र मानधन देण्यात यावे.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **मंदिर सुरक्षेकरीता दर्शन रांग चेकींग गेट व महाव्दार येथील चेकींगकामी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहमदनगर यांचेकडून माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई मंदिर हे जगातील सर्वधर्मीयांचे श्रध्दास्थान असलेले मंदिर असुन श्रींचे दर्शनाला देश, विदेशातुन दररोज लाखो साईभक्त शिर्डीला येत असतात. करीता श्री साई मंदिराचे व साईभक्तांचे सुरक्षेकरीता मंदिर परिसराचे महाद्वार व दर्शनरांगेचे प्रवेशद्वार येथे साईभक्तांची चेकींगकामी तसेच संस्थानचे कॅश काऊंटर, मंदिर, मंदिराचे महाद्वार येथे माजी सैनीक गणमॅन पुरविणेकामी मॉडर्ण व्ही.आर. सिक्युरिटी फोर्स इंडिया प्रा.लि. पुणे या कंपनीला जा.नं.एसएसएस/ वशि७ए/ 5393/ 2015 दि.29/01/2015 चे आदेशान्वये दि.01/03/2015 ते दि.28/02/2018 अखेर कंत्राट देण्यात आलेले असुन सदचे एजन्सीने खालील तपशिलाप्रमाणे सुरक्षा कर्मचारी पुरविणेबाबत कार्यादेश देण्यात आलेला आहे.

| अ.नं. | तपशिल | दररोज कर्मचारी पुरविणे आवश्यक कर्मचारी संख्या | प्रतिदिनी हजेरी (सर्व समावेशक करांसह) | महिण्यामध्ये 26 दिवस काम केल्यास एका कर्मचाऱ्यास देण्यात येणारे एकुण वेतन |
|---|---|---|---|---|
| 01. | माजी सैनीक सुरक्षा अधिकारी | 01 | 537.31 | 13,970.06 |
| 02. | माजी सैनीक सुरक्षा सुपरवायझर | 03 | 415.19 | 10,794.94 |
| 03. | माजी सैनीक बंदुकधारी (गणमॅन) | 40 | 391.79 | 10,186.54 |
| 04. | माजी सैनीक सुरक्षा रक्षक | 48 | 364.99 | 9,489.74 |
| 05. | महिला सुरक्षा रक्षक (सिव्हीलीयन) | 34 | 339.30 | 8,821.80 |
| | एकुण कर्मचारी संख्या | 126 | | |

मॉडर्ण व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स इंडिया प्रा.लि. पुणे या एजन्सीमार्फत संस्थानला आवश्यक असलेले क्षमतेने सुरक्षा कर्मचारी पुरविणेत येत नसल्याने दैनंदिन कामकाजामध्ये अडचणी येत असुन मंदिराचे महाद्वार व दर्शनरांगेचे प्रवेशद्वार येथे आवश्य्ाकतेप्रमाणे माजी सैनीक सुरक्षा कर्मचारी पुरविणेत येत नसलेने श्री साई मंदिराचे व साईभक्तांचे सुरक्षेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. याचेच उदाहरण म्हणजे दि.22/08/2015 रोजी दुपारी 12.35 वाजता नाशिक येथील ए.टी.एस. अधिकारी 1) API श्री गायकवाड, 2) पो.ना. श्री जोहरे, 3) पो.कॉ.श्री पवार, 4) पो.कॉ.श्री जाकीर सय्य्ाद अशा चौघांनी सिव्हील ड्रेसमध्ये गेट नं.03 मधुन प्रवेश करुन हातामध्ये मोठया कापडी पिवळया कलरच्या पिशवीमध्ये डयुप्लीकेट बॉम्ब (आय.डी) घेवून समाधी मंदीर परिसरामध्ये प्रवेश केलेला आहे. दि.06/10/2015 रोजी काही संशयीत पाकीटमार इसमांनी गेट नं.04 ने सोबत चाकु घेवून मंदिर परिसरामध्ये प्रवेश करुन सुरक्षा रक्षकास दमबाजी केलेली आहे. तसेच दि.08/10/2015 रोजी पुन्हा ए.टी.एस. चे अधिकारी यांनी डयुप्लीकेट बॉम्ब घेवून मंदीर परिसरामध्ये प्रवेश केलेला आहे. सदरचे एजन्सीला वारंवार लेखी / तोंडी सुचना देवूनही एजन्सीचे कामामध्ये सुधारणा होत नसल्याने व आवश्य्ाकतेप्रमाणे मंदीर सुरक्षेकामी माजी सैनीक सुरक्षा कर्मचारी पुरविले जात नसल्याने तसेच एजन्सीचे मॉडर्ण व्ही.आर. सिक्युरिटी फोर्स इंडिया प्रा.लि. पुणे यांचे चेकींगकामी नेमलेले कर्मचाऱ्यांवर नियंत्रण नसल्याने त्यांना चेकींगकामी व गणमॅन पुरविणेकामी देण्यात आलेले कंत्राट रद्द करुन त्यांचे ऐवजी माजी सैनीक सुरक्षा बोर्ड यांचेकडून चेकींगकामी व गणमॅन म्हणून घेणेबाबत मंदिर सुरक्षाबाबत दि.17/10/2015 रोजी मा.उपकार्यकारी सो. यांचे समवेत झालेल्या सभेमध्ये चर्चा झालेली आहे. जिल्हा सैनीक कल्याण कार्यालय, अहमदनगर यांचेमार्फत महिला सुरक्षा कर्मचारी पुरविण्यात येत नसल्याने सध्या आहे त्याच महिला कर्मचाऱ्यांची (सिव्हीलीयन) नेमणुक चेकींगकामी करता येईल असे नम्र मत आहे.

जिल्हा सैनीक कल्याण कार्यालय, अहमदनगर यांचेकडून घेणे आवश्य्ाक असलेले कर्मचाऱ्यांचा तपशिल.

| अ.नं. | तपशिल | दररोज आवश्यक कर्मचारी संख्या | प्रत्येकी दरमहा द्यावे लागणारे अंदाजे वेतन | एकुण अंदाजे वेतन |
|---|---|---|---|---|
| 01. | माजी सैनीक सुरक्षा अधिकारी | 01 | 20,000/- | 20,000/- |
| 02. | माजी सैनीक सुरक्षा सुपरवायझर | 03 | 18,000/- | 54,000/- |
| 03. | माजी सैनीक बंदुकधारी (गणमॅन) | 40 | 18,000/- | 7,20,000/- |
| 04. | माजी सैनीक सुरक्षा रक्षक | 48 | 15,000/- | 7,20,000/- |
| | एकुण कर्मचारी संख्या | 92 | | **15,14,000/-** |

तरी श्री साई मंदिराची व साईभक्तांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तातडीची गरज म्हणून जिल्हा सैनीक कल्याण कार्यालय, अहमदनगर यांचेकडून उपरोक्त्ा नमुद तपशिलाप्रमाणे कर्मचारी घेणेस व त्याकामी दरमहा येणाऱ्या अंदाजे रु.15,14,000/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर सुरक्षेकरीता दर्शन रांग चेकींग गेट व महाव्दार येथील चेकींगकामी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहमदनगर हे माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेस तयार आहेत का, याची खात्री करणेत येऊन, त्यासह सदरहू प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **शासनाच्या नविन खरेदी धोरणानुसार निर्णय अंमलात आणणेबाबत.**

**प्रस्ताव-** शासकिय/ निमशासकिय कार्यालय/ मंडळ/ महामंडळ/ शासकिय उपक्रम/ संस्था/ स्वायत्त संस्था/ जिल्हा परिषद/ महापालिका/ नगरपालिका/ नगरपरिषदा व सार्वजनिक उपक्रम इत्यादी अंतर्गत येणा-या कार्यालयांना विविध साधनसामग्री खरेदी करावी लागते. यासाठी दि.३०.१०.२०१५ रोजी महाराष्ट्र शासनाने पुर्वीचे Purchase Manual व दि.०२.०१.१९९२ चा शासन निर्णय व उद्योग उर्जा व कामगार विभागाने निर्गमित केलेले सर्व शासन निर्णय/परिपत्रक अधिक्रमित केले आहेत आणि दि.३०.१०.२०१५ रोजी शासन निर्णय क्रमांक भांखस-२०१४ प्र.क्र.८२/भाग-१११/ उद्योग-८ व्दार शासकिय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियम पुस्तिकेत मान्यता दिली आहे. व सदरील पुस्तिका दि.०१.११.२०१५ पासून अमलात आणण्याचे निश्चित केलेले आहे. सदरील नियम पुस्तिका संस्थानलाही लागू आहे. कारण या शासन निर्णयामध्ये असे स्पष्ट नमुद केलेले आहे की, "विधानसभेच्या कायद्याखाली स्थापीत कोणतीही संस्था व मंडळ किंवा महामंडळ किंवा प्राधिकरण किंवा सोसायटी किंवा न्यास किंवा स्वायत्त संस्था (नाव कोणतेही असले तरी ) अथवा राज्य शासनाचे नियंत्रणाखाली असलेली कोणतही संस्था यांना हा शासन निर्णय लागू असेल."

सदरील नियम पुस्तिकेच्या परिच्छेद १.९.२ मध्ये नमुद केल्यानुसार सर्व विभागांना खरेदी प्रक्रिया पार पाडता यावी, यासाठी प्रत्येक कार्यालयाअंतर्गत खरेदी समिती तात्काळ गठीत करण्यास आदेशीत केले आहे. तसेच परिच्छेद २.९.३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे विभागीय स्तरावर, जिल्हास्तरावर संबंधीत खरेदीदार विभागांनी तात्काळ खरेदी समिती स्थापन करणेबाबत आदेश झालेले आहेत. तेव्हा संस्थानमध्ये शासन निर्णयात नमुद केलेल्या अधिका-यांची चार सदस्यीय खरेदी समिती स्थापन करणे आवश्यक आहे.

समितीची रचना खालीलप्रमाणे असेल

**खरेदी समिती**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कार्यकारी अधिकारी | -- | अध्यक्ष |
| २. | उप कार्यकारी अधिकारी | -- | सदस्य |
| ३. | मुख्य लेखाधिकारी | -- | सदस्य |
| ४. | संबंधीत विभागाचा प्रशासकिय अधिकारी गट-अ | -- | सदस्य सचिव |

या नियम पुस्तिकेत विहीत केलेली खरेदीची पध्दत अवलंबून त्यांनी करावयाच्या बाबी संबंधीत विभागीय खरेदी समिती सर्व निर्णय घेईल. याबाबतीत कोणतीही तफावत असल्यास त्यासाठी विकास आयुक्त यांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक राहील. खरेदी समिती ही खरेदीच्या सर्व म्हणजे तपशिलवार वैशिष्ट्यांना अंतिम स्वरुप देण्यापासुन ते निविदा प्रक्रीयेनंतरच्या संबंधीत सर्व निर्णयासाठी जबाबदार राहील. (निविदा तयारी, प्रसिध्दी, तांत्रिक लिफाफे उघडणे, मुल्यांकन करणे). नियम पुस्तिकेतील परिच्छेद २.१० नुसार खरेदी अधिकारी हा गट ब पेक्षा कमी दर्जाचा नसेल. तो समितीचा सदस्य सचिव म्हणुन काम करेल. संस्थानसाठी सदस्य सचिव म्हणुन प्रशासकिय अधिकारी काम करील.

खरेदी अधिका-याने या नियम पुस्तिकेतील सर्व तरतुदींचे पालन करणे आवश्यक राहील. परिच्छेद पुस्तिकेतील परिच्छेद २.१० नुसार प्रशासकिय अधिका-यांनी म्हणजेच सदस्य सचिवांनी प्रथमतः आवश्यकता, प्रमाण, कालावधी, निधीची उपलब्धता या सर्व बाबींचा प्रस्ताव तयार करुन सर्व खरेदी समिती सदस्य, अध्यक्ष यांचे मान्यता घ्यावी. यासाठी समितीच्या वेळोवेळी बैठका आयोजित कराव्यात. त्यांचे इतिवृत्त ठेवावे. नियम पुस्तिकेनुसार खरेदी समिती सर्व खरेदी कार्यपध्दती, गुणवत्ता नियंत्रण, निविदा दर मुल्यांकन, साधन सामग्रीचे आरक्षण, दरकरार व इतर अनुषांगिक बाबी पार पडतील व निविदा स्विकृतीसाठी व्यवस्थापन समितीसमोर ठेवतील.

उपरोक्तप्रमाणे समिती स्थापन करुन नियम पुस्तिकेतील सर्व तरतुदी तात्काळ लागू करणेबाबत उपरोक्त प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५१४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे शासनाच्या नविन खरेदी धोरणानुसार निर्णय अंमलात आणणेस मान्यता देण्यात आली व त्यासाठी खालीलप्रमाणे खरेदी समितीची रचना करणेत येऊन, संस्थानसाठी विविध खरेदीचे अधिकार या समितीस प्रदान करणेत आले.**

| | | |
|---|---|---|
| **(१) कार्यकारी अधिकारी** | **-** | **अध्यक्ष,** |
| **(२) उपकार्यकारी अधिकारी** | **-** | **सदस्य,** |
| **(३) मुख्यलेखाधिकारी, प्रशासकीय अधिकारी** | **-** | **सदस्य,** |
| **(४) संबंधीत विभागप्रमुख (अधिक्षक/ प्र.अधिक्षक)** | **-** | **सदस्य सचिव.** |

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०९ **संस्थानने भूसंपादनाने घेतलेल्या जमिनीमध्ये असलेल्या बाभळी, काटेरी झाडे-झुडपे काढणेबाबत.**

प्रस्ताव- संस्थान मार्फत निमगांव कोऱ्हाळे, कनकुरी, शिर्डी व नांदुर्खी परिसरात शेती महामंडळाकडुन जमिन खरेदी करण्यात आलेल्या आहेत. खरेदी करण्यात आलेल्या जमिनीचे वेगवेगळ्या ठिकाणी क्षेत्र आहे. संस्थानने शेतीमहामंडळात खरेदी केलेल्या क्षेत्रात सध्या मोठया प्रमाणात बाभळी,काटेरी झाडे- झुडपे उगवलेली आहेत. त्यामुळे सदरचा परिसर अस्वच्छ दिसत आहे. सदर परिसरातील स्थानीक रहिवासी यांनी काट्या काढुन मिळणेबाबत विनंती केलेली आहे. काट्या वाढल्यामुळे चोरांचे प्रमाण, गुन्हेगारीचे अड्डे व शाळेत येणाऱ्या- जाणाऱ्या मुला-मुलींना त्रास होत आहे.

सदरच्या जमिनीमध्ये बाभळी,काटेरी झाडे-झुडपांचे प्रमाण वाढलेले आहे. बाभळी, काटेरी झाडे काढणेबाबत कोळसा करणारे यांना सुध्दा विचारणा करण्यात आलेली होती परंतु त्यांनी झाडे लहान आहे असे सांगीतल्यामुळे संस्थानने सदर परिसरातील बाभळी, काटेरी झाडे काढुन परिसराची सफाई करणे आवश्यक आहे.

संस्थानने भुसंपादनाने घेतलेल्या जमिनीतील बाभळी, काटेरी झाडे- झुडपे भाडोत्री जे.सी.बी लावुन काढून घेता येईल व प्लॉटची सफाई करता येईल. तरी सदर जमिनीमधील काटेरी झाडे - झुडपे, बाभळी काढणेकामी अंदाजे रु. 1,00,000/- (एक लाख) मात्र खर्च अपेक्षित आहे. जे.सी.बी च्या साह्याने बाभळी व काटेरी झाडे- झुडपे काढण्यासाठीचे काम विहीत पध्दतीने दरपत्रके मागवुन काम करुन घेता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.५१५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानने भूसंपादनाने घेतलेल्या जमिनीमध्ये असलेल्या बाभळी, काटेरी झाडे-झुडपे काढणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणा-या अंदाजे रु.१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१० **श्री साईबाबा रुग्णालयात कार्डीओलॉजीस्टची नेमणूक होणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा रुग्णालयाचे मंजुर आकृतीबंधामध्ये इंटरव्हेन्शनल कार्डीओलॉजीस्टचे २ पदे व नॉनइंटरव्हेन्शनल कार्डीओलॉजीस्टचे १ पद मंजूर असुन डॉ.बजाज व डॉ.गौरव वर्मा यांची इंटरव्हेन्शनल कार्डीओलॉजीस्ट म्हणून नेमणुक करणेत आलेली आहे. तथापि डॉ.बजाज व वर्मा यांना त्यांनी केलेल्या गंभीर गैरशिस्त वर्तनाबाबत खाते चौकशी पूर्ण होईपर्यंत दि.०८/११/२०१४ पासुन संस्थान सेवेतून तात्पुरते निलंबीत करण्यात आले आहे.

उपरोक्त दोन्ही डॉक्टर्सना निलंबीत केल्याने रुग्णालयातील रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी सिव्हील ॲप्लीकेशन नं.२७९७/२०१४ वरील मा. उच्च न्यायालयाचा दि. १९/०३/२०१४ रोजीचे आदेशानुसार तात्पुरत्या स्वरुपात Adhoc बेसिसवर सहा महिने कालावधीसाठी कार्डीओलॉजीस्टची नेमणूक करणेकामी मंजुरी मिळालेली होती. सिव्हील ॲप्लीकेशन नं. २९०/२०१५ वरील मा. उच्च न्यायालयाचा दि. १२/०१/२०१५ रोजीचे आदेशानुसार १ वर्ष किंवा डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांची चौकशी पुर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पुढील मंजुरी आलेली आहे. मा. उच्च न्यायालयाच्या मंजुरीनुसार तात्पुरत्या स्वरुपात Adhoc बेसिसवर डॉ. मनोहर शिंदे व डॉ. प्रशांत पवार यांना नेमणूक देण्यात येऊन त्यांना अनुक्रमे मासिक एकत्रित मानधन रुपये तीन लाख, व दीड लाख देण्यात येत आहे. डॉ. प्रशांत पवार यांनी राजीनामा दिल्याने त्यांचे जागेवर डॉ. भारत जैन यांना नेमणूक देण्यात आलेली आहे.

तद्नंतर, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथील सिव्हील ॲप्लीकेशन नं. ३९३७/२०१५ दाखल करणेत आले होते. त्यावर मा. न्यायालयाने दि. १०/०४/२०१५ रोजीचे आदेशानुसार चार कार्डीओलॉजिस्टना Ad hoc बेसिस वर नेमणूक करणेस मान्यता दिलेली आहे. सदर मंजुरीनुसार डॉ. धिरज मोरे यांना नेमणूक देऊन एकत्रित मानधन रुपये एकसष्ट हजार देण्यात येत आहे. डॉ.धिरज मोरे यांनी दि. १०/१०/२०१५ रोजीचे अर्जान्वये त्यांचे मानधनात वाढ करणेबाबत मागणी केली आहे. उपरोक्त कंत्राटी पद्धतीने नेमलेले डॉ. भारत जैन व डॉ. धिरज मोरे यांची शैक्षणिक पात्रता एकसारखीच असल्याने त्यांच्या मागणीचा विचार करता येईल.

आता, डॉ.निखीला अंकुर पाचाणी, गुजरात, डीएम (कार्डीयाक) यांनी कार्डीओलॉजीस्ट पदावर सेवा करणेकामी अर्ज केला आहे. श्री साईबाबा हॉस्पिटलकडील रुग्णांची संख्या बघता त्या प्रमाणात कार्डीओलॉजीस्टची आणखी आवश्यकता भासत आहे.

सबब, डॉ.निखीला अंकुर पाचाणी यांना कार्डीओलॉजीस्ट या पदावर एक वर्ष किंवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या Ad hoc बेसिस वर नेमणूक देऊन मा. न्यायालयाचे दि.१०/०४/२०१५ रोजीचे आदेशानुसार पूर्वीच कामावर हजर झालेल्या डॉ.धिरज मोरे यांना तसेच आता नव्याने घेण्यात येणा-या कार्डीओलॉजीस्ट यांना मसिक एकत्रित मानधन रुपये दीड लाख देता येईल.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.५१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयामध्ये Ad-Hoc basis वर कार्डीओलॉजीस्टची नेमणूक करणेकामी सविस्तर फेर-प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.११** **श्री विवेकानंद मेडिकल ॲण्ड एज्युकेशनल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय, राहुरी येथील पोस्ट ग्रज्युएट विद्यार्थी प्रशिक्षणासाठी संस्थान रुग्णालयात घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रूग्णलयात सध्या दैनंदिन अंदाजे १००० ते १२०० बाहय रूग्ण तपासले जातात. तसेच रूग्णालयात एकुण ३०० ऑपरेशनल बेड असून दररोज ४० ते ५० शस्त्रक्रिया केल्या जातात. रूग्णालयाचे काम अलीकडील ३ ते ४ वर्षात खुपच वाढले असून, त्या प्रमाणात डॉक्टरांची संख्या मात्र पुर्वी पेक्षाही कमी झालेली आहे. सध्या श्री साईनाथ रूग्णालयात विरार येथील होमीओपॅथीक मेडीकल कॉलेज, विरार यांचेकडील ०८ प्रशिक्षाणार्थी डॉक्टर दर चार महिन्याकरिता नियमित येत असतात तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/०६/२०१४ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.३३८ अन्वये श्री विवेकानंद मेडीकल ॲण्ड एज्युकेशनल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय, राहुरी येथील प्रशिक्षणार्थी डॉक्टरांना प्रशिणासाठी दर अडीच महिन्याकरिता परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार सध्या ०७ प्रशिक्षाणार्थी विद्यार्थी प्रशिक्षाणासाठी कार्यरत आहेत. त्यामुळे रूग्णालयातील रूग्ण सेवा सुरळीत चालणेसाठी नक्कीच हातभार लागत आहे. परंतू त्यांची संख्या अपूरी पडत आहे.

आता, जा.क्र. २९६/२०१५-१६ दि.१९/०९/२०१५ पत्रान्वये व जा.क्र.३६३/२०१५-१६ दि.१२/१०/२०१५ ई-मेल व्दारे श्री विवेकानंद मेडीकल ॲण्ड एज्युकेशनल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय, राहुरी यांनी पोस्ट ग्रॅज्यूएट करणारे स्त्रीरोग प्रसुतीतंत्र (Gynaec&obstatrics) कायचिकित्सा (Medicine) नेत्ररोग (Ophthalm) या प्रत्येक विभागातील ०२ विद्यार्थी म्हणजे एकुण ०६ विद्यार्थी डॉक्टरांना श्री साईनाथ रूग्णालयात प्रशिक्षणासाठी ०६ महिन्याकरिता परवानगी द्यावी म्हणून त्यांनी विनंती केलेली आहे. सदर महाविद्यालय भारतीय चिकीत्सा केद्रीय परिषद, नवी दिल्ली येथील कौन्सीलकडे मान्यता प्राप्त असून महाविद्यालयाचा रजिष्टर नंबर ३-१४/९० Auy.(III) दि.१६/०४/१९९१ असा आहे.

श्री साईनाथ रूग्णालयातर्फे दैनंदिन रूग्णालयीन सेवांव्यतिरिक्त प्रथमोपचार केंद्र, फिरते वैद्यकीय पथक, वृध्दाश्रमातील रूग्णांना भेटी, उत्सव काळात पालखी मार्गावर मोबाईल सेवा तसेच साईआश्रम भक्तनिवास व श्री साई प्रसादालय परिसरात प्रथमोपचार केंद्र इत्यादी वैद्यकीय सेवाही नियमितपणे द्याव्या लागतात. उपरोक्त प्रमाणे आयुर्वेद महाविद्यालय, राहुरी येथील पोस्ट ग्रॅज्यूएट विद्यार्थी डॉक्टरांना रुग्णालयातील पुर्णवेळ वैद्यकीय अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणांकरीता संस्थान रुग्णालयामध्ये परवानगी दिल्यास त्यांचा निश्चितच रुग्णसेवा देण्यास मदतच होईल. या प्रशिक्षणांर्थी डॉक्टरांना संस्थानतर्फे कुठल्याही प्रकारचे मानधन अथवा विद्यावेतन द्यावे लागणार नाही. त्यांना आयुर्वेद महाविद्यालय, राहुरी येथिल प्रशिक्षणांर्थी विद्यार्थी प्रमाणेच शेअरिंग बेसिसवर संस्थानतर्फे मोफत निवास व्यवस्था व जेवनाची व्यवस्था करावी लागेल.

तरी श्री विवेकानंद मेडीकल ॲण्ड एज्युकेशनल ट्रस्टचे आयुर्वेद महाविदालय, राहुरी येथील पोस्ट ग्रॅज्यूट करणारे स्त्रीरोग प्रसुतीतंत्र (Gynaec & obstatrics) कायचिकित्सा (Medicine) नेत्ररोग (Ophthalm) या प्रत्येक

विभागातील ०२ विदयार्थी म्हणजे एकुण ०६ विद्यार्थी डॉक्टरांना दर ०६ महिन्याकरिता संस्थान रुग्णालयात प्रशिक्षणसाठी घेणेस तसेच आयुर्वेद महाविदालय, राहुरी येथील प्रशिक्षणार्थी विद्यार्थीप्रमाणे शेअरिंग बेसिसवर संस्थातर्फेमोफत निवासव्यवस्था व जेवणाची व्यवस्था करणेस मान्यता मिळणेस सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.५१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री विवेकानंद मेडिकल ॲण्ड एज्युकेशनल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय, राहुरी येथील पोस्ट ग्रज्युएट विद्यार्थी संस्थान रुग्णालयामध्ये प्रशिक्षणासाठी घेणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **मा.विश्वस्तांच्या सूचनांबाबत.**

**निर्णय क्र.५१८** **मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करणेत आल्या.**

**(१)** संस्थान कायम कर्मचा-यामधील ब-याचशा कर्मचा-यांना ते करत असलेल्या कामाचे स्वरुप समजत नसल्याचे निदर्शनात आले असून कर्मचा-यांनी नम्रतेने, आदरपुर्वक व सेवाभाव वृत्तीने काम करावे, याकरीता कर्मचा-यांच्या कामाच्या स्वरुपाचे प्रशिक्षण देण्यासाठी कार्यशाळा आयोजित करणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

(२) केंद्र शासनाची अटल पेन्शन योजना संस्थान कर्मचा-यांना लागू करणेबाबत अभ्यास करुन सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ मुख्यलेखाधिकारी)

---

वरील निर्णय क्र.४३६ ते ५१८ सर्वानुमते घेण्यात आला.

यानंतर सकाळी १३.४० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/-xxx | स्वाक्षरित/- xxx | स्वाक्षरित/- xxx |
| (अप्पासाहेब शिंदे) | (अनिल कवडे) | (श्रीकांत कुलकर्णी) |
| उपकार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| | सदस्य | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी**